# उलटलेलीं पानें

१५६१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र अ
सं. क्र. ९८०

प्रा.
माधव
दामोदर
अळतेकर

REFBK-0011608
REFBK-0011608

# उलटलेलीं पानें

## ( आत्मचरित्र )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 30668 वि: चरित्र
क्रमांक 980 नों: दि: 23/6/69

लेखक :

कै. माधव दामोदर अळतेकर

संपादक :

मनोहर माधव अळतेकर

19206

REFBK-0011608

REFBK-0011608

१५ मार्च १९६ … त पांच रुपये

मॉडर्न बुकडेपो प्रकाशन

# आभार


माझ्या वडिलांनीं आपलें आत्मचरित्र १९५४-१९५५ ह्या वर्षांत घरांतल्या माणसांच्या, मित्रांच्या आणि खुद्द डॉक्टरांच्या आग्रहामुळें आजार ऐन भरांत असतांना, त्यापासून मनाला थोडाफार विरंगुळा मिळावा म्हणून लिहिलें. वडिलांच्या लेखणीचें सामर्थ्य त्यांच्या प्रकृतीप्रमाणेंच क्षीण झालेलें होतें. मूळ आत्मचरित्र आज छापत आहोंत त्याच्या दुप्पट आहे. पण विस्मरण, पाल्हाळ, पुनरुक्ति, अनिवार तपशील असे अनेक दोष त्यांत असल्यामुळें छापण्यापूर्वी आत्मचरित्राचें संपादन करावें लागले. संपादन करतांना मजकूर कमी केला, पण कोठेंहि वाढविला नाहीं किंवा एका शब्दानेंहि बदलला नाहीं, हें संपादन करतांना माझे मित्र प्रा. ग. प्र. प्रधान ह्यांची फार मदत झाली. संपादित केलेल्या आत्मचरित्राची सुवाच्य आणि शुद्ध मुद्रणप्रत श्री. देविदास बागूल ह्यांनीं करून दिली. ह्या दोघांचा मी आभारी आहें. मॉडर्न बुकडेपोचा व वडिलांचा ऋणानुबंध फार जुना आहे. मॉडर्न बुकडेपोनें प्रसिद्ध केलेल्या ' संपूर्ण आगरकरां 'चें संपादन वडिलांनीं केलेलें आहे. हें लक्षांत घेऊन मॉडर्न बुकडेपोतर्फें ही ' इतिहासाची पुनरावृत्ति ' करण्यांत ' चित्रमयजगत् 'चे संपादक श्री. रा. प्र. कानिटकर ह्यांनीं पहिल्यापासून जो नेट धरला त्याबद्दल त्यांचे कितीहि आभार मानले तरी थोडेच होतील.

सुप्रसिद्ध चित्रकार आणि टीकाकार श्री. गोडसे हे माझ्या वडिलांचे विद्यार्थी ! वडिलांच्या कुठल्याच पुस्तकाला त्यांच्याकडून अंगरखा ( Jacket ) बेतून घेण्याचा योग आला नाहीं. पण ह्या आत्मचरित्रामुळें तो आला. वडिलांचे एक जुने मित्र श्री. सदाशिव रावजी खांदेवाले ह्यांनीं मागील पुस्तकांप्रमाणेंच ह्याहि पुस्तकाची सूचि तयार करून दिली. गोडसे आणि खांदेवाले ह्या दोघांचाहि मी आभारी आहें.



प्रो. माधव दामोदर अळतेकर

जन्म : १८९० ] [ मृत्यु : १९५९



**सेवानिवृत्तीच्या समारंभाचें छायाचित्र ( १९५१ )**

(१) सौ. मालतीबाई अळतेकर, (२) महामहोपाध्याय पां. वा. काणे, (३) प्रो. ह. दा. वेलणकर, (४) प्रो. मा. दा. अळतेकर, (५) डॉ. र. पु. परांजपे, (६) रे. डॉ. केलॉक.

१

तेव्हां मी दहा एक वर्षांचा असेन. माझे वडील वारून सहा वर्षें होऊन गेलीं होतीं. घरीं मी, माझा धाकटा भाऊ कृष्णा आणि आई अशीं आम्ही तीनच माणसें होतों. सप्टेंबर कां ऑक्टोबर महिन्यांत माझी मराठी चौथी इयत्ता मंगळवार पेठेंतल्या शाळेंत सर्व विषयांत पसार झाली होती; आणि कोणत्या इंग्रजी शाळेंत जावयाचें याबद्दल आमचा विचार चालला होता. त्या वेळीं मी विचार करण्यासारखा नव्हतोंच. पण प्रायव्हेट इंग्लिश स्कूलपेक्षां राजाराम हायस्कूलमध्येंच नांव घालावें असें मला वाटत होतें. १९०० सालचा तो ऑक्टोबर महिना होता. कोल्हापुरांत पावसाळा संपून गेला होता व हिंवाळ्याला हळूंहळूं सुरुवात होत होती. मी आणि माझा मित्र विष्णु कृष्ण गोखले यांनीं घरच्या मंडळींची संमति पूर्णपणें मिळवून हायस्कुलांत जाण्याचें ठरविलें. हायस्कूलमध्यें प्रायव्हेट स्कूलपेक्षां फी अधिक होती. पण हायस्कूलमध्यें तेथल्यापेक्षां स्कॉलरशिप्स कितीतरी अधिक होत्या. शिवाय आम्हीं जो प्रवेश केला होता तो राजाराम कॉलेजच्या इमारतींत! त्या वेळीं कॉलेज बंद असल्यानें आमची पहिली इयत्ता पण तेथेंच भरली होती. भरली होती म्हणजे सुरुवातीला तिच्यांत अवघीं तीनच मुलें होतीं. मी, विष्णुअण्णा गोखले आणि तिसरा (बहुतेक) गणेश विठ्ठल कुंभोजकर.

हायस्कूलमध्यें गेल्यावर अगदीं थोड्या दिवसांत म्हणजे नाताळच्या सुट्टींत (१९०० साल) आम्हीं हवाफेरासाठीं म्हणून शहरांतून शाहुपुरींत कोल्हापूरच्या रेल्वेस्टेशनजवळ रहावयास गेलों. तेथें आम्हीं तीनचार आठवडे राहत होतों. आमच्या शेजारीं आमच्या मावशीचे दीर डॉ. वामन बाजी रुईकर आणि त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई हे राहत होते.

जानेवारी महिना निम्मा झाल्यावर न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांचा मृत्यु झाल्याची बातमी आली. ती बातमी माझ्या आईला सौ. लक्ष्मीबाईनीं सांगितली. मी या वेळीं पावणेदहा वर्षांचा होतों. वर्तमानपत्रें वाचीत होतों. केसरी व सुधारक या दोन्ही पत्रांत रानड्यांच्या मृत्यूबद्दल वाचलें. पुढें दोन किंवा तीन महिन्यांनीं आम्हीं इंग्रजी पहिल्या इयत्तेंतल्या चार पांच मुलांनीं मिळून रानडे वाचन मंदिर म्हणून छोटीशी संस्था काढली. प्रत्येकानें चार चार आणे वर्गणी दिली होती. शिवाय प्रत्येकानें आपल्या घरांतील चार-पांच पुस्तकेंहि दिलेलीं होतीं. 'हातीमताई,' 'गुलबकावलि,' 'ठकसेन राजपुत्राच्या गोष्टी' अशासारखीं दहावीस पुस्तकें आम्ही एकत्र गोळा करून हें वाचनमंदिर काढलें. आमची वर्गणी रुपया दोन रुपये गोळा झालेली होती. तेवढ्यांत काय विकत घेणार ? आणि त्यांत आम्हांला कळत तरी काय होतें ? पण महिनाभर विचार करून 'बालबोध' हें निर्णयसागर छापखान्यांतून प्रसिद्ध होणारें मासिक आम्हीं घेण्याचें ठरविलें. या मासिकाची वर्षाची वर्गणी आणे आठ, टपालखर्च वर्षाचा आणे तीन मिळून आणे अकरा आणि मनिऑर्डरचा खर्च एक आणा मिळून बारा आणे आम्हीं एक दिवस खर्च करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें आम्ही तिघे-चौघे एक दिवस पोस्टऑफिसांत जाऊन निर्णयसागर छापखाना मुंबई यांजकडे अकरा आण्यांची मनि-

ऑर्डर पाठविली. आणि काय होतें याची उत्सुकतेनें वाट पाहत बसलों. चार पांच दिवसांनीं 'बालबोध'चा एप्रिल १९०१ चा अंक आमच्याकडे आला. आमच्यापैकीं प्रत्येकानें तो डोळे भरून वाचला. आम्ही आतां बालबोधाचे वर्गणीदार वर्गणी भरून झालों होतों. अशा प्रकारें न्यायमूर्ति रानडे यांचें स्मारक आम्हीं त्या वेळीं केलें.

पुढें चार महिन्यांत आम्हां चार पांच जणांतच कांहीं वादविवाद उत्पन्न झाला, भांडण झालें व बालबोध मासिक बंद करण्याचें ठरलें. व्यवहाराची आम्हाला कांहीं माहिती नव्हती. आमच्या सुदैवानें प्रस्तुत प्रकरणांत त्याची कांहीं आवश्यकता उत्पन्न झाली नाहीं. आम्हीं बालबोधच्या मॅनेजरला पत्र लिहिलें कीं आमचें वाचनमंदिर बंद होणार; तेव्हां आतांपर्यंत पाठविलेल्या अंकांचे पैसे घेऊन उरलेले पैसे परत पाठविण्यांत यावेत. आम्हीं पाठविले होते अकरा आणे. पैकीं सहा अंक आले होते. पांच सहा दिवसांनीं आम्हांला पत्र आलें. त्या पत्रांत पांच कीं साडेपांच आण्यांचीं तिकिटें परत पाठविलीं होतीं. ही गोष्ट निर्णयसागरचे तेव्हांचे मालक तुकाराम जावजीशेट मरण पावल्यानंतर मी इंदुप्रकाशांत प्रसिद्ध केली होती. अशा प्रकारें आमचें रानडे स्मारक प्रकरण पांच सहा महिन्यांतच आटोपलें. पण निर्णयसागर छापखान्याच्या उत्कृष्ट वागणुकीचा परिणाम आमच्यापैकीं प्रत्येकाच्या मनावर कायमचा बिंबला.

आमचे इंग्रजी पहिलीचे मास्तर रा. दत्तोपंत श्रीखंडे हे होते. पुढें कांहीं दिवस ते आमचे दुसरीचेहि मास्तर होते. पण दुसऱ्या इयत्तेला मुख्यत्वेंकरून रा. विरमाडकर उर्फ भागवत हे मास्तर होते, दत्तोपंत श्रीखंडे हे लेखनपटु होते. त्यांनीं एक पद्यरत्नकरंडक तयार केला होता. आणि तो आमच्या शाळेंत पहिल्या दोन किंवा तीन इयत्तांत शिकवीत. त्यांनीं एक अंकगणिताचेंहि पुस्तक लिहिलें होतें. पण

आमच्या वेळीं गोपाळ कृष्ण गोखले यांचेंच अंकगणित सर्वमान्य होतें. नामदार गोखले ह्यांचें हें अंकगणित खरोखर फार चांगलें होतें. कित्येक वर्षें तें आमच्या हायस्कुलांतून चालू होतें.

मला इंग्रजी शाळेंत गेल्यापासूनच मराठी लिहिण्याचा नाद लागला. माझ्या घरीं माझ्या मावशीचे पति रा. बापूरावकाका रुईकर हे मला वरचेवर सांगत, "बाबारे, अगोदर अभ्यास चांगला कर. पुढें अभ्यास संपल्यावर लिहिण्याच्या मागें लाग." पण मला लिहिण्याचा नाद वयाच्या दहाव्या अकराव्या वर्षापासूनच लागला असें वाटतें. कोल्हापूरच्या 'समर्थ' या साप्ताहिक पत्रांत मी इंग्रजी तिसऱ्या इयत्तेंत असतांना किंवा त्यापूर्वीं 'भारतीय विद्यार्थी' या विषयावर चार-पांच लेख पाठविले होते आणि ते त्यांनीं प्रसिद्धहि केले. या वेळीं मला साध्यासुध्या कविता करण्याचाहि नाद होता असें स्मरतें. श्रीखंडे मास्तरांनीं दोनतीन नाटकेंहि लिहिलीं होतीं. पण काय असेल तें असो, तीं केव्हांहि रंगभूमीवर अवतरली नाहींत. मी श्रीखंडे मास्तरांच्या घरीं आठ-दहा दिवसांतून जात असे. त्या वेळीं ते मला आपली ग्रंथरचना वाचून दाखवीत. पुढें मी पुण्याला आल्यावरहि त्यांनीं मला सदर नाटकें एखाद्या नाटकमंडळीकडे खपतील का असें विचारलें होतें. पण माझ्या विशेष ओळखी नाटककंपनींतून नसल्यामुळें माझ्या हातून श्रीखंडे मास्तरांना कांहींहि साहाय्य झालें नाहीं.

आमचे दुसरीचे शिक्षक विरमाडकर उर्फ भागवत हे अगदीं निराळ्या प्रकारचे गृहस्थ. डोक्याला एक टोपी घालून हे वर्गांत येऊन बसत. ते दोनतीन तासांनीं सुटीची वेळ झाली कीं वर्गांतून उठून जात. मुलें यांच्या टोपींत अगदीं हलक्या हातानें एखादी काडी उभी करीत, किंवा असाच कांहींतरी चावटपणा करीत. यांना सर्व मुलें 'धाम्या पिशा' म्हणत असत. कधी वर्गांत फारच

आरडाओरड किंवा दंगा झाला तर हे मुलांना शिव्या देत. वेळ-प्रसंगीं एखाद्या मुलावर मार देण्याचा प्रयोगहि करीत. आमच्या बरोबरचा गणपति कुंभोजकर हा मुलगा विशेष व्रात्य होता. एकदां त्यानें वर्गांत दोन कीं तीन रुपयांचा चिवडा आणला होता. तो चिवडा सर्व मुलांनीं मिळून वर्गांतच मास्तरांच्या समोर खाऊन टाकला. मास्तर पेंगत बसले होते. पुढें कांहीं तंटा झाला. त्या तंट्यांत गणपतीचा भाग होता. तेव्हां मास्तरांनीं त्याला बोलावून जबाब विचारला व रागावून त्याच्या एक कानशिलांत ठेवून दिली. त्या चपराकीच्या तडाक्यांत त्याच्या कानांतील बिगबाळीचा एक मोती कोठें नाहींसा झाला. पुढें गणपतीनें ही तक्रार आपल्या घरीं नेली. त्याच्या घरचीं माणसें शाळेंत आलीं. तेव्हां त्यांच्यापुढें आमच्या मास्तरांना 'क्षमस्व' म्हणावें लागलें. पण सदर मास्तरांची सर्वच मुलें टवाळी करीत यांत शंका नाहीं. अशा प्रकारची टवाळी श्रीखंडे मास्तरांची कोणी कधीं केली असें मला आठवत नाहीं. त्यांचा मुलांवर चांगला दाब असे. पुढें मी कॉलेजांत गेल्यावर विरमाडकर मला एकदां भेटले होते. त्यावेळीं त्यांनीं माझी चांगल्या प्रकारें विचारपूस केली.

आम्ही इंग्रजी पहिलींत असतांनाच जानेवारी—फेब्रुवारी महिन्यांत केव्हांतरी शहरापासून तीन मैल किंवा फार तर चार मैल दूर असलेल्या प्रयाग या क्षेत्रावर एक दिवस गेलों होतों. तेव्हां कॉलेज-हायस्कूलचे मिळून दोनतीनशें विद्यार्थी आणि सर्व शिक्षक, प्रोफेसर व शिवाय निदान पन्नास एक राजारामियन गृहस्थ हजर होते. माझ्या लहानपणचा हा दिवस अद्यापिहि माझ्या स्मरणांत उत्तम प्रकारें आहे. आलेल्या राजारामियन मंडळींत तेव्हांचे मिरज संस्थानचे अधिपति श्रीमंत बाळासाहेब हेंहि होते. प्रयाग येथें पंचगंगा व दुसरी

एक नदी यांचा संगम आहे. वर्षांतून एक महिना त्याला प्रत्यक्ष प्रयागक्षेत्राचें माहात्म्य असतें. तेथें हा विद्यार्थ्यांचा आणि गृहस्थांचा प्रचंड मेळा दरसाल जात असे. १९०१ सालानंतर कोल्हापूरचें वातावरण हळूं हळूं बदलूं लागलें. आणि त्यामुळें हा मेळाहि पुढें दोनतीन वर्षांत बंद पडला, असें मला वाटतें. आमच्या आठवणींत हा १९०१ सालचा प्रयागला गेल्याचा समय फार उत्तम प्रकारें राहिलेला आहे. अकरा बारा वाजेपर्यंत आम्ही स्नानांत दंग होतों. बारा वाजल्यानंतर आम्ही जेवावयास बसलों. दोन चार विद्यार्थ्यांनीं प्रत्येकीं दहा बारा बुंदीचे लाडू खाण्याचा विक्रम केला. पुढें चार वाजतां सभा भरली. त्यांत कांहीं भाषणें होऊन वर आलेल्या मुलांना सभेचे अध्यक्ष ( बहुधा श्रीमंत बाळासाहेब मिरजकर ) यांनीं बक्षिसें दिलीं. संध्याकाळीं आम्ही सर्व मंडळी घरीं परत आलों.

या प्रयाग समारंभांत ज्यांचीं भाषणें झालीं त्यांत पाहिलें बक्षिस पाटणकर नांवाच्या (बहुधा प्रिव्हियस वर्गांत असलेल्या) विद्यार्थ्याला मिळालें. त्यानें भाषण खरोखर जोरदार व परिणामकारक केलें होतें. त्याचें भाषण ऐकून आणि त्याला मिळालेलें बक्षिस पाहून माझ्या मनांत त्यावेळीं आपण वक्ता व्हावें अशी तीव्र इच्छा झाली. पुढें एकदोन वर्षांनीं मी गणपतिउत्सवांत ज्यांना बक्षिस लावलें होतें अशा भाषणसमारंभांत भाग घेतला आणि एका भाषणांत दुसऱ्या नंबरचें व दुसऱ्या भाषणांत पहिल्या नंबरचें अशीं बक्षिसेंहि मला मिळालीं. बक्षिसाची रक्कम तीन चार रुपये अशी कांहीं असेल. पण त्यावेळीं तीन चार रुपये ही लहान रक्कम नव्हती. अशा प्रकारें माझ्या अंतःकरणांत वक्ता आणि लेखक बनण्याची इच्छा अगदीं लहान वयांत झाली. त्यामुळें जरी माझी पुष्कळ लोक वाहवा करीत तरी माझ्या अभ्यासांत बराच व्यत्यय आला असें मला वाटतें. माझ्या

घरीं मला अमुक प्रकारें वाग किंवा तमुक प्रकारें वागूं नकोस असें सांगणारा तसा कोणी वडीलधारा माणूस नव्हता. त्यामुळें लहानपणापासून नियमितपणा आणि शिस्त याकडे माझें दुर्लक्ष झालें असें आतां मला वाटतें. पण नियमितपणा आणि शिस्त यांच्या शासनांत असलेल्या पुष्कळ मंडळींचेंहि पुढें काय झालें हें पाहिलें म्हणजे मला त्याबद्दल फारसें नाखूषहि होतां येत नाहीं. मी पुढें गणपतिसमारंभांत वगैरे वक्ता म्हणून थोडा थोडा भाग घेऊं लागलों. त्यापासून मला दोन-चार रुपयांची प्राप्तिहि होऊं लागली. तसा शाळेंत माझा अभ्यास वाईट नव्हता. साधारणपणें हुषार मुलांत माझी गणना होत असे. तरी पण जर माझ्या पाठीमागें कोणाचें दिग्दर्शन असतें तर माझ्या जीवनक्रमाला निराळें वळण लागलें असतें असें केव्हां केव्हां वाटतें. पण जें झालें त्यांतहि कांहीं फारसें बिघडलें नाहीं असें माझ्या परिचयाच्या कित्येक हुषार आणि यशस्वी विद्यार्थ्यांचें पुढें काय झालें हें लक्षांत घेऊन मला वाटावयास लागलें.

तीन इयत्तापर्यंत आमचा वर्गहि हळूंहळूं मोठा होत गेला. आमच्या वर्गात या वेळीं जीं मुलें होतीं त्यांची मोठी गट्टी असल्यासारखी होती. त्यांत प्रथम नांव विष्णु कृष्ण गोखले यांचें घातलें पाहिजे. ते आणि मी हायस्कुलांत मिळून प्रविष्ट झालों होतों. पण मंगळवारच्या मराठी शाळेंतहि अगदीं बिन इयत्तेपासून ते चौथ्या वर्गापर्यंत पांचहि वर्षे आम्ही एकाच वर्गात आणि बहुतेक एकाच शाळेंत होतों. बहुतेक म्हणण्याचें कारण मध्यंतरीं एक वर्ष मी, रहावयाचें घर बदलल्यामुळें कोटीच्या शाळेंत होतों. पण माझी मंगळवारच्या शाळेंत गोखले यांजबरोबर जी दोस्ती जमली ती आजतागायत कायम आहे.

मंगळवारच्या शाळेंतल्या गोखल्यांच्या खेरीज दुसरे सोबती म्हणजे शंकरराव इंदूलकर. हे मंगळवारच्या शाळेंत गादीचे जोडे घालून

येत आणि लहानशी गादी त्यांचा नोकर घालून देई त्यावर बसत. यांची माझी पुष्कळ दोस्ती झाली. दुर्दैवानें कांहीं वर्षांपूर्वी त्यांचा मृत्यु झाला त्यावेळपर्यंत आम्ही उत्तम मित्र होतों.

मराठी शाळेंतील हे माझे दोन मित्र. मराठी शाळेंत आमच्या वर्गांत पंचवीस तीस मुलें असलीं तर त्यांत ब्राह्मणाचीं दोनचार असत. बाकी सर्व बहुतेक मराठ्यांचीं. या मराठे मंडळींतहि माझे पुष्कळ मित्र होते. पण त्यापैकीं शंकररावांखेरीज इंग्रजी शाळेंत कोणी आलें असें वाटत नाहीं.

१९०३ च्या दिवाळीपूर्वी आमची इंग्रजी तिसरी इयत्ता उतरली व इंग्रजी चवथ्या इयत्तेंत प्रवेश झाला. इंग्रजी चवथ्या इयत्तेंत अभ्यासाचें स्वरूप बरेंच बदललें. पहिल्या तीन इयत्तांपेक्षां कितीतरी पटीनें अभ्यास इंग्रजींतून होऊं लागला. अगोदर गणित विषयांत केवळ अंकगणित होतें. आतां त्यांत बीजगणित आणि भूमिति हे नवीन विषय आले. आतांपर्यंत इंग्रजी आणि मराठी या दोन भाषांचा ( गद्य व पद्य ) अभ्यास चालला होता. त्यांत आतां संस्कृतचा इंग्रजींतून अभ्यास सुरू झाला. डॉ. भांडारकरांचें पहिलें संस्कृत पुस्तक शिकण्यास आम्हीं सुरुवात केली. भांडारकरांच्या पुस्तकांतील इंग्रजी कळणें ही एक कठीण गोष्ट होती. बीजगणित आणि भूमिति यांचीं पुस्तकेंच मुळीं इंग्रजी भाषेंत. शिवाय इतिहास आणि भूगोल हे विषयहि इंग्रजींतूनच अभ्यासावयाचें. आम्हांला संस्कृत शिकविण्यासाठीं एक मास्तर आणि एक शास्त्री होते. हे शास्त्री म्हणजे त्या काळचे विद्वच्छिरोमणि गणेशशास्त्री रुकडीकर. गणेशशास्त्री म्हणजे पट्टीचा विद्वान होता. त्यांनीं शब्दरूपावलि वगैरे इंग्रजी चवथीला शिकवायची म्हणजे खरोखर हास्यास्पद होतें. पण दरमहा मिळणाऱ्या पगारासाठीं त्यांना तें करावें लागत असे. एरवी गणेशशास्त्र्यांची योग्यता

अपूर्व होती. पण त्यांना इंग्रजीचा बिलकुल गंध नव्हता. शास्त्री-पंडितांच्या सभेंत गणेशशास्त्री तळपून दिसत. ते १९०५ सालीं सेवा-निवृत्त झाले असावेत. त्यांना निरोप देण्याचा समारंभ त्या वर्षी कोल्हापूरच्या लायब्ररींत झाला. त्या वेळीं विद्यार्थ्यांतर्फे जीं भाषणें झालीं त्यांत माझेंहि एक होतें. ते बरेंच चांगलें झालें असें माझी पाठ थोपटून तीनचार शिक्षकांनीं मला सांगितलें.

आम्ही या वेळीं मंगळवार पेठेंत रा. रा. कृष्णराव मराठे ह्यांच्या शेजारीं राहत होतों. मराठे त्या वेळीं सरकारी रेव्हेन्यू खात्यांत अंमलदार होते. पण तिकडे बदली होण्यापूर्वी ते हायस्कुलांत गणिताचे शिक्षक होते. त्यांनीं एक दिवस मला हांक मारून आपण तुला गणित विषय शिकवूं म्हणून सांगितलें. त्यांच्याकडे इंग्रजी सातवींतील म्हणजे मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेस बसावयाचीं कितीतरी मुलें गणितांतील प्रश्न विचारावयास येत. त्यांना ते हॉल आणि नाईट यांच्या बीजगणितां-तील कांहीं इंग्रजी वाक्यांचे अर्थ विचारीत. Too much attention cannot be given अशी सुरुवात झालेलें एक वाक्य या पुस्तकांत आहे. त्याचा अर्थ ते अशा विद्यार्थ्यांना विचारीत. प्रत्येक मुलगा त्याचा अर्थ 'इकडे फारसें लक्ष देण्याची जरूरी नाहीं.' असा सांगे. त्याबरोबर ते लागलीच विचारीत, "हें पुस्तक तुम्हीं कधीं वाचलें आहे काय?" मुलगा बहुधा म्हणे, "सर्, पुस्तक वाचण्याचा प्रश्नच येत नाहीं. कारण यांतील उदाहरणें तेवढीं आम्हांला सोडवावीं लागतात." तेव्हां कृष्णराव सांगत, "बाबारे, या पुस्तकांतील विवेचन जर तुला कळेल तर माझ्यासारख्या शिक्षकाची जरूरीसुद्धां लागणार नाहीं. तर हीं पुस्तकें समजावून घेऊन वाचत चला." मला त्यांनीं तोच उपदेश केला. त्यामुळेंच पुढें मॅट्रिकच्या परीक्षेंत मला दोनशेंपैकीं दीडशे मार्क मिळाले. गणित विषय हा माझा पुष्कळ दिवस आवडता

विषय होता, पण पुढें मजवर अनेक कौटुंबिक आपत्ति आल्या. त्यांच्या निस्तारासाठीं मला तो विषय सोडावा लागला ही गोष्ट निराळी.

रामभाऊ रानडे म्हणून आमच्या वर्गाचे नव्हत, पण अधून मधून वर्ग घेणारे एक शिक्षक असत. त्यांना पोथ्यापुराणांचा पुष्कळ नाद होता. कोल्हापूर विठोबाच्या देवळांत होणाऱ्या नारळीकर शास्त्री यांच्या पुराणश्रवणास ते पुष्कळ वेळां किंबहुना नियमानें प्रत्यहीं येत असत. मलाहि लहानपणीं पुराणश्रवणाचा फार नाद होता. नारळीकर शास्त्री यांच्या मुखांतून मीं संपूर्ण 'भागवत,' 'रामायण' आणि 'महाभारत' यांचें श्रवण केलें आहे. नारळीकरशास्त्री हे तेव्हांच कोल्हापूरांतील नामांकित पुराणिक होते. त्यांचा भागवताचा सप्ताह मी निदान दोन वेळां तरी ऐकलेला आहे. या सप्ताहांत ते सकाळीं मूळ संस्कृत वाचीत आणि दुपारीं दोन वाजेपासून ते रात्रीं सात किंवा आठ वाजेपर्यंत सकाळीं वाचलेल्या भागाचा अर्थ सांगत असत. सप्ताह आटोपल्यानंतर एक दिवस शास्त्रीबुवा त्याचें पारणें करीत आणि त्या दिवशीं पुष्कळ लोकांना बोलावून जेवण घालीत. अशा एका भोजनप्रसंगीं मलाहि निमंत्रण होतें, व मी तेथें गेलों होतों असें मला आठवतें. शास्त्रीबुवांची आणि माझ्या वडिलांची उत्तम माहिती होती असेंहि मला आठवतें. नारळीकर-शास्त्री यांच्या पुराणश्रवणानेंच माझा 'महाभारत,' 'रामायण' आणि 'भागवत' या ग्रंथांशीं उत्तम परिचय झाला. आतां पन्नास पंचावन वर्षें होऊन गेलीं आहेत तरी शास्त्रीबुवांची मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर आहे. इतका शुद्ध, स्वच्छ आणि निरलस पुराणिक मी दुसरा पाहिला नाहीं. शास्त्रीबुवांच्या पुराणश्रवणाप्रमाणेंच मला लहानपणीं कीर्तनश्रवणाचा नाद होता. फलटणकर बुवा म्हणून एक नामांकित

गाणारे कीर्तनकार होते. त्यांचें कीर्तन मी इंग्रजी पहिलींत कीं दुसरींत असतांना ऐकलें होतें. फलटणकरांचीं दोन कीर्तनें मीं त्यावेळीं ऐकलीं. पुढेंहि मीं अनेक वेळां कीर्तनें ऐकलीं आहेत. पण त्या सर्वांत माझ्या समजुतीप्रमाणें फलटणकरबुवाच अत्युत्कृष्ट होते. आज पंचवीस वर्षें किंवा अधिकहि झालीं असतील; चांगलीं कीर्तनें ऐकण्याचें प्रसंगच येत नाहींत. फलटणकरांचें दुसरें कीर्तन ऐकलें तें निव्वळ मोरोपंती आर्यांवर बसविलेलें होतें. याप्रमाणें ह्या पुराणकीर्तनश्रवणानें मला हिंदु पुराणकथांची माहिती चांगली होती. पुढें इंग्रजी चवथींत आल्यावर संस्कृतचा परिचय होण्यास सुरुवात झाली. हितोपदेश आणि पंचतंत्र हीं पुस्तकें मीं वाचलीं. त्यावेळीं कोल्हापूरचे पुढें शंकराचार्य झालेले एक शास्त्री पित्रेबुवा हे रघुवंशाचे वर्ग घेत असत. त्या वर्गांना मीं सुमारें एक वर्षभर गेलों. तेव्हां कालिदासाचा आणि माझा जो ऋणानुबंध सुरु झाला तो अद्यापि कायम आहे. परंतु चौथींत संस्कृत शिकायची सुरुवात केली तेव्हां प्रथम कांहीं दिवस इंग्रजींतून शिकावें लागलें. म्हणून जरा अवघड गेलें. माझ्या समजुती-प्रमाणें रूपावलि व क्रियापदांचीं रूपें हीं घोकून जुन्या पद्धतीनें संस्कृत शिकणें फार हितावह आणि थोड्या वेळांत होण्यासारखें आहे. इंग्रजी वाचनाचाहि मला नाद लागला होता. पुष्कळसें समजून घेऊन वाचणें हेंच कोणतीहि भाषा चांगलीं येण्याचें मर्म आहे, अशी माझी खात्री पटलेली आहे. मराठी तर मी इंग्रजी चवथींपर्यंत खूपच वाचलें होतें. या सर्वांचा परिणाम माझी लेखनामध्यें प्रगति होण्यांत झाला अशी माझी समजूत आहे.

इंग्रजी चवथींत असतांना एक विशेष घडलेली गोष्ट म्हणजे आमच्या वर्गांत एक किंवा पहिलीच स्त्री-विद्यार्थिनी आली. तिचें वय काय होतें हें मला माहित नाहीं. पण ती सुमारें वीस वर्षांची

मराठी ग्रंथ सं । य. ठा. स्थळप्रत
अनुक्रम ३००७८ वि:
क्रमांक नों. दि.

असावी. असें मला वाटतें. विद्यार्थिनी आल्यामुळें वर्गात एकच्च गोंधळ उडाला. विशेषतः आमचे वर्गमास्तर अगदीं नेस्तनाबूत होऊन गेले. रसाळ मास्तर—आमच्या चवथीचे वर्गशिक्षक—ही एक नामांकित व्यक्ति होती असें आम्हीं ऐकत होतों. ते त्यावेळीं वीस बावीस वर्षे तरी मास्तरकीच्या धंद्यांत होते. आम्हीं मुलांनीं ऐकलेली त्यांची कीर्ति चांगलीशी नव्हती. या वीस बावीस वर्षांच्या काळांत त्यांचा पगार चढण्याऐवजीं उतरला होता. त्यांच्या कांहीं गचाळ आणि आचरट संवयींहि जुन्या विद्यार्थ्यांकडून आम्हीं ऐकलेल्या होत्या. वर्गात ते कांहींहि बोलत. त्यांच्या जिभेला धरबंद नव्हता. वर्गात बाई आलेली पाहून रसाळ मास्तर चांगलेच चमकले. ते एकदां वर्गात म्हणाले, (ती बाई हजर नसतांना हें सांगावयास नकोच) " आम्ही आतांपर्यंत वाटेल तसें बोलत होतों. आतां या बाईच्या देखत तसें बोलून चालणार नाहीं. तोंडाला कुलूप लावलें पाहिजे. " त्याप्रमाणें रसाळचें तोंड निम्में अधिक बंद झालें. आम्हीं बहुतेक चवदा पंधरा वर्षांचीं मुलें होतों. त्यावेळपर्यंत वर्गात विद्यार्थिनी असण्याचा अनुभव कोणालाहि नव्हता. शिवाय आम्हांला त्यांतलें कांहीं विशेष कळतहि नव्हतें, तरीपण आमच्या वर्गात नवीनच आलेल्या एका मुलग्याला तिच्याकडे शिकवणी किंवा कांहींतरी लागली. हा मुलगा मोठा हुषार होता. पण पुढें कांहीं दिवसांनीं त्याचें तिच्यावर प्रेम बसलें. त्याचें प्रेम बसायला आणि त्या बाईचा कित्येक वर्षे अज्ञात असलेला नवरा कोल्हापुरांत यायला जवळ जवळ एकच गांठ पडली. आणि तेथेंच त्या प्रेमप्रकरणाचा शेवट झाला. त्या बाईचें पुढें काय झालें तें मला माहित नाहीं. पण तिच्या येण्यामुळें रसाळ मास्तरांच्या रसाळपणाला खो बसला होता, ही गोष्ट माझ्या लक्षांत चांगली आहे.

इंग्रजी पहिलींत गेल्यापासूनच मला मराठींत कविता करण्याचा नाद लागला. पुढें बी. ए. ची आणि एम्. ए. ची परीक्षा होईपर्यंत तो नाद कायम होता. पुढें माझें लक्ष वर्तमानपत्राचा धंदा आणि राजकारण इत्यादि विषयांकडे वळलें आणि केव्हांतरी हा नाद लुप्त झाला. इंग्रजी तिसरींत आमचे जोशी म्हणून एक मास्तर होते. ते स्वतः कवि होते. जळगांव येथें भरलेल्या कविसंमेलनाला (जेथें प्रथम बालकवींचें अस्तित्व पुष्कळांना जाणवलें) ते गेले होते. (बहुधा १९०३). मीहि त्यांच्याबरोबर जाणार होतों. पण पैशाच्या अभावामुळें गेलों नाहीं. कोल्हापूरच्या 'समर्थ' पत्रांत यावेळीं मीं कांहींतरी सातआठ लेख लिहिले होते. 'कविता करण्याच्या भानगडींत पडूं नकोस' किंवा 'अभ्यासाखेरीज दुसरीं पुस्तकें वाचूं नकोस' म्हणून इंग्रजी तिसऱ्या इयत्तेंत मला पुष्कळांनीं सांगितलें. मी तें न ऐकतां इंग्रजी तिसऱ्या इयत्तेंत जाईपर्यंत मराठींतील बहुतेक कादंबऱ्या वाचल्या होत्या. 'हरि आणि त्र्यंबक' हें सुंदर पुस्तक मी इंग्रजी पहिलींत कां दुसरींत असतांना वाचलें होतें. चवथींत आल्यावर 'स्टॅन्डफर्ड आणि मर्टन' हें 'हरि आणि त्र्यंबक' याचें मूळचें इंग्रजी पुस्तक वाचलें. इंग्रजी चवथीपासून मला इंग्रजी वाचावयाचा नाद लागला. मराठीचा नाद होताच. बहुतेक सर्व पुराणांचीं मराठी भाषान्तरें मीं वाचून टाकलीं. त्याप्रमाणें कांहीं पोथ्याहि वाचल्या. इंग्रजी चवथीपासून मी जुनी मराठी कविता वाचूं लागलों. तो नाद हळूहळूं वाढत्या प्रमाणांत चालू झाला. त्यावेळीं प्रसिद्ध होणाऱ्या आधुनिक कविताहि मी वाचीत असे. मनोरंजन वाचीत असल्यामुळें केशवसुत आणि विनायक यांच्या कवितांची गोडी मला लागली. मराठींतील इतर पुस्तकेंहि मी बरींच वाचीत असे. अशा प्रकारें मराठीची माझी बहुतेक तयारी इंग्रजी चवथीपर्यंत झाली होती असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

१९०१, १९०२ आणि १९०३ या तीनहि सालीं हिवाळ्यांत म्हणजे ऑक्टोबर महिन्याच्या मध्यापासून किंवा शेवटापासून ते चार-एक महिने कोल्हापूरला प्लेगची साथ आली आणि आम्ही बापूराव-काका रुईकरांच्या बरोबर त्या त्या वेळीं माळावर रहावयाला गेलों. हा माळ शहरापासून दोन मैलांवर होता. तेथें प्रो. रघुनाथराव आपटे हे राहत असत. या माळावर तीनहि वर्षें वर्षांतून चारचार महिने आमचे चांगल्या प्रकारें गेले. पहिल्याच वर्षी म्हणजे १९०१ सालच्या जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यांत आमच्या हायस्कूलचा बक्षिस-समारंभ होता. त्यांत मला दोन मराठी पुस्तकें बक्षिस मिळालीं. मी प्रो. आपटे यांच्याबरोबर त्यांच्या टांग्यांत बसून बक्षिससमारंभाला गेलों. प्रो. आपटे हे उत्तम पहिलवानहि होते. त्या वेळीं सर्व कोल्हापूर शहरांत आम्हां सर्वांना–पोरांना व थोरांना–कोणाच्या विद्वत्तेबद्दल आदर असेल तर तो प्रो. आपटे यांच्या विद्वत्तेबद्दल. आम्हांला त्यांचा फार अभिमान वाटे आणि त्यांची भीति पण वाटत असे. या माळावर असतांना पुण्याचे शिवराम महादेव परांजपे यांचें ' काळ ' पत्र वाचण्याचा नाद मला लागला. आमच्या झोपडीपासून शहराच्या वाटेवर मैल दीड मैलांवर दुसऱ्या कोणाची झोपडी होती. मला त्या गृहस्थाचें नांव आतां आठवत नाहीं. त्यांच्याकडे दर शनिवारीं दुपारीं जेवण करून मी आणि दुसरीं एक दोन माणसें जात असूं व तेथले मालक ' काळ ' पत्र आम्हांला वाचावयास देत.

'केसरी' आम्ही नियमानें वाचीत होतों. पण ' काळ ' पत्राचा खुसखुशीतपणा कांहीं निराळा होता. केसरींत लिहिलेल्या पुष्कळ गोष्टी आम्हांस समजतहि नसत. पण काळांतील लेख असे चटकदार असत कीं ते अक्षरशः कळतात असें आम्हाला वाटे. 'सगळेच नरसू' हा काळाचा प्रचंड व नामांकित लेख आम्हीं या रस्त्यावरच्या

झोपडींतच वाचला. आम्हांला त्यावेळीं पुण्याची कांहीं माहिती नव्हती. तरी तो लेख वाचून आम्हांला खूप गंमत वाटली. ‘ काळ ’ पत्र साद्यंत वाचण्यास आम्हांला त्यावेळीं दीड दोन तास तरी लागत. काळ पत्रानें आमच्यावर जेवढी मोहिनी घातली तेवढी दुसऱ्या कोणत्याहि पत्रानें घातली नव्हती. वातावरणांत हळूहळूं नवीन गोष्टी उद्‌भूत होऊं लागल्या होत्या. त्यांचेंच निदर्शन ‘ काळा ’च्या द्वारें होत होतें. पण आम्हांला त्यावेळीं कांहीं समजत नव्हतें. लॉर्ड कर्झन-साहेबांचें तेव्हां राज्य चाललें होतें. कर्झनशाहीचे परिणाम काय होणार आहेत याची तेव्हां आम्हां मुलांना कल्पनाहि नव्हती. १९०४ सालीं घडलेली एक आणखी गोष्ट म्हणजे नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांची कोल्हापूरला भेट ही होय.

त्यावेळीं नामदार या शब्दाचें आम्हांला फार कौतुक होतें. गोखले यांचें बालपण कोल्हापुरांत गेल्यामुळें आणि ते राजारामियन असल्या-मुळें त्यांचे बालपणापासूनचे स्नेहीसोबती सर्व कोल्हापुरांतच होते. १९०४ सालीं आम्ही कृष्णराव मराठे यांच्या शेजारीं राहत होतों. गोपाळराव कृष्णरावांचेच पाहुणे होते. त्या दिवशीं शहरांतील पंचवीस-तीस मंडळी गोपाळरावांना भेटावयास आली होती. ते आमच्या जिमखान्यावर राजाराम क्लबांतहि संध्याकाळीं आले. गोपाळराव त्या वेळीं मला दिसले ते गोरेपान आणि उंच. त्यांच्याकडे पाहून समाधान वाटे अशी त्यांची मुद्रा प्रसन्न होती. आमच्या बापूराव रुईकरांनीं त्यांना जेवावयास बोलाविलें होतें. तेव्हां मीहि तेथें गेलों होतों. मला रोज सकाळीं लवकर जेवणाची संवय असे. पण गोपाळरावांची पंगत मिळावी म्हणून त्या दिवशीं मी दुपारीं साडेबारावाजेपर्यंत वाट पाहिली.

गोपाळरावांचें भाषण त्या दिवशीं राजाराम क्लबतर्फे झालें. तें ऐकावयास मीहि गेलों होतों. ते पाऊण तास बोलले. ते काय बोलले

हें तेव्हांहि मला फारसें समजलें नाहीं. फक्त Idea आणि Idealism हे दोन शब्द त्या दिवशीं ऐकले ते माझ्या अद्यापिहि स्मरणांत आहेत. गोपाळराव दुसरे दिवशीं मेलनें पुण्यास गेले. त्या वेळीं त्यांना पोंचविण्यासाठीं बरीच मंडळी स्टेशनवर गेली होती. मीहि त्या गर्दींत होतों. गोपाळरावांना मी बापूराव रुईकरांच्या कुटुंबाचा भाचा हें माहित झालें होतें. पुढेंहि म्हणजे १९११ सालीं मी पुण्यास रहावयास आल्यावर त्यांनीं मजसंबंधीं चौकशी केली होती असें मला अण्णासाहेब विजापूरकर यांनीं सांगितलें होतें. मीं त्यांचें एकच भाषण ऐकलें होतें. ते जेव्हां टेनिस कोर्टावर आले होते तेव्हां तेथेंहि त्यांचें एक लहानसें भाषण झालें. त्यांचे आभार राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपॉल ल्यूसी यांनीं मानले. ल्यूसी हे इंग्लिश गृहस्थ. पण बोलतांना ते इतके अडखळले कीं गोपाळरावांच्या वक्तृत्वाची छाप आमच्यावर उत्तमच बसली. १९०४ सालीं याप्रमाणें गोपाळरावांचें प्रथम दर्शन झालें. त्यानंतर १९११ सालीं मी पुण्यास गेल्यावर त्यांना पाहिलें तेव्हां ते थोडेसे स्थूल झाले होते.

गोपाळरावाखेरीज आम्हीं पाहिलेला दुसरा मोठा मनुष्य म्हणजे नामदार बाळ गंगाधर टिळक हे होते. मला वाटतें तें १९०० साल असावें. कोल्हापूरच्या लायब्ररींत त्यांचें स्वागत करण्यासाठीं सभा बोलाविली होती. सभेला भयंकर गर्दी झाली होती. मी माझ्या मामाच्या ( रघुनाथराव कळेकर ) खांद्यावर बसून नामदार टिळकांना पाहिलें. त्या वेळीं झालेल्या विलक्षण गर्दीमुळें टिळकांना भाषण करणेंहि शक्य झालें नाहीं. फक्त एका उंच खुर्चीवर उभे राहून त्यांनीं सर्वांना दर्शन दिलें. अशा प्रकारें तत्कालीन दोन महापुरुषांचें दर्शन मला घडलें होतें. दोघांनाहि पाहून मला आनंद झाला होता. काळाच्या पुढच्या गुंतागुंतींत त्यांच्या मतांचा माझ्यावर काय परिणाम होणार होता याची यावेळीं मला यत्किंचितहि कल्पना नव्हती.

अशा प्रकारें इंग्रजी चवथ्या इयत्तेंतील काळ चालला होता. एका वर्षानंतर तो बदलणार याची आम्हांला कल्पनाहि नव्हती. माझे वडील वारून तेव्हां दहा वर्षें झालीं होतीं. या वेळीं स्वस्ताई चांगली असल्यामुळें आमच्या आईच्या हातीं जरी पैसा थोडाच येत असे तरी तेवढ्यांत आमचें चांगल्या प्रकारें चाललें होतें. माझा अभ्यास ठीक चालला होता. उद्यांच्या पोटांत काय आहे तें कळत नसल्यामुळें आम्हीं सुखी होतों. बापूरावकाकांना त्या वर्षी दसऱ्याच्या दिवशीं सोनें देण्यास आलेला आबा नांवाचा शिपाई म्हणाला, "साहेब हें सोनें घ्या. आजचा दसरा पाहिला, पुढल्या वर्षी काय व्हायचें तें होईल. आजच्या दिवशीं तर सोनें देतों." प्लेगच्या सांथीमुळें कातावून गेलेल्या व आयुष्याचा भरंवसा गळलेल्या माणसाचे ते उद्गार होते. मला त्या वेळीं त्याचा अर्थ कांहींहि कळला नाहीं, पण काळ चालला होता, आणि काळाला जवळ जवळ आणीत होता.

* * *

# २

मी माझ्या इंग्रजी शाळेपासून सुरुवात केली व माझ्या चवथ्या इयत्तेपर्यंत येईन ठेपलों. पण पुढें जो मजकूर येणार त्याला मागची माहिती दिली पाहिजे. मी इंग्रजी शाळेंत गेलों तेव्हां माझ्या वयाला दहा वर्षें झालीं होतीं. यापूर्वींच्या दहा वर्षांचा वृत्तांत थोडाबहुत माहीत असल्याखेरीज पुढील वृत्तांत नीट समजणें थोडेंसें कठीण जाईल. विसावें शतक सुरु होण्यापूर्वीं सुमारें दहा वर्षें अगोदर एका माघ वद्य नवमीला कोल्हापुरापासून बारा मैलांवर कसबा कळें या छोट्या गांवीं मी जन्माला आलों. कळें हें माझ्या आईचें गांव. कोल्हापुराहून पंधरा मैलांवर अळतें म्हणून गांव आहे तें माझ्या वडिलांचें म्हणजे माझें गांव. कळें येथें मी जन्माला आलों त्यावेळीं माझे आजोबा, आणि आजी आणि चार मामा व मावशी अशी मंडळी होती. माझ्या जन्माच्या वेळीं माझ्या आईचें वय चौदा वर्षांचें असावें. माझे वडील दामोदर श्रीपत अळतेकर यांची माझी आई ही तृतीय पत्नी. पहिल्या कुटुंबापासून माझ्या वडिलांना एक मुलगी होती. ती माझ्या आईच्या बरोबरची असेल. दुसऱ्या कुटुंबापासून त्यांना एक मुलगा झाला. त्याचें नांव शंकर. मजपेक्षां चार पांच वर्षांनीं मोठा असावा. दुसरी पत्नी वारल्यानंतर कांहीं दिवसांनीं माझ्या वडिलांनीं माझ्या आईबरोबर विवाह केला. आणि माझ्या जन्मानंतर चार पांच वर्षें लोटल्यानंतर माझे वडील मरण पावले. मला एक धाकटा भाऊ पण होता. त्याचें नांव कृष्णा. तो दुर्दैवानें

१९१५ सालीं मुंबईला मी आल्यावर नवज्वराचा आजार होऊन मरण पावला. माझे वडील कोल्हापुरांत सरकारी नोकर होते. ते भूधरगड पेट्याचे मामलेदार झाले होते. त्यांचे केव्हां तरी पाय भाजले. पुढें त्यांनीं रजा घेऊन कांहीं तीर्थयात्रा केली. तरी त्यांचा दुखण्याचा जोर कमी झाला नाहीं. आणि ते १८९४ सालीं मार्च महिन्यांत मरण पावले. त्यांच्या मरणाच्या वेळीं माझें वय पांच वर्षांचें आणि माझ्या आईचें वय अठरा वर्षांचें असेल. त्यांच्या मरणामुळें आमचें उभें असलेलें मोठें घर कोसळून पडलें आणि आम्ही पोरें पोरकीं झालों. त्यांच्या मृत्यूनंतर लवकरच माझ्या आईचें केशवपन करण्यांत आलें. तो प्रसंग अद्यापिहि माझ्या डोळ्यांसमोर उभा आहे. आईच्या केशवपनाचा माझ्यावर झालेला आघात अद्यापिहि मला अस्वस्थ करतो. माझ्या वडिलांची मला आठवण आहे. पुणें, पंढरपूर, गाणगापूर वगैरे ठिकाणीं त्यांच्याबरोबर मी होतों. आमच्या वडिलांना तात्यासाहेब म्हणत. त्यांना ओळखणारी कितीतरी मंडळी मला कोल्हापुरांत असेपर्यंत म्हणजे १९१० सालापर्यंत भेटत. तात्यासाहेब इतक्या लवकर आम्हांला सोडून गेल्यामुळें आम्ही खरोखर निराधार झालों. पुढें आम्हीं आमच्या मावशीच्या जवळपास म्हणजे बापूराव रुईकर यांच्या जवळपास राहूं लागलों. बापूराव काकांनींच वडिलांच्या मृत्यूपासून आमची काळजी वाहिली. आम्ही आजोळींहि वरचेवर जात येत होतों. आमची आजी आमच्या घरीं पुष्कळ दिवस होती. आमचे चारहि मामा कुळकर्णीपणाचें काम करीत. त्यांना थोडेंबहुत उत्पन्नहि होतें. कोल्हापूरलाच माझें बिनइयत्तेपासून इंटरमिजिएटपर्यंत शिक्षण झालें. पण दोनतीन महिने मी कळें येथील आजोळीं रहावयास गेलों होतों. कळें येथील शाळेंत दोनशेंएक वाचनीय पुस्तकें होतीं. तीं त्या तीनचार महिन्यांत मीं बहुतेक वाचून काढलीं.

पुस्तकें वाचण्यासाठीं म्हणून शाळेच्या हेडमास्तरांना मीं कांहींतरी रुपया आठ आणे फी दिल्याचेंहि माझ्या चांगल्या स्मरणांत आहे. आमचे वडील होते तोपर्यंत आमचें घर अगदीं भरलेलें आणि गजबजलेलें होतें. त्यांच्या मृत्यूनंतर तें सर्व एकदम बदललें आणि नवीन जगाला सुरुवात झाली.

वडिलांच्या मृत्यूनंतर रुईकर कुटुंबाशीं आमचा अतिशय निकटचा संबंध आला. कित्येक दिवस आम्ही त्यांच्याच घरीं अर्थात् निराळें बिऱ्हाड करून राहत होतों. शिकण्यासवरण्याला त्यांच्याच घरीं सुरुवात झाली. त्यावेळीं शिकविण्याच्या पद्धतींत मुलांना मार देण्याचा प्रकार चांगलाच अंमलांत होता. मला शाळेंत जाण्याची भीतीच वाटत होती. एके दिवशीं ( मला वाटतें माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनीं ) माझे मामा मला मंगळवारच्या शाळेंत घेऊन गेले. मी भीतभीतच गेलों. जोगळेकर नांवाच्या शिक्षकांकडे मला नेलें. त्यांनीं प्रथम हातांतील रूळ मला दाखविला आणि कांहीं गडबड केल्यास त्या रुळानें हाडें फोडून काढीन म्हणून मला तंबी दिली. मी अगदीं घाबरून गेलों. दुसरे दिवशीं मीं शाळेंत जाणार नाहीं म्हणून हट्ट धरला. पण माझें कोण ऐकतों ? माझ्या मामांनीं मला शाळेंत पोहोंचविलें. शाळेंत माझें नांव बिनइयत्तेंत दाखल केलें. अशा प्रकारें मोठ्या नाखुषीच्या मनःस्थितींत माझ्या शिक्षणाला सुरुवात झाली. शाळेंत मास्तरांचा मार मीं खाल्ला नाहीं असें नाहीं; पण एकंदरींत फार थोडे वेळां. हळूहळू मी शाळेंत खुषीनें जाऊं लागलों. आमच्या मराठी दुसऱ्या इयत्तेचे भिडे मास्तर म्हणून होते. ते मुलांना फार चांगल्या प्रकारें वागवीत. आणि एका सुट्टीच्या दिवशीं आम्हां वर्गांतल्या सर्व मुलांना ते बाहेर हिंडावयास घेऊन गेले. त्या दिवशीं त्यांच्या संगतींत आम्हीं दोन तीन तास चांगले घालविले. त्यांनीं

तेवढ्या वेळांत आम्हांस कांहीं खावयास दिलें व तो दिवस मोठ्या मजेंत गेला.

इंग्रजी पांचव्या इयत्तेंत प्रवेश केला आणि पुढें लवकरच १९०५ साल सुरु झालें. हिंदुस्थानच्या इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहिलेलें, पण १९०५ च्या सुरुवातीला आम्हांला त्याची कल्पनाहि नव्हती. १९०४ सालच्या नाताळांत मुंबईला कॉंग्रेसचें अधिवेशन झालें. मुंबई कॉंग्रेसच्या स्वागतमंडळाचे अध्यक्ष सर फेरोजशहा मेहता हे होते. त्यांनीं मुंबईत कॉंग्रेसच्या अधिवेशनाबरोबरच एक प्रेक्षणीय प्रदर्शनहि भरविलें होतें. ही कॉंग्रेस पाहण्यास आमच्या ओळखीची कांहीं मंडळी गेली होती. पण मला पाठविणार कोण? यावेळीं लॉर्ड कर्झन यांचा व्हॉईसरॉय म्हणून अंमल चाललेला होता. कर्झनसाहेबांच्या करड्या अंमलाखालीं सारा देश पिळून निघाला होता. सर्व वर्तमानपत्रांत कडक लेख येत होते. बंगालच्या फाळणीचा हुकूम सुटला आणि बंगाल्यांत भयंकर असंतोष माजला. याच वर्षी स्वदेशी चळवळ निघाली. वास्तविक स्वदेशी चळवळीचा उगम पुण्यामध्यें वीस पंचवीस वर्षे अगोदर झालेला होता. रावसाहेब महादेव गोविंद रानडे वगैरे मंडळी स्वदेशीचे आद्य पुढारी होते. पण १९०५ सालीं कर्झनशाहीच्या अंमलांत स्वदेशीचें बीजारोपण सर्व देशभर झालें व क्रांतिकारक चळवळीला याच वर्षी आरंभ झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. हें सर्व गुप्तरूपानें देशभर चालू असतांनाच आमच्या इंग्रजी पांचव्या इयत्तेंत आम्ही शिकत होतों. पण १९०५ सालींच मॅट्रिकच्या प्रिलिमिनरी परीक्षेंत मुलांनीं लिहावयास स्वदेशी पेपर मागितले आणि कोल्हापूर येथील तंट्याला सुरुवात झाली. या परीक्षेनंतर लागलींच राजाराम कॉलेजांतील संस्कृतचे प्रोफेसर विष्णु गोविंद विजापूरकर यांची नोकरी गेली. संस्थानांत ब्राह्मण-ब्राह्मणे-

तरांचा तंटा चालू होऊन तीन-चार वर्षें झालीं होतीं. पण विजापूर-करांची नोकरी ह्या तंट्यामुळें गेली नाहीं. १९०५ सालीं मॅट्रीकच्या प्रिलिमिनरी परीक्षेस विद्यार्थ्यांनीं स्वदेशी कागद मागितला याच कुसाचा कांटा होऊन विजापूरकरांची नोकरी गेली.

गेलीं चार वर्षें कोल्हापुरांत ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद फार वाढला होता. त्याचा एक परिणाम म्हणजे ब्राह्मणेतरांच्या शिक्षणाच्या सोयी सारख्या वाढत होत्या. गेल्या चारपांच वर्षांत मराठा बोर्डिंग, जैन बोर्डिंग वगैरे संस्था ब्राह्मणेतरांसाठीं स्थापन झाल्या होत्या. कोल्हापूरचें वातावरण दुहीनें केवळ गजबजलें होतें. त्यांतच या स्वदेशी चळवळीचें बीज पडलें. आम्ही मराठी शाळेंत असतांना ब्राह्मण-ब्राह्मणेतर असे दोन शब्द आम्हांला माहीतच नव्हते. कोल्हापूरचे राजोपाध्ये यांना दरसाल पंचवीस हजार रुपयांचें इनाम होतें. राजोपाध्यांनीं सरकारी वाड्यांत वैदिक कर्म करण्याचें नाकारलें. त्यामुळें महाराजांनीं प्रथम त्यांचें उत्पन्न जप्त केलें व नंतर तें कायमचें खालसा केलें. अशा प्रकारें या तंट्याची सुरुवात होऊन त्याचें पर्यवसान आतां सर्वांच्या परिच-याच्या झालेल्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादांत झालें. माझे ब्राह्मणेतरांतहि बरेच मित्र होते. त्यांच्याहि डोक्यांत या वादाचा अर्थ काय याचा प्रकाश अद्यापि पडलेला नव्हता. १९०५ च्या सप्टेंबरांत मॅट्रीकच्या प्रिलिमिनरी परीक्षेंत मुलांनीं देशी कागद पेपर लिहिण्यासाठीं मागि-तले हें निमित्त होऊन या नव्या वादाचा पहिला बळी प्रो. विजापूरकर हे झाले. विजापूरकर, आमचे बापूरावकाका आणि विशाळगड संस्थानच्या चीफ् साहेबांचे प्रायव्हेट सेक्रेटरी रावसाहेब जावडेकर हे अगदीं जीवश्चकंठश्च स्नेही, त्यामुळें विजापूरकरांची नोकरी जातांच या तिघांनाहि मोठा धक्का बसला. प्रो. विजापूरकरांचे चहाते संपूर्ण महाराष्ट्रभर व महाराष्ट्राबाहेरहि होते. नामदार गोपाळराव गोखले

आणि प्रो. विजापूरकर यांचा उत्कृष्ट स्नेहसंबंध होता. डॉ. भांडारकरांचीहि त्यांच्यावर मर्जी होती. या सर्व लोकांना मोठें चमत्कारिक वाटलें. त्यांनीं कोल्हापूरच्या छत्रपतींना तुम्हीं केलीत ही गोष्ट फार गैर केलींत असें स्पष्ट सांगितलें. १९०५ सालची कॉंग्रेस बनारस येथें होणार होती. तिचे अध्यक्ष गोपाळराव गोखले होते. त्या कॉंग्रेसला पुढें विजापूरकर गेले. पण तत्पूर्वीं आम्हां सर्वांवर एक मोठा आपत्तीचा प्रसंग कोसळला.

यंदा म्हणजे १९०५ सालीं कोल्हापुरांत प्लेगचीं लक्षणें दिसावयाला ऑगस्ट अखेरपासूनच सुरुवात झाली. म्हणून बापूरावकाका रुईकरांची मंडळी आणि आम्ही असे शहराबाहेर दीड दोन मैलांवर श्रीमंत इचलकरंजीकर यांच्या बंगल्याच्या आऊट हाऊसमध्यें रहावयास गेलों. यावेळीं बापूरावकाकांकडे त्यांचे सर्वांत धाकटे बंधु बंडोपंत रुईकर हेहि रहावयास आले होते. काकांची मातोश्रीहि त्यांच्याजवळ होती. आम्हीहि तिघे म्हणजे माझी आई व आम्ही दोघे बंधू त्यांच्याकडेच होतों. अशा प्रकारें त्यांचें घर सध्या भरलेलें होते.

एके दिवशीं संध्याकाळीं बापूराव काका घरीं आले ते बरें वाटत नाहीं असें म्हणतच आले. डॉ. वामनरावांनीं तपासल्यावर ते अंथरुणांत पडले. बापूरावकाकांचें वय यावेळीं ४५।४६ वर्षांचें असावें. एकदोन दिवसांत त्यांना प्लेग झाला आहे असें ठरलें. आणि आम्हां सर्व मुलांना त्याच्यांपासून दूर ठेवूं लागले. दिवसांतून एक वेळ आम्ही त्यांना पहावयास जात असूं. सात आठ दिवस ते आजारी होते. त्यांचे बंधू डॉ. वामनराव त्यांच्या सुश्रूषेला सारखे होते. शहरांतून शेंकडो मंडळी त्यांना भेटावयास येत. पण दिवसेंदिवस त्यांची प्रकृति अधिकाधिक खालावली आणि एक दिवस त्यांची आशा सर्वांनीं सोडली. ते राम राम म्हणत पडले होते. तशा स्थितींतच त्यांचा अंत झाला.

माझे वडील १८९४ सालीं वारले तेव्हां मी अगदी लहान म्हणजे पांच वर्षांचा होतों. त्यांच्या मरणाची चांगली आठवण मला अद्यापिहि आहे. पण अलिकडे दहा वर्षें त्यांच्या मृत्यूचें तेवढें आम्हांला वाटत नव्हतें. बापूरावकाकांचा मृत्यु ही नवी आपत्ति आमच्यावर कोसळली. माझ्या मावशीला वैधव्य आलें. मी जेव्हां तिला भेटलों तेव्हां तिचा कुंकुमविरहित चेहरा पाहून मला फार रडूं कोसळलें. कित्येक वेळ मी ढसाढसा रडलों. बापूराव काकांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा व्यंकटेश ( हा धाकटा पांच वर्षांचा असेल ) हाहि गेला. पुढें दोन चार दिवसांत बंडोपंत व त्यांची पत्नी कृष्णाबाई हे दोघेहि प्लेगनें आजारी पडले आणि त्यांत बंडोपंत निवर्तले. बापूरावकाकांची आई देखील याच वेळेला चार आठ दिवसांत प्लेगनें वारली. जेथें आम्ही सर्व सुखांत नांदत होतों तेथें आठ पंधरा दिवसांत मृत्यूनें थैमान केल्यामुळें चार माणसें आमच्यांतून नाहींशी झाली. बापूराव काका तर मिळवते पुरुष. त्यांच्या मरणानें रुईकरांचें घरच बसलें. मावशीची त्यावेळीं काय स्थिति झाली असेल हें तिचें तिला माहित. तिचा तिसरा मुलगाहि गेला आणि आपल्या दोन मुलांबरोबर ती उघडी पडली.

त्या दुर्घट प्रसंगांत आम्ही सर्व हतबुद्ध झालों. बापूरावकाकांचें मरण म्हणजे त्याप्रसंगीं आम्हांवर कोसळलेली भयंकर आपत्ति होती. रावसाहेब जावडेकर आणि प्रो. विजापूरकर या दोघांनींहि त्यावेळीं रुईकर कुटुंबाला अतिशय साहाय्य केलें. आम्ही तेव्हां रुईकर कुटुंबांतलेच होतों. जावडेकर मास्तर—हे पूर्वी चीफ ऑफ विशाळगडचे शिक्षक असल्यामुळें त्यांना मास्तर म्हणण्याची पद्धति आतां कायमची झाली होती.—हे मोठे तरल बुद्धीचे, उत्कृष्ट वर्तनाचे आणि सर्व प्रकारची धोरणें समजून त्याप्रमाणें वागणारे अशा प्रकारचे

गृहस्थ होते. यांना एक मुलगी आणि एक मुलगा होता. शिवाय घरामध्यें बिछान्याला खिळलेली म्हातारी आई होती. आम्ही सर्वजण जावडेकरांच्याकडे त्यांच्या बंगल्यांत रहावयास गेलों. माझी इंग्रजी पांचवीची परीक्षा होऊन मी सहावींत गेलों होतों. हिंवाळा होता. आणि परीक्षेनंतर प्लेगमुळें शाळेला सुट्टी मिळाली होती. तेव्हां आम्हीं सर्वांनीं जावडेकरांच्या बरोबर आंबेघाट येथें जावयाचें ठरलें. आंबेघाट हें कोल्हापूर-रत्नागिरी रस्त्यावर चाळीस एकेचाळीस मैलांवर एक लहानसें–अगदींच लहान म्हणाना-खेडें आहे. उन्हाळ्यांत येथें श्रीमंत विशाळगडकर रहावयास जात. आंबेघाट हें या बाजूचें सर्वांत उंच ठिकाण. येथून रत्नागिरीला जातांना बारा एक मैलांचा उतार आहे. यावेळीं आम्हांला जावडेकर आंबेघाटाला घेऊन गेले ही गोष्ट फारच चांगली झाली. कोल्हापुरांत मृत्यूच्या भीषण तडाख्यानें आम्ही अगदी दुर्बळ होऊन गेलों होतों. आंबेघाटाला गेल्यामुळें आम्हांला नवीन जगांत आल्यासारखें वाटलें. तेथील हवा अगदी थंड होती. उन्हाळ्यांत सुद्धां आंबेघाट छान गार असे. मग हे तर हिंवाळ्याचे दिवस होते. पुष्कळ हिंडावें फिरावें आणि पुष्कळ अन्न खावें असा तेथील व्यवहार होता. हळूहळू आम्ही सर्व तेथें ताजेतवानें झालों.

आंबेघाट येथें रानांवनांतून आम्ही खूप हिंडलों. आमच्या मनाला एक प्रकारची प्रसन्नता आली. खूप हिंडणें होत होतें; भूक सपाटून लागत होती, झोंप उत्तम येत होती. कोल्हापुराहून नरसोबा-वाडी, रुई किंवा कळें येथपर्यंतच आतांपर्यंत फारतर मी गेलों होतों. त्यामुळें चाळीस मैल दूर जाणें व तेंहि आंबेघाटासारख्या प्रशांत व प्रशस्त ठिकाणीं म्हणजे कांहीं सामान्य गोष्ट नव्हती. यापुढें निदान तीन वर्षें तरी आम्ही उन्हाळ्यांत आंबेघाटाला जात होतों. तेथील सर्व काळ आनंदांत जात असे. आंब्याला जाण्यापूर्वींहि मला हिंडण्या-

फिरण्याची संवय लागलेली होती. त्यामुळें पांचसहा मैल रपेट करणें ही नित्याची गोष्ट झालेली होती. आंबेघाटाला आम्ही आजूबाजूला खूप हिंडलों. आणि एका वर्षी विशाळगडचा किल्लाहि पाहिला.

आमची शाळा सुरू होतांच आम्ही आंब्याहून परत कोल्हापुरला आलों. आमची सहावी इयत्ता राजाराम कॉलेजच्या इमारतींत भरत असे. त्यामुळें पांचव्या इयत्तेबरोबरच आम्ही नागपूरकरांच्या वाड्याचा निरोप घेतला. मी सहावींत आल्यावर कोल्हापूरच्या नेटीव्ह जनरल लायब्ररीचा सभासद झालों. ही लायब्ररी म्हणजे एक सुंदर इमारत आहे. दरवर्षी त्या ठिकाणीं कांहीं शहरांतील आणि कांहीं बाहेरून आलेल्या माणसांचीं व्याख्यानें होत. हीं व्याख्यानें मी बहुतेक ऐकावयास जात असे. ही व्याख्यानें ऐकून माझ्या ज्ञानांत काहींतरी भर पडत असे, असें निश्चितपणें म्हणतां येते. या लायब्ररींत मी शेंकडों इंग्रजी आणि मराठी पुस्तकें वाचलीं. क्वचित प्रसंगीं संस्कृतहि वाचलीं.

१९०६ सालीं आंबेघाटाहून परत आल्यावर आम्ही स्टेशनवर राहावयास गेलों. तेथें प्रोफेसर विजापूरकरांचा बंगला आमच्या झोंपडीजवळच होता. तेथें मी पुष्कळ वेळां जात असे. प्रो. विजापूर-करांचा माझ्यावर फार लोभ बसला. माझें संस्कृत शिक्षण व्यवस्थित करण्याचें सर्व श्रेय त्यांना आहे. सहाव्या इयत्तेंत असतांनाच ते रोज सकाळीं मजबरोबर रघुवंश वाचूं लागले. निव्वळ इंग्रजींत संस्कृतचें भाषान्तर करण्याची जी पद्धति बहुतेक शाळांतून सुरू होती त्याहून निराळ्या प्रकारें ते मला कालिदास शिकवूं लागले. त्यांनीं मजबरोबर पांचसहा सर्ग तरी वाचले. त्यामुळें मला संस्कृतची गोडी विशेष वाटूं लागली.

मला वाटतें, १९०६ सालीं सप्टेंबर महिन्यांत लोकमान्य ( तेव्हां त्यांना तें नांव पडलेलें नव्हतें. ) टिळक कोल्हापुरास आले. त्यांचा मुक्काम स्टेशनवरच राशिंगकर वकील यांच्या बंगल्यांत होता. हा बंगला विजापूरकरांच्या बंगल्याजवळ होता. तेथील मुक्कामांत टिळक रोज तीन चार दिवस अण्णाकडे येऊन बसत. त्यामुळें मला त्यांच्या दर्शनाचा चांगलाच लाभ मिळाला.

यावेळी टिळक कोल्हापूरला आले ते कै. बाबा महाराजांचे ट्रस्टी म्हणून. श्री. बाळामहाराज ( पंडित महाराजांचे धाकटे बंधु ) यांना ताईमहाराज दत्तक घेणार होत्या, त्याला विरोध करण्यासाठीं ते आले होते. पण शाहूछत्रपतींनीं त्यांना भेटावयास वाड्यावर बोलाविलें. तेथें बराच वेळ गप्पागोष्टी करीत महाराज बसले आणि तेवढ्या वेळांत दत्तविधान पार पडलें. असा कांहीं प्रकार झाला. त्यामुळें टिळक ज्या हेतूनें आले होते. तो हेतु पार पडला नाहींच. पण आम्हांला त्यावेळीं यांतील कांहीं माहिती नव्हती. टिळकांच्या दर्शनामुळें होणाऱ्या आनंदांत आम्ही गर्क होतों. शहराबाहेरील रिसाल्याजवळील मैदानावर त्यांचें एक जाहीर भाषण झालें. तें ऐकण्यास मी गेलों होतों. गर्दी खूपच होती. पण उघड्या मैदानांत सर्व समारंभ झाल्यामुळें सहा सात वर्षांपूर्वीं कोल्हापूरच्या लायब्ररींत जी भयंकर गर्दी लोटली होती व चेंदाचेंद झाली होती तसा प्रकार या व्याख्यानाला झाला नाहीं. टिळक मराठी उत्तम बोलत. त्यांच्या भाषणांत अलंकार फारसे नसत. पण जें बोलावयाचें तें अगदीं स्पष्ट भाषेंत ते सांगून टाकीत. टिळक ही केवळ व्यक्ति नव्हती तर संस्था होती. आणि त्यांचें भाषण म्हणजे तोफखान्याचा भडिमार होता. पुढें मीं एडिटर झालों त्या वेळीं टिळकांच्या संबंधीं विरोधात्मक अनेक वेळां लिहिलें. पण त्यांच्याबद्दल मला पहिल्या-

पासून वाटणारा आदर रतिमात्रहि कमी झाला नाहीं. कोल्हापूरला हे चार दिवस तर मी त्यांच्या अगदीं आजूबाजूला होतों; त्यांचें वागणें-बोलणें अगदीं काळजीपूर्वक पाहत होतों व ऐकत होतों. सामान्य माणसाहून निराळी अशी त्यांची प्रत होती. हा माझा समज पुढच्या काळीं जेव्हां मी त्यांच्या विरुद्ध बाजूच्या राजकारणांत समाविष्ट झालों तेव्हां सुद्धां कधींहि बदलला नाहीं.

आमची इंग्रजी सहावीची परीक्षा झाली तेव्हांहि कोल्हापुरांत प्लेग होताच. मी इंग्रजी सहावी इयत्ता उतरलों तो चांगल्या प्रकारें उतरलों. पुढें सातव्या इयत्तेंत म्हणजे मॅट्रीकच्या वर्गांत नांव दाखल झालें त्यावेळीं आम्हीं आतां एका वर्षांत युनिव्हर्सिटीच्या पहिल्या परीक्षेला — मॅट्रिकला — बसणार असें वाटून फार आनंद झाला. इंग्रजी सहावीच्या सहामाही परीक्षेंत मला गणिताच्या पेपरमध्यें जरा कमी मार्क मिळाले होते. तेव्हां एक दिवस भार्गवराव मास्तरांनीं, " माझ्या वर्गांत लक्ष देऊन अभ्यास केला नाहींस तर पुन्हां याच वर्गांत बसावें लागेल " म्हणून इषारा दिला. सहामाही परक्षिेनंतर उन्हाळ्याची सुटी आली. त्या सुटींत कृष्णराव मराठयांनीं इंग्रजी चवथीच्या वेळीं सांगितलें होतें त्याप्रमाणें गणितावरचीं—भूमिति आणि बीजगणित-यांचीं पुस्तकें मुळांत संपूर्ण वाचून काढलीं. जुन्या युक्लिडच्या चारहि पुस्तकांतील बहुतेक सर्व उदाहरणें सोडविलीं. याचा परिणाम सातवीच्या सहामाही परीक्षेंत मला उत्तम मार्क मिळण्यांत झाला. भार्गवराम उत्तम शिक्षक होते यांत शंकाच नाहीं. पण त्यांच्या वर्गांत मी मागच्या बाकावर बसून गप्पागोष्टी करीत असें हेंहि खरें आहे. त्यांनीं मला सहावीच्या परीक्षेनंतर दिलेला टोमणा बरोबर होता. पण मी सातवींत आणि सातवी सुरू होण्यापूर्वींच्या उन्हाळ्याच्या सुट्टींत गणित विषयाचा पुष्कळ अभ्यास केला. त्याच्या जोरावर मॅट्रीकच्या

परीक्षेंत मी गणितांतहि उत्तम प्रकारें उतरलों. इंग्रजी सातवींत तेव्हां केमिस्ट्री, ॲस्ट्रॉनॉमि आणि फिजिक्स हेहि विषय होते. पैकीं ॲस्ट्रॉनॉमी किंवा खगोलशास्त्र हा विषय प्रो. रघुनाथराव आपटे शिकवीत प्रो. आपटे ह्यांच्याबद्दल आम्हां सर्वांना अत्यादर होता. ते फार मोठे. खगोलशास्त्रज्ञ व गणिती आहेत हें आम्हीं सर्व जाणत होतों. त्यामुळें त्यांनीं आमचा वर्ग घेणें ही मोठ्या सुदैवाची गोष्ट असें आम्हांला वाटावें यांत आश्चर्य नव्हतें. आमच्या कोल्हापुरांत दिगंत कीर्तीचा कोणी एक मनुष्य असेल तर ते प्रो. आपटे अशी आमची खात्री होती.

याशिवाय आणखी एक प्रोफेसर आमच्या लक्षांत राहिले. ते प्रोफेसर म्हणजे अण्णा बाबाजी लठ्ठे हे होत. कोल्हापुरांतील ब्राह्मण-ब्राह्मणेतराचा वाद जेव्हां अतिशय शिगेला पोंचला त्याच सुमारास, मला वाटतें, प्रो. अण्णासाहेब लठ्ठे कोल्हापुरास आले. ते चांगलें शिकवीत. पण वर्गांतील बहुतेक मुलें ब्राह्मण; तीं त्या सातवीच्या वर्गांत तरी त्यांच्याशीं नीट अशी कधीं वागलीं नाहींत. अर्थात सध्यां कॉलेजांत विद्यार्थी कित्येक प्रोफेसरांबद्दल वागतात तसेंच आम्ही पुष्कळ वेळां त्यांच्याशीं वागलों आणि तसें करून आपला आचरटपणा व्यक्त केला असें म्हटल्यावाचून गत्यंतर नाहीं.

आतां इंग्रजी वाचन खूप होऊं लागलें होतें. त्या कामासाठीं लायब्ररीचें सभासदत्व फार कामीं आलें. कॉलेज लायब्ररीचाहि भरपूर उपयोग करण्याची संवय लागली होती. मित्रगण पुष्कळ मोठा होता. कॉलेजचा डिबेटिंग क्लब होता. त्यांत इंग्रजी सहावी-सातवीचीहि मुलें जात. मीहि तेथें कधीं कधीं जाऊं लागलों. वादविवादांतहि भाग घेऊं लागलों. जी थोडीशी शास्त्रीय विषयांची ओळख झाली होती त्यामुळें शास्त्रांचा अभ्यास करावा अशी तीव्र इच्छा उत्पन्न

झाली. कॉलेजमधील दुर्बिणेमुळें तारे पाहण्याची संवय लागली. वर्गांत आणि घरांतहि वेळ चांगला जाऊं लागला. मी सातवींत असतांनाच प्रो. विजापूरकरांनीं कोल्हापूर सोडलें आणि आपली शाळा घेऊन ते पुण्याजवळ तळेगांव दाभाडे या गांवीं गेले.

यावेळीं देशांत चळवळींचा धुमाकूळ चाललेला व इंग्रजी राज्यसत्ता अधिकाधिक निष्ठुर आणि अप्रिय होत चालली होती. पण या परिस्थितीचा सध्यां तरी आमच्यावर म्हणण्यासारखा परिणाम झालेला नव्हता. आमचा अभ्यास नित्याप्रमाणें चालला होता. मॅट्रिकची परीक्षा पास झाली कीं आपण कांहींतरी विशेष मिळविलें असें आम्हांला वाटत होतें. मला वर्तमानपत्रें वाचण्याचा अतिशय नाद होता. त्यामुळें देशांतील सर्व बातमी समजे. ‘ काळ ’ पत्राचा आवाज तर अधिकाधिक कठोर होत चालला होता. १९०६ च्या डिसेंबरांत कलकत्ता येथें कॉंग्रेसची बैठक झाली. तेथें प्रथम दादाभाई नौरोजी यांनीं जहाल भाषण केलें होतें. कलकत्त्याच्या कॉंग्रेसमध्यें सभासदांत पुष्कळ मतभेद असल्याचें स्पष्ट झालें. आम्ही यावेळीं साधारण वाढतीं मुलें होतों. अभ्यास हेंच आमचें मुख्य ध्येय होतें. कोल्हापूर मुंबई-पुण्यापासून दूर—सरासरी दोनशें मैलांवर. १९०५ सालीं विद्यार्थ्यांनीं परीक्षेचे पेपर परदेशी म्हणून घेतले नाहींत; यापलीकडे आमच्या हायस्कुलांत विशेष कांहीं झालें नाहीं. सरकार मात्र अधिकाधिक कडक होत चाललें होतें. आणि लोकांना अत्यंत त्रास होऊं लागला होता यांत शंका नाहीं. माझ्या धाकट्या—भावाला—कृष्णाला आम्ही समर्थ विद्यालयांत घातलें आणि तो तळेगांवीं गेला. सर्वत्र अस्वस्थतेचें वातावरण निर्माण झालें होतें. आपणाला भेटणारा कोणताहि माणूस गुप्त पोलिस असेल असें वाटूं लागलें होतें. पण सुदैवानें या परिस्थितीचा आमच्यावर फारसा परिणाम झाला नव्हता.

हळूं हळूं सप्टेंबर महिना आला. आमची प्रिलिमिनरी परीक्षा झाली. तींत आम्ही पसार होऊन आम्हांला मॅट्रीकला बसण्याचे फॉर्म्सहि मिळाले. ऑक्टोबर महिन्यांत भाऊबीजेच्या दिवशीं आम्हांला परीक्षेसाठीं मुंबईस निघावयाचें होतें. कांहीं प्रमुख मंडळी पुण्याला व कांहीं बेळगांवला गेली.

ठरल्याप्रमाणें आम्ही एकूण आठ मंडळी त्या वर्षी ( १९०७ ) भाऊबिजेच्या दिवशीं सकाळीं कोल्हापुराहून निघालों. बरोबर लहानशा वळकट्या आणि छोटीशी ट्रंक होती. एवढा लांबचा आमचा तो पहिलाच प्रवास होता. आम्ही मोठ्या उत्साहानें आमच्या परीक्षेला निघालों होतों. मुंबईसारखें अजस्त्र शहर पाहणार होतों. समुद्र कसा असतो याची आम्हांला कल्पना नव्हती. तोहि आम्हास पहावयास मिळणार होता. त्या दिवशीं त्या सकाळीं आमचीं अंतःकरणें आनंदानें भरून गेलीं होतीं. घरांतून एकटाच बाहेर पडण्याचा माझ्यावर तरी हा पहिलाच प्रसंग. आतांपर्यंत शिरोळरोड स्टेशन-पलीकडे काय आहे हें मला माहीत नव्हतें. आमची गाडी हळूहळू स्टेशनमधून सरकली. आणि मंद गतीनें चालूं लागली. त्यावेळीं कोल्हापूर हें आमचें सर्वस्व होतें. तीन वर्षांत आपण तेथून बाहेर पडणार हा विचारसुद्धां तेव्हां मनांत आला नाहीं.

आम्ही सकाळीं कोल्हापूराहून निघालों तें रात्रीं नवानंतर पुण्याला पोंचलों. तेथें गांवांत जेवण घेऊन परत स्टेशनवर आलों. आणि मध्यान्हीची मुंबईला जाणारी गाडी पकडून सकाळीं मुंबईला आलों. हें मुंबईचें आम्हांला पहिलें दर्शन होय. बोरीबंदरला जेव्हां आम्ही उतरलों तेव्हां तिथला थाट सर्वच निराळा. एवढें मोठें आणि सुंदर स्टेशन आम्हीं प्रथमच पाहिलें. नंतर व्हिक्टोरियांत

असून मी व केळकर गिरगांवाकडे रवाना झालों. संध्याकाळीं भेटण्याबद्दल एकमेकांच्या गोष्टीं झाल्या व समुद्रकांठीं चौपाटीवर भेटावयाचें असें ठरलें. चौपाटी हें काय प्रकरण आहे याची मला कल्पनाहि नव्हती. मला गिरगांवांत बॅकरोडवर डॉ. भाजेकर यांच्या हॉस्पिटलांत उतरावयाचें होतें. केळकरांना हॉस्पिटलासमोर असलेल्या आंग्रेवाडींत उतरावयाचें होतें. याप्रमाणें आम्ही मुंबईला येऊन पोहोंचलों.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 30668 वि: ...
क्रमांक 210 नों: दि: 53/6/5



मुंबईला बोरीबंदरावर त्या दिवशीं आम्ही उतरलों. मी आणि केळकर यांनीं एक व्हिक्टोरिया केली. गिरगांव बॅकरोडवर ( आतां विठ्ठलभाई पटेल रोड ) आम्ही आंग्रेवाडीसमोर थांबलों. तेथें केळकर उतरला. त्यानंतर जवळच समोर डॉ. भाजेकर यांचें हॉस्पिटल होतें. तेथें मी उतरलों. डॉ. भाजेकरांच्या हॉस्पिटलांत जयराम नांवाचे कम्पाउंडर होते. त्यांना डॉ. वामनराव रुईकर यांनीं माझ्यासाठीं पत्र लिहिलें होतें. सुदैवानें मी दवाखान्याच्या दारांत पोंहोचलों तेव्हां जयराम तेथें उभे होते. त्यांच्या हातीं मी माझ्याजवळचें पत्र दिलें. त्यांनीं लागलीच हॉस्पिटलांतीलच एक खोली रिकामी होती त्यांत माझें सामान ठेवलें. पाणी वगैरे सर्व दाखविलें. कपडे उतरून आंघोळ करण्यास सांगितलें. नंतर कोठून तरी चहा पिण्यास दिला. मग जवळच बाळाची खानावळ होती तेथें ते मला घेऊन गेले. मी ओवळ्यानेंच जेवणार असें त्यांना सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं हॉटेलवाल्याला कळविलें. जयराम हे सोवळ्यानें जेवत असत. पण त्यांची जेवणाची वेळ फार उशीरा असल्यामुळें आपलें व त्यांचें जेवण कधींच एकत्र येणार नाहीं असेंहि त्यांनीं मला सांगितलें. नंतर आम्ही परतलों.

शनिवारीं आम्ही युनिव्हर्सिटींत जाऊन आमचे नंबर पाहून आलों. माझा नंबर बराच वरचा, पन्नासाच्या आंतला होता. आमची परीक्षा कोटांत काळा घोड्याच्या पलिकडे भलें दांडगें मैदान होतें त्यावर बांधलेल्या मंडपांत व्हावयाची होती. आम्ही युनिव्हर्सिटींतून

तेथून पाव मैल अर्धा मैल असलेल्या या मंडपाकडे गेलों. तो विस्तीर्ण मंडप पाहून आम्हाला मोठें समाधान वाटलें. ( आतां याच मैदानांत मुंबईचें म्युझिअम आहे. ) सोमवारीं सकाळीं आपण येथें येऊन परीक्षेला बसणार अशी आमची खात्री झाली. परीक्षा सकाळीं साडेदहा वाजतां सुरु होणार होती. तेथें बरोबर दहा वाजतां पोहोंचण्याचें आम्हीं ठरविलें आणि आमचे नंबर तीन चार वेळां पाहिल्यावर आम्ही हंसत खिदळत घरीं परतलों.

परीक्षेच्या दिवशीं आम्ही लवकर जेवण करून परीक्षेच्या मंडपाकडे निघालों. आमच्या परीक्षेचा वेध आम्हास लागलेला होता. मंडपावर दहा वाजतां जाऊन पोहोंचलों. तेथें शेंकडो विद्यार्थी जमले होते. त्यांतील बरेचसे हातांत पुस्तकें ( नोटांची किंवा दुसरीं ) घेऊन वाचीत होते. मंडपांत शिरण्याला दहा मिनिटांचा अवधि होता. दहा मिनिटानंतर आम्ही आंत शिरलों. आंत गेल्यावर मी नंबर नीट पाहून बसलों.

दीड वाजतां आम्ही मंडपांतून एका तासासाठीं बाहेर पडलों. याप्रमाणें परीक्षेचा पहिला पेपर ठीकपणें लिहून झाला. अडीच वाजण्याला दहा मिनिटें कमी असतांना पुन्हा आम्ही मंडपांत शिरलों. व दुसरा पेपर लिहिला. याप्रमाणें आमची परीक्षा झाली. आमची सर्वांची परीक्षा चांगली झाली होती. आणखी एक दोन दिवस मुंबई पाहून आम्ही परतणार होतों. परीक्षा झाल्यामुळें आम्हाला हायसें वाटत होतें. परीक्षेचा निकाल लागायला महिनाभर अवकाश होता.

दोन दिवसांत आम्हीं जमेल तेवढी मुंबई पाहून घेतली. राणीचा बाग, तेथील माडीवरचें पदार्थसंग्रहालय, रेसकोर्स, धक्का, आगबोटी, भुलेश्वर इत्यादि पाहिलें. शनिवारीं रात्रीं आम्ही कोल्हापुरला परतलों.

कोल्हापुरास परत आल्यानंतर चारसहा दिवस तेथें राहिलों. आणि मग जावडेकरांच्या बरोबर आंबेघाटावर गेलों. तेथें पंधराएक दिवस होतों. थंडीच्या दिवसांत आंबेघाट उन्हाळ्यापेक्षांहि रमणीय वाटतो. आंबेघाटाला नीळकंठराव शेवडे, श्रीमंत बाबासाहेब पंतप्रतिनिधि यांचे शिक्षक हे एका घरांत राहत असत. मला जीं कित्येक उत्तम माणसें भेटलीं आहेत त्यांत नीळकंठरावांची गणना होते. त्यांच्या घरीं त्यांचें कुटुंब, दोन मुली आणि एक मुलगा होता. मला लहान-पणीं व पुढेंहि कित्येक वर्षें लहान मुलांचा अतिशय नाद असे. या लहान मुलांशीं खेळत बोलत माझा वेळ शेवड्यांच्या घरीं फार चांगला जात असे. नीळकंठराव तर उत्तमच माणूस. त्यांची संगत अतिशय फायदेशीर झाली. सकाळीं संध्याकाळीं हिंडावें, फिरावें, फुलें गोळा करावींत; अशा प्रकारें पंधरा दिवस मोठ्या मौजेंत गेले. परीक्षेच्या निकालाचा दिवस जवळ येत चालला तशी मनाला थोडी हुरहूर वाटूं लागली. मॅट्रीकची परीक्षा म्हणजे केवढें भय वाटे त्या वेळीं ! सगळे पेपर चांगले लिहिले आहेत असें सारखें वाटे. पण कोणी सांगावें, काय होईल तें ? माझा थोरला भाऊ दादा हा मॅट्रीक पहिल्याच खेपेला पास झालेला. पण पहिल्याच वर्षाची परीक्षा झाल्यानंतर त्यानें पोस्ट खात्यांत नोकरी धरली होती. आपली परीक्षा पास झाली कीं, आपण कॉलेजांत जाणार व निदान बी. ए. तरी होणार अशी महत्त्वाकांक्षा माझ्या मनांत उत्पन्न झाली होती. बी. ए. कडे गेलों नाहीं तर जपान किंवा अमेरिका इकडे जाऊन शास्त्रीय शिक्षण घ्यावें असेंहि मी म्हणत होतों. अशा प्रकारें थोड्याशा चिंतेंत दोन चार दिवस गेले. रिझल्टचा दिवस उजाडला. माझ्या अंतः-करणांत खूप खळबळ माजलेली होती. तरी पण मी सकाळचा कार्य-क्रम स्वस्थपणें आटोपला. दुपार झाली. तिसरा प्रहर झाला. कोल्हा-

पुरला तार आली असेल असें वाटलें. पण येथें तार आली नाहीं. तो दिवस गेला. रात्र आली. मी बिछान्यावर जाऊन पडलों.

दुसरे दिवशीं सकाळीं उठलों तेव्हां मलकापुराहून तार घेऊन मनुष्य आला होता. माझे मावसबंधु रामभाऊ रुईकर ( नागपूरचे नामांकित मजूर पुढारी ) यांनीं आदलें दिवशीं कोल्हापुरला माझा रिझल्ट समजतांच तार पाठविली होती. 'अतिशय आनंद. पास झालांत.' एवढाच मजकूर तारेंत होता. त्यावेळीं मला अतिशय आनंद झाला. पहिल्याच खेपेला आपण मॅट्रीक पास झालों ही गोष्ट मला फार समाधानकारक वाटली. मी लागलींच कोल्हापुरला घरीं पत्रें लिहिलीं. आणखी चार दिवस आंबेघाटला होतों. आम्ही आठजण मिळून परीक्षेला मुंबईला गेलों होतों. आम्ही आठहि जण पास झालों. यावेळीं बापूरावकाका जीवंत असते तर त्यांना केवढा आनंद झाला असता असें मला वाटलें. मॅट्रीक परीक्षा पास झाल्यानंतर कित्येक दिवस मी त्या आनंदांत होतों. कोल्हापुरांत परत आल्यावर मी सर्व मित्र मंडळींना भेटलों. आम्ही परस्परांचे पेढे खाल्ले. आमच्यापैकीं दोघे म्हणजे विष्णु गोखले आणि गोपाळ सबनीस यांनीं पुण्यास डेक्कन कॉलेजांत जाण्याचें ठरविलें. आम्हीं बाकीच्यांनीं कोल्हापुरांत राजाराम कॉलेजांत प्रविष्ट होण्याचें ठरविलें. माझा कोल्हापुरांत पांचवा नंबर होता. कॉलेजांत स्कॉरलशिप्स चार होत्या. अर्थात् मला स्कॉलरशिप मिळाली नाहीं.

आमच्या वर्गांत एकंदर साठ मुलें होतीं. एक मुलगी होती. कॉलेजांत नांव घालून वर्गांत प्रवेश केला तेव्हां मोठा आनंद वाटला. माझा मित्र गोपाळ सबनीस मला जॉन मोर्लें म्हणत असे. जॉन मोर्लें हे त्यावेळीं हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी म्हणून ब्रिटिश पार्लमेंटांत होते. पण राजकारणापेक्षां नामांकित ग्रंथकार म्हणून त्यांचा लौकिक होता.

मॅट्रीकची परीक्षा पास झाल्यानंतर मला जॉन मोर्लेची आठवण झाली. कॉलेजांत गेल्यावर त्यांचीं कांहीं पुस्तकें मी वाचण्याचा प्रयत्न केला.

१९०७ साल हें सर्व देशांत मोठ्या खळबळीचें व चळवळीचें गेलें. शेवटीं सुरतेला जी डिसेंबरच्या शेवटीं कॉंग्रेस झाली तींत त्या संस्थेंतील राजकीय मतभेद पूर्णपणें जगापुढें आले. आम्हीं परीक्षेसाठीं मुंबईला गेलों होतों तेव्हांच कित्येक देशभक्तांचीं जळजळीत भाषणें ऐकावयास मिळालीं होतीं. शांतारामच्या चाळींत एका रात्रीं आम्ही दादासाहेब खापर्डे यांचें भाषण ऐकलें होतें. सर फेरोजशहा मेहता यांच्यावर पुण्याच्या 'काळ' पत्रानें सडकून टीका केली होती. कॉंग्रेसचें अध्यक्षस्थान टिळकांना द्यावें म्हणून कांहीं लोक प्रयत्न करीत होते. पण शेवटीं तें डॉ. रासबिहारी घोष या बंगाली गृहस्थांना मिळालें. मेहता, वाच्छा, गोखले यांच्यावर शिव्यांचा भडीमार सुरु झाला. 'चणे खावे मेथा वाच्छांचे, तेव्हां अध्यक्षपदीं नाचे' असा झणझणीत अग्रलेख काळ पत्रांत आला होता. मी हें सर्व वाचीत होतों. राजकारणाबद्दल चर्चाहि करीत होतों. पण सुदैवानें त्यामुळें अभ्यासांत कांहीं कमीपणा आला नाहीं. मॅट्रिक झाल्यावर जो मोठा विचार माझ्या डोक्यांत आला होता तो हा कीं अमेरिका येथें जाऊन शिकावें. त्यावेळीं आमच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षेला सायन्सचा वर्ग होता कीं नव्हता हें आठवत नाहीं. पण मॅट्रीकच्या सायन्सचा मीं लक्षपूर्वक अभ्यास केला होता. कांहीं शास्त्रीय उपकरणेंहि घरीं विकत घेतलीं होतीं. अमेरिकेला जाऊन शास्त्रीय विषयांत पंडित व्हायचें ही त्यावेळीं जबरदस्त मनीषा होती. तिचा परिणाम सरळ न होतां कांहीं निराळ्या प्रकारें झाला हें पुढें येईलच.

यंदा कोल्हापुरांत विशेष गोष्ट घडणार होती ती म्हणजे राजकन्येचें लग्न. तें मार्च-एप्रिलमध्येंच केव्हांतरी झालें. त्यावेळीं किर्लोस्कर

मंडळी लग्नसमारंभासाठीं मुद्दाम येणार होती. आम्हाला प्रिव्हियस परीक्षेसाठीं म्हणजे पहिल्या वर्षासाठीं कालिदासाचें शाकुंतल हें नाटक होतें. किर्लोस्कर मंडळींत एक दोन वर्षांखालींच एक नवा नट आला होता. त्याचें नांव बालगंधर्व. या नटाची ख्याति आम्ही मुंबईला गेलों होतों तेव्हांपासून ऐकत होतों. शेवटीं किर्लोस्कर मंडळी कोल्हापुरास आली. त्यांचा शेवटचा दर आठ आणे व खुर्चीला कमींत कमी दीड रुपया. चोवीस खेळांचीं खुर्चींचीं तिकिटें एकदम घेणाऱ्यास चोवीस रुपयांनाच मिळत. आमच्या एका मित्रानें असें एक चोवीस रुपयांचें तिकिटहि काढलें. आम्ही आतांपर्यंत नाटकाला जायचें म्हणजे दोन आण्यांचें तिकिट काढत असूं. जातांना घोंगडें किंवा पोतें घेऊन जावयाचें. पण आतां आम्ही कॉलेजांत गेलों होतों. आणि आमच्या एका मित्रानें चोवीस नाटकें पाहण्याचा चोवीस रुपयांचा पास काढला होता. सौभद्र नाटक पहावें असें पुष्कळांचें म्हणणें होतें. पण आम्हीं शाकुंतल पहावयाचें ठरविलें. शाकुंतल आम्हांला अभ्यासाला असल्यामुळें त्यासाठीं घरांतून दीड रुपया मागणें जरा सोपें गेलें. शेवटीं आम्हीं शाकुंतल पाहिलें. पहांटे चार वाजेपर्यंत नाटक चाललें. बालगंधर्वांनें चारच पदें म्हणावयाचीं होतीं. तीं इतक्या गोड आवाजानें आणि अशी कांहीं सुंदर म्हटलीं कीं आम्ही सर्वजण बेहद्द खूष होऊन गेलों. पुढे चार दिवस नाटकाशिवाय आम्ही दुसरें कांहीं बोलत नव्हतों. शाकुंतलाचा प्रयोग उत्तम वठला होता यांत शंका नाहीं.

आमच्या पुढच्या वर्गांत म्हणजे इन्टरमिजीएटमध्यें असलेले बाळासाहेब पंडित हे बालगंधर्वांचे मोठे भक्त होते. त्याचीं नाटकें त्यांनीं यापूर्वींच मुंबई व पुणें येथें पाहिलेलीं होतीं. तीं पाहिल्यावर बालगंधर्व म्हणजे एक अपूर्व चमत्कार आहे अशी त्यांची खात्री

पटली होती. बालगंधर्व कोल्हापुरास आल्यावर बाळासाहेबांनीं त्यांच्याशीं विशेष मैत्री केली. गोविंदराव टेंबे, सुप्रसिद्ध हार्मोनियम वाजविणारे यांची आणि बाळासाहेबांची त्यावेळीं बरीच मैत्री असावी. कॉलेजच्या विद्यार्थ्यांची एक सभा कॉलेजांतच झाली. त्यांत बालगंधर्वांना गाण्यासाठीं कॉलेजांत बोलवावें असा ठराव बराच वादविवाद झाल्यावर संमत झाला. बालगंधर्वांचें गाणें अवश्य व्हावें अशा अर्थाचें एक भाषण मींहि या सभेंत केलें. त्यामुळें माझी आणि बाळासाहेब पंडितांची विशेष मैत्री झाली. शेवटीं गाणें झालें. गाणें करण्याची परवानगी कॉलेजचे प्रिन्सिपॉल दस्तूर यांनीं दिली. प्रो. आपटे हे गाण्याचे जाणते आणि शोकी होते. म्हणून त्यांना जाऊन मी भेटलों. पण ते म्हणाले, "अरे, गाणें म्हणजे या असल्या पोरांनीं लुगडें चोळी नेसून केलेलें तें नव्हेच मुळीं. मी या गाण्याला मुळींच येणार नाहीं." प्रो. आपटे त्यावेळीं व्हॉईस प्रिन्सिपॉल होते. मी त्यांच्याकडून उठलों आणि प्रो. दस्तूर यांच्याकडे गेलों. त्यांनीं ताबडतोब परवानगी दिली. एका रात्रीं कॉलेजच्या सुंदर दिवाण-खान्यांत बालगंधर्वांचें गाणें झालें. कॉलेजांतील मुलें पंचवीस कां तीसच होतीं. पण सर्व हॉल माणसांनीं भरलेला होता. अग्रभागीं बालगंधर्वांबरोबर गोविंदराव टेंबे होते. बालगंधर्व दोन तास गायले. आम्हांला त्यांतील कांहीं कळलें असें नाहीं. पण गाणें उत्तम झालें. बाळासाहेब पंडित नुसते आनंदांत होते. पुढें पारितोषिक म्हणून बालगंधर्वांना सोन्याच्या बटनांचा सेट देण्यांत आला. कॉलेजांत अवघे पंचवीस तीस रुपये जमा झाले होते. पण बाळासाहेब तेव्हां श्रीमंत होते. सेटचा बाकी लागलेला पैसा त्यांनीं स्वतः दिला.

उन्हाळ्यांत मी आंबेघाटला राहण्यास गेलों. यावेळीं मी एकटाच गेलों होतों. मी नीळकंठराव शेवडे यांच्याकडे राहिलों. नीळकंठ-

रावांचे धाकटे बंधु शिवरामपंत हे त्याच वेळीं आंबेघाट येथें त्यांच्याकडे राहण्यास आले होते. शिवरामपंत हे विलायतला जाऊन वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करून आलेले होते. ते मुंबईच्या इंटर-सायन्स या परीक्षेंत पहिल्या वर्गांत आले होते. त्यावेळीं इंटरसायन्स ही परीक्षा फार कठीण होती, असें म्हणतात. त्यांतहि पहिल्या वर्गांत येणें ही गोष्ट फारच कठीण होती. शिवरापंत हे बुटके, बोलके आणि खूप हिंडणारे गृहस्थ होते. त्यांच्याजवळ डिकन्सचें ' ओल्ड क्युरि-ऑसिटी शॉप ' हें पुस्तक होतें. तें मीं वाचावयास घेतलें. हिंडणें-फिरणें व गप्पा मारणें यांतून वेळ उरेल त्यांत मी तें वाचीत असें. तें मला फारच आवडलें. शिवरामपंत आणि मी रोज सकाळीं चहा व फराळ करून आठ साडे आठ वाजतां हिंडावयास जाऊं लागलों. हिंडून फिरून आम्ही दुपारीं एक दोन वाजतां परत यावयाचें. आंबे येथें पंधराएक दिवस शिवरामपंतांच्या सहवासांत माझा काळ चांगला गेला. शिवरामपंतांच्या बोलण्याचालण्यांत एक प्रकारचा थाट होता; एक प्रकारची ऐट होती. ते विलायतेच्या गोष्टी सांगत. त्यावेळीं विलायत, अमेरिका, जपान वगैरे ठिकाणच्या गोष्टी ऐकण्याची मला अनिवार हौस होती. स्कॉटलंडमधले किल्ले आपण कसे पाहिले तें शिवरामपंतांनीं जेव्हां सांगितलें तेव्हां मला मोठा उत्साह वाटला. त्यावर्षीं कॉलेजांत आम्हांला वॉल्टर स्कॉटचें ' लेडी ऑफ् दी लेक ' हें काव्य होतें. शिवरामपंत म्हणाले कीं आपल्या महाराष्ट्रीय किल्ल्यांच्या मानानें स्कॉटलंडमधील किल्ले म्हणजे पोरखेळ वाटतात. मला वाटलें, स्कॉटलंडमध्यें स्कॉट झाला तसा कोणी कवि महाराष्ट्रांत कां झाला नाहीं ? शिवरामपंतांनीं विलायतचेंहि पुष्कळ वर्णन केलें. केंब्रिजला ते शिकावयास होते. तेथीलहि हकीगती त्यांनीं सांगितल्या. माझ्या मनांत त्यावेळीं परदेशी जाण्याचें फार होतें. फार काय, अमेरिकेंत

जावें, तेथें कांहीं मजुरी करावी, आणि शिक्षण घ्यावें असेहि विचार मनांत येत. हे विचार मनांतल्या मनांतच ठेवावे लागले ही गोष्ट निराळी. पण १९०८ या सालीं हे विचार मनांत अतिशय येत होते ही गोष्ट खरी. त्याचा परिणाम मात्र माझ्या अभ्यासावर झाला. म्हणजे अभ्यासाखेरीज इतर गोष्टींकडे माझें लक्ष अधिक लागलें.

पुढें मे अखेर मी कोल्हापूरला आलों. माझ्या धाकट्या भावाला समर्थ विद्यालयांत घातलें होतें. त्यासंबंधीं चौकशी करण्यासाठीं एक दिवस पोलीस घरीं आले. त्यांना धीटपणें मी सर्व उत्तरें दिलीं. आमचा विजापूरकर आणि जावडेकर यांच्याशीं विशेष संबंध होता. तेव्हां पोलिसांची नजर माझ्याकडे वळली यांत नवल नाहीं. पुढें माझी आई खूप आजारी पडली. मी प्रिव्हियसच्या परीक्षेला मुंबईला गेलों. बरोबर माझा भाऊहि होता. यावेळीं मी मुंबई येथें सुमारें महिनाभर होतो.

या परीक्षेला जाण्यापूर्वीं देशांत महत्त्वाच्या गोष्टी घडल्या होत्या. बळवंतराव टिळक यांच्यावर राजद्रोहाचा खटला मुंबई हायकोर्टांत होऊन त्यांना सहा वर्षें काळ्या पाण्याची शिक्षा झाली. ती बातमी ऐकून आमचीं सर्वांचीं अंतकरणें फुटून निघालीं. टिळक यांच्या राजकारणाबद्दल जरी गेल्या वर्षींच्या कॅांग्रेसमध्यें दुमत झालें असलें तरी त्यांच्या देशभक्तीबद्दल आणि त्यासाठीं वाटेल तो त्रास सोसण्याच्या तयारीबद्दल कोणालाहि शंका नव्हती. लोकांना जबरदस्त धक्का बसला. त्या दिवशीं खासबागेंत आम्हीं किती तरी वेळ या खटल्याची चर्चा करीत होतों. टिळकांच्या अगोदरच शिवराम महादेव परांजपे यांच्यावर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना शिक्षा झाली होती. प्रो. विजापूरकर, प्रो. वामन मल्हार जोशी आणि रा. रा. विनायकराव जोशी यांच्यावर विश्ववृत्तांतील एका लेखाबद्दल खटला होऊन त्यांनाहि

शिक्षा ठोठावण्यांत आल्या. सर्वत्र शिक्षा आणि राजद्रोह हेच शब्द ऐकूं येत होते.

प्रो. विजापूरकर आणि प्रो. जोशी हे दोघेहि विश्ववृत्ताचे संपादक होते. विनायकराव जोशी हे त्याचे मुद्रक होते. या तिघांवर खटला म्हणजे कोल्हापुरांत अत्यंत खळबळ माजविणारी घटना होती. लेख रा. रा. सातवळेकर यांनीं लिहिलेला होता. ते खटल्यांतून सुटलेच असें दिसतें. बाकीच्या तिघांना—विशेषतः वामनराव जोशी ह्यांना—जबरदस्त शिक्षा झाल्या. ( वामनराव जोशी ह्यांना तीन वर्षें सक्त मजुरीची शिक्षा झाली. ) आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला अत्यंत गंभीर स्वरूप आलें. विजापूरकर म्हणजे आम्हांला अगदीं जवळचे; वामनरावांचाहि गेल्या दोन वर्षांतला उत्तम परिचय आणि १९०४ सालीं मी 'समर्थांत' लेख लिहिले तेव्हांपासून विनायकराव जोशी ह्यांची चांगली माहिती. अशा प्रकारें या खटल्याच्या निकालामुळें आम्हांला स्वतःला धक्का बसावा त्याप्रमाणें झालें.

ऑगस्ट महिना संपला. माझी कॉलेजांतली टर्म भरली. तेव्हां मीं मुंबईला जावें असें ठरलें. त्याप्रमाणें सप्टेंबरच्या सुरुवातीला मी पुण्यास कांहीं दिवस राहून, मुंबईस गेलों. पुण्यांत मी रा. रा. हरि नारायण आपटे यांच्याकडे उतरलों होतों. आठ दहा दिवस त्यांच्याकडे होतों. तेवढ्या काळांत माझें त्यांच्याबद्दलचें मत अगदीं उत्तम झालें. त्या आठ दिवसांत मी दोन दिवस डेक्कन कॉलेजांत जाऊन निरनिराळ्या प्रोफेसरांचीं व्याख्यानें ऐकलीं. डेक्कन कॉलेजांत माझे मित्र विष्णुपंत गोखले होते. याच वेळीं तेथें रा. रा. ( पुढें प्रो. ) रामभाऊ रानडे हे फेलो होते. पुण्याला आठ दहा दिवस राहून मी मुंबईला आलों. तेथें माझे मित्र करमरकर यांनीं माझी एका खोलींत राहण्याची व्यवस्था केली होती.

मुंबईत प्रार्थनासमाजासमोर असलेल्या चाळींत मी सप्टेंबरच्या शेवटीं रहावयास सुरुवात केली होती. मी गेल्यावर चार दिवसांतच तेथें समोरच्या बाजूला अशाच एक कां दोन खोल्या घेऊन तेथें बालगंधर्व रहावयास आला. त्यावेळीं बालगंधर्वाची कीर्ति सर्व महाराष्ट्रभर आणि बाहेरहि दुमदुमत होती. बाळासाहेब पंडितहि बालगंधर्वाबरोबर होते. बालगंधर्वाकडे खूप गर्दी जमे. खालीं कुलकर्ण्यांचें हॉटेल होतें. तेथून त्यांच्याकडे चहा इतक्या वेळा आणि इतक्या संख्येनें जाई कीं आम्हांला त्याचें मोठें आश्चर्य वाटे. बाळासाहेब पंडित एकदां माझ्या खोलीकडे येऊन गेले. पण दिवसभर ते बालगंधर्वाच्या गर्दींत निमग्न असत. कोल्हापुरांत मी बालगंधर्वाला पाहून फक्त सहा महिनेच झाले होते. पण तेवढ्या वेळांत तो बराच बदलला असें मला वाटलें. मीहि बालगंधर्वाचें नाटक पाहण्यास जात असे आणि दर खेपेला दीड रुपया देऊन माडीवरची एक खुर्ची रिझर्व्ह करीत असे. मी त्या ऑक्टोबरांत पांचसहा नाटकें तरी पाहिलीं. सखूबाईच्या हॉटेलांत दरमहा अकरा रुपये देऊन दोन वेळां जेवावें, वेलणकराच्या हॉटेलांत चहापाणी घ्यावें, आठवड्यांतून एकदोन नाटकें पहावींत अशी आमची पहिल्या वर्षाच्या परीक्षेची तयारी चाललेली होती. वडिलधारें माणूस आजूबाजूला कोणीहि नाहीं अशी स्थिति होती. परीक्षेला बसलों. पेपर्स सर्व लिहिले. कोल्हापुरची कांहीं मंडळीं परीक्षेसाठीं आली होती. त्यांच्या संगतींत सात आठ दिवस गेले. एक दिवस कार्ल्यांचें लेणें पहावयास गेलों. आईची तब्बेत बिघडलेली होती. पण मी तेव्हां कोल्हापुरास परत न जातां जमाखिंडीला डॉ. कारखानवीस यांचेकडे जाऊन थोडे दिवस राहावें असें मला पत्र आलें. आणि मी मुंबईहून जमाखिंडीस गेलों.

जमाखिंडी येथें डॉक्टरांच्याकडे तीन चार आठवडे सुखांत गेले.

जमखिंडी सोडली त्यावेळीं माझें वजन दहा पौंडांनीं वाढलें होतें. परीक्षेचा रिझल्ट मला जमखिंडीला कळला कीं कोल्हापुरला आल्यावर कळला तें आतां आठवत नाहीं. पण माझी परीक्षा नापास झाली ही गोष्ट खरी. कोल्हापुरला आलों त्यावेळीं परिस्थिति अगदीं बदललेली होती. आईहि कोल्हापुरास माझ्या अगोदर आली होती. तिची प्रकृति तेव्हां फार बिघडलेली होती असें मला आढळून आलें.

प्रिव्हियसच्या वर्गांत पुन्हां नांव दाखल केलें व १९०९ च्या जानेवारीपासून नवे अभ्यास सुरू झाले. समर्थ विद्यालय बंद झालें होतें. त्यामुळें धाकटा भाऊहि घरीं परत आला. तो पुन्हा सरकारी शाळेंत ( हायस्कुलांत ) जाऊं लागला. प्रो. विजापूरकरांना शिक्षा होऊन ते तुरुंगांत गेलेले. रावसाहेब जावडेकर यांनींहि कोल्हापूर सोडलेंच. थोडक्यांत १९०९ हें वर्ष संकटाचें ठरलें असें नाहीं, तर संकटाच्या सुरवातीचें ठरलें. परदेशीं कोठेतरी जाऊन विद्याभ्यास करण्याचीं स्वप्नें लयाला गेलीं. येथें चालू केलेल्या शास्त्रीय अभ्यासाचा शेवट झाला. कांहींतरी लिहून पैसे मिळतील काय म्हणून प्रयत्न केला; त्यांतहि यश मिळालें नाहीं. मी एक रामसीताचरित्रावर नाटक लिहिलें होतें. तें हरिभाऊ आपटे ह्यांना दाखविलें. त्यांनीं चांगलासा अभिप्राय दिला नाहीं. प्रिव्हियसचा अभ्यास पुन्हा सुरू करतांना एक प्रकारचा कंटाळा आला. बरोबरचे मित्र पुढच्या वर्गांत गेलेले. अशी सर्व परिस्थिति निराशाजनक. तरी पण अभ्यासाला लागलों आणि वर्षअखेर प्रिव्हियसची परीक्षा दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झालों. १९०९ आणि १९१० हीं दोन्हीं वर्षें अत्यंत विषण्ण अशा मनःस्थितींत गेलीं.

१९१० च्या जानेवारींत मी इंटरमीजिएटच्या वर्गांत दाखल झालों. त्यावेळीं माझी मनःस्थिति पुष्कळ समाधानाची झालेली

होती. इंटर झाल्यावर पुण्यास जाऊन फर्ग्युसन कॉलेजांत नांव दाखल करायचें असा बेत होता. कारण कोल्हापुरचें राजाराम कॉलेज त्यावेळीं इन्टरमीजिएटपर्यंतच होतें. मी इंटरच्या वर्गांत गेलों तेव्हां तेथें पंचवीसएक विद्यार्थी असावेत. इंटरच्या वर्गांत असतांना श्रीमंत बाबासाहेब पंतप्रतिनिधि यांचा माझा बराच स्नेह जमला.

त्या वर्षीं मी बाबासाहेबांच्या बरोबर इंटरमीजिएटच्या परीक्षेसाठीं मुंबईला गेलों. बाबासाहेबांच्या बरोबर असल्यानें या वेळीं मी परीक्षेला त्यांच्याबरोबरच जात येत असें. आमच्या शेजारीं बाळा-साहेब पंडितहि उतरले होते. पण एक दिवस बालगंधर्व येणार म्हणून ते जे परीक्षेच्या मंडपांतून निघून गेले ते गेलेच. पुन्हां ते परीक्षला बसलेच नाहींत. आम्ही कोल्हापुरला परत आलों. कांहीं दिवसांनीं निकाल कळला. मी तिसऱ्या वर्गांत पास झालों. सेकंड क्लासमध्यें येईन असें वाटत होतें. परंतु गणितांत मला केवळ पासा-पुरते मार्क मिळाले. आतां पुण्याला जायचें होतें. अर्थात् आई-भाऊ यांच्यासह तेथें जाण्याचें ठरलें. पुण्यांतील एका मित्रानें तेथें एक जागा ठरविली. एक दिवस आम्ही सर्व मंडळी पुण्याला येऊन दाखल झालों. मी फर्ग्युसन कॉलेजांत बी. ए. च्या वर्गांत नांव नोंदविलें.

* * *

# ४

१९१० अखेर मला उणीपुरीं वीस वर्षें झालेलीं होतीं. एवढ्या काळांत माझी इंटरमीजिएटची परीक्षा उतरलेली होती. अमेरिकेला जाण्याची केलेलीं मनोराज्यें ढासळलीं होतीं. पुण्याला जो मीं प्रवेश केला त्यावेळीं माझें पुढें काय होणार याची मला कल्पनाहि नव्हती. कांहीं ओळखी झाल्या होत्या; कांहीं थोडें लेखन झालें होतें. आईच्या आजारामुळें अंतर्यामीं मी बराच खचलों होतों. राहण्यासाठीं जी जागा मिळाली ती भास्करराव ओंकार यांच्या घरीं—शनिवार पेठेंत शनिवारवाड्याच्या बाजूला होती.

मीं कॉलेजांत प्रथम गणित विषय बी. ए. च्या वर्गांत घेतला. मला इंटरमध्यें गणितांत मार्क थोडेच मिळाले होते. पण रँग्लर परांजपे यांच्या क्लासमध्यें जाण्याची फार हौस. त्यामुळें गणित घेतलें. माझ्या आईची तब्बेत ठीक नव्हती. १९१२ सालीं तिनें मला लग्नाचा आग्रह केला. तोंपर्यंत साताऱ्याला माझे थोरले (सावत्र) बंधु तेव्हां असत; त्यांच्याकडे मी कधीं कधीं सुट्टींत जाई. तेव्हांहि वधुपरीक्षेचे प्रसंग आलेले होते. पण आतां आईचाच आग्रह चालू झाला. हें विवाहाचें प्रकरण १९१२ सालीं निघालें. त्यापूर्वीं मीं पांचसहा मुली पाहिलेल्या होत्या. आणि त्याहि लोकाग्रहास्तव. १९१२ सालच्या सुरुवातीपासून हें प्रकरण सुरू झालें.

१९१२ साल हें नव्या कॉलेजची ओळख करून घेण्यांत गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कॉलेजांतील व्याख्यानें सुरू व्हायला दोन दिवसांचा अवकाश होता. कॉलेजांत नांव दाखल केलें त्या

दिवशीं दुपारचे १२–१२॥ वाजले होते. हेडक्लार्कला पत्ता विचारून मी प्रो. कर्व्यांच्या विधवाश्रमाकडे निघालों. कालव्याच्या बाजूनें जात जात दुपारीं दोन वाजतां किंवा त्या सुमारास आश्रमांत पोहोंचलों. कर्व्यांच्या अनाथ बालिकाश्रमाला ती माझी पहिलीच भेट होती. आश्रमाच्या एक सेविका पार्वतीबाई आठवले यांना मीं १९०५ सालीं कोल्हापुरांत पाहिलें होतें. त्यांना कांहीं अल्पस्वल्प मदतहि केली होती. त्यांच्यासाठीं झालेल्या हायस्कूल आणि कॉलेज यांच्या सभेंत मी बोललों सुद्धां होतों. त्या पार्वतीबाई आज भेटल्या. आश्रम पाहण्यांत तास दीड तास घालवून चारपांच वाजतां परत फिरलों आणि संध्याकाळीं घरीं पोचलों. आज आश्रम पाहून प्रो. कर्वे यांच्याबद्दल मला विशेष आदर वाटूं लागला.

फर्ग्युसन कॉलेजांत आम्ही गेलों तें रँगलर परांजप्यांच्या चहूंकडे गाजत असलेल्या कीर्तीमुळें. सौंदर्याच्या दृष्टीनें पाहिलें तर डेक्कन कॉलेजपेक्षां फर्ग्युसन कॉलेज निःसंशय सुंदर होतें. आमचे कांहीं थोडे वर्गबंधु डेक्कन कॉलेजांत गेले होते. श्रीमंत बाबासाहेब पंत-प्रतिनिधि यांनीं डेक्कन कॉलेजांत नांव घातलें होतें. ते खडकीला नदीकांठीं बोटक्लबाजवळ एका विस्तीर्ण बंगल्यांत रहावयास गेले. आम्हीं कांहीं दिवसांनीं ओंकारांचें घर सोडलें. शनिवारांत मेहेंदळ्यांची एक बाग होती. त्या बागेंतील बंगल्यांत आम्ही रहावयास गेलों. येथें जावडेकर मंडळीहि आमचेबरोबर राहत. ओंकारांच्याकडे आम्ही कांहीं महिनेच राहत होतों. बी. ए. चा ज्युनिअरचा वर्ग म्हणजे बहुतेक सर्वांचाच जवळ जवळ सगळा वेळ खेळण्यांत जातो. तशांत माझी स्थिति तर फार विलक्षण होती. माझी इंटरची परीक्षा पास झाली होती इतकेंच. पण घरच्या आजारामुळें आणि धावाधावीमुळें माझें मनहि फारसा स्थिर

स्थितींत नव्हतें. माझा बराच वेळ कॉलेजांत जात असे. कॉलेजांत म्हणजे रेसीडेन्सींत रहाणाऱ्या मुलांच्या संगतींत. रेसीडेन्सींत अनेक प्रकारच्या मुलांचा संबंध येत होता. पण माझ्या विशेष लक्षांत राहिले ते म्हणजे माझे मित्र गोखले, दोघे सोवनी आणि भिडे.

मी बी. ए. साठीं गणित हा विषय घेतला व दोन वर्षें त्याचा अभ्यास केला. त्यांतच माझी आई अतिशय आजारी झाली. आणि पुणें सोडून मिरज येथें आम्हांस रहावें लागलें. या जरा दीड दोन वर्षें पुढच्या गोष्टी झाल्या. त्यांचा उल्लेख एव्हांच करण्याचें कारण १९१२ सालीं मी बी. ए. ला बसलों व गणितांत नापास झालों. अशा प्रकारें हा माझा आवडता विषय कर्मधर्मसंयोगानें मला सोडून देणें भाग पडलें. १९१२ सालीं माझें लग्न आईच्याच विशेष आग्रहावरून मिरज मुक्कामीं झालें. (अर्थात् मी त्यावेळीं बी. ए. झालेला नव्हतों.) माझ्या पत्नीचें माहेरचें नांव कृष्णाबाई. आमच्या घरीं आल्यावर तिचें नांव मालतीबाई झालें. लग्नाच्या वेळीं माझ्या आईची प्रकृति खालावलेली होती. पुढें दोन वर्षांनीं मी मुंबईला गेल्यावर ती बरी झाली.

आमचे फर्ग्युसनचे प्रिन्सिपल म्हणजे सर्वांच्या कौतुकाचा विषय होता. वर्गांत शिकवितांना ते तुटक तुटक अशा वाक्यांत बोलत. त्यांची शिकविण्याची पद्धति फार नामी होती. विद्यार्थ्यानें एखादें उदाहरण त्यांच्यापेक्षांहि जलद सोडविलें तर ते त्याला शाबासकी देत. प्रश्न कितीहि विचारले तर रागावत नसत. ते आपल्या बी. ए. च्या विद्यार्थ्यांना दर वर्षीं एकदां आपल्या बंगल्यावर चहापानार्थ बोलावीत. त्यांच्याकडे एकदां गेल्याची मला आठवण आहे. त्या दिवशीं आम्ही पंचवीस तीस जण होतों असें वाटतें. फराळाचें केलेलें होतें आणि रँगलरांच्या पत्नी सीताबाई आणि लहानशी कन्या शकुंतला तेव्हां

वाढत होत्या. शकुंतला तेव्हां पांच सहा वर्षांची असावी. तास दीड तास गप्पाविनोद खूप चालला होता. त्या चहाऱ्या निमित्तानें आम्हांला प्रिन्सिपॉलसाहेबांचें घर पहावयास मिळालें.

पुणें येथें कॉलेजांत कांहीं नामांकित वक्त्यांचीं भाषणें ऐकावयास मिळालीं. त्यांतील डोळ्यासमोर उभें असें बॅरिस्टर जयकर यांचें भाषण आठवतें. जयकर त्यावेळीं अगदीं स्वदेशी पोषाख करून आले होते. डोक्यावर पांढरा रुमाल, अंगांत पारशी पद्धतीचा कोट, अंगावर उपरणें घेतलेलें आणि धोतर नेसलेले; अशी त्यांची मूर्ति मी १९१२ सालीं फर्ग्युसन कॉलेजांत पाहिली. त्यांचें भाषण ऐकल्यावर तर आम्ही सारे खूष होऊन गेलों. पूर्वी १९०५ सालीं गोपाळराव गोखले यांचें भाषण कोल्हापूर येथें ऐकल्यावर जसे आम्हीं आश्चर्यचकित झालों होतों जवळ जवळ तसेंच मुकुंदराव जयकरांचें भाषण ऐकून आमचें यावेळेला झालें. जयकरांचें भाषण ऐकलें तेव्हां आम्हीं इंग्रजी पांचवींत नसून बी. ए. च्या वर्गात होतों. जयकर आपल्या भाषणांत म्हणाले, " मी एक वेळ या कॉलेजांत येऊन प्रोफेसर होण्याचा संभव होता. " तें ऐकून तर आम्ही गार झालों. जयकरांच्यासारखा सुंदर इंग्रजी बोलणारा आपल्या कॉलेजांत कोणीहि नाहीं असें त्यावेळीं आम्हांला वाटलें. याशिवाय एकदां मुंबई सरकारचे कार्यकारी सभासद सर क्लॉड हिल यांचें भाषण ऐकावयास मिळालें. त्यांत वक्तृत्व अर्थात् नव्हतेंच. सर्व राजकारण होतें. लॉर्ड सिडनहेम यांचेंहि भाषण एकदां ऐकावयास मिळालें. आमचा डिबेटिंग क्लब होता. तिकडे मी फारसा किंवा बहुतेक जातच नसे. मी अभ्यासांत मागें पडल्यामुळें डिबेटिंग वगैरे कशांतहि फारसा भाग घेतला नाहीं. आम्हांला वर्गांत होणारीं व्याख्यानें ऐकतां ऐकतां पुरेवाट होत असे.

४

१९१२ सालीं मी बी. ए. ची परीक्षा उतरलों नाहीं हें वर सांगितलेंच. १९१३ मध्यें मला कांहींतरी मिळविण्याची आवश्यकता भासली. त्यावर्षीं मीं इंटरमीजिएटचे क्लासेस काढले. शनिवार पेठेंतच गोळ्यांच्या वाड्यांतील माडीवर एक मोठीशी खोली भाड्यानें घेतली. दर संध्याकाळीं एक कीं दोन तास या क्लासला जात असे. बारा पंधरा विद्यार्थी येत असत. प्रत्येकाची दरमहा फी दोन रुपये असे. क्लास कांहीं दिवस चालला. खोलीचें भाडें दरमहा दहा रुपये दिल्यावर दहाबारा रुपये मला मिळत. पुढें क्लासेस बंद केले आणि कांहींतरी उद्योग पाहूं लागलों. प्रो. विजापूरकर यांनीं 'ज्ञानप्रकाशां'त नोकरी पाहून देण्याची खटपट केली. वामनराव पटवर्धन तेव्हां 'ज्ञानप्रकाशा'चें काम पाहत. त्यांच्याकडे मला अण्णा (प्रो. विजापूरकर) भेटावयास घेऊन गेले. वामनरावांनीं रोज चार तास म्हणजे अर्धा दिवस हिशेब धरून दरमहा वीस रुपये पगार देण्याचें कबूल केलें. मी रोज बारा कॉलम मजकूर लिहिणें जरूर पडेल म्हणूनहि सांगितलें. मला त्यावेळीं वर्तमानपत्राची कसलीहि माहिती नव्हती. पुढें वामनरावांनीं ज्ञानप्रकाशचे प्रत्यक्ष संपादक बापूराव आंबेकर यांना बोलावून माझी नेमणूक केल्याबद्दल आणि मला रोज बारा कॉलम मजकूर लिहिण्याचें बजावल्याबद्दल सांगितलें. बापूराव म्हणाले, "रोज चार तासांत कोणी बारा कॉलम मजकूर लिहूं शकेल हें शक्य नाहीं. शिवाय साऱ्या ज्ञानप्रकाशांत मजकूर सर्व दहा बारा कॉलमच असतो. चला माधवराव, आतां तुम्हीं माझ्या हाताखालीं आलांत. चार तासांत काय लिहावयाचें, काय करावयाचें, तें मी तुम्हांला सांगतों. वामनरावांना पत्राच्या मजकुराची कांहीं माहिती नाहीं." वामनराव त्यावर कांहीं बोलले नाहींत. त्या दिवसापासून मी ज्ञानप्रकाशांत लागलों. तेथें एक दीड वर्षे होतों. पण त्या दीड

वर्षांत मी पुष्कळच शिकलों. बापूराव मला कौन्सिलच्या भाषणांचे वगैरे आणि सरकारी ठरावांचे मराठी तर्जुमे करण्यास सांगत. मला जरा जड गेलें. पण पुढें काम त्यांच्या पंसतीस उतरलें. याप्रकारें मी 'ज्ञानप्रकाश'चा एक उपसंपादक झालों.

'ज्ञानप्रकाशां'त मला दरमहा वीसच रुपये मिळत. पुढें ते पंचवीस झाले. तथापि त्यावेळीं सध्याच्या मानानें स्वस्ताई फार होती. पण मला कांहींतरी उद्योग लागला ही महत्त्वाची गोष्ट होती. पुण्याच्या दोन वसंतव्याख्यानमालांचा रिपोर्ट मी दिलेला आहे. तो चांगला रिपोर्ट होता असें तेव्हां पुष्कळांनीं म्हटलें होतें. १९१३ सालीं पुणें येथें भरलेल्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचा रिपोर्टहि मी थोडाफार ज्ञान-प्रकाशांत दिलेला आहे. यावेळीं असोसिएटेड प्रेसच्या मुंबई शाखेचे मॅनेजर मि. चाटरजी नांवाचे बंगाली गृहस्थ होते. त्यांची माझी प्रथम ओळख पुण्याच्या कायदेकौन्सिलांत झाली. मि. चाटरजी यांना तेव्हां दरमहा दीडशें रुपये पगार होता. शिवाय पुण्यास येण्याजाण्याचा व राहण्याचा सर्व खर्च त्यांना मिळे. त्यावेळीं चाटरजींच्या सारखी नोकरी जर मला मिळाली तर मी आपणाला धन्य समजलों असतों. तेव्हां कौन्सिलचे प्रमुख सभासद सर फेरोजशहा मेहता होते. त्यांच्या प्रशस्त आकृतीकडे पाहून कोणालाहि आदर आणि भय वाटे. मुंबईचें क्रॉनिकल पत्र तेव्हां सुरू झालेलें होतें. मि. चाटरजी यांनीं मला क्रॉनिकलसाठींहि रिपोर्ट करण्यास सांगितलें आणि मीं तसा केलाहि. क्रॉनिकलमधील रिपोर्ट सर फेरोजशहा मेहता यांनीं चांगला म्हणण्याइतका उत्तम झाला पाहिजे असें त्यांनीं मला सांगितलें. मी त्याप्रमाणें रोज रिपोर्ट लिहीत असे. तो अर्थात सारांशरूप असे. तरीपण 'शॉर्टहँड' नोट्स् घेणाऱ्या रिपोर्टरपेक्षां तो कमी पडला नाहीं. या कौन्सिलमध्यें तेव्हांचीं पुष्कळ मोठीं माणसें होतीं. त्यांपैकीं

मराठी ... दा. क. ११७०८

कोणाचाहि अपमान होऊं नये ही सर फेरोजशहा यांची वृत्ति असे. नामदार साठे, नामदार उपासनी, नामदार रँगलर परांजपे वगैरे तेव्हांचे सरकारनें नेमलेले सभासद होते. ते सर्वजण आपापलीं कामें अतिशय शहाणपणानें व स्पष्टपणानें करीत. दोन कौन्सिलें मी पाहिलीं आणि त्यापासून बराच बोधहि झाला. विशेषतः सर फेरोजशहा मेहता यांना पाहून मी विस्मित झालों.

यावेळीं कौन्सिलदारांप्रमाणेंच वर्तमानपत्राच्या बातमीदारांनाहि योग्य पोषाख करून जावें लागत असे. पुणें येथें मी प्रथम कौन्सिलला बातमीदार म्हणून गेलों तेव्हां डोक्याला रुमाल, अंगांत लॉंग कोट आणि पाटलोण घालून गेलों होतों. आमचे ए. सी. चाटर्जी तर अगदीं विलायती पोषाखांत होते. एक विलायती पोषाख किंवा आपला राष्ट्रीय पोषाख याखेरीज तेव्हां प्रवेश मिळत नसे. टोपी ही कोणाहि बातमीदाराच्या डोक्यावर पाहिल्याचें मला आठवत नाहीं. एक विलायती पोषाखामुळें रिक्त मस्तक असलेले किंवा हिंदी पद्धतीप्रमाणें डोक्याला फेटा बांधलेले किंवा पगडी घातलेले असेच लोक तेथें येऊं शकत. ज्यांच्या डोक्यावर पगडी असे त्यांना ती डोक्यावरच ठेवावी लागे. एकदा सर इब्राहीम रहिमतुल्ला डोक्यावरची पगडी हातांत घेऊन पांच एक मिनिटें आपले केस खाजवीत होते किंवा आपल्या डोक्यावरून हात फिरवीत होते. वरती अध्यक्षांच्या शेजारीं सर क्लॉड हिल बसले होते. त्यांनीं सर इब्राहीम यांना हातांत पगडी घेऊन दुसऱ्या हातानें डोकें चोळतांना पाहिलें. त्याबरोबर ते अध्यक्षांना म्हणजे गव्हर्नरांना म्हणाले, “ पहा, नामदार सभासद शिस्तीला सोडून हातांत पगडी घेऊन बसले आहेत.” सर इब्राहिम यांनीं लागलींच डोक्यावर पगडी चढविली आणि सभेचें काम चालू झालें. अर्धा एक तास झाला. सर क्लॉड हिल यांचा हळूहळू डोळा

लागला. ते डुलक्या घेऊं लागले. सर फेरोजशहांनीं तें कांहीं वेळ पाहिलें. मग ते मध्येंच उठून अध्यक्षांना म्हणजे गव्हर्नरांना म्हणाले, " शिस्तीचे कडक अभिमानी नामदार कार्यकारी सभासद आतां शिस्त सोडून खुशाल घोरत आहेत. त्यांना शिस्त पाळण्याबद्दल सांगण्यांत यावें." लॉर्ड विलिंग्डन तेव्हां अध्यक्ष होते. त्यांनीं लागलीच सर क्लॉड हिल यांना जागें केलें; आणि सभागृहांत झोपणें शिस्तीच्या विरुद्ध आहे म्हणून सांगितलें. तेव्हां सर क्लॉड हिल यांनीं जागे होऊन कौन्सिलची क्षमा मागितली. कौन्सिलांत हंशाचा पूर लोटला. असे होते सर फेरोजशहा !

यावेळीं पुण्यास असतांना मीं आणखी एक गोष्ट केली. मीं एक इंग्रजी अग्रलेख लिहिला व तो मुंबई येथें 'इंदुप्रकाश' या वर्तमानपत्राकडे पाठविला. इंदुप्रकाशनें तो आपल्या पुढच्या अंकांत छापला. यावेळीं इंदुप्रकाशाचे इंग्रजी संपादक (रावबहादुर) दामोदर गणेश पाध्ये हे होते. पुढें मी आणखी तीन चार लेख इंदुप्रकाशाकडे पाठविले. ते त्यांनीं आपल्या इंग्रजी बाजूला छापून काढले. मला त्याबद्दल एक दिडकीहि मिळाली नाहीं. आतां 'ज्ञानप्रकाशां'त माझा पगार दरमहा पन्नास रुपये झाला होता. मी एकंदरींत आनंदांत होतों. माझा अभ्यासहि चालला होताच.

श्रीमंत बाबासाहेब विशाळगडकर हे खडकीला राहत. त्यांच्याकडे मी अधूनमधून जात येत असे. एके दिवशीं मी त्यांच्याकडे राहावयास गेलों होतों. त्यादिवशीं संध्याकाळीं पावसाला सुरुवात झाली. पाऊस जोरजोरानें पडत होता. नदीकांठीं पुणें बोटक्लबाजवळ त्यांचा बंगला होता. बंगल्यासमोर कांहीं उंचवट्यावर हमरस्ता होता. रस्त्यापलीकडे पारशाचें एक मोठें दुकान होतें. येथें चहा-फराळाचें सामान मिळत असे. रात्र झाली. तोंपर्यंत आमचें कम्पाऊंड पाण्यानें

भरून गेलें. नदी आणि आमचें कम्पाऊंड यांत कांहींच भेद उरला नाहीं. आमचे शेवडे मास्तर कांहीं कामाकरितां पुण्यासच राहिले होते आणि ते येणारच नव्हते. रात्रीं आमचीं रोजच्या हॉलमध्यें तळमजल्यावरच जेवणें झालीं. त्यावेळेला आमच्या बंगल्याच्या पायऱ्याहि पाण्यांत गेल्या होत्या. पाऊस आतां थांबेल मग थांबेल असें आम्हीं म्हणत होतों. पण तो कांहीं केल्या थांबेना. शेवटीं तळमजल्यांत पाणी शिरूं लागलें. आम्ही माडीवर निजावयाच्या ठिकाणीं गेलों व तेथें गप्पा मारीत बसलों. रात्रीं अकरा वाजण्याच्या सुमारास तळमजला भरून गेला व खालचें बरेंच सामान नोकरांनीं वर आणून ठेवलें. कांहीं खालींच राहिलें. बारा वाजले. एक वाजला. तरी पाणी हटेना. तें चढतच होतें. कांहीं वेळानें समोरच्या पारशी हॉटेलाशीं आमच्या नोकरानें कसेंतरी संधान बांधलें. तिकडून होडी घेऊन एक माणूस आला. त्या होडींत बसून आम्ही दोघेहि कसेबसे रस्त्यावर आलों. त्या पारशी हॉटेलच्या मालकानें आम्हांला झोपावयास जागा दिली. गरम गरम चहा करून दिला. सकाळीं उजाडलें तेव्हां पाणी ओसरत होतें. इतक्यांत शेवडे मास्तरहि आले. कांहीं वेळानें आम्हीं पुन्हां बंगल्यांत प्रविष्ट झालों. हा प्रसंग अघटित तर होताच. पण तेव्हां आमचें वय लहान, आम्हांला त्यापासून विशेष त्रास झाला नाहीं. दुपारीं रावसाहेब जावडेकर तेथें आले व त्यांनीं मोठ्या प्राणसंकटांतून वाचल्याबद्दल श्रीमंत बाबासाहेबांचें अभिनंदन केलें. माझी आणि बाबासाहेबांची चांगली ओळख झालेली होती. पण या प्रसंगामुळें ती विशेष दृढतर झाली. त्याचा परिणाम पुढें मी त्यांच्याजवळ राहावें आणि आपला अभ्यास संभाळून त्यांनाहि होईल तें साहाय्य करावें असें ठरविण्यांत झाला. मग मी ज्ञानप्रकाशची नोकरी सोडली आणि बाबासाहेबांजवळ रहावयास कोल्हापुरास जावें

असें ठरलें. ज्ञानप्रकाशची माझी नोकरी चांगली आनंदांत झाली. बापूराव आंबेकरांनीं मला फार चांगल्या रीतीनें वागविलें. वर्तमान्-पत्रांत एडीटर—म्हणजे सबएडीटर होण्यांत कांहीं मजा आहे असें त्यावेळीं मला वाटलें. माझ्या आईची प्रकृति कांहींशीं सुधारली होती. माझी पत्नीहि आतां बहुतेक आमच्या घरींच असे. मध्यंतरीं एक शिकवणी म्हणून कऱ्हाडचे पांडुतात्या शिराळकर रोज दोन तीन तास पुण्यास घरीं येऊन बसत. ते वयानें माझ्यापेक्षां पुष्कळ मोठे. प्रो. विजापुरकरांनीं मला त्यांना इंग्रजी शिकविण्यास सांगितलें. ते दरमहा पंधरा रुपये देत. ते माझ्याकडे तीन चार महिने येत होते. दिवसा-मागून दिवस चालले होते. १९१४ साली सप्टेंबर महिन्यांत आम्हीं सर्व मंडळी कोल्हापुरास जाऊन बाबासाहेबांनीं दिलेल्या जागेंत राहिलों. दोघांचा अभ्यास एकत्र सुरू झाला. नोव्हेंबरांत आम्ही बी. ए.-च्या परीक्षेला बसलों आणि पुढें दोघेहि नापास झालों. पण परीक्षा झाल्यावर मी बाबासाहेबांच्या बरोबर प्रवासास गेलों. पंधरावीस दिवस हिंडत होतों. हा माझा उत्तर हिंदुस्थानांतील दुसरा प्रवास होता. पहिला प्रवास वर्ष दोन वर्षें अगोदर झालेला होता.

माझा पहिला प्रवास १९१२ सालीं झाला. मी बी. ए. ला या सालीं बसलों होतों. पण पास होण्याची आशा नव्हती. त्यामुळें अंतःकरणाला एक प्रकारची उदासीनता आलेली होती. परीक्षेसाठीं गिरगांवांत मीं हरिभाऊ कुलकर्णी यांच्या घरीं राहिलों होतों. हरिभाऊ हे विशाळगडकरांचे मुंबईतील वकील. त्यांचा आणि जावडे-करांचा त्याचमुळें संबंध. म्हणून मला त्यांच्या घरीं उतरण्यास सांगितलें होतें. तेथें हरिभाऊंचे धाकटे बंधू नारायणराव हेहि असत. त्यांची माझी बरीच दोस्ती झाली. ते माझ्यापेक्षां वयानें पुष्कळच मोठे. परीक्षा झाल्यावर मी अगदीं कंटाळलों होतों आणि उदास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

झालों होतों. परीक्षा नापास होणार ही खात्री असल्यामुळें कांहीं सुचत नव्हतें. यावेळीं कुठला तरी दूरचा प्रवास करावा असें माझ्या मनांत आलें. नारायणरावांनीं तुमचा विचार ठरल्यास आपण येऊं असें सांगितलें. पुढें आम्हीं दोघांनींहि विचार करून प्रवास करण्याचें ठरविलें. तेव्हां दिल्ली एक्सप्रेस ही जी. आय्. पी. ची गाडी रोज सकाळीं मुंबईहून सुटे आणि दुसरे दिवशीं रात्रीं आठ कीं नऊ वाजतां दिल्ली येथें पोहोचे. पंजाबमेलला तेव्हां थर्ड क्लास नव्हताच. आम्हीं दिल्ली एक्सप्रेसनें प्रथम आग्रा, मग मथुरा व तेथून दिल्ली येथें जाण्याचें ठरविलें आणि दिल्ली पाहून परत यावयाचें असें निश्चित केलें. एवढ्या प्रवासाला जास्तीत जास्त पन्नास रुपये खर्च होतील असें आम्हीं ठरविलें.

मला आयत्या वेळीं गरम कपडे करण्याची ताकद नव्हती. तेव्हां होते त्या कपड्यावरच सर्व प्रकारें प्रवास पार पडेल असें मीं ठरविलें. तरी पण एक गरम कोट नेहमींच्या वापरांतला मजजवळ होता. आमचा दोघांचाहि साधा दक्षिणी पोषाख, अंगांत शर्ट आणि कोट, डोक्याला टोपी आणि गळ्याभोवतीं मफलर. एके दिवशीं सकाळीं लवकर उठून स्नान करून बरोबर खाण्यासाठीं कांहीं फराळाचें घेऊन आम्हीं व्हिक्टोरियांत बसलों आणि बोरीबंदरवर गेलों. त्यावेळीं दर शंभर मैल प्रवास केल्यानंतर एक दिवस वाटेंत राहतां येत असे. म्हणजे दिल्लीपर्यंत आम्हाला नऊ दहा दिवस मिळत होते. आम्हांला तेवढे पुरे होते.

आम्हाला गाडींत कशीबशी जागा मिळाली. बरोबर सात वाजतां गाडी सुटली आणि आम्ही उत्तरेकडे प्रवास करूं लागलों. रात्रीं झोपावयास कशीतरी जागा मिळाली. सकाळी आठनऊ वाजतां झांशी स्टेशनवर आलों. तेथें थंडीचा प्रचंड कडाका पडला होता.

कांहीं खावें म्हणून पाव व लोण्याचा एक डबा बाहेर काढला. लोणी गारठून इतकें घट्ट झालें होतें कीं तें पावाला लावतां येईना. आमची ती पावलोण्याशीं चाललेली मारामारी पाहून आमच्या शेजारीं बसलेला एक पंजाबी गृहस्थ ' रामराम ' म्हणूं लागला. मी डब्यांतून उतरून खालीं हिंडत होतों. परत डब्यांत आलों तों माझी टोपी नाहींशी झालेली. खूप चौकशी केली. पण टोपी गेली ती गेलीच. स्नान नाहीं, खाणें पिणें यथातथाच अशा स्थितींत आम्हीं चाललों होतों. नारायणराव तर गरम कपडे अंगावर असूनहि थंडीनें अगदीं बेजार झाले होते. दुपारीं दोन तीन वाजतां आग्रा येथें येऊन पोहोंचलों.

आग्रा येथें मुक्काम करून दुसरें दिवशीं सकाळीं ताजमहाल पहाण्यासाठीं टांग्यांतून निघालों. ताजमहाल पाहिला. ती इमारत पाहून आम्ही आश्चर्यानें थक्क झालों. नंतर एका चबुतऱ्यावर चढून तेथून सर्व आग्रा शहर पाहिलें. दुपारीं आग्रा येथील किल्ला पाहिला. हा किल्लाहि सुंदर आहे. पण ताजमहाल पाहिल्यावर इतर कांहींहि पाहिलें तरी फिकें वाटतें. नंतर मथुरा वृंदावन करून दिल्ली शहर पाहून आम्ही परतलों.

तेव्हां सांगावयाचें हें कीं माझा बाबासाहेबांबरोबर जो प्रवास झाला तो दुसरा म्हणावयास हरकत नाहीं. या प्रवासाचे बेत मुंबईसच झाले. बाबासाहेबांचा एक शिपाई बरोबर होता. एखादा ब्राह्मण होता कीं नाहीं तें आठवत नाहीं. पण तो होता असें वाटतें. पण आम्ही दोघेंच होतों. माझें सेकंड क्लासचें तिकिट काढण्याबद्दल बाबासाहेबांनींच हट्ट धरला. १९१४ सालीं नोव्हेंबरांत एका रात्रीं कलकत्ता मेलनें आम्ही अलाहाबादेस जाण्यास निघालों. तिसऱ्या दिवशीं पहांटे अलाहाबाद स्टेशनवर येऊन पोहोंचलों. तेथें पं. हृदयनाथ कुंझरू यांना पत्र लिहिलें होतें. ते तसल्या पहांटे

अलाहाबाद स्टेशनवर उपस्थित झाले होते. आम्ही पंडित कुंझरूं-बरोबर सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीच्या बंगल्यावर गेलों. अलाहाबादला आमचा मुक्काम तीन दिवस होता. आमची सर्व व्यवस्था उत्तम होती. पंडित कुंझरू यांनीं आम्हांला पंडित मालवीय, पंडित मोतीलाल नेहरू आणि तेजबहादुर सप्रू यांनाहि भेटावयास नेलें. अलाहाबादेहून लखनौ आणि तेथून दिल्ली येथें गेलों. दिल्लीचा किल्ला लढाई सुरु झाल्यामुळें पहावयास मिळाला नाहीं. आम्हीं तेव्हांच्या कमिशनरलाहि जाऊन भेटलों. पण त्यानें आम्हाला किल्ला पहावयास मिळणें सध्यां शक्य नाहीं असें गोड शब्दांत सांगितलें. दिल्ली येथें दोन दिवस राहून आम्ही रात्रींच्या गाडीनें सिमला येथें गेलों. डिसेंबर महिना सुरूं झालेला. सिमला येथें थंडीचा कडाका विलक्षण होता. तरी आम्ही एका हॉटेलांत दोन दिवस राहिलों. पुढें बाबासाहेबांची तब्बेत थोडी नादुरुस्त झाली. तेव्हां तिसरे दिवशीं आम्ही परतून दिल्ली येथें आलों तेथून आग्रा येथें दोन दिवस राहून मुंबईला परतलों. मुंबईला दोन दिवस राहून कोल्हापुरास परतलों.

मार्च महिन्यांत मला बी. ए. च्या परीक्षेस बसावयाचें होतें. अभ्यास ठीक चालला होता. ‘ उद्यान ’ मासिकांचे संपादक रा. रा. सदानंद सदोबा पाटील यांची माझी मुंबईत चांगली ओळख झाली होती. त्यांच्या मासिकांत याच वेळीं मीं लिहिलेली एक लहानशी कादंबरी—‘अपराध कोणाचा ?’—येऊं लागली होती. फेब्रुवारी महिन्यांत मी. रा. सदानंद पाटील यांना माझी बी. ए. ला बसण्यासाठीं युनिव्हर्सिटीची वीस रुपयांची फी भरावयाची आहे. तर तीस चाळीस रुपये शक्य असल्यास पाठवावे म्हणून कोल्हापुराहून लिहिलें. पाटलांनीं लगेच मला पन्नास रुपयांची मनिऑर्डर पाठविली. माझी कादंबरी त्यांच्या उद्यान मासिकांत प्रसिद्ध होत होती तिच्या बदला

ही लहानशी रक्कम त्यांनीं पाठविल्याचें लिहिलें होतें. पुढें मी बी. ए.च्या परीक्षेला बसलों आणि थर्डक्लासमध्यें उत्तीर्ण झालों.

पण परीक्षा झाल्यापासून ते परीक्षेचा निकाल लागेपर्यंत बऱ्याच गोष्टी घडल्या होत्या. आणि त्यावर माझें सर्व भविष्य ठरविलेलें होतें. श्रीमंत बाबासाहेबांचा मुक्काम यावेळीं परीक्षेसाठीं मुंबईसच होता. माझी परीक्षा या खेपेला पास होणार असें वाटत होतें व पुढें काय करावयाचें याचा विचार मी करीत होतों. उत्तम मराठी लेखक म्हणून माझा बराच लौकिक यावेळीं झालेला होता. पुण्यांत मी ज्ञानप्रकाशांत राहावें असा सल्लाहि यावेळीं रँगलर परांजपे यांनीं दिला होता. उलट बी. ए. झाल्यावर मुंबईतच कांहींतरी उद्योगधंदा करून तेथें आपलें वास्तव्य करावें असें माझ्या मनानें घेतलें होतें. मुंबई मला एकंदरींत फार आवडली होती. तसें पाहिलें तर मुंबईचें कोण-तेहि व्यसन किंवा नाद मला लागलेला नव्हता. पण मुंबईची विविध लोकवस्ती, मुंबईचा विस्तार, मुंबईचे बरेच ठिकाणीं असलेले रुंद रस्ते, मुंबईची ट्रामगाडी आणि मुंबईचा समुद्र या सर्वांची माझ्या मनावर जी छाप बसली तिचा परिणाम मुंबईला मीं कायमचें राहावें असें मला वाटण्यांत झाला. अशा विचारांच्या गर्दींत असतांना एक दिवस सरदारगृहांत बाबासाहेब मला म्हणाले, " बापूराव, तुम्ही आतां परीक्षा पास होणार. मी पास होणार नाहीं असें वाटतें. मला आतां थोडेंफार स्वतंत्रपणें वागावयाचें आहे. तेव्हां माझा मला एक निराळा सेक्रेटरी हवा. मी सेक्रेटरीला दरमहा दीडशें रुपये पगार देईन. त्याला माझें सर्व पहावें लागेल. कधी कधी मजबरोबर प्रवास करावा लागेल. तुम्ही जर माझे सेक्रेटरी होण्यास मान्यता द्याल तर मला फार आनंद होईल. " बाबासाहेबांचें हें भाषण ऐकून मी क्षणभर कुंठीत झालों. दरमहा दीडशें रुपये पगार ही कांहीं सामान्य बाब नव्हती. शिवाय बाबासाहेबांचा माझा स्नेह फार उत्तम

होता. त्यामुळें क्षणभर मला वाटलें कीं त्यांना आपण होय म्हटलें तर आपल्या जन्माचा प्रश्न मिटेल. शिवाय बाबासाहेबांच्या समवेत दिवस काढणें हेंहि सर्वस्वीं सुखाचें वाटत होतें.

उलटपक्षीं मी आतां बी. ए. होणार असें जें मनाला वाटत होतें त्याचा परिणाम असो किंवा दुसरें कोणतेंहि कारण असो; माझ्या मनांत दुसरे पुष्कळ विचार खेळूं लागले होते. आज दहा बारा वर्षें मनांत कांहीं विचार जर विशेष परिपुष्ट झाला असेल तर तो सरकारी नोकरी करून आयुष्य घालवतां कामा नये हा होता. महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासांतील दोन नांवें सारखीं डोळ्यांसमोर होतीं. एक टिळक आणि दुसरे आगरकर. त्यांच्यासारखा स्वतंत्र व्यवसाय करून कांहींतरी देशसेवा करावी हें मनांत वरचेवर येत असे. पुढें प्रो. विजापूरकरांनीं समर्थ विद्यालय काढलें, देशांत अनेक चळवळी सुरू झाल्या. त्यामुळें मन जें सरकारी नोकरीपासून परावृत्त झालें तें कायमचें. अर्थात् यावेळीं दुसरें कांहीं डोळ्यासमोर होतें असें मुळींच नाहीं. घरीं आईची प्रकृति बिघडलेली, आपल्या पदरीं बायको आणि भाऊ, वडिलांनीं ठेवलेली थोडीशी माया बी. ए. होईपर्यंत संपुष्टांत आलेली वगैरे गोष्टी लक्षांत घेतां बाबासाहेबांनीं देऊं केलेली नोकरी उत्तम सोयीची होती. मग दोन दिवस मी त्या गोष्टीचा सांगोपांग विचार केला. परत कोल्हापुरास जाऊन तेथें आपलें आयुष्य कंठण्यांत अर्थ नाहीं असें मनानें पक्कें घेतलें. मग एके दिवशीं रात्रीं उठलों आणि रावबहादुर दामोदर गणेश पाध्ये यांना भेटावयास गेलों. माझे कांहीं इंग्रजी लेख त्यांनींच 'इंदुप्रकाशां'त प्रसिद्ध केले होते. 'ज्ञानप्रकाश'चा उपसंपादक म्हणून मीं केलेलें कामहि त्यांनीं ऐकलें होतें. त्यांना भेटलों आणि मला एखादी वर्तमानपत्रांत नोकरी मिळेल काय म्हणून स्पष्टपणें विचारलें. ते मला म्हणाले, "तुम्ही इंदुप्रकाश पत्रांत येतां का? मी दामोदरशेट यंदे

यांना सांगतों," पुढें आमचें आणीक कांहीं वेळ बोलणें झालें. मला सहकुटुंब मुंबईस घर करावें लागेल म्हणून मीं त्यांना सांगितलें. त्यांनीं पगाराचा आंकडा दरमहा साठ रुपये सांगितला. इंदुप्रकाशाचें मराठी काम मुख्य संपादक म्हणून मीं पहावें म्हणूनहि सांगितलें. माझ्या बी. ए. परीक्षेचा निकाल ता. २१ मार्च रोजीं लागावयाचा होता. त्यांत पास होईनसें वाटतें असें पाध्ये यांना सांगून तेथून निघालों. यावेळीं मार्च महिन्याची दहा-बारावी तारीख असेल. मग बाबासाहेबांना भेटलों व त्यांना घडलेली सर्व हकीगत सांगितली. त्यांना त्यावेळीं माझें म्हणणें विशेषसें आवडलें नाहीं. पण मी त्यांना माझी स्वतंत्रपणें राहण्याची इच्छा असल्याचें सांगितलें आणि शेवटीं त्यांनीं तें मान्य केलें.

बाबासाहेबांनीं नोकरी देऊं करून आपल्याकडून शक्य तें साहाय्य मला करण्याची आपली तीव्र इच्छा दाखविली याबद्दल कोणत्या शब्दांनीं त्यांचे आभार मानावेत हें मला समजत नाहीं. पण मीं त्यांच्या म्हणण्याला जाणून बुजून नकार दिला ही गोष्ट खरी. आणि दरमहा दीडशें रुपयांची कोल्हापुरची नोकरी सोडून अवघ्या दरमहा साठ रुपायांची नोकरी मुंबईस पत्करली हेंहि खरें.

पुढें मी आणि बाबासाहेब मिळून कोल्हापुरास आलों. आतां मला कोल्हापुरचें सर्व बिऱ्हाड उचलून मुंबईस कायमचें जावयाचें होतें. कोल्हापुरास आल्यावर गोपाळराव खांडेकर यांनीं मला एक दिवस चहाला बोलाविलें आणि मीं अंगिकारलेल्या स्वतंत्र वृत्तीबद्दल मला शाबासकी दिली. गांवांतील सर्व मित्रमंडळींना भेटून आलों. मुंबईला एक लहानसें तीन खोल्यांचें घर पाहिलेलें होतें. त्याचें भाडेंहि आगाऊ दिलें होतें. हें भाडें दरमहा साडेबावीस रुपये होतें. अशा प्रकारें १९१५ च्या मार्च महिन्यांत बी. ए. ची परीक्षा पास होऊन मी ‘ इंदुप्रकाशा ’चा संपादक झालों. अर्थात् एप्रीलच्या पहिल्या तारखेपासून त्या जागेवर रुजूं झालों.

* * *

मी कोल्हापुर सोडलें तें कायमचें म्हणून निदान त्यावेळीं तरी सोडलें नाहीं. माझी एक जमीन ( शेतीची ) रुईजवळ कोडोली या ठिकाणीं होती. तेथून मला दरसाल दोनशें अडीचशें रुपये उत्पन्नाचे मिळत. त्या जमिनीशिवाय कोल्हापुरांत आतां आमचें म्हणून कांहीं नव्हतें. अर्थात माझे बहुतेक स्नेहीसोबती कोल्हापुरांत होते; आप्त इष्टहि कोल्हापुरांत होते. पण आमच्या जवळच्या आप्तांतील रुईकरांची मंडळी पुण्यास जाऊन राहिली होती. बापूरावकाकांना दोन मुलगे राहिले होते. त्यांतील थोरला गणपति हा लग्न होऊन तीन महिन्यांनीं वारला. धाकटा रामभाऊ हा फर्ग्युसन कॉलेजांत अभ्यास करीत होता. जावडेकर मंडळीहि पुण्यास गेली होती. आतां आम्हीहि चाललों. कोल्हापुराहून मुंबई तीनशे मैलांच्यावर. कोल्हापुरांत जवळ जवळ जन्मापासून ते १९१५ मार्च महिन्यापर्यंत म्हणजे पंचवीस सव्वीस वर्षें काळ गेलेला. १९१० नंतर आम्ही कोल्हापुर सोडलें होतें. पण तें शिक्षणासाठीं. आतां यावेळीं आम्हीं कोल्हापूर सोडलें ते मुंबईला नोकरी पत्करून सोडलें. म्हणजे तत्काळ जरी कायमचें सोडलेलें नसलें तरी जवळ जवळ कायमचें सोडलें असें तेव्हांहि म्हणण्यास हरकत नाहीं. कोल्हापुरांत पुष्कळ स्नेह्यांचा निरोप घेतला. एक दिवस सकाळच्या गाडीनें सर्व सामानसुमान, भांडीकुंडी घेऊन आई, भाऊ, पत्नी आणि मी असे चौघे जण मुंबईला जाण्यास निघालों. निघतांना माझ्या मनांत काय विचार होते ते मला आतां स्मरणांत नाहींत. दुसरे दिवशीं सकाळीं येऊन आम्ही मुंबईच्या सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटी जवळ भाड्यानें घेतलेल्या घरांत प्रविष्ट

झालों. आणि एप्रीलच्या पहिल्या तारखेला ( १९१५ ) मी ' इंदुप्रकाशां'त जाऊन तेथें संपादक म्हणून बसूं लागलों.

मुंबईला मी सहकुटुंब आल्यामुळें दरमहा साठ रुपयांत कसें भागणार हा चिंतेचा विषय होता. मला आणखी दरमहा पंधरा रुपयांची आवश्यकता होती. त्याचीहि सोय कांहीं लिहिण्याचें काम देऊन रा. रा. नारायण मल्हार जोशी यांनीं लावली. मुंबईला गेल्याबरोबर मला मिळालेले उत्तम स्नेही म्हणजे रा. भाटलेकर हे होत. हे तेथील सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटीच्या मुंबई वैभव छापखान्यांत जाहीरातींचे व्यवस्थापक होते. त्यांनीं मला सर्व प्रकारें साहाय्य केलें आणि मुंबईंत माझ्या संसाराची घडी बसविण्यास पुष्कळ श्रम घेतले. इंदुप्रकाशाखेरीज माझें बहुतेक जाणेंयेणें सोसायटीचे रा. वझे, रा. जोशी यांच्याकडे असे. शिवाय रा. पाटील आणि रा. वर्दे ( श्रीपाद महादेव ) हेहि माझे मुंबईंत चांगले मित्र होते. रा. खाड्ये (प्रिन्सिपॉल) यांचा माझा स्नेह १९१४ सालींच जमला होता. शिवाय रा. काणेकर हे तेव्हां मुंबईच्या ज्ञानप्रकाशाचे संपादक होते, त्यांची माझी चांगली दोस्ती जमली होती. यामुळें मला किंबहुना आम्हां सर्वांना मुंबईला म्हणजे परक्या ठिकाणीं आलों असें वाटलें नाहीं. मुंबईला आल्यावर लवकरच मी माझ्याजवळचे दहा रुपये इंपीरियल बँकेंत ( तेव्हां बॉंबे बँक ) सेव्हिंग्ज खात्यांत नेऊन ठेवले. त्यावेळीं मला किती बरें वाटलें ! मी सकाळीं थोडावेळ आणि दुपारपासून संध्याकाळ पर्यंत इंदुप्रकाशांत जाऊन बसत असे. रोज निदान एक अग्रलेख लिहीत असे. इंग्रजी बाजूचे संपादक दिनकरराव वर्दे हे होते. त्यांचा माझा उत्तम स्नेह जमला. माझे अग्रलेख रा. ब. पाध्यांना पसंत पडत. पहिल्या म्हणजे एप्रिल महिन्यांत मी कित्येक लेख असें लिहिले कीं ' इंदुप्रकाश 'ला कांहीं नवीन जोर आला आहे असें पुष्कळजण म्हणूं लागले.

१९१४ सालीं मी पुण्यांत असतांना लोकमान्य टिळक हे मंडाले येथील तुरुंगातून सुटून परत आले होते. पुढें फेब्रुवारी १९१५ च्या ता. १९ रोजीं मी कोल्हापुरास असतांना नामदार गोपाळ कृष्ण गोखले मृत्यु पावले. १९१३ सालीं मीं रा. खाडिलकर यांच्या विद्याहरण नाटकावर ज्ञानप्रकाशांतून टीकेची झोड उठविली. तेव्हां-पासून किंवा कांहींसें त्याच्या अगोदरपासून माझा कल नामदार गोखले यांच्या राजकारणाकडे वळला होता. हळूहळू पण निश्चयानें माझीं मतें प्रागतिक बनत चाललीं होतीं. गोखल्यांच्या मागून नामदार शास्त्री हे सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटीचे अध्यक्ष झाले. त्यांचा त्या वेळीं कट्टे नेमस्त म्हणून लौकिक झालेला नव्हता. मी इंदुप्रकाशांत लिहावयास लागलों त्यांत बरेच वेळां मेहता–गोखले पक्षाचें मी समर्थन करीत असे. पर्यायानें टिळकांच्यावर टीका करीत असे. नेमस्त किंवा मवाळ पक्षांत इतक्या चांगल्या मराठींत इतक्या कडकपणें लेखन करणारा तेव्हां तरी माझ्याशिवाय दुसरा कोणी नव्हता. त्या-मुळें मी इंदुप्रकाशचा संपादक झाल्यापासून पुढें ज्याला प्रागतिक पक्ष म्हणूं लागले आणि तेव्हां ज्याला मवाळ पक्ष म्हणत असत त्या पक्षाची तरफदारी मी करूं लागलों. पुण्याला १९११ सालीं आल्या-पासून मला मवाळ पक्षाचींच मतें अधिकाधिक ग्राह्य वाटूं लागलीं. आगरकरांचे लेख वाचल्यानंतर त्यांत सत्य अतिशय भरलेलें आहे हें मला पटूं लागलें. मी जवळ जवळ १९११ सालापासून नेमस्त पक्षाला अधिक गुण देऊं लागलों. नामदार गोखले यांचीं भाषणें मी जसजशीं वाचूं लागलों तसतशी माझी त्यांच्यावरची निष्ठा वाढीला लागली. १९१५ च्या फेब्रुवारींत जेव्हां ते वारले तेव्हां मी कोल्हापुरांत होतों हें वर सांगितलेंच. शुक्रवारीं जवजवळ मध्यरात्रीं ते वारले. ती बातमी कोल्हापुरांत रविवारीं मिळालेल्या टाईम्समध्यें आम्हीं वाचली.

त्या दिवशीं संध्याकाळीं आम्ही कांहीं कॉलेजमधील मित्रमंडळी खासबागेंत त्यांचें गुणवर्णन करीत बसलों होतों. त्यावेळीं मी काय करणार हें ठरलेलें नव्हतें. पण मी गोखल्यांचा पुरा भक्त बनलों एवढें निश्चित. अशा प्रकारें इंदुप्रकाशचा संपादक झालों त्यावेळीं नेमस्त राजकारणाचा पुरस्कार करण्याचें मीं ठरविलें.

सामाजिक सुधारणांसंबंधीं माझा ग्रह त्यांना अनुकूल असा पहिल्यापासून होता. माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर माझ्या आईवर जो प्रसंग आला त्याचें चित्र अगदीं लहानपणापासून माझ्या अंतःकरणावर कोरलेलें होतें. पुढें १९०५ सालीं पार्वतीबाई आठवले जेव्हां कोल्हापुरला आल्या तेव्हां त्यांच्यासाठीं हायस्कुलांत सभा भरविण्यांत मीच पुढाकार घेतला होता. सभा झाल्यानंतर त्यांना तीसपस्तीस रुपयेहि जमवून दिले होते. माझे मित्र रा. रा. विष्णुअण्णा गोखले यांची थोरली बहीण बालविधवा होती. तिला मी लहानपणापासून पाहत होतों. रूपानें सुंदर आणि वैधव्यानें विटंबित अशा तिचें नांव होतें यमू. पुढें मीं जेव्हां हरिभाऊ आपट्यांची 'पण लक्षांत कोण घेतो ?' ही कादंबरी वाचली. तेव्हां मला या यमुताईची सारखी आठवण होई. अशा प्रकारें बालपणींच कित्येक संस्कार मनाला असे झालेले होते कीं सामाजिक सुधारणा अत्यंत आवश्यक आहे असें मला वाटूं लागलें. पुढे आगरकरांचे लेखसंग्रह वाचले आणि त्यांच्या तर्कशक्तीवर मी अगदीं खूष होऊन गेलों. उलटपक्षीं माझ्या लहानपणीं वडील वारल्यानंतर नरसोबाच्या वाडीला आम्ही श्राद्ध करण्यासाठीं गेलों. मला सकाळीं भूक फार लागत असे. या दिवशीं ब्राह्मण श्राद्धाला दुपारीं दोन वाजल्यावर आले. त्या दिवशीं दुपारीं चार वाजेपर्यंत मला जेवण मिळालें नाहीं. रडून रडून माझे डोळे

सुजले. आज पन्नास साठ वर्षें होत आलीं तरी मला हें स्पष्टपणें आठवतें. त्या दिवसापासून प्रत्येक श्राद्धाला नियमित अनियमितपणें येणाऱ्या ब्राह्मणांची मला धास्ती बसली. १९११ सालीं पुण्यांत वडिलांचें केलेलें श्राद्ध हें शेवटचें. त्या दिवशींहि ब्राह्मण भलते उशीरा आले. कोणत्याहि बापाला आपल्या मुलांचे इतके हाल होणें आवडत असेल असें मला वाटेना. या सर्व प्रकारांमुळें मी इंदुप्रकाशचा संपादक झालों त्यावेळीं ‘ सुधारक ’ आणि ‘ नेमस्त ’ हीं विशेषणें मला लावतां येण्यासारखीं होतीं. आतां अडतीस चाळीस वर्षें होत आलीं तरी तींच मतें माझीं आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

संपादक झाल्यानंतर सप्टेंबर महिनाभर मी माझे मित्र सदानंद दादोबा पाटील यांच्यासाठीं चंदारामजी गर्ल्स हायस्कूलमध्यें शिक्षकाचें काम केलें. पाटील तेथें बरींच वर्षें शिक्षक होते. आतां ते वकीलीचा अभ्यास करीत होते. तेव्हां त्यांना परीक्षेला बसावयाचें होतें. म्हणून त्यांनीं आपलें काम महिनाभर मला करावयास सांगितलें. तें मी मान्य केलें. या महिनाभरांत मला नवीन जगाची ओळख झाली. शाळेच्या हेड्मिस्ट्रेस एक पार्शी बाई होत्या. शाळेंत गुजराथी व दक्षिणी मुली जवळजवळ सारख्याच संख्येनें हजर असत. यानंतर पुनः जानेवारी महिन्यापासून ते मार्चपर्यंत (म्हणजे १९१६ सालीं) मी चंदारामजी शाळेंत तीन महिने पाटलांच्यासाठीं शिक्षकाचें काम केलें. शाळेंत काम करणें मला एकंदरींत आवडलें. पण तें कायमचें पत्करण्याचा विचारसुद्धां माझ्या मनांत आला नाहीं. माझी शिकविण्याची पद्धतहि शाळेची सर्व व्यवस्था पाहणाऱ्या प्रो. धराधरांना पसंत पडली. हे तीन महिनेहि माझे सुखांत गेले. या वेळीं मी जरा विषण्ण मनः-स्थितींत होतों. १९१५ च्या ऑक्टोबर महिन्यांत माझा धाकटा भाऊ नवज्वरानें वारला. तेव्हा माझ्या आईची स्थिति अगदी चिंता

करण्यासारखी झालेली होती. ऑक्टोबर महिन्यांत पंधरा दिवसांची रजा घेऊन मी काशी, प्रयाग, हरद्वार वगैरे ठिकाणीं सर्व मंडळीसह जाऊन आलों. त्यानंतर जानेवारी महिन्यापासून तीन महिने ही नोकरी मला मिळाली.

याप्रमाणें शाळेचें काम कधीं कधीं, तर इंदुप्रकाशचें काम नित्याचें, असें माझें चाललें होतें. इंदुप्रकाशांत माझ्या ओळखी बऱ्याच झाल्या आणि मला मला नवे नवे अनुभव येऊं लागले. मला वाटतें दोन तीन महिन्यांत इंदुप्रकाशांतील लेखांसंबंधीं लोकांत चर्चा होऊं लागल्या. मे महिन्याच्या शेवटीं लोकमान्य टिळकांनीं पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेचा समारोप केला. त्या समारोपांत इंदुप्रकाशचा संपादक या नात्यानें माझ्यावर बराच हल्ला झाला. या व्याख्यान-मालेंत रा. रा. गोपाळ कृष्ण देवधर यांचें गोपाळ कृष्ण गोखले यांच्याविषयीं एक व्याख्यान झालें. तें व्याख्यान संपल्यावर एका तरुण श्रोत्यानें गोपाळराव गोखले दारू पीत होते कां म्हणून देवधरांना प्रश्न केला. देवधर म्हणाले, “ माझ्या माहितीप्रमाणें ते दारू पीत नव्हते, फार काय तमाखूसुद्धां ओढत नव्हते. ” श्रोता म्हणाला, “ तुम्हांला माहीत नसेल. ते अगदीं पीत नव्हते असें कांहीं तुम्ही म्हणूं शकत नाहीं. ” तेव्हां श्रोतृवर्गांत हंसें उत्पन्न झालें. पुण्याच्या कोणत्याहि पत्रानें याबद्दल निषेधपर एक शब्दहि लिहिला नाहीं. तेव्हां मी इंदुप्रकाशांत एक अग्रलेख लिहून गोखल्यांच्याविषयीं त्यांच्या मृत्यूनंतर दोन चार महिन्यांत होणाऱ्या सभेंत हा प्रकार व्हावा याबद्दल खेद व्यक्त केला आणि टिळकांसारखे लोकनायक पुण्यांत असतांना त्यांनीं झाल्या प्रकाराबद्दल नापसंती व्यक्त करूं नये याबद्दल आमची नापसंती व्यक्त केली. लोकमान्य टिळकांनीं आपल्या समारोपाच्या भाषणांत या लेखावरून माझ्यावर बरीच

टीका केली. माझ्यासारख्या तरुण लेखकानें टिळकांच्याबद्दल असे उद्‌गार काढावेत हें गर्हणीय नव्हें काय म्हणून प्रश्न केला. यावेळीं इंदुप्रकाशांत मी पुष्कळ कडक लिहीत असें हें खरें. पण रोज शंभर वेळा प्रतिपक्षाला हजार शिव्या देणाऱ्या जहाल मंडळींनीं त्यासाठीं मजवर रागावण्याचें मुळींच कारण नव्हतें. पण पक्षभेद असला कीं या गोष्टी चालावयाच्याच. तशा त्या चालल्या होत्या.

याच सुमारास पुणें येथें नेमस्त पक्षाची एक प्रांतिक परिषद भरली. या परिषदेला अनुकूल असें मीं इंदुप्रकाशांत पांचसात वेळां लिहिलें. परिषदेसंबंधीं येथें कांहीं लिहावयाचें नाहीं. ती यथासांग पार पडली. दुसरें दिवशीं मी आणि मुंबईचे शांतप्रकृति वकील नारायण विष्णु गोखले सेकंडच्या डब्यानें मुंबईस निघालों. त्याच डब्यांत माझा शोध घेत एक गृहस्थ येऊन बसला. आपलें सामान व्यवस्थित ठेवून झाल्यावर तो माझ्याकडे वळून म्हणाला, " आपणच इंदुप्रकाशचे संपादक अळतेकर का ? " मी ' होय ' म्हणून म्हणतांच तो पुढे म्हणाला, " इतक्या दुष्टपणाचीं आर्टिकलें खरडतांना तुम्हांस कांहींच वाटत नाहीं ? तुमचा नेमस्त पक्ष म्हणजे सरकारी पक्ष आहे. तुमच्यासारख्या तरुण माणसानें असें लिहावें हें मोठें लाजिरवाणें आहे. " तो कितीतरी वेळ बोलत होता. मग रा. गोखले म्हणाले, " अळतेकर, तुम्ही गप्प बसा. मी यांच्याशीं बोलतों. " परंतु लोणावळा आलें तरी गोखल्यांची छाप त्याच्यावर बसेना. मग आमचें बोलणें सुरू झालें. तो गृहस्थ म्हणाला, " तुम्ही सारे खराब लोक आहांत. तुम्ही सरकारची कृपा संपादन करण्यासाठीं काय वाटेल तें करतां. देशाला या सरकारनें आग लावली आहे. त्या सरकारची बाजू घेऊन बोलतांना लिहितांना तुम्हाला लाज वाटत नाहीं. " त्यावर मीं असें प्रतिपादन केलें कीं त्या पक्षांतहि स्वार्थत्याग करणारी मंडळी

आहेत; जर तुम्हाला या पक्षांत कार्य करावयाचें असेल तर मी तशी मदत करीन. कारण त्यांनाहि तरुण कार्यकर्त्यांची जरुरी आहे. यावर तो गृहस्थ म्हणाला, " मला त्या पक्षांत शिरणें शक्य नाहीं. कारण मी नुकतीच सरकारी नोकरी पत्करली आहे. " मग मी त्यांना त्यांचें नांवगांव विचारलें. त्यांचें नांव जोशी. ते इंजिनिअरिंगची परीक्षा पहिल्या वर्गांत पहिला नंबर मिळून पास झाले होते. त्यांना सरकारी इंजिनिअरिंग खात्यांत चांगली नोकरी मिळाली होती. त्या नोकरीवर रुजूं होण्यासाठींच ते चालले होते; वगैरे माहिती त्यांनीं सांगितली. मग मीं त्यांना विचारलें, " असल्या दुष्ट सरकारची नोकरी कां पत्करलीत ? " ते म्हणाले, " दुसरा उपाय नव्हता. माझी परिस्थिति तशी आहे. " मी म्हणालों, " ज्या सरकारबद्दल तुम्हांला एवढा कंटाळा वाटतो त्याच सरकारची मोठा पगार घेऊन तुम्हीं नोकरी करणार.

आणि त्याबरोबरच आमच्या सारखे जे लोक, ज्यांना जहाल मतें मान्य नाहींत आणि जे आपल्या बुद्धीप्रमाणें लोकसेवा करीत आहेत त्यांनाहि तुम्ही वाटेल तशा शिव्या देणार. हा दुहेरी रोजगार मला मोठा चमत्कारिक वाटतो. " जोशी म्हणाले, " मी कोणत्याहि राजकीय पक्षाचा नाहीं. तुमच्यासारखे कांहीं लोक स्वार्थत्याग करून त्या पक्षाच्या दृष्टीनें देशसेवा करीत असतील. मी एक सरकारी नोकर आहे. मला जें रास्त वाटलें तें बोललों. " मीं त्यावर म्हटलें, " तें ठीक आहे. मला तुमच्या बोलण्याचा किंवा शिव्यागाळीचा राग नाहीं. पण नेमस्त पक्षासंबंधीं चार जहाल लोक पक्षाभिमानानें बोलतात तसेंच तुम्ही बोलतां. त्यांत थोडा विचार राखा एवढेंच माझें म्हणणें. आमचेंहि कांहीं चुकत असेल. पण आम्ही आमच्या बुद्धीप्रमाणें जें करतां येईल तें करीत आहोंत एवढा तरी आमच्याबद्दल

तुमच्यासारख्या चांगल्या सुशिक्षितांनीं समज ठेवला पाहिजे. "
त्यानंतर आम्ही जास्त जवळपणानें बोलत होतों. आपण नेमस्तांना वाटेल त्या शिव्या देण्यांत विचारबुद्धी दाखविली नाहीं हें जोशी यांनीं कबूल केलें. शेवटीं आमची बरीच दोस्ती झाली. मी त्यांना मुंबईच्या मुक्कामांत माझ्याकडेच या म्हणून बोलाविलें आणि त्यांनीं तें मान्य केलें. मजबरोबर रा. जोशी एक दोन दिवस होते.

१९१५ च्या ऑक्टोबरांत माझा धाकटा भाऊ नवज्वराला बळी पडला हें वर सांगितलेंच. त्याच्या त्या अत्यंत दुःखदायक मृत्यूनंतर मी राहत होतों तें घर लागलींच सोडलें आणि नव्या वाडीजवळ रहावयास गेलों. त्यावेळीं माझी आई तर जवळजवळ वेडीच झाली होती. मलाहि कांहीं सुचत नव्हतें. अशा स्थितींत ऑक्टोबर महिन्याच्या वीस तारखेपासून तीन आठवड्याची रजा काढून मी दूर यात्रेस जाण्याचें ठरविलें. बरोबर आई आणि पत्नी होत्या. सोबत कोणीतरी असावे म्हणून इंदुप्रकाशांतील शास्त्री जोगळेकर ह्यांना येतां का म्हणून विचारलें. त्यांनींहि कृपा करून येण्याचें कबूल केलें. असे आम्ही चौघेजण एके दिवशीं अलाहाबादेस जावयास निघालों. जबलपूर, अलाहाबाद, बनारस, लखनौ, हरद्वार, दिल्ली वगैरें ठिकाणीं जाऊन मुंबईला परतलों. हरद्वारला असतांना ( नोव्हेंबर १९१५ ची सुरवात ) सर फेरोजशहा मेहता कालवश झाल्याचें समजलें. फेरोजशहा मेहता म्हणजे मुंबईचा जीव कीं प्राण होते. त्यांच्या निधनानें मुंबईचें अपरंपार नुकसान झालें. हिंदुस्थानचाहि एक अत्यंत मान्य पुढारी नाहींसा झाला. फेब्रुवारींत गोखले गेले, नोव्हेंबरांत फेरोजशहा गेले. अशा प्रकारें आमच्या देशांतील प्रमुख राष्ट्रीय पक्ष जवळ जवळ उघडा पडला. यंदाची कॉंग्रेस मुंबईला व्हावयाची होती. ती आतां फेरोजशहा यांच्याशिवाय कशी काय होते हेंहि पहावयाचें होतें.

मुंबईला परत येऊन मी इंदुप्रकाशांत कामाला लागलों. कॉंग्रेसची तयारी जोरांत चालू होती. इंदुप्रकाशामध्यें मी कॉंग्रेसबद्दल वरचेवर लिहित होतों. सर फेरोजशहा यांच्या मृत्यूनंतर सर दिनशा वाच्छा हे स्वागताध्यक्ष झाले होते. १९०४ सालानंतर अकरा वर्षांनीं कॉंग्रेसचें मुंबईला पुनरागमन होत होतें. मी कॉंग्रेसला प्रतिनिधि म्हणून जावयाचें ठरविलें. आणि त्याप्रमाणें रीतसर प्रतिनिधि झालोंहि. मुंबईची ही कॉंग्रेस चांगली धूमधडाक्यांत झाली. याच कॉंग्रेसमध्यें जातवार प्रतिनिधि कायदेकौन्सिलांत घेण्याचा ठराव पास झाला. मी आणखी पांच मित्र यांनीं या ठरावाला विरोध केला. १९१५ सालीं जो मी या जातीवादाला विरुद्ध होतों तो आजपर्यंत तसाच आहे. आमच्या विरोधाचा कांहीं परिणाम झाला नाहीं आणि होणार नव्हताच. पण १९१५ सालीं हें तत्त्व अत्यंत घातुक आहे याबद्दल आमची खात्री होती, हें येथें सांगावयाचें आहे. दुर्दैवानें हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांनीं या तत्त्वाला मान्यता दिली आणि आपल्या हातानें आपल्या देशाचे दोन तुकडे केले. मुंबईची कॉंग्रेस तीन दिवस जोरांत झाली. आम्ही सर्व मंडळी हे तीन चार दिवस अतिशय गडबडींत होतों. मी जिला गेलों अशी ही पहिलीच कॉंग्रेस होती. यापुढें आणखी दोन कॉंग्रेसना ( लखनौ व कलकत्ता ) मी प्रतिनिधि म्हणून हजर होतों. १९१८ सालीं मी कॉंग्रेस सोडून लिबरल पक्षांत गेलों.

१९१६ साल उगवलें. इंदुप्रकाश नेहमीप्रमाणें जोरांत चालत होता. त्याचे वाचकहि वाढत होते. आमचे इंग्रजी संपादक वर्दे आणि मी यांचें उत्तम सख्य होतें. दरम्यान मी नव्या वाडीवरील बिऱ्हाड बदलून चौपाटीवर हाजी कासम वाडींत रा. रेगे यांच्याजवळ रहाव-वास गेलों. रेगे ह्यांच्या घरांत दोन खोल्या द्यावयाच्या आहेत हें

मला माझे मित्र वाघ यांच्याकडून कळलें. वाघ हे मुंबईच्या क्रीस्टल आणि कंपनींत कामाला होते. सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे रा. नारायण मल्हार जोशी हे वाघांचे मोठे मित्र होते. त्यांनींच माझी प्रथम वाघांशीं ओळख करून दिली. वाघ नोकरींतून बाहेर पडले कीं संध्याकाळीं त्यावेळीं नुकत्याच स्थापन झालेल्या सोशल सर्व्हिस लीगमध्यें काम करीत. वाघ यांनीं पुनर्विवाह केला होता. त्यांची पत्नी अतिशय शांत आणि सुस्वभावी होती. मीहि सोशल सर्व्हिस लीगमध्यें काम करी. मी आणि वाघ पुष्कळ वेळां बोलत बसत असूं. वाघ हे अस्सल समाजसुधारक होते.

एके दिवशीं मी आणि वाघ संध्याकाळीं बोलत बसलों होतों. बोलतां बोलतां समाजसुधारेणाचा विषय निघाला. वाघ म्हणाले, "ज्यानें सुधारणेचा सर्वांगीण पुरस्कार केला आहे अशा एखाद्या माणसाचें नांव आपण समाजापुढें आणलें पाहिजे. तो पुरुष मोठा धीरवीर असावा. राजकारणांतहि तो पुढचा असावा आणि समाजकारणांतहि तो पुढचा असावा." मीं लागलींच त्यांना गोपाळ गणेश आगरकर यांचें नांव सांगितलें. त्यांना तें पूर्णपणें पसंत पडलें. ते म्हणाले, "आगरकरासारखा निर्मळ सुधारक दुसरा झाला नाहीं. आपण आगरकरांचा कांहींतरी उत्सव करावा." पुढें आणखी दोन तीन वेळां बोलणें होऊन आमचा बेत कायम झाला. ते दिवस मार्च महिन्याचे (१९१६) होते. आगरकर ता. १७ जून १८९५ रोजीं मरण पावले होते. तेव्हां जमलें तर त्या दिवशीं नाहींतर त्यानंतर जितक्या त्वरित जमेल तेव्हां त्यांची पुण्यतिथि सार्वजनिक समारंभानें साजरी करावयाची असें आम्ही ठरविलें. लागलीच आमची सात आठ जणांची समिती नेमण्यांत आली. त्यांत मला चिटणीस नेमण्यांत आलें. माझ्याबरोबर काम करण्यासाठीं दुसरे चिटणीस म्हणून रा. रा.

वसंत नारायण नाईक ह्यांना विचारलें आणि त्यांनीं ते लागलीच मान्य केलें. मुंबई येथें हाजी कासम वाडींतच वाघ यांनीं आपल्या घरीं चहाला सर्व मंडळी बोलाविली. आणि मार्च महिन्यांत आमची पहिली औपचारिक सभा झाली. या सभेंत आगरकरांची एकविसावी पुण्यतिथि साजरी करावी असें ठरलें. त्याचवेळीं जातिभेद आपण मोडला हें प्रत्यक्ष आचरणानें जाहीर करण्यासाठीं एक सर्व जातीय एकत्र भोजन करावें असेंहि ठरलें. आगरकरांच्याबद्दल आदर असलेलीं हजारों माणसें होतीं. त्यापैकीं कांहीं जणांना तरी त्या दिवशीं बोलावयाची विनंती करावी असेंहि ठरलें. अध्यक्षस्थान फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल परांजपे यांना देण्याचें ठरलें. सर नारायण चंदावरकर यांनीं स्वागताध्यक्ष व्हावें असें ठरलें. अशा प्रकारें आमच्या पहिल्या सभेंत काम तर उत्कृष्ट झालें. मी आणि वाघ कामाला लागलों.

पुढें मी सर नारायणराव चंदावरकरांना जाऊन भेटलों. त्यांना आम्ही आगरकर दिन साजरा करण्याचें ठरविलें आहे असें सांगितलें. सर नारायणरावांची आणि माझी ओळख होऊन वर्ष झालें होतें. त्यांना माझ्यासारख्या लहान माणसाबरोबरसुद्धां बोलणें चालणें आवडत असे. त्यांनीं आम्ही काढलेल्या कल्पनेचें अभिनंदन केलें आणि आमच्या कमिटीचे अध्यक्ष होण्याचें तत्काळ कबूल केलें. मी त्यांना विचारलें, " आगरकरांचे जे स्नेही अद्यापि असतील त्यांनाहि या समारंभाचें आमंत्रण द्यावयास नको काय ? " नारायणराव लागलीच म्हणाले, " त्यांना अवश्य बोलावलें पाहिजे. " तेव्हां मी टिळकांचें नांव घेतलें. नारायणराव म्हणाले, " टिळकांना अवश्य बोलावलें पाहिजे. टिळकांनीं या समारंभाला हजर राहणें फारच योग्य होईल. " पुढें नारायणराव लोणावळा येथें रहावयास गेले. त्यांच्याशीं माझा पत्रव्यवहार असे. त्यांनीं लोणावळा येथून पत्रांत मला लिहिलें,

" तुमची टिळकांना बोलावण्याची कल्पना योग्य आहे. टिळक आणि आगरकर दोघांनींहि आपापल्या मताबद्दल सरकारी रोषाची पर्वा केलेली नाहीं. दोघेहि मोठे निःस्वार्थी आणि देशभक्त होते यांत शंका नाहीं. " हें पत्र पुढें मी समारंभ आटोपल्यावर पांचसहा महिने जवळ ठेवलें होतें. मुंबईत डॉ. मॅकीकन यांची परवानगी घेऊन विल्सन कॉलेजचा हॉल समारंभाला ठरविला. समारंभाची तारीख २ जुलै १९१६ ही निश्चित केली. यावेळीं काशिनाथपंत मित्र मला म्हणाले कीं आपण ' मनोरंजना ' चा खास अंक या समारंभासाठीं काढतों; तुम्हीं त्याची तयारी करून दिली पाहिजे. मी होय म्हटलें व लागलींच कांहीं मंडळींशीं पत्रव्यवहार सुरू केला. रँगलर परांजप्यांची अध्यक्ष होण्यासाठीं संमति मिळविली. रावबहादुर महाजनींना पत्र लिहून त्यांचा आगरकरांवरील लेख मागितला. प्रो. भाटे, नासिकचे रा. रा. रामचंद्र गणेश प्रधान, बॅ. जयकर वगैरे मंडळींना भाषणें करण्याची विनंती केली. ती त्यांनीं ताबडतोब मान्य केली. मी आगरकरांचें एक छोटें चरित्र मराठींत लिहिलें व वसंतराव नाईक यांनीं एक लहानसें चरित्र इंग्रजींत लिहिलें. मनोरंजनाच्या खास अंकाची तयारीहि चालली होती.

पुढें मीं टिळकांना पत्र लिहिलें. मी जरी आज नेमस्त पक्षांत असलों तरी ज्यावेळीं आगरकर वारले त्यावेळीं माझा जन्म नुकताच झालेला होता. त्यावेळीं जे तंटेबखेडे महाराष्ट्रांत झाले ते माझ्या दृष्टीनें ऐतिहासिक स्वरूपाचे होते. माझा त्यांच्याशीं कसलाहि संबंध नव्हता. त्यावेळीं ज्या व्यक्ति राजकारणांत किंवा समाजकारणांत गाजल्या त्या सर्वच आपल्याला पूज्य आहेत. त्या व्यक्तींत कांहींहि मतभेद असले तरी त्या सर्व देशसेवक होत्या. याच दृष्टीनें मी टिळक आणि आगरकर यांच्याकडे पाहतों. हें सर्व मीं टिळकांना कळविलें

आणि त्यांच्यांत आणि आगरकरांच्यांत कांहींहि मतभेद असले तरी दोघेहि थोर देशसेवक आपण मानतों. यासाठीं त्यांच्या पुण्यतिथि-उत्सावाला त्यांच्या वेळचे आणि त्यांचे मित्र म्हणून आपण आलें पाहिजे. आपल्या मुखानें त्यांच्याबद्दल चार शब्द ऐकण्याची आपली अतिशय इच्छा आहे हें मीं टिळकांना कळविलें. स्वागतमंडळाचे अध्यक्ष नामदार सर नारायणराव चंदावरकर यांनींहि आपणांस बोलाविण्यासाठीं सांगितलें आहे; ता. २ जुलै रोजीं होणाऱ्या सभेनंतर भोजनसमारंभ आहे त्यालाहि आपण उपस्थित व्हावें इत्यादि मी सर्व त्यांना कळविलें. पांच सहा दिवसांनीं एका कार्डावर त्यांचें उत्तर आलें. त्यांत त्यांनीं लिहिलें होतें, " आपण समारंभ करीत आहांत ही गोष्ट चांगली आहे. मी त्या रविवारीं मुंबईत असलों तर आपल्या समारंभाला येईन. पण मी त्या दिवशीं मुंबईत असण्याचा संभव नाहीं. " हें उत्तर आम्हीं सर्वांनीं—सर नारायणराव धरून—वाचलें. सर्वांच्या सूचनेवरून मीं पुन्हा त्यांस रविवारीं सवड काढून आलेंच पाहिजे म्हणून कळविलें. आम्ही पुढील तयारीला लागलों. दोन तारखेचीं आमंत्रणपत्रें काढलीं आणि आठशें लोकांना तीं पाठविलीं. आमंत्रणपत्राबरोबर सभागृहांत दाखल होतांना दाखविण्याचें एक कार्डहि मुद्दाम घातलें होतें. टिळक येतील ते एकटे येणार नाहींत हें आम्हांला माहीत होतें.

गेलीं दोनतीन वर्षें रा. राम गणेश गडकऱ्यांची आणि माझी चांगली दोस्ती झाली होती. त्यांचें पहिलें नाटक 'प्रेमसंन्यास' पहाण्यासाठीं मी पुण्यांत त्यांच्याबरोबर गेलों होतों. आम्हीं माडीवरून तें नाटक पाहिलें. माझ्या वाङ्मयात्मक मित्रांसंबंधीं मी पुढें लिहिणार आहे तेव्हां गडकऱ्यांबद्दल विशेष लिहिन. सध्या त्यांचें नांव निघण्याचें कारण ता. १ जुलैला शनिवारीं रात्रीं ( १९१६ )

कल्पना असती तर मोठा हॉल किंवा एखादें थिएटर घेतलें असतें. आतां तें अर्थात् शक्य नाहीं. आपण आंत तर चला. आगरकर-दिनाला गर्दी झाली तर तें चांगलेंच आहे. आंत चंदावरकर आणि परांजपे आहेत. त्यांच्या सल्ल्यानें काय करावयाचें तें ठरवूं. " मग टिळक एकदाचे आंत आले. त्यांच्याबरोबर त्यांचे चारपांच रक्षक म्हणून ज्यांना आम्ही समजत होतों त्यांनाहि आंत नेऊन बसविलें. सी. आय. डी. चीं माणसेंहि येऊन बसलीं. बाहेर गर्दी सारखी वाढत होती. आंत हॉलहि चिक्कार भरून गेला. टिळक मला म्हणाले, " अळतेकर, बाहेरचीं माणसें बसायची सोय झाली पाहिजे. नाहींतर सभा होण्यांत अर्थ नाहीं. " मीं त्यांना एका खुर्चीवर बसविलें आणि त्यांना म्हणालों, " आगरकरदिनाच्या निमित्तानें एवढी गर्दी जमली ही आनंदाची गोष्ट आहे. आम्हांला फक्त या हॉलची परवानगी मिळाली आहे. तो तर गच्च भरलेला आपण पाहताच. आतां बाहेर मंडळी आहेत ही गोष्ट खरी. पण त्यांनीं शांतपणें उभें राहिलें पाहिजे. या सभेला एवढी गर्दी जमली यांत आम्हांला आनंदच आहे." टिळक कांहीं वेळ स्तब्ध होते. मग ते म्हणाले, " बाहेर एवढी गर्दी जमली आहे ती आंत घेण्याची सोय झाली पाहिजे. " मीं म्हटलें, " काय करतां येईल तें मी पाहतों. पण एवढी गर्दी आंत घेणें शक्य नाहीं. बाहेरची मंडळी शांतपणें राहतील तर यांतूनहि कांहीं उपाय निघेल. तेव्हां आतां विनंती कीं आपण या सभेंत भाषण करावें. " टिळक म्हणाले, " तुमचे दहा वक्ते आहेत. मला आज पुष्कळ वेळ पाहिजे. " मीं सांगितलें, " आम्ही जास्तीत जास्त अर्धा तास आपणांस देऊं. " टिळक म्हणाले, " अर्ध्या तासानें काय होणार ? आज मला चांगले दोन तीन तासहि पुरणार नाहींत. " मीं त्यांना म्हटलें, " आपण म्हणतां तें मला बरोबर वाटतें. पण आपण आज नक्की येणार असें

आम्हांला कळविलें असतें आणि आपण दोनतीन तास बोलणार असेंहि सांगितलें असतें तर आम्हीं आपलेंच भाषण फक्त ठरविलें असतें. पण आपण येऊं शकणार नाहीं असें मला कळविलें हें खरें ना ? " त्यावर टिळक म्हणाले, " तें खरें आहे. तेव्हां मी मुंबईला आज येऊं शकेन असें मला वाटलें नव्हतें. पण आतां मी आलों आहे. " मी म्हणालों, " आपण आलांत त्यामुळें आम्हां सर्वांना अतिशय समाधान वाटतें. इतर कांहीं भाषणें बंद करून आपलें भाषण अर्धापाऊण तास होण्याची व्यवस्था करायलाहि मी तयार आहे. आम्हीं आपल्याला भक्तिभावानें बोलाविलें. आपणहि आलांत ही आनंदाची गोष्ट आहे. परगांवाहून बरेच वक्ते आले आहेत. त्यांनाहि बोलावयास दिलें पाहिजे. " टिळकांनीं विचारलें, " तर मग तुमचें म्हणणें काय ? " मी म्हणालों, " आपण येथें स्वस्थ बसा. या समारंभांत आपला अपमान करावा अशी निदान आमची इच्छा नव्हती किंवा नाहीं. " टिळक म्हणाले, " तें मला मान्य आहे. मी तुम्हांला न कळवितां आलों ही गोष्ट खरी आहे. पण आतां ही बाहेर गर्दी माजली आहे तिचें काय करावयाचें ? " मीं म्हटलें, " तें आतां आपण पाहूं. " इतक्यांत बाहेर ओरडा झाला. हॉलच्या कांहीं खिडक्या पण फुटल्या. शेवटीं असें ठरलें कीं आंत एक आणि बाहेर एक अशा दोन सभा एकाच वेळीं भरवाव्यात. बाहेरच्या सभेपुढें आमच्या म्हणजे उत्सवमंडळाच्यातर्फे टिळकांनीं बोलावें. टिळकांनीं सुदैवानें ही सूचना मान्य केली. मग रा. दळवी वकीलां-बरोबर टिळक बाहेर गेले. बाहेरच्या सभेपुढें टिळकांनीं भाषण केलें. भाषण करण्यापूर्वीं " गर्दी फार झाल्यानें बाहेर सभा भरविणें निश्चित करावें लागलें. आतां मी आगरकर डे कमिटीच्या तर्फे आपल्यापुढें भाषण करणार आहे. " असें टिळकांनीं स्वच्छ सांगितलें.

निवडणूक फार योग्य होती असें लिहिलें. लेखाच्या शेवटीं इतक्या वर्षांनीं का होईना पण हा समारंभ घडवून आणल्याबद्दल दोघे चिटणीस रा. वसंतराव नाईक आणि मी यांचें अभिनंदन केलें.

आगरकर डे झाल्यावर सर्व महाराष्ट्रभर माझ्या नांवाला प्रासिद्धि मिळाली. हा समारंभ झाला त्यावेळीं मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन हे होते. आगरकर डे म्हणजे टिळकांचें स्तोम माजविण्यासाठीं केलेला समारंभ अशी समजूत तेव्हांच्या सरकारी रिपोर्टरांनीं किंवा सी. आय्. डी. नें त्यांची करून दिली होती. त्यासंबंधीं लॉर्ड विलिंग्डन एकदां चंदावरकरांकडे बोलले. तेव्हां चंदावरकरांनीं विलिंग्डन यांचा करवून देण्यांत आलेला भ्रम दूर केला. हें सर्व चंदावरकरांनीं मला नंतर सांगितलें.

आगरकर डे झाल्यानंतर मी माझ्या मनाशीं आगरकरांचें विस्तृत चरित्र केव्हांतरी लिहावयाचें असा संकल्प बांधला आणि तूर्त हळूहळू त्याच्या तयारीला लागलों. टिळकांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा (फर्ग्युसन कॉलेजचा) जो राजीनामा दिलेला होता त्या राजीनाम्याची प्रत कोठेंहि पहावयास मिळत नव्हती फर्ग्युसन कॉलेजांत ती प्रत आहे म्हणून कळलें. तेव्हां त्या वेळचे कॉलेजचे सेक्रेटरी प्रो. हरिभाऊ लिमये यांच्याकडे मीं त्यासंबंधीं चौकशी केली. मी आगरकरांचें चरित्र लिहिणार आहे; तेव्हां मला ती राजीनाम्याची प्रत कांहीं दिवस पहावयास द्यावी असें मीं हरिभाऊंना म्हटलें. हरिभाऊ म्हणाले कीं ती प्रत तुलाच काय पण कोणालाहि मिळणार नाहीं. टिळकांना विचारलें तेव्हां ते म्हणाले कीं माझ्याकडे एक प्रत आहे आणि दुसऱ्या कोणाजवळहि ती प्रत नाहीं हें मला खात्रीनें माहीत आहे; माझी प्रत कोणालाहि मिळणार नाहीं. अशा प्रकारें टिळकांचा राजीनामा पहावयाला मिळणार नाहीं असें

टिळकांचें बाहेरच्या सभेंत सुमारें दीड तास भाषण झालें. हॉलमधील सभाहि सुमारें अडीच तास उत्तमपणें आणि शांतपणें चालली. रँगलर परांजपे यांनीं उत्कृष्ट भाषण केलें. याशिवाय बॅ. जयकर, रा. रा. रामचंद्र गोविंद प्रधान, प्रो. गोविंदराव भाटे, श्रीमती वेणूबाई नामजोशी वगैरे वक्त्यांचींहि उत्तम भाषणें झालीं. सर्व समारंभ उत्कृष्टपणें पार पडला. बाहेर टिळकांचें भाषण संपल्यानंतर मीं जाऊन त्यांचे आभार मानले आणि रात्रींच्या जेवणाचें आमंत्रण दिलें. आपण जेवायला येणार नाहीं म्हणून त्यांनीं सांगितलें. सभेचें सर्व काम उत्तम झालें. आलेल्या प्रसंगांतून सभा निभावली म्हणून सर्वांनीं संतोष प्रदर्शित केला. सभा संपल्यानंतर मुझफराबाद हॉलमध्यें मंडळी गोळा झाली. रात्रीं नऊ वाजण्याच्या सुमारास निरनिराळ्या धर्मांची आणि सर्व हिंदु जातींची मंडळी एकत्र बसून जेवली. सर नारायणराव चंदावरकर, रँगलर परांजपे वगैरे सर्व मंडळी जेवणास उपस्थित होती. जेवणाचा बेतहि फार उत्तम होता. गुजराती खाजा आणि आंबरस हीं पक्वान्नें होतीं. भोजन समारंभ तास दीडतास सुखानें झाला. भोजनास आलेल्या मंडळीचीं नांवें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालीं. सर्व धर्मांचा आणि जातींचा हा एकत्र भोजनसमारंभ म्हणजे मुंबईंत एक अपूर्व कार्यक्रम होऊन गेला. कांहीं थोड्या लोकांनीं ( चार किंवा पांच ) आपलीं नांवें प्रसिद्ध करूं नयेत म्हणून अगदीं गयावया करून सांगितलें. त्याप्रमाणें तीं केलीं नाहींत.

आगरकर डें मुंबईंत फार गाजलें. प्रत्येक वर्तमानपत्रांत त्यासंबंधीं लेख आले. केसरीनेंहि पुढच्या मंगळवारच्या अंकांत या समारंभावर अग्रलेख प्रसिद्ध केला. तथापि त्या लेखांत चंदावरकरांना उगाच कोपरखळ्या दिल्या. मात्र रँगलर परांजपे यांची अध्यक्षस्थानीं

निवडणूक फार योग्य होती असें लिहिलें. लेखाच्या शेवटीं इतक्या वर्षांनीं का होईना पण हा समारंभ घडवून आणल्याबद्दल दोघे चिटणीस रा. वसंतराव नाईक आणि मी यांचें अभिनंदन केलें.

आगरकर डे झाल्यावर सर्व महाराष्ट्रभर माझ्या नांवाला प्रसिद्धि मिळाली. हा समारंभ झाला त्यावेळीं मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन हे होते. आगरकर डे म्हणजे टिळकांचें स्तोम माजविण्यासाठीं केलेला समारंभ अशी समजूत तेव्हांच्या सरकारी रिपोर्टरांनीं किंवा सी. आय्. डी. नें त्यांची करून दिली होती. त्यासंबंधीं लॉर्ड विलिंग्डन एकदां चंदावरकरांकडे बोलले. तेव्हां चंदावरकरांनीं विलिंग्डन यांचा करवून देण्यांत आलेला भ्रम दूर केला. हें सर्व चंदावरकरांनीं मला नंतर सांगितलें.

आगरकर डे झाल्यानंतर मी माझ्या मनाशीं आगरकरांचें विस्तृत चरित्र केव्हांतरी लिहावयाचें असा संकल्प बांधला आणि तूर्त हळूहळू त्याच्या तयारीला लागलों. टिळकांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा ( फर्ग्युसन कॉलेजचा ) जो राजीनामा दिलेला होता त्या राजीनाम्याची प्रत कोठेंहि पहावयास मिळत नव्हती फर्ग्युसन कॉलेजांत ती प्रत आहे म्हणून कळलें. तेव्हां त्या वेळचे कॉलेजचे सेक्रेटरी प्रो. हरिभाऊ लिमये यांच्याकडे मीं त्यासंबंधीं चौकशी केली. मी आगरकरांचें चरित्र लिहिणार आहे; तेव्हां मला ती राजीनाम्याची प्रत कांहीं दिवस पहावयास द्यावी असें मीं हरिभाऊंना म्हटलें. हरिभाऊ म्हणाले कीं ती प्रत तुलाच काय पण कोणालाहि मिळणार नाहीं. टिळकांना विचारलें तेव्हां ते म्हणाले कीं माझ्याकडे एक प्रत आहे आणि दुसऱ्या कोणाजवळहि ती प्रत नाहीं हें मला खात्रीनें माहीत आहे; माझी प्रत कोणालाहि मिळणार नाहीं. अशा प्रकारें टिळकांचा राजीनामा पहावयाला मिळणार नाहीं असें

वाटूं लागलें. त्यामुळें चरित्रलेखनाचा योग तावडतोब म्हणजे १९१६ १७–१८ या सालांत आला नाहीं. पुढें तो योग कसा आला त्याची हकीगत दुसऱ्या एका भागांत येणार आहे. पण तो योग आला त्यावेळीं टिळकांचा मृत्यु होऊन दहा वर्षे लोटलीं होतीं. सध्यां तरी (१९१७) टिळकांनीं आपली प्रत देण्याचें नाकारलें. त्यामुळें चरित्रलेखनाची तयारी तूर्त स्थगित झाली.

पुढच्या जुलै महिन्यांतच इंदुप्रकाशांत बरेच फेरफार झाले. वर्तमानपत्राचें संपूर्ण स्वरूप बदलणार असा रंग दिसूं लागला. रा. ब. पाध्ये यांचा संबंध बहुतेक तुटला. दामोदरशेट यंदे यांच्याबरोबरच आतां मला काम करणें प्राप्त झालें. दामोदरशेट मोठा हुशार माणूस. अतिशय गोड बोलणारा. पण आतां पैशाच्या बाबतींत त्याला उतरली कळा लागली होती. आगरकर डे झाल्यानंतर एम्. ए. होण्याचा मीं निर्धार केला. अण्णा विजापूरकरांनीं दरमहा पन्नासप्रमाणें सात आठ महिने मला पैसा पुरविण्याचें कबूल केलें. हा पैसा मला सात आठ महिने पुरवावयाचा होता, तो मीं पुढें सवडीनें फेडून टाकावयाचा होता. म्हणजे, माझें जीवन अद्यापि स्थिर झालेलें नव्हतें. एम्. ए. होण्याची मला हौस होती. त्यावेळीं घरींच अभ्यास करून एम्. ए. होता येत असे. व्याख्यानें वगैरे होत. पण तीं ऐकण्याची सक्ति नव्हती. अर्थशास्त्र आणि इतिहास हे विषय मीं एम्. ए. साठीं घेतले. त्यासंबंधीं पुस्तकें मिळवून वाचूं लागलों. १९१७ च्या मार्चमध्यें मी एम्. ए. ला बसलों; आणि तावडतोब परीक्षेंत उतरलों. एम्. ए. झाल्यावर मी एक इंग्रजी मासिक ' New Review ' म्हणून सुरू केलें. अशा प्रकारें माझ्या आयुष्याला नवें वळण लागणार असें दिसूं लागलें.

* * *

आगरकर दिन म्हणजे माझ्या आयुष्यांतील एक फार महत्त्वाचा प्रसंग होऊन गेला. त्याच्यामुळें मी पुष्कळांना ओळखूं लागलों. या माणसाच्या अंगीं कांहींतरी कर्तृत्व आहे असें पुष्कळ लोकांना वाटूं लागलें. या तीन चार महिन्यांत मुंबईतील कांहीं चांगल्या लोकांशीं माझा जो स्नेह झाला तो कायमचा झाला. विशेषतः टिळकांची समजूत काढण्यांत मी जें धारिष्ट्य आणि शहाणपण दाखविलें त्यामुळें पुष्कळ मंडळी माझ्यावर खूष झाली. 'मनोरंजना' च्या खास आगरकर-अंकांत मीं जें आगरकरांचें चरित्र लिहिलें तें पुष्कळांना आवडलें. जुलै महिनाअखेर वर्तमानपत्रांतून आगरकर दिनाची चर्चा चालली होती. टिळकांनीं कांहीं झालें तरी आगरकरांची खूप स्तुति केली होती. त्यामुळें आगरकरांच्या उत्सवास नांव ठेवण्यास कोणीहि धजावला नाहीं. अच्युतराव कोल्हटकरांनीं सुद्धां लिहिलें कीं अळतेकर चांगले होतकरू तरुण आहेत; पण त्यांचें लोणचें अजून मुरलेलें नाहीं.

पुण्यांत रँगलर परांजपे, नामदार कामत वगैरे थोर थोर मंडळींची माझ्यावर कृपा होती. रँगलर परांजपे यांची जी मैत्री मला मिळाली ती अद्यापि उत्कृष्टपणें चालूं आहे आणि पुढें तिचें रूपांतर माझा मुलगा आणि त्यांची पुतणी यांचा विवाह होण्यांत झालें. नामदार कामतांशींहि माझा संबंध आला आणि त्यांनींहि मला मोठ्या उदार अंतःकरणानें वागविलें. पुण्यांतील फर्ग्युसन कॉलेजांतील गुरुजनांशींहि माझे संबंध चांगले होते. प्रो. लिमये, प्रो. काळे, प्रो. वासुदेवराव पटवर्धन, प्रो. पानसे वगैरे मंडळी माझी वरचेवर विचार-

पूस करीत. हरिभाऊ आपट्यांची माहिती १९०८ पासून कशी झाली हें मागें सांगितलें आहे. गेल्या सहा महिन्यांत ज्यांच्याशीं माझा संबंध विशेष आला असे म्हणजे सर नारायणराव चंदावरकर. त्यांच्या उत्कृष्ट साहाय्याशिवाय आगरकरदिन चांगल्या प्रकारें पार पाडण्याला बराच अडथळा आला असता. त्यांचा माझा स्नेह चांगला जमला. मधून मधून सकाळीं मी त्यांच्याबरोबर तास दीड तास हिंडावयास जात असे. ही सर्व मंडळी वयानें माझ्यापेक्षां मोठी पण त्यांची मजवर कृपा असे.

पुण्यांतच झालेली आणखी एक ओळख म्हणजे प्रसिद्ध नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची. माझी आणि गडकरी यांची दोस्ती कॉलेजमध्येंच झाली होती. गडकरी यांनीं एक दिवस मला सांगितलें कीं तात्यासाहेब कोल्हटकरांची मीं भेटावें अशी इच्छा आहे. मीं अर्थात् त्या गोष्टीला आनंदानें संमति दिली. तात्यासाहेब कोल्हटकरांचें नांव तेव्हां मोठें होतें. त्यांच्याशी परिचय व्हावा म्हणून मीहि उत्सुक होतों. एक दिवस मला वाटतें मी गडकरी यांच्या घरीं गेलों. तेथेंच तात्यासाहेब मला भेटले. त्या दिवशीं मी दोन तीन तास त्यांच्याजवळ बसलों होतों. ते आणि गडकरी यांचीं बोलणीं पोटभर ऐकलीं. माझे ज्ञानप्रकाशांतील खाडिलरांच्या नाटकांविषयीं लेख त्यांनीं वाचले होते. त्यांतील विवेचन आणि भाषासरणी या दोहोंबद्दल त्यांनीं मला शाबासकी दिली. कोल्हटकरांचा आणि माझा स्नेहसंबंध तेव्हांपासून त्यांच्या मृत्यूपर्यंत कायम होता. पुढें मी मुंबईला आल्यावर त्यांची माझी दर वर्षीं गांठ पडे. त्यांच्याचमुळें मुंबईला पुढें प्रख्यात झालेले डॉ. भालेराव यांचा आणि माझा स्नेह जुळला. कोल्हटकरांच्या मुळेंच नरसिंह चिंतामण केळकरांशीं माझी प्रथम ओळख झाली. पुढें पुढें तर ते माझ्यावर फार लोभ करीत.

गडकरी यांची आणि माझी ओळख कॉलेजांत झाली. ते कॉलेजमध्यें कांहीं दिवस विद्यार्थी म्हणून होते. पण कॉलेजमध्यें ते फार दिवस राहूं शकले नाहींत. त्याला कारण बहुधा त्यांच्याजवळ पैसा विशेष नव्हता हें असावें. कॉलेजांत जेव्हां जेव्हां येत तेव्हां तेव्हां गडकरी बहुधा प्रो. गोविंदराव भाटे यांच्या संगतींत असत. त्यांची माझी गांठ प्रथम केव्हां आणि कशी पडली हें आतां आठवत नाहीं. पण मी जेव्हां खाडिलकरांच्या विद्याहरणासंबंधीं लेख लिहिले तेव्हां त्यांची माझी चांगली ओळख होती. आम्ही कॉलेजांत असतांना कधी कधी रेसीडेन्सींत बसून खूप गप्पा मारल्या आहेत. कसबा पेठेंतील त्यांच्या घरांतहि मी दोनचार वेळां गेलेलों आहे. त्यांच्याच बरोबर मीं त्यांचें प्रेमसंन्यास हें पहिलें नाटक पाहिलें. त्यानंतरहि त्यांचें नाटक असलें तर मुंबईस मी पहावयास जात असे. एका संध्याकाळीं ते श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांबरोबर माझ्या घरीं आले होते. आम्ही बराच वेळ गप्पागोष्टी करीत बसलों होतों. १९१७ सालापासून गडकऱ्यांची गांठ केव्हांतरी पडत असे.

१९१६ सालीं आगरकर दिन झाल्यानंतर मी एम्. ए. च्या अभ्यासाला लागलों. त्याच वेळीं मनोरंजन मासिकांत मीं 'शांताराम' नांवाची कादंबरी लिहिली. त्याबद्दल थोडी रक्कम मिळाली. ती आणि विजापूरकरांनीं दरमहा पन्नास रुपये देण्याचें कबूल केलें होतें ते असें मिळून माझा संसार थोडक्यांत पण नीटपणें चालला होता. यावेळची मुख्य गोष्ट म्हणजे बाजारभाव फार बेताचे होते. पहिलें महायुद्ध चालूं होतें तरी जिनसांच्या किंमती फारशा चढल्या नव्हत्या. तेव्हां मुंबईला अठ्ठावीस तोळ्यांचा शेर होता. वांगी अर्धा आणा शेर मिळत. यामुळें दरमहा शंभर रुपये असले तर चांगलें चालत असे. माझी निरनिराळ्या प्रकारें जवळजवळ शंभर रुपये प्राप्ति होती.

१९१६ सालीं डिसेंबर महिन्यांत लखनौ येथें कॉंग्रेस व्हावयाची होती. त्या कॉंग्रेसला मीं जाण्याचें ठरविलें. सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे अमृतलाल ठक्कर यांजबरोबर मी निघालों. आमचीं थर्ड क्लासचीं तिकिटें होतीं. आमच्याबरोबर पुण्याचे वीरकर वकील आणि गुप्ते वकील होते. शिवाय इंटरक्लासचें तिकीट काढून त्या डब्यांत नासिकचे रामभाऊ प्रधान बसले होते. रामभाऊंची आणि माझी उत्तम माहिती झाली होती. पण ते झांशी येईपर्यंत आपल्याच डब्यांत बसून होते. झांशी दुसरें दिवशीं बारा एक वाजतां आली. पुढें दुसऱ्या गाडींत बसून आम्ही लखनौकडे चाललों आणि रात्रीं तेथें पोहोंचलों.

सुरतेच्या कॉंग्रेसनंतर लोकमान्य टिळक या लखनौ कॉंग्रेसला आलेले होते. गेल्या वर्षीं मुंबई कॉंग्रेसला ते आले नव्हते. लखनौ येथें त्यांच्याबरोबर दोनशे तरी महाराष्ट्रीय असावेत असें वाटतें. ती सर्व मंडळी शहरांत गंगाप्रसाद वर्मा धर्मशाळेंत उतरली होती. सबजेक्ट्स् कमिटीला मेंबर निवडण्याबाबत टिळकांनीं स्पष्ट सांगितलें कीं आपण एकाहि नेमस्ताला येऊं देणार नाहीं. रा. गांधी मध्यरात्रीं जाऊन टिळकांना भेटले आणि रॅंगलर परांजपे वगैरे मंडळी विषय-नियामक मंडळींत असणें फार जरूर आहे म्हणून त्यांनीं आग्रहपूर्वक सांगितलें. १९१६ सालीं गांधींना गोखल्यांचे अनुयायी समजत. टिळकांनीं गांधींचें म्हणणे ऐकलें नाहीं. ते म्हणाले, " बहुमत मजजवळ आहे. ते निवडतील तीं माणसें विषयनियामक मंडळींत येणार. " टिळकांचें तें म्हणणें अर्थात् खरें ठरलें. कॉंग्रेसच्या अध्यक्षांना कांहीं माणसें सदर कमिटींत घालतां येतात. त्यांनीं परांजपे यांचें नांव घातलें. परांजपेहि विषयनियामक कमिटींत आले. कॉंग्रेस एकंदरींत उत्तमपणें पार पडली. मुसलमान लोकांशीं जमवून

घेण्यांत आलें. अर्थात् जातवार प्रतिनिधित्वाचें विष दिवसेंदिवस वाढत गेलें. त्याचा परिणाम १९४७ सालीं हिंदुस्थानचे तुकडे पाडण्यांत झाला.

आम्हीं पांचसहा दिवस लखनौ येथे होतो. कॉंग्रेस आटोपल्यावर सर्व लखनौ शहर व तेथील पुराण इमारती आम्हीं पाहिल्या.

मुंबईला आल्यावर दोन दिवसांनीं एम्. ए. च्या अभ्यासाला लागलों. १९१७ साल सुरुं झालें होतें. परीक्षा मार्च महिन्याच्या शेवटीं किंवा एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत होती. अर्थ-शास्त्राचे चार पेपर व इतिहासाचे चार पेपर यांची त्या दोनतीन महिन्यांत पुन्हा उजळणी केली. गेलीं जवळजवळ चार पांच वर्षें वर्तमानपत्राशीं संबंध आल्यामुळें आणि अर्थशास्त्रासंबंधीं प्रत्यक्ष अवलोकन करण्याचें काम माझ्याकडेच असल्यामुळें त्या विषयांत मी बराच तरबेज झालों होतों. इतिहासाचींहि पुस्तकें मीं पुष्कळ वाचलीं होतीं. मधून मधून कांहींतरी लिहिण्याचीहि संवय लागली होती. १९१६ सालींच मी रॉयल एशियाटिक सोसायटीचा सभासद झालों आणि तेथून इतिहास व अर्थशास्त्र या विषयांवरील पुस्तकें वाचावयास आणूं लागलों. त्याच्या पूर्वीं मी हॉर्नबी रोडवरच्या पेटीट लायब्ररीचा सभासद होतों. एशियाटिक सोसायटीचा सभासद झाल्यावर दोन तीन महिन्यांनीं मीं पेटीट लायब्ररीचा राजिनामा दिला. एशियाटिक सोसायटीचा सभासद मी अद्यापि आहे. तिच्या व्यवस्थापक मंडळांतहि मी पंचवीसतीस वर्षें होतों.

मासिक मनोरंजनांत माझी ' शांताराम ' कादंबरी प्रसिद्ध होत होती. तिच्यासंबंधीं चांगलें अनुकूल मत सर्वत्र झालें होतें. 'अपराध कोणाचा ? ' ही माझी पहिली छोटी कादंबरी ' उद्यान ' मासिकांत

सदानंद दादोबा पाटील यांनीं प्रसिद्ध केली होती. त्यानंतर ही दुसरी कादंबरी आतां ‘ मनोरंजन’नें प्रसिद्ध केली. या कादंबरीमुळें माझा बराच लौकिक झाला. तारुण्याच्या त्या कालांत माझें मन अगदीं सुप्रसन्न होतें. एम्. ए. झाल्यावर आपण कांहींतरी विशेष करूं अशा कल्पनाहि माझ्या मनांत येऊन जात. या वर्षीं (१९१६-१७ ) प्रो. वामन गोविंद काळे यांना मुंबई युनिव्हर्सिटीनें एम् ए. साठीं अर्थशास्त्राचे व्याख्याते नेमले होते त्यांचीं दहाबारा व्याख्यानें मुंबई युनिव्हर्सिटींत व्हावयाचीं होतीं. त्यांची माझी युनिव्हर्सिटींतच एकदां गांठ पडली; आणि त्यांनीं आपलीं व्याख्यानें ऐकतोस का म्हणून मला विचारलें. मीं त्यांना ऐकायला वेळ होत नाहीं म्हणून सांगितलें. त्यावेळीं हीं व्याख्यानें एम्. ए. च्या विद्यार्थ्यांसाठीं होत हें खरें, पण त्या व्याख्यानांना हजर राहिलें पाहिजे अशी कांहीं युनिव्हर्सिटीची सक्ति नव्हती. माझ्यापाठीमागें दुसरे उद्योग असल्यामुळें मला तीं ऐकण्याचें जमलें नाहीं. त्यामुळें माझें थोडेंबहुत नुकसानहि झालें असेल. पण त्याला माझा इलाज नव्हता. पुढें काय करावयाचें याचा विचार एम्. ए. चा निकाल लागल्यानंतर करावयाचा असें मीं ठरविलें. सध्याचा वेळ एम्. ए. च्या पुस्तकांचें पुनरावलोकन करण्यांत घालविण्याचा निश्चय केला. जानेवारीपासून मार्च अखेरपर्यंत मीं माझ्या परीक्षेसाठीं असलेल्या विषयांची एकदा चांगली उजळणी केलीं आणि १९१७ सालच्या एप्रिलच्या सुरुवातीला म्हणजे बी. ए. झाल्यावर बरोबर दोन वर्षांनीं एम्. ए. च्या परीक्षेला बसलों.

परीक्षा झाल्यानंतर एप्रिल महिन्यांतच सोलापूर येथें प्रांतिक परिषद भरली. तिचे अध्यक्ष नरसिंह चिंतामण केळकर होते. टिळकहि या परिषदेला उपस्थित होते. नामदार कामत,

रँगलर परांजपे, रावबहादुर साठे वगैरे नेमस्त पक्षाचे धुरीणहि आलेले होते. मी या परिषदेस प्रतिनिधि म्हणून गेलों होतों. वालचंद कोठारी हे माझ्याच वयाचे तरुण गृहस्थ त्यावेळीं ब्राह्मणेतरांचे पुढारी बनले होते. तेहि परिषदेला प्रतिनिधि म्हणून आले होते. वालचंद कोठारी आणि मी एकाचवेळीं कॉलेजांत होतों बी. ए. च्या परीक्षेंत ते पहिल्या वर्गांत उतरले होते. वालचंद कोठारी यांनीं बरेच ब्राह्मणेतर प्रतिनिधि या परिषदेंत खेचण्याचा प्रयत्न केला असें त्यावेळीं टिळकपक्षीयांचें म्हणणें होतें. या प्रयत्नाला परांजपे आणि कामत यांचें साहाय्य होतें अशी विधानें केलेलीं आढळतात. अशा तऱ्हेनें कोणाला तरी प्रतिनिधि म्हणून घुसडणें ही गोष्ट योग्य नाहीं असेंच मत त्यावेळीं परांजपे आणि कामत या दोघांनींहि दिलेलें मला स्पष्ट आठवतें. परिषद जोरांत झाली. केळकरांचें भाषण चांगलें झालें. परांजपे यांच्याबद्दल मुद्दाम गैरसमजूत करून घेण्याकडे त्यावेळीं त्यांचे अनुयायी म्हणून समजले जाणाऱ्या कांहीं जणांचा कल दिसला. त्यावेळीं या गोष्टी विशेष कोणाला मनावर घेण्यासारख्या वाटल्या नाहींत. प्रांतिक परिषदेनंतर सोलापूरला एक सामाजिक परिषद झाली. ती घडवून आणण्याचें श्रेय गोपाळराव देवधरांना दिलें पाहिजे. ही सभाहि मोठी झाली. या सामाजिक परिषदेंत देवधरांच्या सांगण्यावरून जातिभेदाविरुद्ध मी एक भाषण केलें.

सोलापुराहून रात्रींच्या गाडीनें निघून दुसरे दिवशीं आम्ही परत आलों. या सोलापूरच्या मुक्कामांत माझी आणि रावबहादुर साठे यांची चांगली ओळख झाली. ती पुढें वाढतच गेली.

मे महिन्याच्या शेवटीं एम्. ए परीक्षेचा निकाल लागला. तो ऐकण्यासाठीं युनिव्हर्सिटींत मीच गेलों होतों. पास झाल्याचें समजलें

तेव्हां आनंद वाटला. घरीं येतांना दोन रुपयांचे पेढे घेतले. घरीं आल्यावर आईला आणि पत्नीला नीट हकीगत सांगितली. माझे शेजारी रा. रेगे यांचा मुलगा तेव्हां अगदीं लहान होता. त्याच्याहि तोंडांत दोन पेढे टाकले. तो दिवस त्याच आनंदांत घालविला. आतां कांहीं तरी नवीन करावयाचें आणि त्यांत गांठीला दोन रुपये पडतील हेंहि साधावयाचें असे विचार माझ्या मनांत खेळूं लागले.

* * *

एम्. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर माझ्या डोक्यांत विचार आला कीं महाराष्ट्राच्या बाजूला इंग्रजी मासिक पुस्तक नाहीं; तर आपण तसें काढण्याचा प्रयत्न करावा. त्यासंबंधीं कांहीं मित्रमंडळी-जवळ मी बोललों. त्यांत निरुत्साह कोणीहि उत्पन्न केला नाहीं. त्यावेळीं मुंबईच्या एका तरुण शेटजींशीं माझी ओळख झाली होती. या शेटजींचें नांव शेट गुलाबचंद देवचंद जव्हेरी. हे जातीनें जैन होते. यांचा मोत्यांचा मोठा व्यापार होता. यांची माझी ओळख प्रथम सर्व्हंटस् ऑफ् इंडिया सोसायटींत भरलेल्या एका सभेंत झाली. माझे मित्र प्रो. वसंतराव नाईक यांना गुलाबचंदाकडे शिकवणीसारखी नोकरी होती. वसंतराव मजजवळ त्याच्यासंबंधीं कधी तरी बोलले होते. गुलाबचंदाजवळ त्यावेळीं सार्वजनिक कार्यास देण्यासाठीं पुष्कळ वेळ होता. त्यांनीं आगरकरडेच्या वेळीं मजबद्दल वसंतरावांकडून ऐकलें होतें. लवकरच त्यांचा आणि माझा स्नेह जमला. त्यांच्याकडे माझें जाणें येणें होऊं लागलें.

मीं इंग्रजी मासिक काढावयाचें ठरविलें त्यावेळीं मजजवळ पैसे कांहींच नव्हते. माझ्या चारपांच मित्रांनीं शंभर शंभर रुपयांची रक्कम माझ्या हवालीं केली आणि मुंबई वैभव छापखान्यांत New Review (न्यू रिव्हयू) नांवाचें मासिक १९१७ जुलै पासून काढण्याचें मीं ठरविलें. त्यावेळीं मासिक किंवा वर्तमानपत्र काढणें ही गोष्ट सोपी नव्हती. चीफ् प्रेसीडेन्सी मॅजीस्ट्रेटपुढें जाऊन आपण मासिक काढणार असें सांगावें लागत असे. मॅजिस्ट्रेट नंतर पोलिसला चौकशी करण्यास सांगे. पोलिसचा रिपोर्ट आल्यावर मॅजिस्ट्रेट

आपला निकाल जाहीर करीत. त्यांत बहुधा दोन तीन हजारांचा जामीन घेऊनच मासिक काढण्याला परवानगी मिळे. यावेळीं मी रॉयल एशियाटिक सोसायटीचा सभासद होतों. आणखीहि एक दोन संस्थांत सामील झालों होतों. जून महिन्याच्या सुरुवातीला मी रावबहादुर चुनीलाल सेटलवाड या मॅजिस्ट्रेट समोर माझें म्हणणें सांगितलें; आणि मला मासिक काढण्याबद्दल परवानगी देण्याची विनंती केली. मॅजिस्ट्रेटनीं मला बरेच प्रश्न विचारलें. मी नुकताच एम्. ए. झालों होतों. त्यासंबंधीं मला मॅजिस्ट्रेटनें विचारलें. आठ दिवसांनीं पुन्हा बोलाविलें. त्या आठवड्यांत मी सर नारायणराव चंदावरकर यांना भेटलों आणि त्यांना डिक्लेरेशनची सर्व हकीगत सांगितली. नारायणरावांनींहि निरुत्साह केलें नाहीं. सर दिनशा वाच्छा यांची ओळख झाली होती. त्यांनाहि सर्व हकीगत सांगितली. ते म्हणाले, " चांगलें इंग्रजी लिहीत जा. " मी अगदीं निष्कांचन. तेव्हां चारपांचशें रुपये तरी हातीं सुरुवातीला असावेत म्हणून खटपट केली. माझे बालमित्र डॉ. त्रिंबकराव सोवनी, तसेंच रँगलर परांजपे, शेट गुलाबचंद यांनीं प्रत्येकीं शंभर रुपये देण्याचें कबूल केलें. इकडे तिकडे फिरून शंभर वर्गणीदार जमविले. आठ दिवसांनीं मॅजिस्ट्रेटनीं मासिक काढण्याची परवानगी दिली. जामीन कांहीं मागितला नाहीं. तेव्हां मला जरा हायसें वाटलें. मुंबई—वैभव छापखान्यांत जाऊन मासिक छापण्याची व्यवस्था केली. पहिल्या महिन्याचें बिल अडीचशें रुपये येईल असें सांगण्यांत आलें. मी पहिल्या अंकाच्या तयारीला लागलों.

याच सुमाराला आणखी एक गोष्ट घडून आली. मुंबईत यावेळी बॉम्बे प्रेसीडेन्सी असोसिएशन ही फार महत्त्वाची राजकीय संस्था होती. आज पन्नास वर्षे किंवा अधिक मुंबईचें सर्व राजकारण तेथेंच

तयार होत असे. १९१५ सालीं फेरोजशहा मेहता यांच्या मृत्यूमुळें असोसिएशनचें अध्यक्षस्थान सर दिनशा वाच्छा यांच्याकडे गेलें. सेक्रेटरीपदावर सर चिमणलाल सेटलवाड, मि. जहांगिर बोमनजी पेटिट, नारायण महादेव समर्थ आणि एक मुसलमान गृहस्थ असे चार जण होते. या मंडळींना एक असिस्टंट सेक्रेटरी पाहिजे होता. जुलै १९१७ पासून माझी त्या जागेवर नेमणूक झाली. मला दरमहा पाऊणशें रुपये पगार ठरला होता. पुढें तो शंभरवर जाईल असें मला सर चिमणलालनीं सांगितलें होतें. असोसिएशन त्यावेळीं युनिव्हर्सिटीसमोरील एका सुंदर इमारतींत चौथ्या माळ्यावर होती. तेथें रोज थोडीफार मंडळी जमत असत. असोसिएशनमध्यें नोकरी धरल्यानें माझ्या मासिकाच्या व्यवसायाला कोणतीच हरकत येणार नव्हती. तेथें सहा तास बसावयाचें असें, त्यांत एक दोन तास काम असें. असोसिएशनची मॅनेजिंग कौन्सिलची सभा पंधरावीस दिवसांतून एकदां भरे. त्या दिवशीं मात्र कधीं कधीं रात्र होईपर्यंत बसावें लागे. ही नोकरी मला सर्व प्रकारें चांगली होती. मुंबईतील सर्व राजकारणी पुरुष तेथें येत. तो काळ राजकारणाचा असल्यानें इतक्या मोठ्या लोकांची ओळख मला फार फायदेशीर झाली. नारायणराव ऊर्फ नानासाहेब समर्थ हेच खरे असोशिएशनचे कर्ते सेक्रेटरी होते. त्यांची माझी प्रथम अगदी थोडी ओळख होती. आतां चांगलीच ओळख झाली आणि तिचें रूपांतर पुढें उत्तम मैत्रींत झालें. नारायणराव समर्थासारखा उदार वृत्तीचा, थोर मनाचा पुरुष मीं क्वचित पाहिलेला आहे. माझें सर्व राजकीय शिक्षण यापुढें निदान दहा वर्षें तरी नानासाहेबांच्या हाताखालीं झालें हें मी कृतज्ञतापूर्वक कबूल करतों. नानासाहेबांनींच मला असोसिएशनचा असिस्टंट सेक्रेटरी होण्यास सांगितलें होतें. मीं तें काम सरासरी दोन वर्षें केलें.

यावेळीं मुंबईची प्रेसिडेन्सी असोसिएशन म्हणजे हिंदुस्थानच्या राजकारणाचें जवळजवळ केंद्रस्थान होतें. तेथेंच मुंबई प्रांतिक कॉँग्रेस कमिटीचेंहि वास्तव्य होतें. तिचेंहि काम मलाच पहावें लागे. यावेळीं कॉँग्रेसमध्यें जो बदल होणार होता आणि नेमस्त पक्ष जो फुटून निराळा होणार होता त्याची अप्रत्यक्ष तयारी चाललेली होती. असोसिएशनमध्यें मी सकाळीं जेवण करून साडे-अकराच्या सुमारास जात असे. संध्याकाळीं सहा वाजेपर्यंत मी तेथें बसत असे. असोशिएशनमध्यें दोन ख्रिस्ती कारकून माझ्या हाता-खालीं होते. तीं चांगलीं माणसें होतीं. ख्रिस्ती असल्यामुळें त्यांना राजकीय पक्ष असा कोणताहि नव्हता. असोसिएशनमध्यें वरचेवर टीपार्टीज होत. त्यावेळीं बरीच मंडळी येत. सर नारायणराव चंदावरकर, बॅ. जिना, सर चिमणलाल सेटलवाड, नारायण विष्णु गोखले, जहांगीर बोमनजी पेटीट, नारायण मल्हार जोशी वगैरे मंडळी वरचेवर येत. त्यांचीं संभाषणें ऐकणें म्हणजे एक तऱ्हेचें राजकीय शिक्षण होतें. नारायण मल्हार जोशी त्यावेळीं मजूर पक्षाचे असे झाले नव्हते. सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचीं कामें म्हणजे समाजसेवा अशीच बहुतेकांची समजूत होती. गोपाळराव देवधरांचें सेवासदन आणि नारायणराव जोशांची सोशल सर्व्हिस लीग या संस्था तेव्हां सोसायटीच्या प्रतीक होत्या. आणखी एक व्यक्ति त्यावेळीं प्रेसिडेन्सी असोसिएशनमध्यें सकाळीं अकरावाजे-पासून संध्याकाळीं सहावाजेपर्यंत बसत असे. तिच्या डोक्यावर मुसलमानी लाल टोपी असे. या व्यक्तीची आणि माझी लवकरच चांगली ओळख आणि पुढें स्नेह झाला. ही व्यक्ति म्हणजे बॅरिस्टर विठ्ठलभाई पटेल होत. हे त्यावेळीं मुंबई कायदेकौन्सिलचे सभासद होते. त्यांचें प्रॅक्टीसकडे फारसें लक्ष नव्हतें. ते अकरा साडेअकरा

वाजतां येऊन एका इझीचेअरमध्यें बसत व तेथेंच संध्याकाळपर्यंत असत.

१९१७–१८ हीं वर्षें प्रेसिडन्सी असोसिएशनच्या इतिहासांत फार महत्त्वाचीं झालीं. या सुमारास मि. मॉंटेग्यु हे हिंदुस्थानचे लंडन येथें स्टेट सेक्रेटरी झाले. त्यांनीं हिंदुस्थानला भेट दिली त्यावेळीं शेंकडो संस्थांचे प्रतिनिधि त्यांना भेटावयास गेले. मुंबईच्या नऊ राजकारणी पुरुषांनीं एक मोठा लेख तयार केला आणि तो सेक्रेटरी ऑफ् स्टेटकडे पाठविला. यावर सह्या केल्या होत्या त्या सर दिनशा वाच्छा, सर नारायणराव चंदावरकर, सर चिमणलाल सेटलवाड, नारायण महादेव समर्थ अशा नेमस्त पक्षीय लोकांनीं. तो वाचून वगैरे शेवटीं तयार झाला प्रेसिडन्सी असोसिएशनमध्येंच. हा निबंध जेव्हां संपूर्ण तयार झाला तेव्हां एक दिवस सर नारायण यांनीं त्यांतील कांहीं भाग मोठ्यानें वाचून दाखविला. त्यावेळीं विठ्ठलभाई अर्थात तेथें होते. ते सर नारायणरावांना म्हणाले, " माझीहि या निबंधावर सही करण्याची इच्छा आहे. तुमची कांहीं हरकत नाहीं ना ? " सर नारायणराव म्हणाले, " जरूर सही करा. तुम्ही कायदे कौन्सिलचे सभासद आहांत. तुम्हांला जर आमचें म्हणणें पसंत असेल तर जरूर आपली सही करा. " त्याप्रमाणें विठ्ठलभाईनीं त्या मेमोरँडमवर सही केली. पुढें एकदोन वर्षांत विठ्ठलभाई हळूहळू जहाल गटांत सामील होऊं लागले. आणि शेवटीं ते त्यांत पुरते सामील झाले. पण या खलित्यावर त्यांनीं अगदीं पूर्ण संमति देऊन सही केली यांत शंका नाहीं. इंडियन सोशल रिफॉर्मरचे संपादक नटराजन् यांनीं चंदावरकरांना एक दिवस सांगितलें कीं हा अळतेकर विठ्ठलभाईकडे फार जातो येतो. मला त्याबद्दल चंदावरकरांनीं विचारलें. मी त्यांना सांगितलें कीं विठ्ठलभाईचा आणि माझा स्नेहसंबंध आहे म्हणून मी

जातों. तेव्हां सर नारायणराव म्हणाले, " मग ठीक आहे. खाजगी स्नेहसंबंध राखलेच पाहिजेत. "

माझ्या ' न्यू रिव्हयू ' मासिकाचे दर महिन्याला एक असे तीन चार अंक बाहेर पडले. त्यांत संपादकीय लेखांतून नेमस्त विचार-सरणी पूर्ण जहाल भाषाशैलीनें प्रसिद्ध होऊं लागली. त्या वर्षाची कॉंग्रेस (१९१७) कलकत्ता येथें व्हावयाची होती. तिचें अध्यक्षस्थान ॲनी बेझंट यांना लाभलें होतें. दोन वर्षांखालीं सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटीच्या एका चहापानप्रसंगीं मीं मिसेस बेझंट यांना पाहिलें होतें. त्यांचीं कांहीं भाषणेंहि मीं ऐकलीं होतीं. पण बाई जरी लोकोत्तर होत्या तरी माझें त्यांच्याबद्दल विशेष असें अनुकूल मत नव्हतें, हें खरें. गोपाळराव गोखल्यांच्या मृत्यूनंतर बाईनीं ' न्यू इंडिया ' या वर्तमानपत्रांतील एका लेखांत गोपाळराव हे थिऑसॉफिस्ट होते म्हणून प्रसिद्ध केलें होतें. ही माहिती खोटी असल्याचें मला पूर्ण कळलें होतें. म्हणून ' न्यू रिव्हयू 'त एका लेखांत मीं बाईचा खोटेपणा जाहीर करून नामदार शास्त्री यांनीं बाईच्या लिहिण्याचा निषेध करावा असें सुचविलें होतें. पुढें नामदार शास्त्री हे मुंबई येथें आले असतां त्यांनीं मला भेटावयास बोलाविलें आणि सध्यां तरी मिसेस बेझंटविरुद्ध लिहिणें बरें नव्हें म्हणून सांगितलें. मीं म्हटलें, " माझें म्हणणें खोटें असल्यास तें परत घेण्यास केव्हांहि तयार आहे. " त्यावर शास्त्री म्हणाले, " गोखले थिऑसॉफिस्ट नव्हते ही गोष्ट अगदीं खरी आहे. पण सध्यां मिसेस बेझंट यांना दुखविणें बरें नाहीं. मीं त्यांना सांगितलें कीं मग मला माझें म्हणणें परत घेतां येणार नाहीं. गोपाळराव गोखल्यांच्याविषयीं असा गैरसमज होऊं देणें इष्ट नाहीं. शास्त्री म्हणाले, " तें खरें आहे. पण सध्यां बाईला दुखविणें बरें नाहीं. आमच्या

आमच्या सोसायटींतील मंडळींना तुमचें वागणें पसंत नाहीं." मी म्हणालों "दुर्दैवाची गोष्ट आहे. सोसायटींत पुष्कळ मंडळी माझी मित्र आहेत. पण गोपाळरावांवर असें कांहीतरी कुभांड उठविणें बरोबर नाहीं. म्हणून मीं लिहिलें." यावर शास्त्री हंसले आणि तो विषय संपला.

१९१६ सालीं लखनौला कॉंग्रेस झाली तींत वस्तुतः जहाल पक्षाची सरशी झाली होती. १९१७ सालीं कलकत्ता येथें जी कॉंग्रेस होणार होती तिचें अध्यक्षस्थान मिसेस ॲनी बेझंट यांना मिळाल्यानें तेथेहि जहाल पक्षाची सरशी होणार हें उघड होतें. मिसेस बेझंट यावेळीं जहाल पक्षांत मोडत होत्या. मद्रासच्या गव्हर्नरनें एक दिवस त्यांना आणि त्यांचे सहकारी मि. वाडिया यांना प्रतिबंधांत ठेवल्यामुळें त्यांचा जहालपणा अगदीं ताजा टवटवीत होता. पुढें कालांतरानें मिसेस बेझंट या नेमस्त पक्षांत सामील झाल्या ही गोष्ट निराळी. पण १९१७ सालीं त्या पुऱ्या जहाल बनल्यासारख्या दिसत होत्या. त्यांना कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडलें हें ऐकून मला उद्वेग वाटला यांत शंका नाहीं. तेव्हां मी माझ्या मासिकांत लिहिलें कीं मिसेस बेझंट ह्यांना अध्यक्ष निवडण्यापेक्षां रा. टिळक यांना अध्यक्ष करणें जास्त योग्य झालें असतें. माझ्या नोव्हेंबरच्या अंकांत प्रचलित राजकारणावर मी एक विस्तृत लेख लिहिला आणि त्यांत हें मत प्रकट करून कॉंग्रेसच्या भवितव्याविषयीं बरेंचसें लिहिलें. हा लेख त्या काळीं फार गाजला. त्यावर लेखक म्हणून माझी सही नव्हती. 'जुना राजकारणी' अशा टोपणनांवाखालीं तो छापला होता. अलाहाबादच्या 'लीडर' या चिंतामणींच्या पत्रानें त्याची तारीफ केली. पुढें मला चिंतामणींकडून समजलें कीं लॉर्ड सिन्हा

यांना तो लेख फारच पसंत पडला आणि तो कोणी लिहिला म्हणून ते चौकशी करीत होते.

नेमस्त आणि जहाल यांचें जमणार नाहीं हें स्पष्ट दिसत होतें. पुढे कलकत्ता कॉंग्रेसला मी जाण्याचें ठरविलें. सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे वामनराव पटवर्धन, श्रीधर गणेश वझे आणि दत्तोपंत आंबेकर यांच्यासह डिसेंबर महिन्याच्या बावीस-तेवीस तारखेला कलकत्ता मेलनें निघालों. बनारसला एक दिवस चांगला घालविला. आम्ही गेलों त्याच्या दुसऱ्या दिवशीं लोकमान्य टिळक दीडशें दोनशें लोकांसहित आले. त्यांना मोगलसराई स्टेशनवर काशीकर दाक्षिणी ब्राह्मणांतर्फे मेजवानी देण्यांत आली.

कलकत्याला ही माझी पहिलीच भेट होती. १९१५ च्या ऑक्टोबरांत मीं बनारस ते हरद्वार प्रवास करून दिल्ली, आग्रा, मथुरा वगैरे शहरें पाहिलीं होतीं. पण बनारसच्या पुढें जाण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता. स्टेशनवर उतरल्यावर आम्ही एक घोड्याची पण बैलासारखी हळू जाणारी गाडी घेतली. तिच्यांत बसून रिपन कॉलेजांत आलों. त्या ठिकाणीं प्रतिनिधींचें वसतिगृह होतें. सर्व दक्षिणी मंडळी येथेंच उतरली होती. संध्याकाळीं पांच वाजतांच कलकत्ता येथें अंधार सुरु झाला. आम्हाला सात वाजतां जेवणाचें आमंत्रण आलें. रात्रीं साधारण थंडी होती. पण मुंबईच्यापेक्षा अधिक होती.

चार दिवस कॉंग्रेसच्या दंगलींत गेले. मिसेस बेझंट यांचें भाषण त्यांच्या नेहमींच्या पद्धतीला अनुसरून झालें.

कलकत्त्याला मी माझ्या ‘ न्यू रिव्ह्यू ’ मासिकाच्या डिसेंबर महिन्याच्या सुमारें शंभर प्रती घेऊन गेलों होतों. दहा बारा वर्गणीदार मिळाले. जीं राजकीय आणि सामाजिक मतें मी त्यांत प्रतिपादन

करीत होतों त्याविरुद्ध बहुमत होतें. तथापि तेव्हां माझा उत्साह दांडगा होता. ते तरुणपणाचे दिवस होते. आत्मविश्वास जबरदस्त होता.

१९१८ च्या जानेवारींत मी मुंबईला परतलों. माझ्या 'न्यू रिव्ह्यू' मासिकाच्या ऑफिसांत गेलों असतां ( सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसासयटींत ) तेथें कांहीं फेरफार झालेले आढळले. रा. देवळे ( सोसायटीचे एक मेंबर ) यांनीं जी हकीगत सांगितली ती ऐकून मी थक्क झालों. सदर हकीगतीचा माझ्या कथेशीं कांहींच संबंध नाहीं. म्हणून ती येथें देण्याचें कारण नाहीं. पण तेव्हांपासून सोसा-यटीच्या सभासदांत एक प्रकारचें वितुष्ट आलें. त्याचा तात्कालिक परिणाम म्हणजे माझे मित्र रा. भाटलेकर यांची ज्ञानप्रकाशच्या कामावरील नोकरी गेली. रा. देवळे हेहि माझे निकटचे स्नेही होते. त्यांनीं कथन केलेल्या हकीगतीवरून त्यांच्यावर कांहीं दुर्धर प्रसंग ओढवलेला होता. आगरकर डे झाल्यानंतर देवळे यांचें लक्ष माझ्या-कडे विशेष गेलें होतें. १९१७ च्या शेवटीं किंवा १९१८ च्या सुरुवातीस मुख्यत्वेंकरून त्यांनीं आणि मी मिळून इंडियन इकॉनॉमिक सोसायटी काढली. या सोसायटीमार्फत सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीमध्यें वरचेवर सभा भरून अर्थशास्त्रीय विषयावर चर्चा होत. १९१८ सालीं हिंदुस्थान सरकारचें बजेट प्रसिद्ध झाल्यावर एप्रिल महिन्यांत आमच्या इकॉनॉमिक सोसायटीची सभा होऊन त्यांत त्या बजेटाची सविस्तर चर्चा झाली. या चर्चेंत बॅरिस्टर मुजुमदार, प्रो. सी. एन्. वकील वगैरे मंडळींनीं भाग घेतला होता. ही इकॉनॉमिक सोसायटी तीन एक वर्षें चाललीं होती. तेथें दर महिन्याला चर्चा वगैरे होत. सर नारायण चंदावरकर यांनीं या सोसायटीला १००० रुपये दिले होते. कलकत्त्याहून परत आल्यावर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम 30५५६ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

माझ्या मासिकाचें काम, इकॉनॉमिक सोसायटीचा एक सेक्रेटरी या नात्यानें काम, शिवाय कांहींतरी इकडेतिकडे लिहिणें अशा प्रकारें माझा काळ ज़ात असे. यावेळीं माझी प्राप्ति दरमहा शंभर सव्वाशें रुपये निरनिराळ्या प्रकारें मिळून होत असे.

१९१८ सालींहि माझें मासिक चालू होतें. त्यांतील कांहीं उतारे निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून येत. या वर्षी मी 'नवयुग' नांवाच्या एका नव्या मासिकासाठीं 'ललिता' नांवाची कादंबरी लिहूं लागलों. ती त्या मासिकांत वर्षा सव्वा वर्षांत समाप्त झाली. ही माझी तिसरी कादंबरी. माझ्या नांवें याप्रमाणें तीन कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्यामुळें मला कादंबरीकार म्हणून यावेळीं बरीच प्रसिद्धि मिळाली. थोडासा पैसाहि मिळाला. प्रेसिडेन्सी असोसिएशनचें काम चाललेलें होतें. तेथे आतां मतभेद अधिकाधिक होऊं लागले होते. मुंबईच्या प्रांतिक काँग्रेस कमिटीचें ऑफिस आमच्या येथेच होतें. तेथील मारामाऱ्या वाढत होत्या. मी असिस्टंट सेक्रेटरी होतों. माझीं स्वतःचीं मतें कांहीं असलीं तरी असोसिएशनचें काम नीटपणें चालवीत होतों. आमचे अध्यक्ष सर दिनशा वाच्छा आणि सेक्रेटरी सर चिमणलाल सेटलवाड, मि. जहांगिर बोमनजी पेटीट, एक मुसलमान गृहस्थ (त्याचें नांव तय्यबजी असावें) आणि नारायण महादेव समर्थ हे होते. यापैकीं चिमणलाल सेटलवाड हे समर्थ करतील त्याला होय म्हणत. आणि वाच्छांना विचारल्याशिवाय समर्थ कांहींहि करीत नसत. पण आतां मि. जहांगीर पेटीट मधून मधून अडथळे उत्पन्न करूं लागले. मि. पेटीट हे एक श्रीमंत आणि आचरट गृहस्थ होते. पुढे त्यांचें आणि त्यांच्या पत्नीचें भांडण होऊन ते वेगळे राहूं लागले. पुढें पुढें तर ते अगदीं द्रव्यहीन झाले होते असें दिसतें. पण मी ज्या वेळचें लिहित आहे त्यावेळीं ते मुंबईतील एक बडे

मराठी ग्रंथ संग्रहालय दा. क्र. ९९५००

गृहस्थ होते. सर नारायणराव चंदावरकरांच्या बंगल्याशेजारीं त्यांचें विस्तीर्ण कम्पाऊंड आणि एक मोठा बंगला होता. यांचें आणि समर्थांचें पटत नसे. सर दिनशा वाच्छा तर मि. जहांगीर पेटीट यांना आचरट समजत असत. या लोकांच्या हाताखालीं मला काम करावें लागे.

१९१८ साल हें हिंदुस्थानांत फार गडबडीचें गेलें. दिवसेंदिवस राजकारणाला तीव्र स्वरूप येत होतें. त्याच्या जंजाळांत आपल्या देशाचें काय होणार याची कुणाला कल्पना करवत नव्हती. १९१८ सालीं युरोपांतील महायुद्ध जर्मनीचा पूर्ण पराभव होऊन संपलें. हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी मि. मॉंटेग्यू हे झाले. त्यांचीं दोन तीन भाषणें ते सेक्रेटरी होण्यापूर्वीं झालेलीं होतीं. तीं हिंदुस्थानला आशादायक वाटत होतीं. त्यांनीं सेक्रेटरी झाल्याबरोबर हिंदुस्थानला भेट देण्याचा संकल्प केला. मुंबईच्या दहा जणांच्या खलित्याचा जो वर उल्लेख आहे तो मि. मॉंटेग्यू यांच्याकडेच पाठविण्यांत आला होता. मि. मॉंटेग्यू यांच्याकडे गेलेल्या खलित्यांत हाच खलिता विशेष महत्त्वाचा होता यांत शंका नाहीं. हा खलिता गेल्यावर प्रेसिडन्सी असोसिएशनमध्यें दोन पक्ष झाले. त्यापैकीं बहुतेक तरुण गुजराथी जहाल पक्षांत होते. मुंबईच्या कॉंग्रेस कमिटीच्या निवडणुकीच्या वेळीं या मंडळींनीं बरीच धांदल केली. त्याचा परिणाम म्हणजे त्यांच्या पक्षाचे बरेच लोक मॅनेजिंग कौन्सिलचे सभासद म्हणून निवडून आले. माझी आणि विठ्ठलभाई पटेल यांची यावेळेला फार दोस्ती जमली होती. ते अद्यापि पुरे जहाल झालेले नव्हते. त्यांच्या डोक्या-वर अजून लाल मुसलमानी टोपी असे. त्यांचा माझ्यावर पूर्ण विश्वास होता. ते एकदां मला आपल्याबरोबर दिल्लीला चल म्हणूनहि म्हणत होते. परंतु कांहीं लोकांची मी समर्थांचा माणूस अशी समजूत

झाली होती आणि त्यांनीं थोडा थोडा त्रास देण्यास सुरुवात केली होती. इतक्यांत असोसिएटेड प्रेसचे मि. चतर्जी यांनीं आपल्या ऑफिसांत मला नोकरीला बोलाविलें. तेहि प्रेसिडन्सी असोसिएशनमध्यें कधीं कधीं येत.

१९१८ च्या ऑगष्टमध्यें किंवा सप्टेंबरमध्यें काँग्रेसचें एक खास अधिवेशन मुंबई येथें झालें. या खास अधिवेशनांत काँग्रेसनें आपल्या नव्या अवताराची सुरुवात केली. सर दिनशा वाच्छा वगैरे कोणीहि नेमस्त मंडळी या अधिवेशनाला हजर नव्हती. काँग्रेस आतां जहाल लोकांच्या पूर्णपणें ताब्यांत गेली. पंडित मोतीलाल नेहरू यांचाहि कल तिकडेच झुकला. तो प्रसंग मोठा विलक्षण होता. काँग्रेसनें आतां नवें स्वरूप धारण करण्यास सुरुवात केल्यामुळें जुने काँग्रेसवाले रस्त्यावर रिकामे पडले. त्यांनीं नवा पक्ष काढला. यांत मुख्य भाग नारायणराव समर्थ ह्यांचा होता. सर दिनशा वाच्छा यांचीहि इच्छा नव्या काँग्रेसशीं सहकार्य करण्याची नव्हती. प्रश्न होता तो हा कीं मि. मॉंटेग्यू यांच्याशीं सहकार्य करावयाचें कीं नाहीं ? मि. मॉंटेग्यू यांची हिंदुस्थानाबद्दल पूर्ण सहानुभूति होती. त्यांच्या साहाय्यानें हिंदुस्थानाला वसाहतीसारखें स्वराज्य मिळेल असा भरंवसा या नेमस्त मंडळींना वाटत होता. पण काँग्रेसमधील जहाल लोक आतां संपूर्ण स्वातंत्र्याच्या गोष्टी बोलत होते. अशा परिस्थितींत मि. मॉंटेग्यू ह्यांना सर्वस्वीं पाठिंबा देण्याच्या हेतूनें व मिळतें तें पदरांत घ्यावें ह्या इराद्यानें लिबरल पक्षाची स्थापना होऊन नोव्हेंबर १९१८ मध्यें या नव्या पक्षाची पहिली परिषद मुंबई येथें भरली. तिचे स्वागताध्यक्ष सर दिनशा वाच्छा आणि अध्यक्ष मि. सुरेंद्रनाथ बानर्जी होते.

मी सप्टेंबर महिन्यांत प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या असिस्टंट सेक्रेटरीपणाचा राजीनामा दिला. आणि लागलींच असोसिएटेड

प्रेसमध्यें दाखल झालों. तेथील मुख्य अधिकारी मि. चतर्जी हे मला तिकडे येण्याबद्दल कांहीं दिवस आग्रह करीत होते. शेवटीं मीं तेथें जाण्याचें कबूल केलें. ऑक्टोबरच्या पहिल्या तारखेपासून तेथें जाऊं लागलों. प्रेसिडेन्सी असोसिएशनचा असिस्टंट सेक्रेटरी झाल्यामुळें वर्षदीडवर्षांत मुंबईतील आणि इतर प्रांतांतील राजकारणी लोकांशीं माझा जवळून संबंध आला. त्यांत विठ्ठलभाई पटेलासारखे कांहीं कायमचे मित्र मिळून गेले. त्यांतल्या त्यांत सर दिनशा वाच्छा यांच्याशीं माझी विशेष मैत्री जमली. सर चिमणलाल सेटलवाडहि मला वरचेवर उत्तेजन देऊं लागले.

लिबरल फेडरेशनचें पहिलें अधिवेशन मुंबई येथें एम्पायर थिएटरमध्यें मोठ्या थाटांत तीन दिवस झालें. तेथें मी प्रतिनिधि म्हणून होतोंच; पण असोसिएटेड प्रेसचा बातमीदार म्हणूनहि होतों. त्या वेळीं असोसिएटेड प्रेसचे जवळजवळ संस्थापक आणि नामांकित बातमीदार मि. के. सी. रॉय हे मुंबईला आले होते. त्यांच्या हाताखालीं मला काम करावयाचें होतें.

ही परिषद आटोपल्यानंतर कोठें जावयाचें नव्हतें. पण सुरतेला मुसलमान शिक्षण परिषद होती. ती डिसेंबरच्या २६ कीं २७ तारखेला सुरु होणार होती. असोसिएटेड प्रेसनें मला तिचा रिपोर्ट घेण्यासाठीं तिकडे पाठविण्याचें ठरविलें. या परिषदेचे अध्यक्ष सर इब्राहीम रहीमतुल्ला हे होते. प्रेसिडेन्सी असोसिएशनमध्यें असतांना त्यांची माझी चांगली ओळख झाली होती. सर इब्राहीम यांचें भाषण मला शक्यतर त्यांचेकडून स्टेशनवरच मिळवायचें होतें. पुढें सुरतेहून रोज संध्याकाळीं टाईम्सचा एक कॉलम भरेल एवढी तार मी पाठवायची असें मि. चतर्जी यांनीं सांगितलें होतें. ग्रँटरोड स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरच सर इब्राहीम ह्यांची गांठ पडली. मी त्यांना

सलामी दिली. तूं कोठें चाललास म्हणून त्यांनीं मला विचारलें. मीहि सुरतेला असोसिएटेड प्रेसचा बातमीदार म्हणून मुस्लीम शिक्षण परिषदेला चाललों आहें असें सांगितलें. शक्य तर आपल्या भाषणाची एक प्रत मला मिळावी म्हणूनहि विनंती केली. ते म्हणाले, "भाषणाच्या प्रती बहुधा गाडी निघण्यापूर्वीं माझ्या हातीं येतील. तेव्हां तुला एक प्रत मी देईन." मग ते म्हणाले, "तूं आमच्याच कॉन्फरन्सला येत आहेस तर माझ्याच जवळ बैस. म्हणजे तुला सर्व कांहीं दिसेल." असें सांगून लागलींच त्यांनीं माझें तिकिट माझ्याजवळून घेतलें आणि तें आपल्या कारकुनाजवळ देऊन स्टेशनमास्तरकडे परत करण्यास सांगितलें. ते मला म्हणाले, "हा फर्स्ट क्लास कंपार्टमेंट आहे. मीं तो संपूर्ण रिझर्व्ह केला आहे. त्याचीं सर्व तिकिटें मजजवळ आहेत. त्यांतील एक तुझ्यासाठीं. माझा एक मुलगा मजबरोबर आहे; आतां तूं दुसरा होशील. आणि तूं उतरहि माझ्याबरोबर." मीं म्हटलें, "उतरायला हरकत नाहीं; पण मी आहे शाकाहारी." सर इब्राहीम हंसून म्हणाले, "मी तुझ्या शाकाहाराची सर्व व्यवस्था करतों." सुरतेला उतरल्यावर त्यांचे चिरंजीव फाझल यांच्यासह मी त्यांच्याबरोबर नदीकांठीं शेखअल्ली पॅलेस मध्यें रहावयास गेलों.

तेथें गेल्यावर सर इब्राहीम यांनीं लागलींच प्रथम माझ्या शाकाहारीं जेवणाची व्यवस्था करावयास सांगून दोन मुसलमान वेटर माझ्या दिमतीस दिले. तासा दीडतासानें आम्ही जेवावयास बसलों. माझ्यासाठीं आणलेला स्वयंपाक उत्तम तऱ्हेनें तयार केला होता. सुरती पापडीची फक्कड भाजी त्यामध्यें होती. आणखी दोन तीन मुसलमान प्रतिनिधि शाकाहारी बनले. मला सर इब्राहीम यांच्या जवळच बसविलें होते. माझ्याजवळ मुंबईचे एक बॅरिस्टर आणि समोर पंजाब लखनौचे कांहीं प्रतिनिधी होते. ते सर्व मुसलमान आणि त्यांत मी एक

शाकाहारी ब्राह्मण हा देखावा विलक्षण होता यांत शंका नाहीं. एका गृहस्थानें मला विचारलें, "आमच्या बरोबर जाहीरपणें जेवणांत तुम्हीं धैर्य दाखविलें आहे. त्यांतल्या त्यांत शाकाहारी असूनसुद्धां आमच्याबरोबर खाण्याचें तुम्हांला भय वाटत नाहीं?" मीं म्हटलें, "आपण सर्व माणसें आहोंत. ज्याच्या त्याच्या संवयीप्रमाणें जो तो खाणार. पण माणसें म्हणून आपण एकत्र बसलेंच पाहिजे."

शेखअल्ली पॅलेसमध्यें दुसऱ्या दिवशीं सकाळीं कॉन्फरन्सला सुरुवात झाली. ती कॉन्फरन्स तीन दिवस चालली. मुंबईहून बरेच तरुण मुसलमान आले होते. त्यांत (सध्यां मुंबईचे चीफ् जस्टीस असलेले) मि. छगला हे होते. ते चांगले हुषार दिसले. त्यांचें वाचन तेव्हांहि चांगलें होतें. सर इब्राहीम यांचें वागणें सर्व कॉन्फरन्समध्यें मोठें उत्तम होतें. चार दिवस गर्दीत आणि आनंदांत गेले.

* * *

# ८

१९२१ च्या जानेवारीपासून हिंदुस्थानांत नव्या युगाची सुरुवात झाली. त्याला जवळ जवळ पूर्णावस्था १९४७ साल संपण्यापूर्वीं हिंदुस्थानला (त्याचे दोन तुकडे पडून) पूर्ण स्वातंत्र्य मिळून आली.

मुंबईच्या लिबरल पक्षांत अद्यापि बरीच सजीवता होती. ठिकठिकाणीं जाऊन खटपट करून लिबरल पक्षाच्या सभा काढाव्यात अशा कामावर माझी नेमणूक सर दिनशा वाच्छा यांच्या अनुमतीनें झाली. त्यासाठीं दरमहा शंभर रुपये पगार आणि जाण्यायेण्याचा सर्व खर्च मला द्यावा असें मुंबईच्या असोसिएशननें ठरविलें. याच सुमारास माझें 'न्यू रिव्ह्यू' हें मासिक मी बंद करावयाचें ठरविलें. मासिक तोट्यांत चाललें होतें. माझ्यासारख्या गरीब माणसाला तें यापुढें चालविणें शक्य नव्हतें. माझे दोन मित्र हानीमभाई आतारी व गुलाबचंद देवचंद यांनीं प्रत्येकीं मला हजार हजार रुपयांची मदत केली. मासिकाला वाचक पुष्कळ होते. पण वर्गणीदार कमी होते. जाहीरातींचें थोडेंबहुत उत्पन्न होतें. पण तें हातीं येण्यास वेळ लागूं लागला. तेव्हां शेवटीं तें मीं बंद करण्याचें ठरविलें. तसें केलें हेंच उत्तम झालें. त्या मासिकानें आपल्या थोड्याशा आयुष्यांत चांगलें नांव कमावलें होतें. त्यांतील उतारे कलकत्त्यापासून मद्रासपर्यंत निरनिराळ्या इंग्रजी वर्तमानपत्रांत येत असत. 'न्यू रिव्ह्यू' तीन साडेतीन वर्षें चालविल्यामुळें इंग्रजी लेखनांत माझी पुष्कळच गति झाली. मराठी लेखन तर निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून आणि

मासिकांतून चालू होतेंच. मी मोठा कडक लिहिणारा आहे असा लौकिक तेव्हां मीं मिळवला होता.

ठरल्याप्रमाणें मी लिबरल पक्षासाठीं दौऱ्यावर निघालों. आणि बेळगांव, धारवाड इकडे एक फेरी मारून आलों. या पर्यटनांत माझे मित्र दत्तोपंत आंबेकर मजबरोबर होते. बेळगांवला माझें एक व्याख्यान झालें. तेथील मारुतीच्या देवळांत तें व्याख्यान झालें. व्याख्यानाला गर्दी पुष्कळ होती. यावेळीं वक्ता म्हणून माझा चांगला लौकिक झाला होता. मला शिव्या देणारे लोकसुद्धां माझ्या बोलण्याची तारीफ करीत. बेळगांवची आमची सभा ठीक झाली. पुढें आम्ही धारवाडला गेलों. धारवाडला तेव्हांहि मराठी-कानडी हा वाद होता. धारवाडांत एका ठिकाणीं खूप गर्दीची सभा होऊन माझें व्याख्यान झालें. तें मराठींत झालें. पुढें अध्यक्ष बोलूं लागले तेव्हां त्यांनीं कानडींत बोलले पाहिजे असा गलका सुरू झाला. शेवटीं सभेंत आरडाओरड होऊन सभा बंद करावी लागली. पण बेळगांव, धारवाड या दोन्ही ठिकाणीं लिबरल असोसिएशन स्थापन झाल्या. माझें तेथील काम आटोपलें. परत येतांना मी सातारा येथें थांबलों. दत्तोपंत आंबेकर बरोबर होतेच. तेथें रावबहादुर काळे यांच्याकडे उतरलों. रावबहादुरांनीं गावांतील प्रतिष्ठित लोकांची एक सभा भरवून आपल्या निवासस्थानींच लिबरल असोसिएशनची स्थापना केली. नंतर आम्ही नगरला गेलों. तेथें कांहीं असोसिएशन निघूं शकली नाहीं. पुण्याला या कामासाठीं जाण्याची जरुरी नव्हती. कारण तेथें डेक्कन सभा हीच लिबरल असोसिएशन होती. याप्रमाणें महाराष्ट्रांत तीनचार असोसिएशन झाल्या. शिवाय नासिक आणि धुळें येथें लिबरल असोसिएशन निघाल्या होत्या. नासिकला रामभाऊ प्रधान यांचें आम्हांला साहाय्य होतें. धुळें येथें अप्पासाहेब आपटे

आणि भय्यासाहेब गरुड ह्यांचें साहाय्य आम्हाला मिळे. या सर्व ठिकाणीं मी जाऊन आलों. तेथें लिबरल असोसिएशन निघण्यास थोडाबहुत मीहि कारणीभूत झालों होतों.

लहानपणापासून भाषणें करण्याकडे माझा कल असून इंग्रजी पहिलींत कीं दुसरींत माझ्या वक्तृत्वाला सुरुवात झाली होती. गेल्या दोन वर्षांत वक्तृत्वशक्तीबद्दल माझी पुष्कळ प्रसिद्धि झाली. लिबरल पक्ष १९१८ च्या नोव्हेंबरमध्यें स्थापना झाल्यावर मी त्याची सेवा जशी इतर पुष्कळ प्रकारें केली तशीच माझ्या वक्तृत्वाच्याहि बळावर केलेली आहे. १९२० व १९२१ या दोन सालीं राजकीय विषयांवर जहालपणें बोलणारा नेमस्त वक्ता म्हणून मी पुष्कळ प्रसिद्धीला आलों. त्याचा परिणाम मला वऱ्हाडमधून व्याख्यानें देण्याबद्दल व लिबरल पक्षासंबंधीं लोकांना सांगण्याबद्दल आमंत्रण आलें. हें आमंत्रण यवतमाळहून रावबहादुर मुंडले यांच्याकडून आलें होतें. त्यांनीं यवतमाळ जिल्ह्यांत चारपांच ठिकाणीं तरी मला बोलावें लागेल आणि श्रोते कसले असतील हें सांगतां येत नाहीं असें कळविलें होतें. मुंबई येथें बरीच चर्चा होऊन मीं हें आमंत्रण स्वीकारावें असें मत पडलें. त्याप्रमाणें डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीला (१९२१) मी यवतमाळला जाण्यास निघालों. यावेळीं मी एकटाच निघालों होतों. दत्तोपंत आंबेकर बरोबर नव्हते. एके दिवशीं दुपारच्या नागपूर मेलनें मी निघालों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं धामणगांव या स्टेशनवर उतरलों. धामणगांवाहून यवतमाळ मला वाटतें अठ्ठावीस तीस मैल कांहींतरी आहे. सकाळीं दहा वाजतां किंवा त्या सुमारास यवतमाळ येथें मी मोटारबसनें पोहोचलों. मुक्कामाला रावसाहेब लांडगे यांच्या बंगल्यावर गेलों. समोरच रावबहादुर मुंडल्यांचा बंगला होता. लांडगे यांच्या बंगल्यांत रा. भालचंद्र हे त्यांचे नातेवाईक राहात

असत. भालचंद्र पुण्यांत फर्ग्युसन कॉलेजांत मी होतों तेव्हां होते. लांडगे आणि मुंडले हे रात्रीं इंग्रजी खाना मुंडल्यांच्या बंगल्यांत घेत आणि दुपारीं भालचंद्राकडे शाकाहार घेत असत. मी सर्वकालीन शाकाहारी. तेव्हां माझा मुक्काम लांडगे यांच्या बंगल्यांत भालचंद्रांकडे झाला.

यावर्षीं डिसेंबर महिन्याच्या २६ कीं २७ तारखेला आमची राष्ट्रीय लिबरल ( चवथी ) कॉन्फरन्स अलाहाबाद येथें होणार होती. अध्यक्षस्थानीं दिवाणबहादुर गोविंदराव आझर होते. ते यवतमाळहून रावबहादुर मुंडले यांच्याबरोबर जायचे होते. म्हणून अलाहाबादला निघेपर्यंत माझा मुक्काम यवतमाळला पंधरा दिवस व्हावयाचा होता. त्यावेळीं माझी शरीरप्रकृति उत्तम होती. शिवाय भालचंद्रांकडे व्यवस्था फार चांगली होती. पुढे मुंडले आणि लांडगे यांच्याबरोबर त्यांच्या मोटारीनें किंवा टांग्यानें आमची स्वारी जिल्ह्याच्या अंतर्भागांत निघाली. एका ठिकाणीं आम्ही गेलों. ते दुसरे दिवशीं आम्ही परत निघायच्या वेळीं आमची गाडी पळून गेलेली. मोठ्या कष्टानें दुसरी गाडी कशीतरी पैदा करून यवतमाळला संध्याकाळीं येऊन पोहोंचलों. सकाळीं दहा वाजतां पोंचावयाचें होतें. कारण बारा वाजतां भाऊसाहेब मुंडल्यांना कोर्टांत केस होती. मॅजिस्ट्रेटना मुंडल्यांनीं सकाळींच तार केली म्हणून ठीक झालें. एक दिवस आम्ही लांडगे यांच्या गांवीं गेलों. तेथें बाजार होता. बाजारांत मी व्याख्यान द्यायला सुरुवात केली. त्यावेळीं एका शाळेंतील आठ दहावर्षांची लहान मुलें येऊन सारखी गोंगाट करूं लागलीं. मीं त्यांना म्हटलें कीं तुम्ही मुलें आहांत; तुम्हांला येथें आरडाओरड करण्यास कोणी सांगितलें? एक मुलगा म्हणाला, “ आमच्या गुरुजींनीं आम्हांला तसें करण्यास सांगितलें आहे. ” मग मीं त्यांना म्हटलें, “ तुम्ही

आपल्या गुरुजींनाच बोलावून आणा. " इतक्यांत खेड्यापाड्याहून बाजारला आलेले चारपांचशें लोक तेथें जमले. त्यांनीं मला व्याख्यान देण्याची विनंती केली. त्यांच्यापुढें मी तासभर भाषण केलें. याप्रमाणें हा यवतमाळ जिल्ह्यांतील दौरा झाला.

मी लांडगे यांच्या बंगल्यांत भालचंद्रांकडे राहिलों होतों. दुपारचें जेवण झाल्यावर मी आणि अण्णासाहेब लांडगे अनेक वेळां गप्पा मारीत बसत असूं. त्यावेळीं खूपशीं संत्रींहि खात असूं. हिंवाळ्यांतील संत्रीं फारशी गोड नसतात आणि मला आंबट संत्रीं चालत नसत. तरी पण तीन चार वेळां अण्णासाहेबांनीं आणलेलीं संत्रीं चांगलीं निघालीं. डिसेंबरची एकवीस कीं बावीस तारीख आली. आम्ही पुढें अलाहाबादला कॉन्फरन्ससाठीं जाणार होतों. मी दोन दिवस अगोदर नागपूरला जाऊन राहिलों आणि मग २३ तारखेला नागपूर मेलमध्यें मुंडले वगैरे मंडळी होती त्यांच्याबरोबर बसलों. मुंडल्यांच्या बरोबर भालचंद्र आणि देशपांडे हे होते. देशपांडे हे यवतमाळ येथील एक व्यापारी होते आणि ते लिबरल असोसिएशनचे सभासद होते.

अलाहाबादेंत आम्ही सर्वजण एका हॉटेलांत उतरलों. त्या दिवशीं आम्ही कांहींजण संगमावर जाऊन स्नान करून आलों. दुसऱ्या दिवसापासून कॉन्फरन्स सुरू व्हावयाची होती. कॉन्फरन्स चांगली झाली. गर्दी बरीच होती. लिबरल पार्टी सध्यां राज्यकारभारांत होती त्याचाहि तो परिणाम असण्याचा संभव होता. या अलाहाबादच्या परिषदेच्या निमित्तानें माझी आणि ' लीडर ' चे संपादक कृष्णाराम मेहता यांची चांगली ओळख झाली. त्यावेळीं कृष्णाराम हे मला अतिशय अबोलके गृहस्थ वाटले. पुढें क्रमाक्रमानें माझा त्यांचा चांगला स्नेह जमला आणि जेव्हां जेव्हां मी अलाहाबादेस गेलों तेव्हां पुष्कळ वेळां त्यांच्याकडे राहिलों आहे. पण १९२१ च्या अखेरीला

मला ते फार अबोलके वाटले. या माणसाची आणि आपली एवढी मोठी मैत्री पुढें होईल याची मला तेव्हां कल्पनासुद्धां आली नाहीं. त्यांचा लीडर छापखानाहि मीं पाहिला. चिंतामणींशीं झालेली ओळखहि येथें दृढतर झाली. माझी आणि त्यांची ओळख १९१८ पासून चांगली झाली होती. चिंतामणि यावेळीं संयुक्तप्रांतांत मिनिस्टर होते. मिनिस्टर या नात्यानें त्यांनीं मोठा लौकिक मिळविला ही गोष्ट निर्विवाद.

मुंबईला परत आल्यावर मी कांहीं दिवस लिबरल असोसिएशनचें काम करीत होतों. सर दिनशा वाच्छा यांना माझें काम पूर्ण पसंत पडलें होतें. १९२१ सालीं माझे एक मित्र असोसिएशनसाठीं लहान लहान पत्रकें लिहीत असत. त्याच्या हजारों प्रती काढून त्या आम्ही मुंबईत आणि बाहेरगांवीं पाठवीत असूं. या पत्रकांचा मी प्रसिद्धिकर्ता झालों होतों. लिहिणाऱ्या गृहस्थांना आम्ही दरमहा तीनशें रुपये देत होतों. पण तो आपलें नांव प्रसिद्ध करूं नका म्हणून सांगे. असा करार करूनच तो लिहित असे. त्या पत्रकांत नेमस्त पक्षाची तारीफ आणि जहाल म्हणजे कॉंग्रेस पक्षावर टीका असे. पत्रकें लिहिण्याला आपली दरमहाची प्राप्ति तेवढी कमवायची होती. मला कांहीं वेडीवाकडीं पत्रें या पत्रकांबद्दल आलीं. मीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. मीं जरी पत्रकें लिहिलीं नव्हतीं तरी पत्रकांतील मजकूर मला अमान्य नव्हता. तेव्हां त्याबद्दल मी प्रकाशक म्हणून मला कोणी दोष दिला तर तो घेण्याला त्यावेळीं माझी तयारी होती. यावेळीं गुलाबचंद देवचंद यांचा माझा उत्तम स्नेह जमला होता. त्यांना हा गृहस्थ माहित होता. त्यांनींहि मी जें केलें त्याला मान्यता दिली होती. पुढें पत्रकें छापणेंहि बंद पडलें. १९२१ सालीं मी धुळें, नासिक, पुणें, सोलापूर, विजापूर, धारवाड, बेळगांव वगैरे ठिकाणीं जाऊन आलो.

आलों. आतां मला व्याख्यानासाठींहि निरनिराळ्या ठिकाणाहून आमंत्रणें येत.

१९२२ मध्यें कांहींतरी नवें काम मिळावें अशा मनःस्थितींत मी होतों. एके दिवशीं मला रा. गुप्ते ॲडव्होकेट प्रेसिडन्सी असोसिएशनमध्यें भेटले. गुप्ते यांच्याशीं माझा चांगला परिचय होता. ते नानासाहेब समर्थांचे जांवई. माझ्याबद्दल त्यांचें मत फार चांगलें होतें. एक दिवस मीं त्यांना सहज बोलून गेलों कीं मला एखादी चांगलीशी नोकरी हवी. ते म्हणाले "तुला जमेल अशी एक नोकरी मला माहीत आहे. तेथे जमलें तर ठीक होईल." मग ते स्वतः मला घेऊन 'इंडियन टेक्स्टाईल जर्नलच्या' ऑफिसांत गेले. तेथें त्यांनीं माझी आणि मासिकाचे संपादक मि. रत्नाकर यांची ओळख करून दिली. मी अर्थशास्त्र घेऊन एम्. ए. झालों. होतों. तेव्हां 'टेक्स्टाईल जर्नल' चें काम माझ्याकडून ठीक होईल असें गुप्ते यांनीं सांगितलें. शिवाय सर दिनशा वाच्छा यांचें माझ्यावर चांगलें लक्ष आहे. हें ऐकून तर मि. रत्नाकर यांनीं मला त्याच क्षणीं नोकरी देण्याचें कबूल केलें. दुसऱ्या दिवसापासून मी तेथें कामावर रुजू झालों. मला निम्में म्हणजे चारतास काम करावयाचें होतें तसें मिळालें. आणि पगार रुपये दरमहा दीडशें ठरला. यापुढें मी टेक्स्टाईल जर्नल ऑफिसांत रोज चारपांच तास जाऊं लागलों. माझ्या कामावर मि. रत्नाकर खूष होते. हें काम मिळाल्यामुळें मला फार बरें वाटलें. लिबरल असोसिएशनमध्यें काम फारसें करावें लागत नव्हतें. पण करावें लागल्यास मि. रत्नाकर यांनीं कधींहि हरकत घेतली नाहीं. मी सर दिनशा वाच्छा यांना ही सर्व हकीगत जाऊन सांगितली. त्यांनाहि ती सर्व व्यवस्था मान्य झाली. याप्रमाणें ज्ञानप्रकाशचा १९१३-१४ सालीं उपसंपादक, इंदुप्रकाशचा १९१५-१६ सालीं संपादक, पुढें

'न्यू रिव्ह्यू'चा १९१७ ते १९२० पर्यंत संपादक आणि आतां चौथ्या खेपेला ' इंडियन टेक्स्टाईल जर्नल ' चा उपसंपादक अशा प्रकारची माझी वर्तमानपत्री संपादकत्वाची कहाणी झाली.

'इंडियन टेक्स्टाईल जर्नल' मासिकांत बराच मजकूर गिरणीच्या धंद्यासंबंधीं असे. तो मजकूर मि. रत्नाकर निवडून देत. त्या विषयावर आलेले लेखहि तेच पसंत–नापसंत करीत. त्यांच्याकडे वरचेवर लिहिणारे असे गिरणी कारखान्यांतील चार पांच लेखक होते. शिवाय लंडनमधून त्यांना एक दोन लेख येत. त्यांच्या मासिकाला जाहिराती सपाटून होत्या. त्या बहुतेक युरोपियन कंपन्यांच्या होत्या. मी यावेळीं कापसाची आयात व निर्यात वगैरे विषयासंबंधीं अर्थशास्त्रदृष्ट्या लिहूं लागलों होतों. माझे बरेच लेख यावेळीं टेक्टाईल जर्नलमध्यें प्रसिद्ध झाले. त्यावरून त्यांना कांहींतरी अर्थ होता हें उघड झालें. हळूंहळूं मला त्या धंद्याची चांगली माहिती झाली. त्या धंद्याबद्दलच्या बातम्याहि मी रोजच्या वर्तमापत्रांतून अचूक हुडकून काढूं लागलों. ऑफिसमध्यें जरी मी चार तास बसायचें असें ठरलें होतें तरी पुष्कळ वेळां मी तास दोन तास अधिकहि बसत असें. एक दिवस मी कलकत्त्याचें ' कॅपिटल ' हें वर्तमानपत्र वाचीत होतों. त्यावेळीं त्यांत मुंबईसंबंधीं एक संपूर्ण पत्रात्मक लेख असे. नुकतेंच हिंदुस्थान सरकारनें एक आर्थिक कमिशन तीन वर्षांची मुदत देऊन नेमलें होतें. त्याचे अध्यक्ष सर इब्राहीम रहिमतुल्ला हे होते. या कमिशनवर मी एक लेख लिहून ' कॅपिटल ' कडे पाठविला. आणि मला आश्चर्य वाटतें तें हें कीं तो त्यांत छापून प्रसिद्ध झाला. याच वेळीं मी कांहीं लेख लिहून मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया'कडे पाठविले. त्यांत ते प्रसिद्धहि झाले. पुढील चारपांच वर्षें मी 'कॅपिटल' आणि

'टाइम्स ऑफ इंडिया' या पत्रासाठीं लिहीत होतों. त्यामुळें माझी प्राप्ति दरमहा सुमारें शंभर रुपये तरी होती. कधीं कधीं अधिकहि होत असे. पुढच्याच वर्षीं माझ्यावर मोठें संकट कोसळणार होतें. त्या संकटाशीं तोंड देतांना या वाढत्या प्राप्तीचा मला चांगला उपयोग झाला. ही प्राप्ति नसती तर माझें काय झालें असतें तें सांगवत नाहीं.

१९२२ सालीं मी व आंबेकर एकदां धुळ्याला जाऊन आलों. धुळें येथें आमचे मित्र रा. माधवराव आपटे वकील होते. पण या खेपेला आम्ही त्यांच्याच सांगण्यावरून रा. भय्यासाहेब गरूड यांच्याकडे उतरलों. भय्यासाहेब हे खाण्यापिण्यांत आधुनिक थाटाचे व जुन्या सरदारी वळणाचे गृहस्थ होते. आम्ही त्यांच्या घरीं सकाळीं सात वाजतां पोहोंचलों. त्यांना आम्ही अगोदर पत्र पाठविलें होतें. त्यामुळें आम्ही येणार हें त्यांना माहित होतें. त्यांच्या कारकुनानें आम्हांला माडीवर नेऊन आमची उतरण्याची खोली दाखविली. चहा आणून दिला. भय्यासाहेबांना निजून उठण्यास उशीर लागेल असें समजल्यावरून मी व दत्तोपंत आंबेकर यांनीं स्नान वगैरे आटोपलें. नंतर आम्ही माधवराव आपट्यांकडे जाऊन येतों म्हणून सांगितलें. माधवराव म्हणाले कीं भय्यासाहेब सकाळीं उशीरा उठतात. त्यांत आज कचेरीला सुट्टी आहे. तुम्हांला उद्याचा दिवस राहावें लागेल. आम्ही त्याप्रमाणें राहिलों. दुसऱ्या दिवशीं भय्यासाहेबांनीं एक सभा बोलाविली. माधवराव आपटे, बाबूराव रणसिंग वगैरे मंडळी आली होती. सभेंत एक दोन भाषणें झालीं. लिबरल असोसिएशन स्थापन करण्यांत आली. याप्रमाणें धुळ्याचा कार्यक्रम यशस्वी झाला आणि आम्ही संध्याकाळच्या गाडीनें निघालों.

मला एक दोन दिवसांची सवड होती. दत्तोपंतांनाहि वेळ होता. आम्ही गाडीनें धुळ्याहून चाळीसगांवला पोंहोचलों. तेथें आम्हीं

दिल्लीकडे चाललेली पंजाबमेल गांठली. तिच्यांतून दुसरे दिवशीं पहाटे खांडव्याला उतरलों. तेथून इंदूरकडे जाणाऱ्या गाडींत जाऊन बसलों. ओंकारनाथ म्हणून नर्मदेच्या तीरावर ज्योतिर्लिंग आहे तें पाहण्यासाठीं ओंकारेश्वररोड स्टेशनवर उतरलों. त्यावेळीं नुकतेंच उजाडायला लागलें होतें. तेथें एका बसमध्यें बसून ओंकारनाथकडे गेलों. तेथें जवळ जवळ सर्व दिवस घालविला. काशीचा विश्वनाथ, रामेश्वरचा रामनाथ तसाच हा ओंकारनाथ. हें आमचें तिसरें ज्योतिर्लिंग आम्हीं पाहिलें. नर्मदेच्या उत्तरतीरावर हें ज्योतिर्लिंग आहे. आम्ही उतरलों होतों रेल्वेच्या बाजूनें दक्षिण तीरावर. नदीचा प्रवाह मोठा आहे. पाणी सपाटून आहे. आम्ही स्नान वगैरे आटोपून ओंकारनाथाच्या दर्शनाला गेलों. ओंकारनाथाचें दर्शन घेऊन नदीकांठानें दोनतीन मैल फिरलों. ओंकारनाथाचा देखावा फार रमणीय आहे. ओंकारनाथाचें दर्शन घेऊन आमच्या अंतःकरणाला प्रसन्नता लाभली होती. त्या आनंदांत आम्ही खांडव्याला परत आलों. रात्रींच्या गाडीची वाट पहात तेथें बसलों. रात्रीची गाडी पकडून दुसऱ्या दिवशीं सकाळीं मुंबईला आलों आणि पुन्हा आपल्या कामकाजाला लागलों.

यंदा म्हणजे १९२२ सालीं डिसेंबरांत आमची लिबरल कॉन्फरन्स नागपूर येथें व्हावयाची होती. तेथें नेक नामदार श्रीनिवास शास्त्री अध्यक्षपद स्वीकारणार असें नोव्हेंबरांत ठरलें. या कॉन्फरन्सला मीहि जाणार होतों. नागपूर म्हणजे जहाल मंडळींचा किल्ला. तरीपण त्याच ठिकाणीं आमची कॉन्फरन्स होणार होती. डिसेंबरपर्यंत मुंबईत मी नेहमीचें काम करीत होतों. डिसेंबरच्या एकवीस कीं बावीस तारखेस मी नागपूरला गेलों. मुक्काम अर्थात् माझे मावस बंधु रामभाऊ रुईकर यांच्याकडे होता. सहासात दिवस नागपूरला राहिलों. तेथेंहि बऱ्याच नव्या ओळखी झाल्या.

नागपूरमध्यें माझें एक जाहीर व्याख्यान झालें. त्यावेळीं मध्यप्रांताचे होममेंबर सर मोरोपंत जोशी अध्यक्षस्थानीं होते. व्याख्यानाला तरुण मंडळींचा भरणा खूप होता. तरुण पिढीनें सर्व विषयांचा अभ्यास करावा, राजकारणाचाहि अभ्यास करावा; पण केवळ लोक शाब्बास शाब्बास म्हणतात म्हणून राजकारणांत भाग घेऊं नये असें मीं सांगितलें. त्यावेळीं ज्यांनीं त्यांनीं तरुण विद्यार्थ्यांना भरीस घालावयाचें आणि आपण नामानिराळे रहावयाचें ही प्रवृत्ति फार होती. तिला उद्देशून माझे हे उद्‌गार होते. मॅजिस्ट्रेटसुद्धां तरुण माणसाला जबर शिक्षा ठोठावीत. आमच्या वामन मल्हार जोशांना अशी शिक्षा झालेली मला माहीत होती. म्हणून मी जें बोललों तें अगदीं मनापासून बोललों. सर मोरोपंत जोशी अध्यक्ष होते आणि होममेंबर होते. म्हणजे सर्व मॅजिस्ट्रेटांचे कर्ते करविते होते. त्यांच्या देखत मी हें अगदीं स्पष्टपणें बोललों. भाषण संपवून घरीं आल्यावर माझे नवे मित्र धुंडिराजपंत ठेंगडी मला म्हणाले, " तुम्ही नांवाचे मवाळ आहांत. तुमचें भाषण कोणत्याहि जहालाच्या तोंडीं शोभलें असतें. " मी म्हणालों, " तरुणांवर जबाबदारी टाकून आपण नामानिराळे व्हायचें ही वृत्ति मला मान्य नाहीं. हें तुमच्या जहालांना कबूल आहे का विचारा. " माझ्या ह्या भाषणानें त्यावेळीं नागपुरांत बरीच खळबळ उडाली. नागपूरच्या मॉरिस कॉलेजांतहि माझें एक इंग्रजींत भाषण झालें. कॉलेजचे युरोपियन प्रिन्सिपॉल अध्यक्षस्थानीं होते. त्या व्याख्यानांत मी तरुणांना वर सांगितलेलाच उपदेश केला. मी माझ्या भाषणांत सरकारची तरफदारी न करतां तरुणांचीं कर्तव्यें काय तें त्यांना सांगत असे. पुढे एक दोन दिवसांनीं नागपूर येथील पारशी गिरणीवाल्यांनीं आमच्या सर्व प्रतिनिधींना एक मोठी पार्टी दिली. तेथें मी गेलों होतों. त्यावेळीं मला मॉरिस कॉलेजचे प्रिन्सिपॉलहि भेटले.

त्यांनीं माझ्या स्पष्ट उद्गारांबद्दल माझी प्रशंसा केली. नागपुरांत माझीं व्याख्यानें श्रोतृवर्ग उत्साहानें ऐकून घेत असे.

नागपूर येथें आमची कॉन्फरन्स तीन दिवस जोरांत झाली. नेक नामदार शास्त्री यांचें भाषण सुंदर झालें. कॉन्फरन्समध्यें रोज एखादी सायंकालीन पार्टी कोणीतरी देत असे. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आम्ही या पार्टींत चहापान करीत असतां शहरांतील कॉंग्रेसचे कांहीं सभासद आमच्या प्रतिनिधींना भेटावयास आले. डॉ. खरे तेव्हां त्यांच्या अग्रभागीं होते. या कॉंग्रेसवाल्यांशीं आमचें कांहीं वेळ अगदीं चांगलेपणाचें बोलणें झालें. यावेळीं नागपूर येथें एक मिनिस्टर राव-बहादुर नारायणराव केळकर हे होते. त्यांनीं आमच्या सर्व प्रतिनिधींना कॉन्फरन्स संपल्यावर दुसऱ्या दिवशीं थाटाची मेजवानी दिली. त्या दिवशीं दुपारीं दीड कीं अडीच वाजतांच्या गाडीनें पाहुणे मंडळी नागपूर मेलनें मुंबईस जावयास निघणार होती. मेजवानी आटोपल्यावर आम्ही सर्व मंडळी स्टेशनवर आलों. तेथें गाडी तीन तास उशीरा येणार असें कळलें. सर गंगाधरराव चिटणवीस हे नामदार शास्त्री यांना पोंहोचविण्यासाठीं मुद्दाम स्टेशनवर आले होते. गाडीला इतका उशीर होता तरी आम्ही सर्व बिनगाडीवाले तेथेंच बसलों. पण कांहीं मंडळी आपल्या मोटारींतून जावयास निघाली. शास्त्री तेथेंच बसले होते. सर गंगाधररावांना कोणीतरी विचारलें, “ आपण घरीं जाणार नाहीं का ? ” ते म्हणाले, “ अहो, पेट्रोल सध्यां फार महाग आहे. तेव्हां तें उगीच खर्च करण्याऐवजीं गाडी येईपर्यंत मी येथेंच बसणार. ” मग ते म्हणाले, “ आणि मि. शास्त्री येथेच आहेत. तेव्हां येथेंच बसणें बरें. ” मी स्वतः आणखी दोन दिवस राहून मग मुंबईस परतणार होतों. संध्याकाळीं सहाच्या सुमारास गाडी आली. त्यांतून मुंबईला जाणारी सर्व मंडळी रवाना झाली. पुढील वर्षाचें

अधिवेशन आम्ही मुंबई येथेंच बोलाविलें होतें. तेव्हां पुढल्या वर्षी कोठें दूर जाण्याचा प्रश्न नव्हता. आतापर्यंत मुंबई, कलकत्ता, मद्रास, अलाहाबाद आणि नागपूर असा आमचा फेरा झाला होता. आतां परत मुंबईला जाणें हें ठीक होतें. अशा प्रकारें नागपूरला सुमारें एक आठवडा राहून मग मी मुंबईला परतलों.

चालू सालींच आम्ही हवा पालटण्यासाठीं म्हणून साताऱ्यास जाऊन राहिलों होतों. साताऱ्यास विशेष ओळखीचे म्हणजे राव-बहादुर रावजी काळे हे होते. काळे हे लेजिस्लेटीव्ह कौन्सिलचे निवडून आलेले सभासद होते. त्यांच्या साहाय्यानें तेथें एक लिबरल असोसिएशन आंबेकर आणि मी जाऊन काढली होती हें वर आलेंच आहे. त्यांच्या सल्ल्यानें सातारा येथें माचीवर एका बंगल्याचा वरचा मजला मीं रहावयास मुक्रर केला. आणि तेथें रहावयास गेलों. मी शनिवार-रविवार साताऱ्याला येत असे. बाकीच्या दिवसांत 'इंडियन टेक्स्टाईल जर्नल'च्या कामासाठीं मला मुंबईला राहावें लागत असे. सध्यांच्या मानानें त्यावेळीं स्वस्ताई पुष्कळ होती. म्हणून माझ्या लहान प्राप्तींत ही साताऱ्याची राहणी ठीकपणें पार पडली. माझ्या पत्नीची तब्बेत बिघडली होती म्हणून डॉक्टरांच्या सांगण्यावरून हा हवापालट केलेला होता. माझी पत्नी साताऱ्याला असतानांच मी वर लिहिल्या प्रमाणें नागपूर येथें जाऊन आलों होतों. साताऱ्यांत आमच्या शेजारींच माचीवर मुंबईचे बुद्धधर्मानुयायी वकील केशव अप्पा पाध्ये हे राहावयास आले. त्यांची माझी ओळख झाली. ती पुढें त्यांच्या मृत्यूपर्यंत कायम होती. पुढें मीं विल्सन कॉलेजांत मराठीचा प्राध्यापक म्हणून गेल्यावर त्यांचा मुलगा आणि जांवई माझे विद्यार्थी होते. सातारा येथें असतांना मी आणि केशवराव पाध्ये कित्येक वेळा हिंडावयास मिळून गेलों आहोत. साताऱ्याला माझ्या पत्नीची प्रकृति पुष्कळ सुधारली यांत शंका नाहीं.

मुंबईंत गुलाबचंद शेटकडे माझें जाणेंयेणें वरचेवर होऊं लागलें. त्यांचा माझा स्नेह वृद्धिंगत होत गेला. पुष्कळ वेळां जेवावयासहि मी त्यांच्याकडेच असे. त्यांनीं आणि मी एकत्र प्रवास एकदाच म्हणजे १९२५ सालीं महाबळेश्वरपर्यंत केला. त्याशिवाय त्यांचा माझा एकत्र प्रवासाचा योग आलेला आठवत नाहीं. एकदां मी त्यांच्याबरोबर विजापूरला जाणार होतों. तो ऑक्टोबर महिना होता. आमचीं दोघांचींहि विजापूरचीं तिकिटें काढून रिझर्व्ह केलेलीं होतीं. पण आयत्या वेळीं त्यांच्या व्यापारधंद्याचें कांहीं जरूरीचें काम निघाल्यानें आमचा तो प्रवास रद्द झाला.

१९२३ साल सुरूं झालें. मी सर्व प्रकारें सुखी होतों. पत्नीचीहि प्रकृति आतां पुष्कळ सुधारली होती. निदान आम्हांला तसें वाटत होतें. दिवसामागून दिवस चालले होते. या वर्षी लिबरल फेडरेशन मुंबई येथेंच व्हावयाचे होतें. तेव्हां दूर कोठें जावें लागेल हाहि प्रश्न नव्हता. माझी आतां सर्वत्र चांगला व्याख्याता म्हणून प्रसिद्धि झाली होती. १९२३ सालींहि मधून मधून लिबरल पार्टीसाठीं मी प्रवास करीत असें. निरनिराळ्या ठिकाणीं व्याख्यानें देत असें. कोल्हापुरांत माझें जाणें बहुधा दरसाल होत असें. तेथें गेलों म्हणजे तेथेंहि एखादें व्याख्यान होत असें. कोल्हापूर संस्थानांत आमच्या दोन बागायती जमिनी होत्या. एक वडिलांनीं खरेदी केलेलीं जुनी आणि आम्ही गहाण घेतलेली नवी. ही गहाण घेतलेली जमीन पैसे परत घेतल्यावर गेली. तेव्हां कोडोली येथें असलेली व आमच्या वडिलांनीं विकत घेतलेली जमीन तेवढी आमच्याकडे होती. या कोडोली येथील जमिनीला मी दरवर्षी एकदा तरी जाऊन येत असें. ही जमीन सुमारें सात एकर असून तिचें वर्षाचें तीनशें साडेतीनशें रुपये उत्पन्न येई. तिच्या निमित्तानें माझी जवळजवळ दरवर्षी कोल्हापूरला एक फेरी

होई. बेळगांव-धारवाडला कोठें जावयाचें असेल तर त्यांत कोल्हापूरहि वाटेंतच येत असे. कोल्हापुरांत माझा मुक्काम माझे अगदीं बाळपणापासूनचे मित्र विष्णुअण्णा गोखले यांच्याकडे असे. तेथें तीनचार दिवस राहून मी सर्व आप्तेष्टांना भेटत असें. यावर्षींहि मी बेळगांव, धारवाड, कोल्हापूर येथें जाऊन आलों. धारवाडला गेलों असतांना बंगलोर जवळ म्हणून तेथेंहि जाऊन आलों. त्यावेळीं टाटा इन्स्टिटयूट प्रथम पाहिली.

डिसेंबर महिन्यांत आमची लिबरल कॉन्फरन्स मुंबईस झाली. सर तेजबहादुर सप्रू अध्यक्षस्थानीं होते. कॉन्फरन्स उत्तम झाली. ह्यावेळची विशेष गोष्ट म्हणजे मि. चिंतामणि हे आपल्या प्रधान पदवीचा राजीनामा देऊन बाहेर पडले होते. अर्थात् ते कॉन्फरन्सला आले होते. त्यांनीं व्याख्यानांचा एक दौरा काढला. या दौऱ्यांत मी त्यांच्याबरोबर होतों. त्या दौऱ्याची हकीगत पुढील भागांत येईल.

* * *

९

सी. वाय्. चिंतामणि हे एक मोठें प्रस्थ होतें. १९२३ च्या मे कीं जून महिन्यांत त्यांनीं आपल्या मिनिस्टरशिपचा—प्रधानपदाचा राजिनामा दिला. संयुक्त प्रांतांत त्यांची कारकीर्द मिनिस्टर म्हणून चांगलीच गाजली. ते मुंबईच्या काँग्रेसला १९१५ सालीं आले तेव्हां मी त्यांना पाहिलें होतें. १९१६ सालीं लखनौ काँग्रेसमध्येंहि मीं त्यांना पाहिलें होतें. तेव्हां ओळख झाली नव्हती पण १९१७ सालीं कलकत्ता येथें काँग्रेस झाली तेव्हां मात्र त्यांची माझी ओळख झाली. माझ्या ‘ न्यू रिव्ह्यू ’ या मासिकाचे सहा अंक तेव्हां प्रसिद्ध झाले होते. त्यांतील कांहीं लेखांचे उतारे चिंतामणींच्या ‘ लीडर ’ मध्यें प्रसिद्ध झाले होते, हें मला माहित होतें. कलकत्ता येथें १९१७ च्या नाताळांत चिंतामणींची आणि माझी ओळख झाली. ती हळूंहळूं वाढत जाऊन तिला पुढें पूर्ण मैत्रीचें स्वरूप आलें. चिंतामणि जसे मोठे आनंदी होते तसे मोठे रागीटहि होते. त्यांच्या रागीटपणाचा थोडासा अनुभव मला या खेपेस यावयाचा होता. पण त्यांचा रागीटपणा हा दुसऱ्याच्या प्रमादामुळें उत्पन्न होत असे. आणि तो लागलीच नाहींसा होत असे. आपल्या मिनिस्टरच्या जागेचा राजीनामा देऊन ते बाहेर पडले आणि त्यानंतर सर दिनशा वाच्छा यांच्या आमंत्रणावरून ते मुंबईला आले. मुंबईला आल्यावर ते पुणें आणि सोलापूर येथें जाऊन आले. मला त्यांच्याबरोबर तिकडे जातां आलें नाहीं. पण नाशिक आणि धुळें येथें मीं त्यांच्याबरोबर जावें असा सर दिनशा यांनीं फार आग्रह केला. म्हणून मी ‘टेक्स्टाईल जर्नल’-कडून चार दिवसांची रजा घेऊन तिकडे जाण्याचें ठरविलें. दत्तोपंत

आंबेकर आणि मी अगोदरच्या गाडीनें नाशिकला गेलों. नंतर प्रिन्सिपॉल त्र्यंबक अप्पाजी कुलकर्णी यांच्याकडे गेलों. दुपारच्या गाडीनें चिंतामणि आणि मुंबईचे रा. दत्तोपंत दळवी वकील हे आले. त्यांचा मुक्काम सरदार विंचूरकर यांच्या बंगल्यावर होण्याचें ठरलें आहे असें आम्हाला नाशिकला गेल्यावर कळलें.

प्रिन्सिपॉल त्र्यंबक अप्पाजी कुलकर्णी, दत्तोपंत आंबेकर आणि मी असे तिघेहि जेवण करून सरदार विंचूरकरांच्या बंगल्यावर गेलों. तेथें आम्हांला वातावरण जरा संतप्त दिसलें. दुपारीं चार वाजतां प्रथम नाशिकच्या कांहीं प्रमुख नागरिकांची सभा बोलावली होती. ती सभा आटोपून तेथील क्लबांत थोडावेळ जावयाचें होतें. शेवटीं सहा वाजतां गंगेच्या म्हणजे गोदावरीच्या तीरावर चिंतामणीचें जाहीर व्याख्यान व्हावयाचें होतें. आम्ही विंचूरकरांच्या बंगल्यांत गेलों तेव्हां चिंतामणींची मुद्रा थोडीशी रुष्ट दिसली. पुढें आम्ही सर्व पहिल्या सभेला गेलों. तेथें दोनतीन मंडळींनीं नेमस्त पक्षाबद्दल कांहीं आचरटपणाचे उद्‌गार काढले. कोणत्या तरी कारणानें चिंतामणि अगोदर विमनस्क झाले होते. त्यांत ही भर पडली. ते रागानें म्हणाले, “ आम्ही देशभक्त आहोंत कीं नाहींत हाच जेथें प्रश्न निघतो तेथें एकमेकांशीं चर्चा काय करावयाची ? ” असें म्हणून ते उद्वेगानें उठले आणि बाहेर येऊन टांग्यांत बसले. त्यांना परतवण्याचा प्रयत्न सर्वांनीं केला. पण तो यशस्वी झाला नाहीं. चिंतामणि परत विंचूरकरांच्या बंगल्यांत आले. आम्हीहि त्यांच्या पाठोपाठ आलों. चिंतामणींनीं संध्याकाळच्या व्याख्यानाला आपण येत नाहीं असें सांगितलें. दळवीहि त्यांना संमति देऊं लागले.

चिंतामणींची समजूत घालण्याचा मीहि प्रयत्न केला. पण तो फुकट गेला. शेवटीं चिंतामणींना मी सांगितलें कीं “ आपला पक्ष

पुष्कळ लोकांना मान्य नाहीं. त्यांत आणखी अशा प्रकारें लोकांच्यावर बहिष्कार घालणें हें न्यायदृष्टीनें रास्त असलें तरी आपल्या पक्षाच्या दृष्टीनें योग्य नाहीं. हा पक्ष आम्हाला बलिष्ठ करावयाचा आहे. तर लोकांपासून दूर राहून तो बलिष्ठ कसा होणार? तुम्ही लोकांना व्याख्यानांत सर्व समजावून सांगा. त्यांतील कांहीं लोक समजावून घेणार नाहींत. पण त्यांना समजेपर्यंत आपण सांगत राहिलें पाहिजे." दळवी म्हणाले, "तें कांहीं नाहीं. जर ते चिंतामणींना असें बोलतात तर चिंतामणींनीं त्यांचें तोंड पाहतां उपयोगी नाहीं." मीं चिंतामणींना म्हटलें, "हा वाद व्यक्तिव्यक्तिमधील नाहीं. हा पक्षापक्षांचा वाद आहे. म्हणूनच आपण व्यक्तित्वाला थोडी मुरड घातली पाहिजे. तेव्हां तुम्ही क्लबांत चला. आणि मग व्याख्यान द्या." कांहीं वेळानें चिंतामणि क्लबांत येण्यास कबूल झाले. मग व्याख्यानासहि तयार झाले. त्या संध्याकाळीं चिंतामणि फार रागावलेले होते. पण हळूहळू त्यांचा राग कमी झाला. आपल्या पक्षासाठीं स्वतःचा मानापमान कधीं कधीं बाजूला ठेवला पाहिजे ही गोष्ट त्यांना पटली. दळवींचें न ऐकतां त्यांनीं क्लबांत जाण्याचें आणि नंतर ठरल्याप्रमाणें व्याख्यान देण्याचें कबूल केलें. आम्हांला सर्वांना अर्थात् फार संतोष झाला. आमचे प्रिन्सिपॉल कुलकर्णी तर म्हणाले, "आतां ठीक झालें. ते असे वागणारच. पण आपण त्यांच्यापुढें आपलें म्हणणें मांडण्याची संधी जाऊं देतां उपयोगी नाहीं." आम्ही सर्व मिळून मग क्लबांत गेलों. तेथें सर्व मंडळी आमची वाटच पाहत होती. तेथें अर्धा तास कीं तासभर गप्पागोष्टी झाल्या. इकडे तिकडे खाणेंपिणें झालें. ज्या दोन तीन मंडळींनीं पहिल्या सभेंत कांहीं आचरट उद्‌गार काढले होते त्यांनीं ते आपण पक्षाभिमानाच्या आवेशांत काढल्याची कबुली दिली. वातावरण पुष्कळ थंड झालें. नंतर आम्ही गंगातीरावर व्याख्यानासाठीं गेलों.

चिंतामणींचें भाषण सुमारें दीड तासभर आणि अतिशय उत्कृष्ट असें झालें. आपल्या पक्षाचा दृष्टिकोन आणि कार्यक्रम त्यांनीं सांगितला. तो सांगतांना सरकारवर अनेक वेळां प्रखर टीका केली. सर्व लोक एकचित्तानें ऐकत होते. व्याख्यानांत मधून मधून टाळ्यांचा गजर होत होता. भाषण संपलें. आभार मानणाऱ्यांनीं चिंतामणींचा योग्य शब्दांत गौरव केला. त्यांच्या प्रखर देशभक्तीचा उल्लेख केला. सरकारचें वागणें बरोबर नाहीं असें वाटतांच त्यांनीं कसा ताडदिशीं राजीनामा दिला हेंहि सांगितलें. लोकांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. आपलें भाषण 'लोकांनीं इतक्या उत्तमपणानें ऐकून घेतलें त्याबद्दल चिंतामणींनाहि समाधान वाटलें. भाषणाच्या पूर्वींचा त्यांचा राग नाहींसा झाला होता. ते आतां अगदीं आनंदी वृत्तीनें बोलत होते. सर्व आटोपल्यावर आम्ही आपापल्या घरीं गेलों. जाण्यापूर्वीं रात्रीच्या गाडीनें धुळ्याला जावयाचें असें ठरलें. गाडी बारा साडेबारा वाजतां यावयाची होती. मी आणि दत्तोपंत आंबेकर जेवणखाण आटोपून रात्रीं अकरा वाजतां टांग्यांतून निघालों आणि नाशिक रोड स्टेशनवर सुमारें बारा वाजतां आलों. चिंतामणि, दळवी आणि एकदोन मंडळी आमच्या अगोदर आलेली होती. गाडी अर्धा पाऊण तास उशीरानें येणार होती. रात्रींचें स्वच्छ चांदणें पडलें होतें. तिकिटें घेऊन आम्ही प्लॅटफॉर्मवर हिंडत होतों. चिंतामणि यावेळीं अगदीं आनंदांत होते. ते म्हणाले, “आतां मी अगदीं स्वतंत्र आहे. पाहुणा म्हणून कोणावर लादलेला नाहीं. आतां सर्व कांहीं ठीक आहे.” धुळ्यांत आम्ही माधवराव आपटे यांच्याकडे जाणार होतों. चिंतामणि म्हणाले, “धुळ्यांत एखादें सरदारगृह नाहीं का?” मी त्यांना म्हटलें, “माधवराव आपट्यांच्या घरीं तुम्हांला परकेपणा वाटणार नाहीं. मी नेहमीं तेथेंच उतरतों. ते फार आतिथ्यशील गृहस्थ आहेत.”

सकाळीं उजाडलें त्यावेळीं आम्हीं धुळे येथें पोंचलों होतों. माधवराव आपटे चिंतामणींच्या स्वागताला हजर होते.

आपटे यांच्या घरच्या वातावरणानें चिंतामणींची प्रकृति अगदीं पहिल्याप्रमाणें प्रसन्न झाली. आम्ही गेल्यावर कांहीं वेळ इकडे तिकडे गप्पा मारल्या. चिंतामणींना प्रत्यक्ष भेटण्यासाठीं कांहीं मंडळीहि आली होती. नंतर चिंतामणींचें स्नान वगैरे होऊन दुपारच्या वेळीं सुग्रास भोजन झालें. दुपारीं कांहीं वेळ विश्रांति घेऊन संध्याकाळीं ठरल्याप्रमाणें सभेचा कार्यक्रम झाला. सभेला फार मोठा लोकसमूह जमलेला होता. तेथें सुमारें सव्वातास दीडतास चिंतामणींचें सुंदर व्याख्यान झालें. व्याख्यान सर्व श्रोत्यांनीं अगदीं तल्लीनतेनें श्रवण केलें. याप्रमाणें रात्रीचे आठ वाजले. पुढें जेवणखाण आटोपेपर्यंत रात्रीचे नऊदहा वाजले. धुळ्याहून चाळीसगांवला जायला आतां गाडी नव्हती. पण त्याची व्यवस्था आपटे वकिलांनीं अगोदरच करून ठेवली होती. धुळ्याहून मनमाडपर्यंत जाणाच्या मोटारी त्यांनीं सुसज्ज ठेवल्या होत्या. त्यांत बसून आम्ही सर्व मंडळी मनमाडला गेलों. माधवराव आपटे देखील आम्हांला निरोप देण्यासाठीं मनमाडपर्यंत आले होते. मनमाड येथें प्रथम दीड दोन वाजतां अलाहाबादेस जाणारी मेल आली. त्यांत चिंतामणींना फर्स्ट क्लासमध्यें उत्तम जागा मिळाली. नंतर कांहीं वेळानें मुंबईला जाणारी गाडी आली. तींत आम्ही बसलों. दुसऱ्या दिवशीं आम्ही सुखरूप मुंबईला आलों.

यापुढें दरसाल निदान एक वेळां तरी चिंतामणि मुंबईला येत. आले म्हणजे माझ्या घरीं येऊन कांहीं वेळ राहून जात. पुढें लौकरच चिंतामणि लीडर पत्राचे पुन्हा संपादक झाले. ते त्या जागेवर परत येणार हें निश्चितच होतें. कारण लीडर पत्र हें सर्वस्वीं चिंतामणींचें होतें. तेथें रजा घेऊनच ते मिनिस्टर झाले होते.

मुंबईला आल्यावर 'टेक्स्टाईल जर्नल'मध्यें कामाला लागलों. महिन्या दोन महिन्यांनीं 'टाईम्स ऑफ् इंडियांत'हि प्रचलित राजकारणावरील माझा एखादा लेख प्रसिद्ध होई. कलकत्त्याच्या 'कॅपिटल' या नामांकित साप्ताहिकांत मी जवळजवळ आठ पंधरा दिवसांतून एखादें आर्टिकल लिहित असें. अशा प्रकारें आजकाल माझा वाङ्मयसंसार बराच वाढला होता. मीं नेहमीं राजकीय विषयावर लिहीत होतों असें नव्हे. पुष्कळ वेळां 'टाईम्स ऑफ् इंडियां'त सामाजिक विषयावरहि मी लिहित असें. लेखक, व्याख्याता आणि विद्यार्थी या नात्यांनीं माझा लौकिक पुष्कळ वाढलेला होता. ह्या वेळपर्यंत माझ्या आयुष्याचा विकास एका विशिष्ट पद्धतीनें पण एकंदरींत ठीक झाला होता. अमेरिकेला जाऊन एखाद्या शास्त्रीय विषयांत तरबेज होऊन परत यावयाचें आणि एखादा कारखाना काढावयाचा हें आतां मनोराज्य ठरलें होतें. प्रिव्हियसच्या वर्गांत असतांना हें केवळ मनोराज्य नव्हतें; तर अंतःकरणाची पूर्ण तळमळ होती. त्या गोष्टीला आतां चौदा पंधरा वर्षें झालीं होतीं. तरी पण तेव्हां पोटांत असणाऱ्या तळमळीची वरचेवर आठवण होई. आणि एक प्रकारें खेद होई. आतां तो प्रश्नच मिटला होता. आतां स्वदेशांतच प्रवास करण्याचे दरसाल प्रसंग येत होते. सध्यां माझी स्थिति एकंदरींत सर्व प्रकारें चांगली होती. मासिकाच्या नोकरीचा दरमहा दीडशें रुपये पगार आणि वर्तमानपत्रांतून लिहिण्याचें उत्पन्न दरमहा जवळ जवळ शंभर रुपये अशी परिस्थिति होती. शिवाय व्याख्यानें देण्यासाठीं, पक्षाच्या कामासाठीं बाहेर जाऊन येण्याचा खर्च बहुतेक मिळे. ही सर्व यातायात केल्यावर फारसा विचार करण्यास वेळ मिळत नसे. घरीं पत्नीला मुलाच्या जन्मानंतर वर्षादीड वर्षानें आजारानें पछाडलें होतें. त्यांत सात आठ महिने गेले. पण वय

तरुण असल्यामुळें म्हणा किंवा कांहींहि म्हणा तो प्रसंग नीट निभावला आणि तिची प्रकृति ठीक झाली. आम्हीं कांहीं महिने साताऱ्याला काढले हें पूर्वीं सांगितलें आहेच. त्यानंतर मुंबईंत आम्ही सर्व राहूं लागलों. आम्ही सर्व म्हणजे मी, माझी आई, माझी पत्नी आणि माझा मुलगा. मुलगा अगदींच छोटा होता. पण त्याच्या आनंदांत आम्ही सर्व होतों. आईच्या बाबतींत बोलायचें तर तिच्या काशी-रामेश्वरादि यात्रा झाल्या होत्या. एवढेंच नव्हे तर, जम्नोत्रीपासून बद्रीनारायणापर्यंत हिमालयांतील सर्व यात्रा तिच्या झाल्या होत्या. एकंदरींत १९२३ साल आम्हाला ठीक गेलें.

मार्च महिन्यांतील दिवस असावेत. होळी नुकतीच होऊन गेली होती. सातारचे डॉक्टर केळकर पाहुणे म्हणून आमच्या घरीं आले होते. एके दिवशीं दुपारीं माझ्या पत्नीला ताप आला. केळकरांनीं पाहिलें व कांहीं औषध दिलें. पुढें डॉ. मावळणकरांना बोलावलें. त्यांच्याही औषधाचा उपयोग होईना. ताप रोज येई व जाई. घरीं मूल लहान. त्याची काळजी आई घेत होती. पत्नीचें वजन कमी होऊं लागलें. पंधरा एक दिवस याप्रमाणें गेले. हळूहळू शेजारी माणसें बोलूं लागलीं. हा डॉक्टर आणावा, तो डॉक्टर आणावा अशी बोलवा सुरू झाली, शेवटीं मी डॉ. नाडगीर यांच्याकडे गेलों. डॉ. नाडगीर माझ्यापेक्षां वयानें पुष्कळ मोठे. पण त्यांची माझी चांगली ओळख झाली होती. त्यांनीं येऊन पत्नीची प्रकृति पाहिली. डॉक्टरनीं सांगितलें, “सध्यां दोष कांहीं दिसत नाहीं; पण ताप रोज येतो, तेव्हां कांहींतरी दोष आहे असें वाटतें. तुम्ही सर्व मंडळी घेऊन देवळालीला जा. तेथें या पावसाळा अखेर रहा. बहुधा बरें वाटेल. जास्ती चिंता करूं नका. लोक काय बोलतात इकडे लक्ष देऊं नका. आणि देवळालीला डॉक्टरकडून मीं दिलें आहे तेंच औषध देत

चला. मुंबईच्या डॉक्टरकडे केस आहे म्हणून सांगा." मीं सर्व ऐकलें आणि त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय केला. आतां माझ्या पत्नीला बिछान्यावरून हालतां सुद्धां येत नसे. शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं वाटेल ते रोग असल्याचें सांगितलें होतें. पण मीं तेव्हां ठरविलें कीं डॉ. नाडगीरांनीं सांगितल्याप्रमाणें वागायचें. आणि एके दिवशीं पत्नीला मोटारींत घालून स्टेशनवर नेलें आणि देवळालीकडे जाणाऱ्या गाडींत बसविलें. देवळाली येथें लीलावती सॅनिटोरियममध्यें प्रवेश केला.

लीलावती सॅनिटोरियम हें गुजराथी आरोग्यगृह आहे. देवळालीला आठ दहा सॅनिटोरियम्स आहेत. पण त्यांत दक्षिणी एकहि नाहीं. एका तेलगू गृहस्थानें बांधलेलें सॅनिटोरियम नाशिक स्टेशनपासून मैल दीड मैलावर नाशिकच्या रस्त्याला आहे. पण तें क्षयरोग्यांसाठीं आहे. मुंबईस मोठ्या खटपटीनें आणि वशिले लावून तीन चार गुजराथी शेटना भेटलों होतों. शेवटीं या आरोग्यगृहाचा पत्ता लागला. तेथें गेल्यावर जागाहि मिळाली. सॅनिटोरियममध्यें आलों तेव्हां संध्याकाळ होत होती. सर्व देखावा पाहून मनाला समाधान वाटलें. चोहींकडे चांगली स्वच्छता होती. आजूबाजूला जवळ जवळ झाडें नसलेला माळ होता. वारा वरचेवर वाहत होता. समोर, उजव्या हाताला आणि डाव्या हाताला सॅनिटोरियमधील तीन खोल्यांचीं घरें, मध्यें विस्तीर्ण पटांगण, त्या पटांगणांत पाणी असलेली एक मोठी विहीर, उत्तम प्रकाश. स्टेशनपासून दोन मैल दूर आणि गांवापासूनहि सुमारें दीड मैल दूर असें तें फार चांगलें सॅनिटोरियम होतें. आम्ही गेल्यावर भय्याला सर्व चिठ्याचपाट्या [illegible] ल्या त्यानें लागलींच मध्यावरचा एक ब्लॉक आम्हांला उघडून दिला. सर्व व्यवस्था ठीक लागली. मी दोन तीन दिवस राहून परत माझ्या उद्योगासाठीं मुंबईला जाणार होतों. दर शनिवारीं सकाळीं किंवा दुपारीं मी मुंबईहून

देवळालीला येई. सोमवारीं सकाळीं परत जाई. असा क्रम कांहीं महिने चालला होता. देवळालीची हवा उत्तम होती यांत शंकाच नाहीं. मला देखील तेथें एक दोन दिवस विशेष बरें वाटलें.

आम्ही एकंदर तीन महिने तेथें राहिलों. तेवढ्या काळांत आनंदाची गोष्ट ही कीं पत्नीची तब्बेत बरीच सुधारली. डॉ. नाडगीर मला मुंबईला दर खेपेला भेटत. पत्नीची तब्बेत सुधारते आहे हें ऐकून त्यांना फार समाधान वाटलें. आणखी निदान सहासात महिने देवळालींतच रहावें असा त्यांनीं सल्ला दिला. म्हणून आम्ही तेथें दोन तीन खोल्यांची स्वतंत्र जागा भाड्यानें घेतली. पुढील पावसाळ्यापर्यंत ( १९२५ ) आम्ही तेथें राहिलों.

सुदैवानें या अतिशय अडचणींच्या दिवसांत मला प्राप्ति चांगली होत असल्यानें देवळालीचा खर्च करतांना मला कांहीं वाटलें नाहीं. पत्नीला दुखणें एवढें आलें होतें कीं तिचें कसें होणार व काय होणार याची मला निरंतर काळजी वाटे. पण मी निराशेंत असा कधींच नव्हतों. १९१० सालीं इंटरमिजिएटची परीक्षा उतरली नाहीं तेव्हां मी फार हादरलों होतों. पुढचीं तीन चार वर्षें माझ्या अंतःकरणांत प्रचंड खळबळ उडालेली होती. तीं वर्षें मी जरी बाह्यतः आनंदांत काढलीं तरी त्यावेळीं लिहिलेल्या कांहीं कविता मासिक मनोरंजनांत १९१५-१६ सालीं प्रसिद्ध झाल्या होत्या. त्या वाचल्या म्हणजे माझी तेव्हांची मनःस्थिति ध्यानांत येईल. माणसाला चार पैसे सुखानें मिळत असले—नव्हे दुःखानें पण नियमानें मिळत असले तरी त्याची मनःस्थिति चांगली राहते असें दिसते. ही वेळ अशी होती कीं मीं कांहीं लिहिलें कीं लागलींच कोणतें तरी वर्तमानपत्र तें घेई आणि माझ्या पदरीं दोनचार पैसे पडत.

या वर्षी जून महिन्यांत एक फार महत्त्वाची गोष्ट घडून आली. मी इंग्रजी वर्तमानपत्रांत विल्सन कॉलेजची एक छोटीशी जाहिरात वाचली. त्यांना बी. ए. च्या वर्गांत आठवड्यांतून तीन चार वेळां शिकवील असा एक मराठीचा शिक्षक हवा होता. तो एम्. ए. पाहिजे होता. मी एम्. ए. होतों. पण मराठीचा नव्हतों. मराठी वर्तमानपत्रांत मी पुष्कळ लिहिलें होतें. शिवाय माझ्या दोन कीं तीन कादंबऱ्या या वेळपर्यंत प्रसिद्ध झाल्या होत्या. निदान मासिकांतून प्रसिद्ध झाल्या होत्या. शिवाय जुन्या मराठी कवितेचा ज्ञानदेवापासून मोरोपंतापर्यंत माझा अभ्यास चांगला होता. आधुनिक वाङ्मयाशीं तर माझी ओळख होतीच. विल्सन कॉलेजांत यापूर्वी मीं एक व्याख्यान दिलें होतें. तेथील विद्यार्थ्यांना तें पूर्णपणें आवडलें होतें. मराठी लेक्चररचें काम जर मला मिळालें तर रोज फार तर एक तास कॉलेजांत जावें लागेल आणि चार तास टेक्स्टाईल जर्नलमध्यें नेहमीं-प्रमाणें जातां येईल यांत शंका नव्हती. जागा काय आहे, कशी आहे याची मला कांहीं कल्पना नव्हती. पुन्हां ती मलाच मिळेल अशी खात्री नव्हती. मी घरीं कोणाजवळहि बोललों नाहीं. फक्त विल्सन कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. मॅकेन्झी यांना एक पत्र लिहिलें; जमेल तर माझी काम करण्याची तयारी आहे असें त्यांना कळविलें. डॉ. मॅकेंझी यांच्याकडून चार सहा दिवसांनीं पत्र आलें. त्या पत्रांत मीं त्यांना कॉलेजांत अमुक वेळीं भेटावें अशी सूचना होती. त्या पत्रांत निश्चित असें कांहींच नव्हतें. पण मीं त्यांना जाऊन भेटण्याचें ठरविलें.

त्याप्रमाणें मी डॉ. मॅकेंझी यांना जाऊन भेटलों. मी त्यांना पूर्वीं कधीं भेटलों नव्हतों कीं पाहिलें नव्हतें. त्यांनीं माझें पत्र मला दाखविलें आणि ते म्हणाले, " माझ्याकडे पांचसहा अर्ज आलेले आहेत. ते बहुतेक

मराठी घेऊन एम्. ए. झालेल्या लोकांचे आहेत. पण मला प्रथम तुमची भेट घ्यावीशी वाटली. आमच्याकडे मराठीचें काम थोडें आहे. आठवड्यांतून चार पिरिअड्स् घ्यावे लागतील. मुलांची संख्या फारच थोडी आहे. तुम्हाला हें काम करतां येईल कीं काय तें सांगा." मी म्हणालों, "माझ्या दुसऱ्या उद्योगाला आपली हरकत नसेल तर आपलें एवढें काम सहज करतां येईल असें मला वाटतें. शिवाय माझें घर कॉलेजपासून पांच मिनिटांच्या रस्त्यावर आहे. त्यामुळें माझा फारसा वेळही जाणार नाहीं." मग डॉ. मॅकेंझी म्हणाले, "मराठी जुन्या कविता वगैरे तुम्ही चांगल्या शिकवूं शकाल ना?" मीं सांगितलें, "मला वाटतें माझा जुन्या त्याचप्रमाणें आजकालच्या मराठी वाङ्मयाशीं चांगला परिचय आहे. मी जरी माझ्या परीक्षांसाठीं तो विषय घेतला नाहीं तरी माझा त्याच्याशीं चांगला व्यासंग आहे. तो विषय मी ठीक शिकवूं शकेन." डॉ. मॅकेंझी यांनीं माझ्या म्हणण्यावर पूर्ण विश्वास ठेवला. त्यांनीं सांगितलें, "मग मी आतां हे दुसरे अर्ज आतां विचारांत घेत नाहीं. तुम्ही मला पत्र पाठविलेंत त्यांत डॉ. परांजपे यांना मजबद्दल कांहींहि विचारा म्हणून लिहिलें होतें. त्याप्रमाणें मी त्यांना पत्र पाठवितों. आणि मग मी तुम्हांला चारपांच दिवसांत पत्र लिहितों." पुढें चार दिवसांनीं त्यांचें पत्र आलें. जुलैच्या पंधरा तारखेपासून दरमहा शंभर रुपयांवर माझी नेमणूक झाली. प्रत्यक्ष काम आठवड्याचे चार पिरिअड्सचें होतें. एक पिरिअड म्हणजे त्या कॉलेजांत पंचेचाळीस मिनिटांचा होता. मीं सोमवारीं कांहीं काम करावयाचें नव्हतें. त्यामुळें शनिवारीं सकाळचा तास घेऊन मी दुपारीं देवळालीला जाऊं शकत असे. मंगळवारीं सकाळीं परत येई. सोमवारीं 'टेक्स्टाईल जर्नल'मध्यें ते कृपा करून सुट्टी देत असत. पुढें ही गोष्ट याप्रमाणें निश्चित झाल्यावर घरीं सागितली. घरांतील सर्व मंडळींना ती ऐकून आनंद झाला.

डॉ. परांजपे ह्यांना डॉ. मॅकेंझी यांनीं पत्र लिहिलें. डॉ. परांजपे ह्यांना मीं कांहींच बोललों नव्हतों. शिवाय गेल्या वर्षीं डेक्कन कॉलेजांत मराठीची जागा तुम्हाला हवी कां म्हणून त्यांनीं मिनिस्टर असतांना मला विचारलें होतें. तेव्हां ती सरकारी नोकरी नको म्हणून मी तेव्हां त्यांना सांगितलें होतें. त्यामुळें डॉ. मॅकेंझी यांचें पत्र वाचून त्यांना आश्चर्य वाटलें. पण त्यांनीं ताबडतोब उत्तर पाठविलें. त्यांनीं डॉ. मॅकेंझी यांना लिहिलें; " रा. अळतेकर हे त्या कामाला पूर्णपणें लायक आहेत. पण आपल्या कॉलेजांत त्यांच्यासारखा विचारवादी मनुष्य ( Rationalist ) चालेल कीं काय हें आपण पहा. ते आपलें काम चांगलें करतील यांत मला शंका नाहीं. " मी कॉलेजांत रूजूं झाल्यावर डॉ. मॅकेंझी यांनीं हें पत्र मला दाखविलें आणि ते म्हणाले, " प्रामाणिकपणें विचारवादी मनुष्य असेल तर त्याला आमची हरकत नाहीं. म्हणून आपली नेमणूक करण्याचें आम्हीं ठरविलें. तेव्हां आतां हें कॉलेज तुमचें आहे, आणि तुम्ही कॉलेजचे आहांत. "

१९२४ च्या जुलैमध्यें मी विल्सन कॉलेजांत गेलों. पुढें मराठी विषय मुंबई युनिव्हर्सिटींत पूर्णावस्थेस आला तेव्हां तेथें लेक्चररचा प्रोफेसर झालों. शेवटीं १९५१ सालीं वयाला साठ वर्षें पुरीं झाल्यावर निवृत्त झालों. १९२४ सालीं मी नव्वद टक्के वर्तमानपत्र-कार होतों आणि जुलैपासून मी शिक्षक झालों. १९५१ सालीं मी नव्वद टक्के शिक्षक आणि दहा टक्के वर्तमानपत्राचा लेखक होतों. हा शिक्षकाचा व्यवसाय माझ्याकडे कधीं येईल असें मला तो प्रत्यक्ष येईपर्यंत वाटलें नव्हतें. मी शिक्षक झालों त्यावेळीं तो उद्योग दीर्घकाळ चालेल असेंहि मला वाटलें. नव्हतें. कॉलेजांतील काम पत्करल्यानंतर मी रँगलर परांजपे यांना एकदां जाऊन भेटलों. ते म्हणाले, " चांगलें केलेस. प्रतिष्ठितपणाचा व्यवसाय आहे. "

१९२४ सालीं रा. चिंतामणि केव्हांतरी मुंबईला आले असावेत. त्यावेळीं किंवा १९२३ च्या डिसेंबरांत ते लिबरल कॉन्फरन्सला आले त्यावेळीं – बहुधा त्याच वेळीं – मला अलाहाबादच्या लीडर पत्राचा मुंबईचा बातमीदार नेमले. रा. चिंतामणि मला उत्तम प्रकारें ओळखत होते. त्यांनीं माझ्या 'न्यू रिव्ह्यू' या मासिकांतील सर्व लिखाण अगदी काळजीपूर्वक वाचलें होतें. तसेंच अलिकडे वर्षं दोन वर्षें कलकत्त्याच्या 'कॅपिटल'मधील आणि 'टाईम्स ऑफ् इंडिया'-मधील प्रसिद्ध झालेलीं माझीं बहुतेक आर्टिकल्स त्यांनीं वाचलीं होतीं. गेल्या वर्षींचा दौरा आटोपून ते अलाहाबादेस परत गेल्यावर ते पुन्हा 'लीडर'चे संपादक झाले. आतां त्यांनीं संपादक या नात्यानेंच मला लीडरचा बातमीदार होण्याविषयीं विचारलें. ही गोष्ट १९२३ च्या शेवटीं म्हणजे आमचें फेडरेशन संपल्यानंतर एके दिवशीं झाली. मी आठवड्यांतून एक बातमीपत्र अलाहाबादेस लिहावयाचें आणि कधीं कांहीं महत्त्वाची बातमी वगैरे असल्यास ती तारेनें कळवायची असें ठरलें. त्यासाठीं लीडरकडून मला दरमहा पन्नास रुपये मिळतील असें त्यांनीं सांगितलें. मीं त्यांचें म्हणणें लागलींच मान्य केलें. १९२४ सालापासून मी लीडरचा मुंबईचा बातमीदार झालों तों सुमारे वीस वर्षें होतों. पुढें पुढें मी लीडरमध्यें अनेक विषयांवर आर्टिकलें लिहिलीं. माझे आणि लीडरचे संबंध फार निकटचे झाले. अल्पशी कां होईना पण ही निश्चित भर माझ्या प्राप्तींत पडली. चिंतामणींनीं तेव्हांच सांगितलें होतें कीं लहान पण निश्चित होणारी प्राप्ति ही मोठ्या पण अनिश्चित प्राप्ति-पेक्षां फार मोलाची असते. चिंतामणींचें हें म्हणणें अक्षरशः खरें होतें यांत शंका नाहीं.

दुसरी एक गोष्ट घडून आली ती म्हणजे वाङ्मयसेवा मंडळाची

स्थापना ही होय. १९२४ सालीं दसऱ्याच्या सुमुहूर्तावर या संस्थेची स्थापना रा. ब. दामोदर गणेश पाध्ये यांच्या हस्तें मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांत झाली. मी आणि आतां माझे व्यवसायबंधु असलेले प्रो. हरिभाऊ वेलणकर हे तिचे पहिले चिटणीस झालों. ही संस्था पहिलीं पंचवीस वर्षें जोरांत चालली. आजहि ती आहे. पण तिचें काम तितक्या जोरांत चालत नाहीं. रा. ब. पाध्ये हे मोठे उत्साही पण एककल्ली गृहस्थ त्यावेळीं आपल्या कर्तृत्वाच्या भरांत होते. ही संस्था म्हणजेहि सुरुवातीला त्यांच्याच कर्तृत्वाचें फळ होती यांत शंका नाहीं. अशा प्रकारें १९२४ साल हें मला जरी माझ्या गृहस्थितींत अतिशय त्रासाचें गेलें तरी माझ्या सार्वजनिक कामांत मात्र तें अत्यंत महत्त्वाचें होतें.

चालू वर्षीं आमची लिबरल कॉन्फरन्स लखनौ येथें डिसेंबरांत भरणार होती. डॉ. परांजपे तिचे अध्यक्ष होणार हें निश्चित झालें होतें. मी देवळाली स्टेशनवरून गाडींत बसलों. माझे मित्र बापूराव आंबेकर आणि दत्तोपंत आंबेकर यांनीं मुंबईहून माझी जागा राखून आणली होती. गाडींत आणखी आमच्या परिषदेचे बरेच प्रतिनिधी होते. त्यांत बॅरिस्टर गाडगीळ, रावबहादुर काळे, वाग्भट देशपांडे, प्रो. केशवराव कानिटकर, प्रो. वामनराव काळे वगैरे बरीच मंडळी होती. कांहीं कारणासाठीं प्रो. कानिटकर आणि प्रो. काळे हे त्यावेळीं माझ्यावर रागावले होते. लीडरमधील माझ्या एका मुंबईच्या बातमीपत्रांत रँगलर परांजपे हे फर्ग्युसन कॉलेजांतील एक मूळचा अंक असून बाकीचे प्रोफेसर म्हणजे त्या अंकावरील पूज्यें आहेत असें मीं लिहिलें होतें. त्या वेळीं कानिटकर, काळे वगैरे मंडळी परांजपे यांच्यावर निष्कारण टीका करीत. त्यासंबंधीं मीं हें लिहिलें होतें. तेव्हां त्या मंडळींनीं माझ्याशीं बोलावयाचें नाहीं

असें ठरविलें आहे आणि इतर प्रतिनिधींनांहि ते माझ्याशीं अबोला धरा म्हणून सांगत आहेत असें मला बापूराव आंबेकर म्हणाले. मीं म्हटलें, " ठीक आहे. पण तुम्ही तर माझ्याशीं बोलत आहांत." तेव्हां बापूराव म्हणाले, "आम्हीं त्यांना सांगितलें कीं माधवराव आमचे स्नेही आहेत. आम्ही त्यांच्याशीं बोलणार. आम्ही आणि ते प्रवाससुद्धां एका डब्यांतून करणार आहोंत." मी या मंडळींची थोडी कठोरपणें चेष्टा केली होती आणि ती त्यांना आवडली नव्हती हें उघड आहे. लखनौंत गेल्यावर ते चिंतामणींच्याकडे तक्रार करणार होते आणि 'लीडर'ला कोणीहि चांगला बातमीदार आपण मिळवून देऊं म्हणून सांगणार होतें, म्हणून मला समजलें. मी बेफीकिर होतों. चिंतामणी हे असल्या सांगवासांगवीला बळी पडणार नाहींत अशी माझी खात्री होती. आम्हीं त्या दिवशीं आगगाडींत खूप गप्पा गोष्टी केल्या. मी विल्सन कॉलेजांत प्रोफेसर झालों हें ऐकून बापूराव आंबेकरांना मोठा आनंद झाला. तो त्यांनीं त्यावेळीं पत्रद्वारें व्यक्तहि केला होता. आम्ही दुसऱ्या दिवशीं सकाळीं लखनौ येथें उतरलों. दोघेहि आंबेकर, जोशी आणि मी एका हॉटेलांत उतरलों. पुढें आम्हाला कळालें कीं काळे आणि कानिटकर यांनीं माझ्याविरूद्ध आपली तक्रार चिंतामणींकडे केली आणि चिंतामणींनीं त्यांना कांहीं-तरी सांगितलें. दुसऱ्या दिवशीं चिंतामणि मला भेटले तेव्हां त्यांनीं सर्व हकीगत सांगितली. ते म्हणाले, " कानिटकर आणि काळे यांनीं तुम्हीं काय लिहिलें याबद्दल तक्रार केली. मीं त्यांना सांगितलें कीं तुम्ही आमच्या बातमीदाराला उत्तर म्हणून लीडरकडे आपल्या सहीचें एक पत्र पाठवा. आम्हीं तें छापूं. त्यांनीं लीडरसाठीं दुसरा बातमीदार आपण देऊं म्हणूनहि सांगितलें. त्यावर मी ह्मणालों कीं आम्हांला दुसरा तिसरा बातमीदार नको. आमच्या

बातमीदाराबद्दल कांहीं तक्रार असल्यास ती तुम्ही पत्रद्वारें कळवा. आमच्या बातमीदाराची चूक असली तर त्याला कबूल करावी लागेल पण आमचा बातमीदार आम्ही ठरविणार. आमच्या बातमीदारावर आमचा विश्वास आहे.'' याप्रमाणें हें चहाच्या पेल्यांतील वादळ येथें शांत झालें.

लखनौ येथें आमची परिषद थाटांत झाली. परिषद संपल्यावर मी मुंबईला न परततां माझे मित्र ( प. वा. ) प्रोफेसर आर. एम्. जोशी यांच्याबरोबर बनारसला जाण्याचें ठरविलें. बनारसला पोहोंचल्यावर एक घोडयाची गाडी करून बनारस युनिव्हर्सिटींत गेलों. त्या भव्य आणि विस्तृत विद्यामंदिरांत जाण्याचा तो पहिलाच प्रसंग होता. काशी विद्यापीठाचा तो अवाढव्य विस्तार पाहून माझे डोळे तृप्त झाले. या विद्यापीठाची मनोमय कल्पना १९०५ सालीं बनारस काँग्रेसच्या वेळीं पंडित मदनमोहन मालवीय यांच्या डोक्यांत चमकली. त्यानंतर त्या महात्म्यानें तिला मूर्त स्वरूप देण्यासाठीं हिंदुस्थानभर प्रवास करून कोट्यावधि रुपये जमविले. आणि ही संस्था स्थापन केली. बनारस युनिव्हर्सिटी हें पंडित मालवीयांचें अत्यंत उदात्त कर्तृत्व होय.

बनारस युनिव्हर्सिटींतच प्रो. अनंतराव अळतेकर म्हणून होते. हे सुप्रसिद्ध रामदासभक्त सदाशिव खंडो अळतेकर यांचे चिरंजीव. सदाशिवराव आणि आम्ही मूळचे एकाच गांवचे, एकाच गोत्राचे आणि एकाच कुळाचे. मी त्यांना लहानपणापासून कोल्हापूर येथें ओळखत होतों. आज त्यांच्या चिरंजीवाकडे चाललों होतों. सुदैवानें अनंतराव घरीं होते. मी त्यांना माझी ओळख करून दिली. अनंतराव हे वयानें माझ्यापेक्षां लहान. पण त्यामुळें आमची मैत्री जमण्यास मुळींच अडचण पडली नाहीं. मी चार दिवस अनंतरावांच्या सोबतीनें काढले.

येथेंच इकॉनॉमिक कॉन्फरन्स व्हावयाची होती. मोठमोठे प्रोफेसर कॉन्फरन्सला आले होते. मीहि प्रतिनिधी झालों होतों. मी तीन वर्षें तरी इंडियन इकॉनॉमिक सोसायटीचा चिटणीस होतों. कॉन्फरन्स-मध्यें मुंबईचे कांहीं प्रतिनिधि भेटले. रँगलर परांजपे, पंडित मालवीय वगैरे मंडळी कॉन्फरन्सला उपस्थित होती. कॉन्फरन्स नसेल त्या वेळीं मी आणि अनंतराव बनारसमध्यें पुष्कळ हिंडलों. तेव्हां आम्ही दोघेहि खूप चालणारे होतों. आम्ही विश्वनाथाचें दर्शन घेतलें. कांहीं नव्या ओळखी झाल्या. याप्रमाणें बनारसला चारपांच दिवस मुक्काम झाला.

आठ जानेवारीला आम्ही मुंबईला परतलों. मी वाटेंत देवळालीला उतरलों होतों. माझी पत्नी हळूंहळूं सुधारत होती. देवळालीला दोन दिवस राहून मी मुंबईस परतलों आणि माझ्या दोन्ही जागांवर रुजू झालों. अशा प्रकारें १९२४ संपलें आणि १९२५ सालाला सुरुवात झाली. कधी अंधार, कधी उजेड असें चाललेलें होतें. माझी स्वतःची प्रकृति चांगली होती. मी वाटेल तितकें काम करूं शकत होतों. लेखनव्यवसाय नेहमीप्रमाणें ठीक चालला होता. याप्रमाणें १९२५ च्या सुरुवातीला जगाकडे अद्यापि कुतूहलानें पाहत मी माझें काम करण्यास सुरुवात केली.

* * *

# १०

कॉलेजमध्यें माझें काम नियमितपणें आठवड्याला चार पांच तास चालें. शिवाय एखाद्या दिवशीं एखाद्या सभेचा अध्यक्ष होण्याची पाळी येई; एखाद्या दिवशीं कॉलेजांत प्रोफेसर मंडळीची एखादी बैठक होई; अशा प्रकारें आणखी कांहीं वेळ कॉलेजांत जात असे. उरलेला वेळ 'कॅपिटल' आणि 'लीडर' यांना लेख पाठविण्यांत जाई. चार तास 'इंडियन टेक्स्टाईल जर्नल'मध्यें जात. बाहेरून केव्हां केव्हां व्याख्यानांचीं आमंत्रणें येत. तींहि मी स्वीकारीत असें. कॉलेजांत मराठी विभागावर जरी मी एकटाच होतों; आणिं जरी माझा पगार दरमहा शंभर रुपये एवढा थोडा होता, तरी मराठीचें खातें अगदीं स्वतंत्र होतें. मीं कॉलेजांत काम पत्करलें तेव्हांच माझा विषय स्वतंत्र; मी इतर सर्व प्रोफेसरांच्या बरोबरचा; माझ्यावर प्रिन्सिपॉलचा इतरांवर होता तेवढा अधिकार, दुसऱ्या कोणाचाहि अधिकार नाहीं, वगैरे गोष्टी ठरवून घेतल्या. त्यामुळें माझी कॉलेजांतील परिस्थिति फार चांगली होती. माझी पहिली कॉलेजांतील ओळख प्रो. हरि दामोदर वेलणकर यांच्याशीं झाली. तिचें लवकरच स्नेहांत रूपांतर झालें. कॉलेजमध्यें माझा विशेष प्रसंग प्रो. वेलणकरांशींच येत असे. गेल्या वर्षी स्थापन झालेलें वाङ्मयसेवा मंडळहि आमची मैत्री दृढ होण्यास कारण झालें. कॉलेजांतील सर्व माणसें चांगलीं होतीं. शिक्षणाचा दर्जाहि चांगला होता. हळूं हळूं कॉलेजचें वातावरण मला आवडूं लागलें. रँगलर परांजपे मला म्हणाले होतें कीं "प्रोफेसरला पगार

कमी असला तरी त्याचा दर्जा चांगला असतो." त्याचा मला अनुभव येऊं लागला. प्रथम प्रथम प्रोफेसर म्हणवून घेतांना मला चमत्कारिक वाटे. पुढे पुढे तें अंगवळणीं पडलें.

'मुक्तबंध' नांवाची माझी आणखी एक कादंबरी मासिक मनोरंजनमधून प्रसिद्ध झाली. ती आतां पुस्तकरूपानें बाहेर पडली. 'मुक्तबंध' ही कादंबरी शांतारामपेक्षांहि लोकप्रिय झाली, असें म्हणतां येईल. म्हणजे ह्या वेळपर्यंत माझ्याकडून चार कादंबऱ्या लिहून झाल्या; आणि कादंबरीकार म्हणून माझें नांव झालें. मी मराठीचा प्राध्यापक झालों होतों; पण कॉलेजांत चालू होईल असें एकहि पुस्तक मी त्या सालीं लिहिलें नाहीं. माझ्या विविध लेखांचें आणि गोष्टींचें अशीं दोन पुस्तकें मी नंतर प्रसिद्ध केलीं.

१९२५ पासून माझ्या पत्नीची प्रकृति चांगली सुधारली. १९२५ च्या जूनपासून आमचें कॉलेज पुन्हां सुरूं झालें. जसजसे दिवस जाऊं लागले तसतसा कॉलेजच्या कामांत माझा अधिकाधिक वेळ जाऊं लागला. १९२५ सालीं आमची लिबरल परिषद कलकत्त्यास होणार होती. डिसेंबरांत मी थोडासा अगोदर बाहेर पडलों. या वेळीं कलकत्त्याला मी आणि आई गेलों. बरोबर आई होती म्हणून आमच्या ओळखीचे भास्कर बाळाजी ढवळे यांच्याकडे उतरलों.

कलकत्ता येथील परिषदेंत इतरांचीं भाषणें झालीं त्याप्रमाणें माझेंहि एक भाषण झालें. नागपुरांत मागें मी सर मोरोपंत जोशी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं केलेलें एक भाषण फार गाजलें होतें. कलकत्ता येथील परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें सर मोरोपंत यांनीं एका ठरावावर मला बोलावयास सांगितलें. त्याप्रमाणें मी बोललों. कलकत्ता आतां माझ्या परिचयाचें झालें होतें. तेथें एखादा सिनेमा किंवा एखादें नाटक

मी पहावयास जात असे. अद्यापि कलकत्त्यांत स्त्रियांच्या संबंधीं वागण्याची पद्धति जुनी होती. पुढें पुन्हा मी कलकत्त्याला १९३२ सालीं डिसेंबरांत गेलों होतों. तेव्हां मात्र कलकत्त्याला नवीनपणा आलेला होता. तरी मुंबईच्या मानानें कलकत्ता या बाबतींत पुष्कळ मागासलेलें होतें. कलकत्त्याचें अधिवेशन आटोपलें. थोडी खरेदी वगैरे करून अलाहाबाद मार्गानें आम्ही मुंबईला १९२६ च्या सुरुवातीला परतलों.

आतां कॉलेजचें आणि वर्तमानपत्रांतून लिहिण्याचें एवढींच कामें मी करीत होतों. 'इंडियन टेक्स्टाईल जर्नल'मध्यें मधून मधून लेख लिहीत असे. पण तेथील नोकरी आतां सोडून दिली होती. 'लीडर'-कडून दरमहा पन्नास रुपये मिळत होते.

या वर्षीं नव्या निवडणुकी व्हायच्या होत्या. त्यामुळें आमच्या प्रागतिक (लिबरल) पक्षातर्फें ठिकठिकाणीं जाऊन मीं व्याख्यानें दिलीं. कोठें दोनतीन ठिकाणीं नव्या लिबरल असोसिएशनहि काढल्या. १९२६ सालीं निवडणुकी झाल्या त्यांत रँगलर परांजपे हे उभे होते. ते निवडून आले. १९२७ च्या मिनिस्टरांमध्येंहि त्यांचा समावेश झाला.

१९२६ च्या डिसेंबरांत आमची प्रागतिक परिषद अकोल्याला भरली. या परिषदेंत मी बराच प्रत्यक्ष भाग घेतला. ज्यांना प्रागतिक तत्त्वें पसंत नाहींत आणि ज्यांना दुसरी कोणतीं तरी तत्त्वें आवडतात त्यांनीं खुशाल दुसऱ्या पक्षांत समाविष्ट व्हावें असें मीं स्पष्टपणें सांगितलें. या माझ्या बोलण्याचा कांहीं मंडळींना राग आला. पण मला वाटतें अध्यक्ष आणि इतर पुढारी मंडळी यांना माझें म्हणणें रास्त वाटलें. माझ्या भाषणाला सभेंत कोणी उत्तर दिलें नाहीं. पण इतर ठिकाणीं मात्र त्यांनीं आपली नाखुषी व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. सभेंतील फार मोठें बहुमत माझ्या बाजूचें होतें. अलिकडे

कित्येक मंडळींनीं—ही मंडळी थोडीच होती-कॉंग्रेसपक्षाशीं कांहीं-तरी संबंध जोडण्याचा प्रयत्न चालविला होता. त्यांत कौन्सिल-साठीं उभे राहिलेले कांहींजण होते. ते म्हणत, " कॉंग्रेसबरोबर कांहींतरी मेळ बसविल्याशिवाय आम्ही निवडून येऊं शकत नाहीं." मी म्हणालों, " नाहीं निवडून आलां तर नाहीं. तुम्हांला निवडून येणें अधिक महत्त्वाचें वाटतें कीं आपल्या तत्त्वाशीं धरून राहणें महत्त्वाचें वाटतें ? " अशा तऱ्हेच्या प्रश्नाला ते उत्तर टाळीत. आमच्या पक्षाचीं जास्त माणसें निवडून येणें अवश्य होतें. पण तीं माणसें आमच्या पक्षाचींच असलीं पाहिजेत. असो. वादविवादानें परिषदेला थोडा रंग चढला. जीं माणसें थोडीशीं चलबिचल झालीं होतीं तीं आमच्या पक्षाला पुन्हा पूर्णपणें चिकटलीं. अकोला येथें कॉन्फरन्स थाटांत पार पडली. आमची परिषद जिल्ह्याच्या ठिकाणीं प्रथमच भरत होती.

१९२७ ची कॉलेजची टर्म फेब्रूवारी अखेर शिकविण्याच्या दृष्टीनें खलास झाली. मग मी महिनाभर दिल्ली येथें गेलों. घरीं छोट्या मुलाची मुंज पार पडून तीन एक आठवडे झाले असतील. दिल्ली येथें रोज सकाळीं नऊ वाजतां जेवण करून मी असेंब्लींत जात असे. तेथे त्यावेळीं विठ्ठलभाई पटेल अध्यक्ष होते. पंडित मोतीलाल नेहरू प्रमुख सभासद होते. मोतीलाल नेहरू म्हणजे त्यावेळीं असेंब्लीचा प्राण होते. आमच्या दाक्षिणात्यांपैकीं नरसिंह चिंतामण केळकर, माधवराव अणे, दत्तात्रेय व्यंकटेश बेळवी, नागपूरचे डॉ. मुंजे वगैरे मंडळी होतीं. असेंब्लींत नेहमींच कांहींतरी मजेदार वादविवाद चाले. नामदार जिन्हा त्यावेळीं असेंब्लीचे सभासद होते. ते अद्यापिहि कॉंग्रेसमध्यें होते. जिन्हा नेहमीं स्पष्ट बोलत, आणि सरकारवर खूप टीका करीत. त्यामुळें त्यांचीं भाषणें ऐकण्यासारखीं होत.

या वर्षी, म्हणजे लिबरल फेडरेशन स्थापन झाल्यापासून दहा वर्षांनीं देशांत राजकीय पक्षांत एकी व्हावी म्हणून पुन्हा खटपटी सुरू झाल्या. यंदाच्या ( १९२८ ) कॉंग्रेसचे अध्यक्ष पंडित मोतीलाल नेहरु होते. नेहरूंच्या नांवानें निरनिराळे राजकीय पक्ष एकत्र आणण्याची एक योजना प्रसिद्ध झाली होती. जरी तिला नेहरू योजना म्हणण्यांत येत असे तरी तिची बहुतेक सर्व उभारणी लिबरल पक्षाचे पुढारी सर तेजबहादुर सप्रू यांनींच केली होती, असें आम्ही तेव्हां ऐकत होतों. कांहीं झालें तरी पं. नेहरूंना ती योजना मान्य होती हें उघड होतें. कॉंग्रेस भरण्याच्या पूर्वीं दोनचार दिवस ती योजना मान्य करून घ्यावी या हेतूनें एक सर्व पक्षीय सभा कॉंग्रेसनें कलकत्त्याला बोलाविली. ही सर्वपक्षीय परिषद २२ किंवा २३ डिसेंबरला भरावयाची होती. प्रागतिक परिषदेच्या पतिनिधींपैकीं मीहि एक म्हणून गेलों. तीन हजार मंडळी जमली. पहिल्या दिवशीं जेव्हां सभेला सुरुवात झाली तेव्हां सर्वत्र आनंद भरलेला होता. कमींत कमी दहा वर्षांनीं सर्व मंडळींच्या एकत्र गांठी पडल्या. शेंकडों लोक अक्षरशः एकमेकांना आलिंगन देऊन भेटले. पंडित मोतीलाल यांची इच्छा पुन्हा एकी घडावी अशी होती यांत शंका नाहीं. पण हा प्रयत्न गांधींच्या प्रेरणेमुळें पंडित जवाहरलाल यांनीं उधळून लावला.

* * *

विलेपार्लें येथें राहत असतांना एखादें वाङ्मय संमेलन भरवावें अशी सूचना कोणी करूं लागले. त्याचाच परिणाम म्हणून वर्षभरानें विलेपार्लें येथें साहित्यसंमेलन झालें. त्याची हकीगत पुढें येईल. आगरकरांचें चरित्र लिहिण्याची कल्पना पार्लें येथें रहावयास आल्यावर पुन्हां घोळूं लागली. एक दिवस प्रो. गोविंद चिंतामण भाटे मजकडे आले तेव्हां त्या कल्पनेला प्रत्यक्षांत येण्यास फार सहाय्य झालें. प्रोफेसर साहेबांना मी माझी अडचण सांगितली. तेव्हां प्रो. भाटे म्हणाले, "टिळकांचा राजीनामा तुम्हाला वाचायला मिळाला नाहीं, एवढीच अडचण असेल तर मी राजीनाम्याची प्रत तुम्हाला देतों. मात्र ती आठदहा दिवसांत माझ्याकडे परत दिली पाहिजे." मी त्यांना ती प्रत त्यांच्याकडे कशी आली म्हणून विचारलें. ते म्हणाले, "ही प्रत तीन चार वर्षांपूर्वीं आम्हांला मिळाली. आर्यभूषण प्रेसच्या मॅनेजरकडे १८९२ सालीं राजीनाम्याची प्रत होती. त्यांचें व टिळकांचें पुढें नीट राहिलें नाहीं. त्यांनीं ती एक प्रत आपल्याजवळ जपून ठेवली. त्यांच्या कागदपत्रांत ती आम्हांला सांपडली. त्याला चार पांच वर्षें झालीं. प्रतीच्या पांच सहा प्रती आणखी नव्या केल्या. त्यांतील एक माझ्याकडे आहे. ती मी तुम्हाला चार दिवसांसाठीं देतों." याप्रमाणें वचन देऊन प्रो. भाटे गेले. पुढें आठ दिवसांनीं रजिस्टर्ड पोस्टानें त्यांच्याकडून टिळकांच्या राजीनाम्याची प्रत आली. मी त्यांचे आभार पत्रद्वारें मानले. राजीनाम्याची प्रत तीन चार वेळां वाचली. नंतर १९२९ च्या सुरुवातीला एक दिवस विलेपार्लें येथें आगरकरांचें चरित्र लिहावयास बसलों. त्या वेळीं कर्नाटक छाप-

खान्याचे मंगेशराव कुलकर्णी मजकडे कधीं कधीं येत असत. त्यांनीं चरित्र छापून प्रसिद्ध करण्याचें कबूल केलें. ते मोठें धारिष्ट्य करीत आहेत असें मला वाटलें. पण त्यांची कबूली मिळाल्यानें माझी बरीच चिंता दूर झाली.

१९२९ सालीं कॉलेजचा वेळ सोडला तर मी बहुतेक या चरित्र-लेखनांत गुंतलों होतों. टिळकांसारख्या लोकमान्य पुरुषावर या ग्रंथांत टीका करावी लागणार हें मी जाणून होतों. त्यासंबंधीं निरनिराळ्या माणसांकडून मला इषारे येत होते. टिळकांच्यावर त्या ग्रंथांत यत्किंचितहि टीका होतां उपयोगी नाहीं हें पूर्ण लक्षांत ठेवा अशींहि मला कित्येकांचीं पत्रें आलीं. टिळकांवर निष्कारण टीका करण्याचा माझा अर्थात् हेतु नव्हता. टिळकांबद्दल मला पूर्ण पूज्यबुद्धि होती. किंबहुना त्यांच्या जाज्वल्य देशभक्तीबद्दल मला अणुरेणुमात्रहि शंका नव्हती. टिळकांच्यांत अतिशय मोठे गुण होते. आणि त्या गुणांमुळें त्यांचे दोष विसरणें शक्य होतें. पण जे दोष होते ते उघड उघड होते अशी माझी खात्री पटली होती. ते दोष सार्वजनिक किंवा वैयक्तिक कार्यांत कोठें कोठें नडले हें दाखविणें क्रमप्राप्त होतें. टिळक हे महापुरुष होते ही गोष्ट मी निर्विवाद समजत होतों. पण त्यांनीं आगरकरांच्या बाबतींत आणि दुसऱ्या कांहीं बाबतींत स्वीकारलेलें धोरण ठीक नव्हतें अशी माझी खात्री पटली होती. समाजसुधारणेच्या बाबतींत टिळकांनीं पत्करलेला मार्ग त्यांना संमतिवयाच्या वादाच्या वेळीं बरोबर वाटला असावा यांत मला शंका नव्हती. पण तो मार्ग बरोबर नव्हता ही माझी पुढील इतिहासावरून खात्री पटली. १९१६ सालीं 'आगरकर डे' च्या प्रसंगीं टिळकांनीं केलेल्या भाषणांत आगरकरांची संपूर्ण तारीफ केली होती. यापुढें त्यांचा सामाजिक सुधारणेबद्दल दृष्टिकोण बदलेल असें वाटावयास लागलें होतें. इतक्यांत १९२० च्या ऑगस्ट महिन्यांत दुर्दैवानें त्यांचा मृत्यु झाला.

आगरकरांचें चरित्र लिहिण्याचें काम १९२९ या वर्षभर चाललें होतें. छपाईच्या कामाला सप्टेंबरमध्यें सुरुवात झाली. पुस्तकाचीं सुमारें दोनशें पानें झाल्यावर मी तीं छापून प्रुफें आलीं कीं विलायतेस रँगलर परांजपे यांच्याकडे पाठवित असे. परांजपे यांनीं पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची माझी विनंती सहृदय अंत.करणानें मान्य केली होती. १९२९ च्या अखेरीस त्यांची प्रस्तावना माझ्या हातांत आली. १९३० च्या फेब्रुवारींत पुस्तक प्रसिद्ध झालें. पुस्तक तयार करीत असतांना माझा वेळ फार उत्तम प्रकारें गेला. आगरकरांच्या चरित्राचें मीं जसजसें अवलोकन केलें तसतसा माझा त्यांच्याबद्दलचा आदर वृद्धिंगत होत गेला. ग्रंथाच्या सुरुवातीला मी ' दोन शब्द ' म्हणून दोन अडीच पानें लिहिलीं आहेत. त्यांत म्हटलें आहे, " या निबंधांत वादात्मक स्थळें पुष्कळ आहेत. माझ्या समजुतीनें खरें तें मी स्पष्टपणें लिहिलें आहे. माहितीची चुकी असल्यास ती, किंवा तिच्यावर उभारलेलीं विधानें दुरुस्त करण्याला किंवा तशी आवश्यकता असल्यास परत घेण्याला माझी केव्हांहि तयारी आहे. मुद्दाम कोणाचें मन दुखवावें अशी माझी इच्छा नाहीं. एखाद्याचें मन दुखावेल म्हणून सत्य झांकून ठेवणें किंवा त्याला निःसत्व स्वरूप देणें हा मार्ग मी अवलंबिला नाहीं. तात्विक मुद्दयांचा किंवा ऐतिहासिक सत्यासत्याचा विचार करतांना व्यक्तींवर टीका करावी लागते. तशी टीका करण्यांत वैयक्तिक टीका करण्याचा माझा हेतु नव्हता. एवढें वाचकांना नम्रपणें कळविण्याची मी परवानगी घेतों. " मी केलेलें एकहि विधान परत घेण्याचा प्रसंग मजवर आला नाहीं, हें येथें सांगावयास हरकत नाहीं. पुष्कळांनीं या चरित्र लेखनाबद्दल मला शिव्याशाप दिले. पण कोणीहि माझें कोठें चुकलें हें सांगितलेलें नाहीं. त्या चरित्रासंबंधीं



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
नों: दि: ........

अनेकांनीं चर्चा केली, वादविवाद झाले, सर्व कांहीं झालें. आतांपर्यंत मी कादंबरीकार आणि वर्तमानपत्री लेखक म्हणून प्रसिद्ध होतों. आतां चरित्रकार म्हणून प्रसिद्ध झालों. ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर त्याची जाहिरात देतांना ग्रंथकार म्हणून माझें नाव गाळण्याचेंहि धाष्टर्य एक वेळ झालें. पण त्याबद्दल मी बोलतांच तत्काळ दुरुस्ती झाली.

१९२९ च्या डिसेंबर महिन्यांत आमची प्रागतिक परिषद मद्रास येथें झाली. सदर परिषदेचे अध्यक्ष सर फिरोझ सेटना हे होते. यावेळीं मी मागच्याप्रमाणेंच नेक नामदार श्रीनिवासशास्त्री यांचे धाकटे बंधु रामस्वामी यांचा पाहुणा होतों.

मी कॉलेजांतील काम करीत होतों आणि लीडरमध्यें नियमानें लिहित होतों. पुण्याला जवळ जवळ प्रत्येक वसंत व्याख्यानमालेसाठीं माझी भेट मे महिन्यांत केव्हांतरी होत असे. तेथून एखादे वेळीं मी कोल्हापुरास पांचसहा दिवस जाऊन येई. मुंबईला गणेशोत्सवांत व्याख्यान देण्यासाठीं दहापंधरा तरी आमंत्रणें असत. त्यापैकीं चारपांच तरी मी स्वीकारीत असे. नागपूरला कधीं गेलों तर तेथेंहि व्याख्यानें होत. या सालीं ( १९३० डिसेंबर ) प्रागतिक परिषद भरावयाची नव्हती. तेव्हां काठेवाडांत जाऊन द्वारका आणि सोमनाथ हीं क्षेत्रें पाहून यावीं असें मीं ठरविलें. त्याप्रमाणें द्वारकेची आणि सोमनाथाची यात्रा पुरी झाली. आम्हाला आनंद वाटला.

१९३१ च्या जुलै महिन्यांत मुंबई येथें प्रागतिक परिषद भरली. हिचे अध्यक्ष मि. चिंतामणि होते. ते एक दिवस संध्याकाळीं विलेपार्लें येथें आमच्याकडे जेवावयास आले. त्या रात्रीं पार्लें येथील दोनचार मंडळी जेवावयास बोलावली होती. शिवाय मुंबईहून दोन चार मंडळी आली होती. रात्रीं अकरा वाजेपर्यंत आम्हीं गप्पा मारल्या.

याच सुमारास ( ऑक्टोबर १९३१ किंवा त्याच्या पूर्वी एक वर्ष ) घडून आलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे विलेपार्लें येथें झालेलें साहित्यसंमेलन. या संमेलनाचा स्वागताध्यक्ष मी होतों. त्या संमेलनाची बहुतेक प्रेरणाहि मजकडून झालेली होती. त्यावेळीं मुंबई शहर किंवा मुंबईचे सबर्बन ( उपनगर ) यांजसाठीं हें प्रादेशिक संमेलन भरविण्याची कल्पना आम्ही विलेपार्लें येथें प्रथम काढली असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. या संमेलनाला पार्लें येथील बहुतेक सर्व मंडळी अनुकूल होती. संमेलन दोन दिवसांचें करावयाचें ठरलें. अनेक मित्रमंडळी त्या कामाला लागली. संमेलन म्हणजे खर्चाचें काम; तेव्हां स्वागतमंडळाच्या सभासदाची आणि प्रतिनिधीची फी ठरविण्यांत आली. अध्यक्ष कोणाला निवडावें याची चर्चा सुरू झाली. नरसोपंत केळकरांचें नांव सुचविण्यांत आलें. मला केळकरांच्या बद्दल पुष्कळ आदर होता. परंतु त्यांच्या नांवाला प्राधान्य देणारी मंडळी त्यांच्या राजकारणविषयक मतांमुळें तसें करीत होती हें मला माहीत होतें. आम्ही जी परिषद करणार होतों ती साहित्यपरिषद करणार होतों. म्हणून तिचें अध्यक्षस्थान एखाद्या पूर्ण साहित्यिकानें सुशोभित करावें असें मला वाटत होतें. सुदैवानें तसें एक नांव माझ्यापुढें होतें. जानेवारीच्या शेवटीं किंवा फेब्रुवारी महिन्यांत बडोदें येथें सहविचारिणी सभेपुढें व्याख्यान देण्यासाठीं मी गेलों होतों. त्यावेळीं बोलतां बोलतां चंद्रशेखरांचें नांव निघालें. मी ज्यांच्याकडे उतरलों होतों त्यांनीं मला रात्रीं त्यांच्याकडे नेण्याचें कबूल केलें. संध्याकाळीं आठ वाजतां जेवण आटोपून माझे मित्र मला चंद्रशेखरांकडे घेऊन गेले. चंद्रशेखर नुकतेच जेवण आटोपून आपल्या माडीवर बसले होते. वर गेलों. नमस्कार वगैरे विधि आटोपले, मग माझे मित्र म्हणाले,

"यांचीं कालपरवां येथें व्याख्यानें झालीं. ते आतां आपल्या कविता ऐकावयास आले आहेत." चंद्रशेखर हंसले. ते म्हणाले, "एवढ्या रात्रीं यांना येथें घेऊन आलांत?" मी म्हटलें, "मीच यांना आणण्याचा आग्रह केला. आपल्याला त्रास होत नसेल तर आपण दोन तीन कविता म्हणाव्यात." त्यानंतर त्यांनीं आपलीं बाडें काढलीं. चांगले दोन तास त्यांनीं निरनिराळ्या कविता वाचून दाखविल्या. चंद्रशेखर अतिशय सुंदर रीतीनें आपल्या कविता वाचून दाखवित होते. दोन तास कसे गेले हें समजलें सुद्धां नाहीं. एका अत्युत्कृष्ट कवीचें काव्य आपण त्याच्याच तोंडून ऐकत आहोंत ही माझी भावना झाली. मी त्यांचे आभार मानले; त्यांना धन्यवाद दिले. त्यांच्यासारख्या उत्कृष्ट कवीला साहित्यसंमेलनाचें अध्यक्षस्थान प्राप्त झालें नाहीं; उलट तें कोणातरी रसायनशास्त्रज्ञाला किंवा नमस्कारशास्त्रज्ञाला तो जहागीरदार आहे म्ह्णून प्राप्त होतें याचा मला त्यावेळीं अत्यंत विषाद वाटला. त्यावेळीं पार्ले येथें आपण एखादें साहित्यसंमेलन भरवूं ही मला कल्पना नव्हती. मी चंद्रशेखरांचा निरोप घेऊन निघालों. त्या गोष्टीला आतां सहासात महिने झाले होते. चंद्रशेखरांचें नांव साहित्यसंमेलनाच्या बाबतींत मजपुढें उभें राहिले. ते जर आपल्या संमेलनाला अध्यक्ष म्हणून लाभतील तर फार उत्तम होईल असें वाटलें. मी लागलींच ही गोष्ट विलेपार्लें येथील माझ्या मित्रमंडळींना सांगितली. आनंदाची गोष्ट ही कीं त्यांनीं मला पूर्ण दुजोरा दिला. पुढें रीतीप्रमाणें स्वागतमंडळापुढें ठराव मांडला आणि तो एकमतानें मंजूर झाला. निव्वळ वाङ्मय क्षेत्रांत विहरणारा सुंदर कवि हा एखाद्या संमेलनाचा अध्यक्ष होणें ही गोष्ट सामान्य नव्हती हें उघड आहे. संमेलन उत्तम प्रकारें पार पडलें. चंद्रशेखरांचें अध्यक्षीय भाषण फार सुरेख झालें. दुसऱ्या

दिवशीं सकाळीं त्यांनीं आपल्या कविता वाचून दाखविल्या तेव्हां तर श्रोते तल्लीन होऊन गेले. चंद्रशेखर तीन दिवस माझे पाहुणे होते. त्यांचा तीन दिवसांचा सहवास फार आनंददायक वाटला.

यापुढें म्हणजे १९३२ च्या ऑक्टोबर महिन्यांत मी आणखी एक दौरा केला. तो काश्मीरचा होय.

* * *

# १२

आतां मी मुंबई युनिव्हर्सिटीचा दर वर्षी परीक्षक होत होतों. त्याचप्रमाणें आग्रा, नागपूर, अजमीर वगैरे ठिकाणींहि मला परीक्षकाचें काम मिळत होतें. हें सर्व मिळून प्राप्ति ठीक होत होती. सध्यां तरी काळजी करण्याचें कारण नव्हतें. कॉलेजमधूनहि माझा लौकिक वाढला होता. १९३३ सालीं सुरवातीला मी कोल्हापूर सांगली इकडून दरसालप्रमाणें एक फेरा मारून आलों होतों. या खेपेला सांगली येथील विलिंग्डन कॉलेजांत मला व्याख्यान देण्यासाठीं बोलाविलें होतें. प्रो. लिमये तेव्हां तेथें प्रिन्सिपॉल होते. प्रो. पारसनीस मराठी शिकवीत. दोघांचाहि मजवर लोभ. म्हणून त्यांनीं मला आपल्या कॉलेजांत बोलावलें. कॉलेजांत मराठी मंडळाचा वार्षिक दिन होता. तासभर बोललों. भाषण सर्वांना आवडलें असें दिसलें. मी राजकारणांत होतों. दर आठवड्याला अलाहाबादच्या 'लीडर' पत्रांत लिहीत होतों. तरी पण माझें लक्ष आतां प्रोफेसरीच्या व्यवसायांत अधिक केंद्रित झालें होतें हें कबूल केलें पाहिजे. राजकारणापासून माझें चित्त कधींहि ढळलें नाहीं, हें खरें आहे. पण युनिव्हर्सिटी घेत असलेल्या वार्षिक परीक्षा आणि आतां मराठी विषयाचा कॉलेजच्या प्रत्येक परीक्षेशीं येणारा संबंध यामुळें माझें लक्ष तिकडेहि भरपूर होतें. मुंबई युनिव्हर्सिटीनें मराठी विषय आतां बी. ए. च्या परीक्षेला इंग्रजी किंवा संस्कृतप्रमाणेंच लागूं केला होता. विल्सन कॉलेजांत माझी नेमणूक आतां मराठीचा प्रोफेसर म्हणून झालेली होती.

एकदां मी पुणें येथील वसंत व्याख्यानमालेंत 'अश्लील वाङ्मय' या विषयावर एक व्याख्यान दिलें. तें वादविवादासह दोन दिवस चाललें. त्याचप्रमाणें फ्रॉईडच्या कांहीं कल्पना घेऊन कित्येक लेखकांनीं नवीन मानसशास्त्रज्ञांची आराधना चालविली होती. त्याचाहि उल्लेख मी या व्याख्यानमालेंत केला. हें व्याख्यान अतिशय गाजलें. त्याच्या वादविवादांत नरसिंह चिंतामणि केळकर वगैरेंनींहि भाग घेतला. कालिदासावरहि मी पांच सहा ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. तीं अतिशय लोकप्रिय झालीं. विशेषतः विद्यार्थी मंडळींना तीं फारच आवडलीं. तेव्हां या विषयावर एखादा ग्रंथ लिहावा अशी कल्पना माझ्या मनांत आली. त्याप्रमाणें 'कालिदासाची सृष्टि' असें पुस्तक मी लिहावयास घेतलें. पुढें दोन वर्षांनीं तें छापून प्रसिद्ध झालें. त्यावेळीं माझ्या कल्पनेप्रमाणें मी बरीच पुस्तकें लिहिणार होतों.

१९३७ साल उजाडलें. मला आतां कॉलेजांत कामाला सुरुवात करून बारा वर्षें झालीं होतीं. राजकीय चळवळींत काम करायला सुरुवात होऊन तर बत्तीस वर्षें होऊन गेलीं होतीं. या वेळांत किती गोष्टी कळल्या, किती अनुभव आले! पण माझ्यापुरतें बोलावयाचें झाल्यास या सर्वांतून पार पडून मी आतां आयुष्यपथावर एकंदरीनें स्थिर गतीनें चाललों होतों. प्रोफेसर या नात्यानें गेल्या बारातेरा वर्षांत माझें नांव बरेंच गाजलें होतें. उत्तम वक्ता म्हणून माझा लौकिक सर्वत्र झाला होता. माझ्या प्रथम महत्त्वाकांक्षा काय होत्या याचा विचार केला तर मला जें व्हावेंसें वाटत होतें तें मला मुळींच मिळूं शकलें नव्हतें. कॉलेजांत गेलों त्यावेळीं (१९०८ सालीं) अमेरिकेला जाऊन शास्त्रीय विषयांत शिक्षण घ्यावें ही माझी मनीषा होती. आतांपर्यंत माझ्या आयुष्यांत जें जें वळण मिळालें त्यांत परदेशी जाणें केव्हांहि घडलें नाहीं. वृत्तपत्रव्यवसायांत मी अर्थप्राप्तीसाठीं

शिरलों. कांहींतरी मिळविल्याशिवाय प्रारंभीं जगणें शक्यच नव्हतें, त्यामुळें हा व्यवसाय मी स्वीकारला. त्या व्यवसायांत कांहीं वर्षें अनुभव घेतल्यावर मी प्रोफेसरीच्या व्यवसायांत पडलों आणि तेथें शेवटीं माझें ठीक जमलें. वृत्तपत्रव्यवसायांत माझा लौकिक पुष्कळ चांगला झाला होता. पण त्या धंद्याला मी कंटाळलों. जरी तो व्यवसाय मी अजूनहि सोडला नव्हता तरी शिक्षणाच्या कार्याकडे माझें लक्ष मुख्यपणानें केंद्रित झालें.

१९३७ सालींच कॉँग्रेसचें प्रधानमंडळ अस्तित्वांत आलें. त्या काळांत तरी ' काळ ' पत्रांतील निबंधवाङ्मयावरील जप्ती उठावी म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेनें प्रयत्न चालविला. एक मंडळ नेमलें गेलें. त्यांत मीहि होतों. त्यावेळीं बाळासाहेब खेर हे मुख्य प्रधान आणि कन्हयालाल मुन्शी हे गृहखात्याचे प्रधान झाले होते. एके दिवशीं अगोदर पत्रव्यवहार झाल्याप्रमाणें पुण्यांत मुनशी याना भेटण्यासाठीं मी, नरसिंह चिंतामण केळकर वगैरे मंडळी गेलों. परंतु जरूरीच्या कामासाठीं मुनशी मुंबईस गेल्याकारणानें आम्ही बाळासाहेब खेरांना भेटलों. त्यांनीं जप्ती उठवण्याबद्दल तोंड भरून आश्वासन दिलें. आम्हांला वाटलें हा प्रश्न सुटला. मुनशींची आणि आमची गांठसुद्धां पडली नाहीं हें आम्ही विसरलों. परंतु पुढें पंधरा दिवस झाले तरी सरकारकडून कांहींच कळलें नाहीं. पुन्हां आम्ही मुनशी यांना भेटण्यास गेलों. पण आतां पूर्वींचा उत्साह राहिला नव्हता. मुनशींनीं सांगितलें कीं सत्य, अहिंसा यांना सोडून जें जें असेल तें आम्हांला जप्त केलें पाहिजे. मुनशींची ' सत्य आणि अहिंसा ' इंग्रज सरकारच्या धोरणाशीं इतकी कशी जुळते ह्याचें आम्हांला आश्चर्य वाटलें. मी मुनशींना थोडेसें विनोदानें म्हणालों, " युद्ध कर, म्हणून सांगणारी गीता ही आपण जप्त कराल

काय ?" त्यावर त्यांनीं मला पुढें केव्हां तरी बोलूं किंवा असें कांहींतरी उत्तर दिलें. पुढें पुष्कळ दिवसांनीं हा प्रश्न सरकारनें सोडवला. पण आम्हांला त्यावेळीं जो अनुभव आला तो अगदीं लिंबाचा पाला खाल्ल्याप्रमाणें आला.

यावेळीं कोल्हापुरच्या महाराजांनीं ब्राह्मणांच्या जमिनी निरनिराळ्या तक्रारी उपस्थित करून काढून घेण्याचा तडाखा चालविला होता. माझ्या जमिनीवरहि एक दिवस तो प्रसंग आला. जमिनीची मूळ किंमत ( आमच्या वडिलांनीं दिली होती ती ) तीन हजार रुपये होती तर आम्हीं एक हजार रुपये दंड दिला पाहिजे म्हणून आमच्यावर नोटीस लावली. मी ही जमीन विकून टाकली. आणि त्यामुळें पाठीमागचा एक त्रास संपला असें वाटतें. माझी जमीन फार चांगली होती. लहानपणीं माझ्या आणि भावाच्या शिक्षणाला तिचें फार साहाय्य झालें होतें. कोल्हापूर दरबारांत कोर्टांत जाण्याचा हा माझा पहिला आणि शेवटचा प्रसंग. याप्रमाणें जन्मापूर्वींपासून असलेला कोल्हापूरचा आणि माझा संबंध कायमचा तुटला. आम्ही जमीन विकली नसती तर बहुधा महाराजांनीं ती आपल्या अनियंत्रित कारभारांत काढून घेतली असती. तेव्हां झालें तें ठीक झालें, असें म्हणून आम्ही स्वस्थ बसलों. ह्या वेळपर्यंत मी जवळजवळ दरसाल कोल्हापुरास जात होतों. यानंतर मी कोल्हापुरला एखादें वेळीं गेलों असेन. पण तेथें जाणें आतां बहुतेक थांबलें. कोल्हापूर म्हणजे आमचें गांव असें आम्हांस वाटे, अद्यापिहि वाटते. पण आतां आमचें तेथें कांहींहि नाहीं. माझे कांहीं स्नेही सोबती अद्यापि तेथें राहतात. आणि ते आहेत तोपर्यंत मला कोल्हापूरबद्दल आपलेपणा वाटणारच. पण माझ्या मुलाला आतां कोल्हापूरबद्दल कांहीं तरी वाटत असेल किंवा नाहीं हें सांगणें फार कठीण आहे. माझीं

पहिलीं वीस वर्षें कोल्हापुरांत गेलेलीं. तेव्हां तें गांव अद्यापि माझें वाटलें तर नवल नाहीं. कोल्हापुरच्या लायब्ररींत कितीतरी पुस्तकें मीं वाचलीं; कितीतरी व्याख्यानें ऐकलीं. कोल्हापुरच्या राजाराम हायस्कुलांत सात वर्षें आणि राजाराम कॉलेजांत तीन वर्षें घालविलीं. महाराष्ट्राचे दोन मोठे पुढारी टिळक आणि गोखले मी प्रथम कोल्हापुरासच पाहिले. कोल्हापुरानंतर दोन चार वर्षें पुणें येथें काढलीं. शेवटीं मुंबई हेंच माझें कायमचें निवासस्थान झालें. तेव्हां कोल्हापूर, पुणें आणि मुंबई ही माझी त्रिस्थळी असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या वर्षीं (१९३८) एप्रिल महिन्यांत मी एम्. ए. चा मराठीचा परीक्षक होतों. गेलीं चार वर्षें तात्यासाहेब केळकर आणि मी असे दोघे परीक्षक होतों. गेल्या वर्षीं मी या परीक्षेच्या कामासाठीं पुणें येथें गेलों असतांना तात्यासाहेबांच्या आग्रहावरून त्यांच्याचकडे चार दिवस राहिलों. तात्यासाहेबांचा आणि माझा परिचय प्रथम मी विद्यार्थी असतांना १९१३ सालीं झाला, पुढें वसंत व्याख्यान-मालेच्या निमित्तानें हा परिचय पुष्कळ दृढतर झाला. त्यानंतर अलिकडे चार वर्षें परीक्षक असल्यामुळें परिचयाला स्नेहाचें स्वरूप आलें. तात्यासाहेब एकदां दोनदां मजकडे विलेपार्ले येथील घरींहि आले. त्यामुळें घरच्या मंडळींच्याहि ओळखी झाल्या.

सुमारें दहा वर्षें सतत परिक्षकाचें काम केल्यावर मला खरोखरच त्याचा कंटाळा आला होता. परीक्षक होणें म्हणजे सालीना सुमारें दोन महिन्यांची अडवणूक असे. हिंडण्याफिरण्याची मला फार हौस, त्यामुळें ही अडवणूक मला जाचक होत असे. या दरम्यानच्या काळांत मी युनिव्हर्सिटींत मराठी बोर्डाचा सभासद निवडून आलों होतों. तेथें पांच वर्षें काम केल्यावर मी कंटाळलों. पुन्हा त्या जागे-

शाठीं उभा राहिलों नाहीं. युनिव्हर्सिटींत मी कधीं कधीं जात असें. पण तेथील लायब्ररींत मी क्वचितच गेलों.

यावेळीं ( १९३८ ) माझें वय पन्नाशीच्या बाजूला चाललें होतें. पण तें मुळींच माझ्या लक्षांत नव्हतें. दिवसभर भरपूर काम, नवींनवीं कामें अंगावर घेण्याची उत्सुकता, दोनतीन वर्तमानपत्रांतून आणि मासिकांतून लिहिण्याची कायमची संवय, आणि माझ्या समजुतीप्रमाणें माझी शरीर प्रकृति उत्तम ! अशा स्थितींत एकदां हिमालयाची तीर्थयात्रा करून यावी असें माझ्या मनांत सारखें येत होतें. मी आतापर्यंत आठदहा वेळां जाऊन आलों होतों. या वर्षीं परीक्षेंत थोडे बरे पैसे मिळतील असें मला वाटलें. जवळहि थोडेसे पैसे होतेच. तेव्हां याच वर्षी गंगोत्री बद्रीनारायण यांचें दर्शन घ्यावयाचें असें नक्की ठरविलें. हिंदुस्थानांतील तीर्थयात्रा मी बहुतेक संपविली होती आणि बारा ज्योतिर्लिंगापैकीं अकरांचें मी दर्शन घेतलें होतें. बारावा उरला केदारनाथ. हा हिमालयांत. त्याचें दर्शन घेतलें कीं माझी बाराहि ज्योतिर्लिंगांची यात्रा होणार होती. गेल्या सहासात वर्षांत म्हणजे आमच्या काश्मीरच्या प्रवासानंतर कित्येकांनीं मला तुम्ही बद्रीनारायणाला गेलांत तर आम्हांला अवश्य सांगा, आम्हीहि येऊं असें सांगितलें होतें. त्या सर्वांना मी विचारलें. तेव्हां सर्वांनीं आम्हांला येतां येत नाहीं म्हणून कळविलें. शेवटीं मी ठरविलें कीं आपण एकट्यानें जावयाचें. त्याप्रमाणें घरीं बोललों. पत्नीनें स्वच्छ सांगितलें कीं तुम्ही जाणार तर मीहि येणार. माझ्या पत्नीची तब्येत ठीक नव्हती. पण तिनें अगदीं हट्ट धरला. शेवटीं मी ठरविलें कीं हिला बरोबर डोलींतून न्यावी. हरिद्वारला आमचे एक स्नेही केशवराव चितळे होते. त्यांना मी पत्रहि लिहिलें. माझ्या पत्नीची एक ओळखीची बाई होती. तीहि येते म्हणून म्हणाली.

आमचें रोजचें कामहि करीन म्हणून ती म्हणाली. तेव्हां तिलाहि घेण्याचें ठरलें.

केदारनाथाच्या दर्शनानें बारा ज्योतिर्लिंगांची यात्रा समाप्त झाली कुठें रामेश्वरचा रामनाथ आणि कुठें हिमालयांतील केदारनाथ! तेथें भक्तिपूर्वक नमस्कार करून मी काय मागितलें? कांहींहि मागितलें नाहीं. सवत्र नमस्कार केला. सर्वत्र आनंदानें हिंडलों फिरलों. सर्वत्र सुखाचा अनुभव घेतला. माझें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून गेलें. मी धन्य झालों.

माझी प्रकृति १९४४ सालीं बिघडली ती आज दहा वर्षें जवळ जवळ तशीच आहे. पण या प्रसंगीं कुटुंबांतील सर्व मंडळींनीं माझी शक्य ती काळजी घेतली एवढें नमूद केलें पाहिजे. माझी प्रकृति बिघडली होती तरी किती बिघडली याची यावेळीं मलाहि कल्पना नव्हती. प्रकृति बिघडल्यामुळें माझें वाचन बहुतेक थांबलें आणि लिहिणें जवळजवळ अजिबात बंद झालें. माझें ब्लडप्रेशर बरेंच वाढलें होतें. पुढें निद्रानाशाचें संकट माझ्यावर आलें. हा निद्रानाश सुमारें सोळा महिने सतत राहिला. तीस-बत्तीस वर्षांपूर्वीं कॉलेजांत असतांना गप्पा मारण्याच्या भरांत ‘ रात्रिरेव व्यरंसीत ’ अशी स्थिति अनेक वेळां झाली होती. पण वीसपंचवीस ह्या वयांतील तडफ आणि पन्नाशी उलटल्यानंतरची परिस्थिति यांत साहजिकच अंतर असणार. फर्ग्युसन कॉलेजमध्यें एका रात्रीं दहा वाजल्यानंतर आम्ही चार पांच मंडळी वेताळाच्या टेकडीवर फिरावयास गेलों होतो. रात्र पौर्णिमेची होती. आम्ही वेताळापर्यंत गेलों. खूप खूप गप्पा मारल्या. अनेक मनोराज्यें केलीं. पहांटे तीन वाजण्याच्या सुमारास कॉलेजांत परतलों. दोन अडीच तास बिछान्यावर अंग टाकलें आणि सकाळीं सहा वाजतां उठून पुन्हां दिनक्रमाला लागलों.

पण तें वय आणि पन्नाशीनंतरचें वय यांत फार अंतर आहे; हें पुस्तकांतून आम्हीं कितीतरी वेळां वाचलें होतें. पण तें आतां प्रत्यक्ष नजरेंत भरलें.

कॉलेजमधून माझी निवृत्ति १९५१ सालीं जून महिन्याचा वीस तारखेपासून झाली.

मी निवृत्त होईपर्यंत आजारांत माझीं सुमारें सहा वर्षें गेलीं. त्यांत निद्रानाश आणि रक्तदाब हीं प्रमुख चिन्हें होतीं. आज लिहितांना ( ता. २३ नोव्हेंबर १९५९ ) देखील मला तीन दिवसाखालीं झोंप आली नव्हती असें सांगतां येईल. त्याशिवाय अलिकडे माझें हृदयहि गडबडलेलें आहे. त्यामुळें माझे मित्र डॉ. वाड म्हणतात त्याप्रमाणें मी घरांत बसून शिक्षा भोगीत आहे. हें किती दिवस चालणार आणि यांतून मुक्तता केव्हां होणार या गोष्टी आपल्या तर्काच्या कक्षेंतील नव्हेत हें सांगावयास नकोच. गेल्या दोनतीन वर्षांत मी व्याख्यान देणें वगैरे गोष्टीं टाळलेल्या आहेत. लेखनहि म्हणण्यासारखें कांहीं झालेलें नाहीं. मी कॉलेजांतून निवृत्त झाल्यापासून प्रेक्षक या नात्यानें वागत आहे. तसें वागण्याचा मला फार कंटाळा येतो. पण तसें वागलें नाहीं तर त्याचें प्रायश्चित्त भोगावें लागतें. यंदाच मी हें प्रायश्चित्त वर्षापेक्षां अधिक दिवस भोगलेलें आहे. अद्यापि भोगतों आहे. मला हें प्रेक्षकाचें काम आवडत नाहीं. पण माझे डॉक्टर सांगतात कीं आतां प्रेक्षक म्हणूनच वागलें पाहिजे. आणि तें म्हणणें खरें आहे असेंच सर्व म्हणतात. तेव्हां आतां इलाज नाहीं. विश्रांति हा शब्द गोड आहे. पण त्याचा अनुभव मात्र तितकासा गोड नाहीं.

( समाप्त )

* * *

# परिशिष्ट

श्री                    रावपुरा, बडोदें

रसिक विद्वन्मित्रवर्यं                    ता. ९ डिसेंबर १९२९

श्रीयुत माधवराव ऊर्फ बापूसाहेब अळतेकर मु० विलेंपार्लें यांस—

ता. २१-१०-२९ रोजीं संमेलनाहून परत बडोद्यास सुखरूप पोहोंचल्याचें पत्र पाठविल्यानंतर आज इतक्या उशीरानें हें दुसरें पत्र लिहित आहे! त्याबद्दल क्षमा असावी. पार्लें येथें असतां---

"सौदामिनीविलसितप्रतिमानकाण्डे
दत्वा कियन्त्यपि दिनानि महेन्द्रभोगान्।"

आपण जें मला धन्य केलें, त्याची फार फार आठवण होते! पण तो सुखाच्या परमावधीचा प्रसंग आतां **गोड दुःखाप्रमाणें** हृदयांत नुसती खळबळ उडवून सोडीत आहे. काय करावें? अस्तु.

मनोरंजनाच्या नवेंबरच्या अंकांत संमेलनाचें सुंदर छायाचित्र पाहिलें. खरोखरीच संस्मरणीय प्रसंग! ह्याच्याच आधींच्या अंकीं आपली सरस रमणीय कविताहि वाचली. दिवाळीनिमित्त काढण्यांत आलेल्या 'मौजे'च्या खास अंकीं 'कालिदासाची सीता' हा आपला लेख वाचून तर नेत्रांतून वारंवार अश्रू कोसळले! हें आपणांस खरें वाटेल काय? मी हें विधान परावाणीनें सत्य असेंच सांगतों. ह्यांत व्याजस्तुतीचा गंधही नाहीं. हल्लीं आपण भेटीदाखल दिलेली मुक्तबंध ही नवलकथा सावकाश वाचीत आहे. **मनाच्या रसायनाप्रमाणें** ह्यांतील **भाषा फारच घोटीव आहे**! अनसूयेच्या रूपवर्णनाचा मासला अश्रुतपूर्व—अपूर्व आहे! कादंबरींतील वस्तुवैचित्र्यांत आणि सरसरम्य वाक्प्रवाहांत चैनीनें पोहणाऱ्याप्रमाणें, मन लहरींतून हलक्या खात जातें! अजून पुस्तक संपूर्ण वाचिलें नाहीं. वरील स्वानुभव, हा दरम्यानचा सांगितला. असो.

आतां जमलेल्या मित्रत्वाच्या नात्याचा फायदा घेण्यासाठीं थोडीशी तसदी देतों. कर्नाटक छापखान्याचे मालक व चालक श्रीयुत मंगेशराव कुळकर्णी हे आपल्या नित्य बैठकीमधील गृहस्थ आहेत. त्यांच्या भेटीसाठीं आपणांस दूरवर जाणें नलगे. भेटींत त्यांना माझ्या पत्राची आठवण द्यावी. कितीतरी दिवस झाले पत्र पाठवून!

पण अजून गृहस्थ उत्तर म्हणून पाठवीत नाहींत ! त्यांनीं विवेकानंदाचा, मी रूपान्तारित केलेला काव्यखंड छापिला काय ? छापिला असल्यास ठरल्याप्रमाणें त्याच्या पांच प्रती, अगर तितक्या देण्याची सवड नसल्यास निदान तीन प्रती कां होईनात, पण माझ्या परिश्रमाच्या मोबदल्याबद्दल मला कांहीं द्याल तर खरें ! मी केलेल्या कविता माझ्या संग्रहीं तर कृपा करून ठेवा ! असें त्यास मित्रत्वाच्या नात्यानें माझ्या वतीनें सांगावें; व काय म्हणतात, तें कळविण्याची मेहेरबानी व्हावी. दुसरें, माझ्या स्वतःच्या काव्यसंग्रहाचें काम रा. अधिकारी यांनीं घोटाळ्यांत टाकिलें आहे ! त्यांना कोठेंहि जुने अंक मिळत नाहींत म्हणून म्हणतात, व त्यामुळें अनुपलब्ध कवितांची प्रेस कॉपी कशी तयार करावी म्हणून चिंता दर्शवितात ! मुंबई येथें नांदेडचे कोणी एक सद्‌गृहस्थ रा. रा. रामेश्वर यादव मुळादकर म्हणून रा. अधिकारी यांचे स्नेही आहेत. ते Sheth Block, Naoreji Street, Thakurdwar, B'b.y No. 2. ह्या ठिकाणीं राहतात. त्यांना रा. अधिकारी यांनीं माझ्या कविता शोधून त्या copy out करून देण्याची कामगिरी सोंपिवली होती. बिचाऱ्यानें पुष्कळ परिश्रम करून बहुतेक कवितांच्या नकलाहि केल्या व प्रेस कॉपी एक महिना श्रम करून तयार केल्याबद्दल रा. अधिकारी ह्यांना पत्रद्वारें खबरहि त्यांनीं दिली. असें असून रा. अधिकारी त्यांना भेटतही नाहींत व उत्तरही देत नाहींत ! आणि मला वरप्रमाणें उलटें भासवितात ! बिचाऱ्या मुळादकरानें मला पत्र लिहून काय करावें म्हणून विचारिलें आहे. तरी आपण येत्या रविवारीं कर्नाटक प्रेसमध्यें त्यांस बोलावून घेऊन व आपणही जाऊन ह्या बिचाऱ्या काव्यप्रेमी मनुष्यास भेटावें व त्यांनीं केलेल्या नकला कृपा करून मजकडे बुकपोस्टानें पाठविण्यास त्यांना सांगावें. मीहि त्यांस पत्र लिहून ह्याप्रमाणें विनंति केलीच आहे. त्यांनीं कविता पाठविल्यास मी त्या तपासून, नक्की करून प्रेस कॉपी final तयार करून देतों आणि आपण रा. मंगेशराव ह्यांस माझा काव्य-

संग्रह छापवून देतां काय म्हणून विचारून जमत असल्यास नक्की करावें. षोडषपत्री एका फॉर्मचा आकारही त्यांनीं मला कळविल्यास एकंदर किती फॉर्म होतील ह्याचा साधारण अंदाज करून मी त्यासंबंधीं पुढील कांहीं तजवीज करीन. मी माझ्या पत्रीं त्यांना हेंच विचारिलें होतें. तरी आपण ज्याअर्थीं माझ्या कवितेबद्दल कळकळ बाळगतां त्याअर्थीं वर विनंति केल्याप्रमाणें ह्या कामीं मला सक्रिय साहाय्य देण्याची कृपा कराल काय? अगर रा. अधिकारी ह्यांनीं ज्या शर्तींवर हा काव्यसंग्रह छापून देण्याचें स्वीकारिलें त्याच शर्तींवर मी हें काम रा. कुळकर्णी यांनाहि देण्यास तयार आहे. त्या शर्ती म्हणजे फर्स्ट कॉपी राइट घेऊन दोन हजार प्रती त्यांनीं काढाव्या व पहिल्या हजाराबद्दल रु. १००, दुसऱ्या हजाराबद्दल रु. ५० आणि १०० प्रती मला द्याव्या ह्या शर्ती सर्वसाधारण आहेत. रा. कुलकर्णी ह्यांना ह्याबद्दल विचारून त्यांचा मनसुबा कळवावा. अथवा दुसरी कांहीं विचारणीय सल्ला असल्यास तीहि कळवावी. पुस्तक तयार झाल्यावर आपण सांगाल त्या दिशेनें युनिव्हर्सिटीच्या बुक कमिटीकडे अर्ज वगैरे करूंच, पण एकदां कसेंहि करून सर्वांगसुंदर असें काव्यसंग्रहाचें पुस्तक छापून निघावें अशी उत्कट इच्छा आहे. ती सिद्धीस नेण्यासाठीं आपली मदत मागतों! तरी ह्या सर्व गोष्टींचा विचार रा. कुळकर्णी ह्यांच्या कमिटींत करून, उत्तर शक्य तितक्या लवकर पाठविण्याची कृपा अवश्य व्हावी.

कर्नाटक प्रेसनें पुस्तक छापून दिल्यास त्याला आपण व विद्वद्वर्य रा. रा. वेलणकर यांनीं सुरेखशी प्रस्तावना जोडावी. हीहि प्रार्थना आत्तांपासूनच करून ठेवितों. मी सर्वस्वीं आपल्या पुरस्कारावर अवलंबून आहे! जाणून आपलेपणाचा अभिमान राखून आपणच नांवारूपास आणिलें पाहिजे. जास्त काय लिहूं!

पत्रविस्तार फार झाला. सबब, तूर्त एवढीच विनंति करून रजा घेतों. सर्व खुलाशाचें उत्तर सवडीप्रमाणें, पण लवकरच यावें ही विनंति. आपल्या मातोश्रीस नमस्कार व घरमंडळीस अनेकोत्तम आशीर्वाद विदित करावे.

आपला--चंद्रशेखर

# शेवटचें पान

गुरुवार ता. २० ऑगस्ट १९५९ रोजीं सकाळीं सुमारें सात वाजतां स्नान करीत असतांनाच माझ्या वडिलांना हृदयविकाराचा झटका आला आणि कसलेहि उपचार करण्यापूर्वींच त्यांचा अंत झाला. अशा प्रकारें माझ्या वडिलांनीं आपल्या आयुष्याच्या ग्रंथाचें अखेरचें पान उलटलें.

विल्सन कॉलेजमधून १९५१ सालीं निवृत्त झाल्यानंतर शेवटचीं आठ दहा वर्षें वडील आजारीच होते. कधीं आजार अधिक असे, तर कधीं त्याचें प्रमाण कमी असे. पण आजार हा अव्याहत चालूच होता. आजाराचा प्रारंभ बराच अगोदर म्हणजे १९४४ सालीं झाला. प्रथम रक्तदाब, नंतर निद्रानाश आणि शेवटीं हृदयविकार अशी या व्याधींची चढती भांजणी होती. या रोगांचें संपूर्ण निराकरण अशक्य होतें. शक्य एकच होतें तें म्हणजे या दुर्धर व्याधींचें सामर्थ्य मान्य करणें, त्यांना शरण जाणें आणि देहांत वस्ती करण्यास आलेल्या या अनाहूत पाहुण्यांच्याबरोबर उरलेलें आयुष्य न भांडतां गुण्यागोविंदानें घालविणें. डॉक्टरांनीं, बरोबरीच्या मित्रांनीं आणि आप्तांनीं ही गोष्ट वडिलांना परोपरीनें पटविण्याचा प्रयत्न केला. वडिलांना हें सगळें कळत होतें, पण त्यांच्या व्यक्तित्वाची ठेवणच अशी होती कीं तें वळणें अशक्य होतें.

माझ्या वडिलांचा स्वभाव हा विलक्षण आग्रही आणि आक्रमक होता. वयोमानामुळें आणि दोनतीन प्रकारच्या व्याधींमुळें देह थकत चालला होता, पण वृत्ति पहिल्याप्रमाणेंच चिरतरुण होती. आपण आजारी आहोंत,

अपंग आहोंत हें वडिलांना दिसत होतें, पण मनाला पटत नव्हतें आणि पटवून घेण्याची इच्छाहि नव्हती. पण गांठ निसर्गाशीं होती. बोलून चालून समर्थांबरोबरचें भांडण! निकाल ठरलेला होता. मोडणें किंवा वांकणें यांखेरीज तिसरा मार्ग नव्हता. माझे वडील मोडले पण शेवटपर्यंत वांकले नाहींत. जवळजवळ दहा वर्षें चाललेला हा सगळा प्रकार हृदयद्रावक तर खराच, पण तसाच तो रोमहर्षकहि होता. जन्माचा मित्र त्याचा कसलाहि प्रमाद नसतांना केवळ परिस्थिति पालटल्यामुळें शत्रु ठरावा, तीच गत वडिलांच्या ठिकाणीं वास्तव्य करून असलेल्या अनेक गुणांची झाली. बिचारे गुण खरे, पण आजारांत दोष म्हणून प्रत्येकजण त्यांना हिडीस फिडीस करूं लागले. निग्रहाला हटवादीपणा, उत्साहाला पोरकटपणा अशीं नवीं नांवें मिळूं लागलीं. या सगळ्यांचा त्याग केला तरच कांहीं तरणोपाय आहे, असा समंजस सल्लाहि रोजच्या औषधाबरोबर रोग्याला देण्यांत येऊं लागला. वडील कधीं शांतपणें ऐकून घेत, कधीं रागावत, कधीं त्रागा करीत, कधीं आजाराचा भोग सहन करणें अशक्य झाल्यामुळें घळघळां रडत, तर क्वचित् आपल्या या जन्माच्या मित्रांना निरोप देण्याचा निष्फळ प्रयत्नहि करीत. कधीं कधीं समाचारास आलेल्या माणसांच्या संगतींत वर्तमान विसरत आणि आपल्या पराक्रमी आणि संपन्न भूतकालाशीं समरस होऊन गप्पा मारीत बसत.

"हें विश्वचि माझें घर," अशा वृत्तीचे माझे वडील, पण शेवटचीं दहा वर्षें त्यांना अशा प्रकारें "घर म्हणजेच विश्व" असें समजून काढावीं लागलीं. सगळ्या शक्ति शाबूत असतांना माझ्या वडिलांचा पाय घरीं कधींच ठरला नाहीं, पण आजारामुळें तो पुढें घरामधून बाहेर कधींहि पडूं शकला नाहीं; प्रवासाप्रमाणेंच लेखन, वाचन, भाषण, संभाषण आणि भोजन या वडिलांच्या अत्यंत प्रिय असणाऱ्या गोष्टी; पण आजारच असा बिनतोड आला कीं या सगळ्या गोष्टींना आळा घातल्याखेरीज गत्यंतर

नव्हतें. आयुष्यांत आढळणाऱ्या सर्व प्रकारच्या उत्कटतेचे आणि भव्यतेचे माझे वडील उपासक होते, केवळ मनानें नव्हे तर कृतीनेंहि. पण शेवटच्या आजारांत मिळमिळीतपणें वागण्याचें त्यांच्या कपाळीं आलें. सिंहासमोर साबूदाण्याची लापशी ठेवावी तसें वडिलांच्यासमोर प्रारब्धानें व्याधिग्रस्त असें मिळमिळीत जिणें ठेवलें. वडिलांनीं शेवटपर्यंत त्याचा धिःकारच केला. आज विचार करतांना त्याचा अभिमान वाटतो, पण त्या वेळीं मात्र तो वडिलांचा हटवादीपणा आणि असमंजसपणा वाटे.

शेवटच्या ५–६ महिन्यांत मात्र वडिलांचें आपल्या आजाराबरोबर असलेलें भांडण जवळ जवळ संपुष्टांत आलें. माझी आजी, वडिलांची आई शेवटचीं दोन वर्षें भ्रमिष्ट झाली होती, पण शरिरानें काटक आणि निरोगी होती. दांत, कान आणि डोळे शेवटपर्यंत शाबूत होते. वडिलांच्या प्रदीर्घ आजाराचा परिणाम शेवटीं शेवटीं तिच्या डोक्यावर झाला. १९५९ च्या मार्च महिन्यांत आजी मरण पावली. तिच्याबरोबरच एक मोठें भय दोघांना आणि सर्वांना वाटत होतें तें संपलें. दैवानें येवढी तरी खैर केल्यामुळें वळचणीचें पाणी आढ्याला गेलें नाहीं. एका मोठ्या चिंतेंतून वडील सुटले आणि दैवाबद्दल वाटणारी कृतज्ञताच व्यक्त करण्याकरितां कीं काय संतोषानें आणि शांतपणें राहूं लागले. "ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें," हें वचन त्यांनीं शेवटच्या चारपांच महिन्यांत अहोरात्र अंमलांत आणलें. आपल्या नातवंडांबरोबर खेळावयाचें, त्यांना कथा सांगावयाच्या, रोजचीं वर्तमानपत्रें आणि कांहीं सटरफटर पुस्तकें वाचावयाचीं, आकाशवाणीवरील बातम्या ऐकावयाच्या आणि ताटांत वाढतील तें बिनतक्रार सेवन करावयाचें— खरोखर हा झालेला बदल बघून आम्ही सर्व चकलों. वाटलें आतां वडिलांची प्रकृति सुधारणार आणि आम्हांला अनेक वर्षें त्यांचा सहवास लाभणार. खरोखर प्रतिकारसामर्थ्य कमी झाल्याचें तें लक्षण होतें. दिवा विझण्यापूर्वीं मोठा होतो असें म्हणतात—येथें मात्र अनेक वर्षें फार प्रखर असणारा

आणि शेवटचीं कांहीं वर्षे आंतल्या आंत आपल्याला जाळून घेणारा दिवा मंदावत होता—आम्हांला भ्रम झाला होता, तो सौम्य आणि शीतल होतो आहे. पण २० ऑगस्ट १९५९ रोजीं हा सतत आपल्या तेजानें तळपणारा आणि सर्वांना प्रकाश देणारा दिवा कायमचा मालवला.

माझ्या वडिलांचें चरित्र अलौकिक खास नव्हतें, पण तें मोठें होतें, हें तितकेंच खरें. अलौकिकपणाची मूर्ति स्वयंभू असते; उलट मोठेपणाची घडविलेली असते. अलौकिकाला प्रतिभेचा दिव्य स्पर्श झालेला असतो, तर मोठेपणाचा पाया केवळ मानवी परिश्रम हा असतो. अलौकिकाचें आकर्षण, अभ्यास आणि अनुकरण यांमधून मोठेपणाचा जन्म होतो. घरोघर पाळणे असतात आणि त्यांत दिसणारे मुलांचे पाय एकासारखे एकच असतात. लेखन, वाचन, भाषण, राजकारण आणि समाजकारण यासंबंधीं बहुतेक लोकांच्या विद्यार्थिदशेंत ज्या प्रतिक्रिया असतात तशाच माझ्या वडिलांच्याहि होत्या. फरक इतकाच कीं इतर मुलांची याबद्दलची आवड कालांतरानें ओसरते. पण वडिलांची आवड म्हणा, वेड म्हणा, उत्तरोत्तर वाढतच गेलें. आपल्याला लहानपणीं अनेक थोर पुरुषांचें दर्शन घडतें, कांहीं काल त्यामुळें आपण भारावतों आणि मग कांहीं दिवसांनंतर सर्व विसरतों. कोल्हापूरला शाळेंत असतांना वडिलांनीं ना. गोखल्यांना व लो. टिळकांना जवळून बघितलें. दोघांचाहि अलौकिकपणा इतरांच्याप्रमाणेंच त्यांनाहि जाणवला. पण या दोन पुरुषांच्या विचारसरणीचा आणि चरित्राचा परिणाम जो उत्तर-काळांत त्यांच्यावर होणार होता त्याची मात्र या मुलाला कल्पना नव्हती.

या सगळ्या गोष्टींमुळें अवांतर वाचनाची व त्यावर वादविवाद करण्याची आवड जी निर्माण झाली ती सांवलीप्रमाणें वडिलांना शेवटपर्यंत साथ देत होती. केवळ शाळा आणि कॉलेज एवढ्यापुरताच जर विचार केला तर या अवांतर वाचनामुळें व लेखन, भाषणादि उद्योगांमुळें या बुद्धिमान

विद्यार्थ्यांचा थोडाफार तोटाच झाला. त्यांतच आजीच्या आजाराची भर पडली आणि त्यामुळें सर्व विषयांत चांगली गति असूनहि वडिलांना मॅट्रिक-नंतरच्या जवळजवळ प्रत्येक परीक्षेंत पहिल्या प्रयत्नांत अपयश आलें. नियमितपणा आणि शिस्त या जोडगोळीचें आणि माझ्या वडिलांचें फारसें सख्य नव्हतें. पण पन्नास वर्षांनंतर सगळा जमाखर्च डोळ्यांसमोर आणून वडील आपल्या आत्मचरित्रांत बेफिकीरपणें आणि समाधानानें लिहितात, "माझ्या अंतःकरणांत वक्ता आणि लेखक बनण्याची इच्छा अगदीं लहान वयांत झाली. त्यामुळें जरी माझी पुष्कळ लोक वाहवा करीत, तरी माझ्या अभ्यासांत बराच व्यत्यय आला असें मला वाटतें...त्यामुळें लहानपणापासून नियमितपणा आणि शिस्त यांकडे माझें दुर्लक्ष झालें. पण नियमितपणा आणि शिस्त यांच्या शासनांत असलेल्या पुष्कळ मंडळींचेंहि पुढें काय झालें हें पाहिलें म्हणजे नाखूष होतां येत नाहीं." ( उलटलेलीं पानें–पृ. ६–७ ) हा आयुष्याच्या अखेरीस लिहिलेला हिशेब खोटा नाहीं. कारण या अवांतर उद्योगावरच व त्यामुळें परीक्षेंत प्राप्त झालेल्या अपयशावरच वडिलांच्या कर्तृत्वाची व कीर्तीची इमारत आज उभी आहे हें विसरून चालणार नाहीं.

विज्ञानाचें, संशोधनाचें आणि त्यासाठीं परदेशांत जाण्याचें विद्यार्थि-दशेंत वडिलांना फार वेड होतें. पण प्रतिकूल परिस्थितीच्या प्रखर तापामुळें हें मनोराज्य धुक्याप्रमाणें वितळलें. मात्र हेच विचार आणि ह्याच निष्फळ ठरलेल्या आकांक्षा कादंबऱ्यांत आकाराला आलेल्या दिसतात. 'शांताराम' आणि 'मुक्तबंध' या कादंबऱ्यांतील नायक एकटेच नव्हे तर, सहकुटुंब परदेशांत जाण्यास निघतात आणि तेथेंच कथेची इतिश्री होते.

अवांतर वाचनावरून आठवण झाली. एकदां या अवांतर वाचनाचें वडिलांचे बाळपणचे एक मित्र डॉ. सोवनी यांनीं फार मार्मिक आणि विनोदी वर्णन केलें होतें; डॉ. सोवनी मला म्हणाले, "आम्ही परीक्षेला लावलेलीं पुस्तकें नीटपणें वाचीत असूं. 'रघुवंशा'चे दोन सर्ग असतील,

' व्हिकार ऑफ वेकफील्ड ' या कादंबरीचीं पहिलीं शंभर पानें असतील तर त्यांचा प्रथम काळजीपूर्वक अभ्यास करावयाचा आणि उरलेल्या वेळांत इतर वाचन करावयाचें. पण तुझ्या बापाचा खाक्या वेगळा होता. परीक्षेला नेमलें असेल तें नेमकें शेवटीं वाचावयास ठेवून त्या त्या लेखकाचें इतर सर्व वाङ्मय वाचून काढण्यांत वेळ घालवावयाचा. यामुळें परीक्षेंत जेवढें विचारलें असेल तेवढेंच नेमकें सोडून बाकी सर्व ज्ञान तुझ्या बापाला असे.'' वडिलांनीं अनेक ठिकाणीं आपल्या पुस्तकांत, शेंकडों वेळां आपल्या जाहीर भाषणांत आणि असंख्य वेळां आपल्या संभाषणामधून या ' परीक्षार्थी ' वाचनाचा व वृत्तीचा उपहासगर्भ समाचार घेतला आहे. त्यावर उतारा म्हणून वरील डॉक्टरमित्रांचे उद्गार दिले आहेत.

एखाद्या व्यक्तीवर करावें तसें वडिलांनीं मुंबई शहरावर आमरण प्रेम केलें. मुंबई शहरावर केलेली टीका त्यांना अगदीं खपत नसे. मुंबईची हवा, मुंबईची गर्दी, मुंबईचा बकालीपणा आणि मुंबईची महागाई यांबद्दल सर्वांचें एकमत असतें. पण माझ्या वडिलांना मात्र या शहरांत एकहि दोष दिसत नसे. पोटासाठीं या शहराचा आश्रय घ्यावयाचा, संसार करावयाचा, पैसा सांठवायचा आणि वर अशा उपकारकर्त्या शहरावर उठल्यासुठल्या टीका करावयाची हा वडिलांच्या दृष्टीनें अक्षम्य कृतघ्नपणा होता. प्रेम आंधळें असतें म्हणतात तें अशा वेळीं पटतें. मॅट्रिकच्या परीक्षेला आले त्याच वेळीं माझ्या वडिलांचें या मुंबासुंदरीवर ' प्रथमदर्शनीं प्रेम ' बसलें. विज्ञानाच्या बाबतींत जसा आशाभंग झाला तसा प्रेमभंग या नगरीबाबत झाला नाहीं. १९१५ सालीं कायमचें वास्तव्य करण्यासाठीं म्हणून वडिलांनीं या शहरांत प्रवेश केला आणि १९५९ सालीं चव्वेचाळीस वर्षांच्या दीर्घ सहवासानंतर मृत्यूनेंच दोघांच्यामध्यें दुरावा निर्माण केला. वडिलांचा जन्म कोल्हापुरांत झालेला असला आणि कांहीं वर्षें शिक्षणासाठीं पुण्यांत काढलीं असलीं तरी अनेक अर्थांनीं त्यांना ' द्विजत्व '

प्राप्त झालें तें या मुंबई शहरांतच. मृत्यूनंतर मुंबई महानगरपालिकेनें या कर्तृत्ववान् आणि एकनिष्ठ नागरिकाविषयीं केलेला गौरवाचा ठराव म्हणजे जन्मभर केलेल्या या निर्व्याज प्रेमाची मिळालेली कायदेशीर पावतीच होय.

वडील इंटरची परीक्षा पास झाले. राजाराम कॉलेजमध्यें पुढील शिक्षणाची सोय नसल्यामुळें माझ्या आजीनें आपलें बिंचवाचें बिऱ्हाड १९१० सालीं कोल्हापूरहून पुण्यास हलविलें. एक तर मुलाला स्वतंत्रपणें वसतिगृहांत ठेवण्याइतका पैसा तिच्याजवळ नव्हता आणि दोन मुलांशिवाय तिला जवळचें असें कोणी नव्हतें. पुढील पांच वर्षें या कुटुंबाचें वास्तव्य पुण्यांत होतें. कमवा आणि शिका ( Earn and Learn ) हा स्वावलंबनाचा पाठ वडिलांनीं पुणें शहरांतच प्रथम गिरविला. कधीं शिकवण्या करून, कधीं मॅट्रिकचे वर्ग चालवून आणि शेवटीं ज्ञानप्रकाशांत उपसंपादकाची नोकरी करून वडिलांचें 'द्रव्यार्जन' आणि 'ज्ञानार्जन' चालें. मिळविलेल्या पैशांतला बराचसा भाग हा आजीच्या आजाराप्रीत्यर्थ खर्च होई. १९१२ सालीं लग्न झाल्यानंतर हा खर्च कमी न होतां अधिकच वाढला.

जसा मुंबई शहराचा तसाच फर्ग्युसन कॉलेजचा माझ्या वडिलांना लोभ होता. रँ. परांजपे हे तर या बुद्धिवादी तरुणाला देवाप्रमाणें आदरणीय आणि प्रिय वाटत. ना. गोखल्यांचा भारतसेवक समाज, कर्व्यांचा हिंगणें येथील अनाथबालिकाश्रम आणि सुप्रसिद्ध कादंबरीकार हरिभाऊ आपटे हीं वडिलांचीं आणखी तीन श्रद्धास्थानें होतीं. आगरकरांच्या विचारसरणींतून आणि चरित्रांतून निर्माण झालेल्या सर्व परंपरांचा, संस्थांचा व वाङ्मयाचा त्यांना फार अभिमान होता. यामुळेंच बहुधा केशवसुत, हरिभाऊ आपटे आणि कोल्हटकर यांच्याबद्दल जितका अभिमान आणि आत्मीयता माझ्या वडिलांना वाटे तशी ती खाडिलकर, परांजपे किंवा केळकर यांच्याबद्दल वाटत नसे. एका गोष्टीचा मात्र नीट उलगडा होत नाहीं. सरकारी नोकरीचा, सत्तेचा किंवा संपत्तीचा अभिलाष नसूनहि

वडिलांनीं लो. टिळकांच्या शब्दांत लिहावयाचें म्हणजे, " संपूर्ण आगरकर कां पचवला नाहीं ?" बोलक्या आणि ढोंगी सुधारकांचा वडिलांना पूर्ण तिटकाराच होता. त्यांचे विचार सुधारकी असूनहि वर्तन अतिशय सोंवळें— अगदीं सनातनी म्हणावें इतकें सोंवळें होतें. आगरकरांनीं वर्णन केलेल्या एकाहि 'डी' कारांताची (अंडी, ब्रँडी वगैरे) त्यांना तोंड-ओळखसुद्धां नव्हती. बहुसंख्य सुधारकांनीं केला तसा समाजापासून अलग राहण्याचा, त्याचा तिरस्कार करण्याचा व आपली स्वतंत्र जात निर्माण करण्याचा उपद्व्याप माझ्या वडिलांनीं कधींच केला नाहीं. म्हणजे त्या काळीं मवाळ राजकारणामुळें व सुधारकी मतांमुळें मिळणारा एकहि फायदा वा गैरफायदा वडिलांनीं घेतला नाहीं; तर उलट तो लाथाडला. राजकारण जहाल तर समाजकारण मवाळ आणि समाजकारण जहाल तर राजकारण मवाळ असा कांहीं कायदा नव्हता. आगरकरांचीं सुधारकी मतें आणि टिळकांचीं राजकीय मतें यांचा गुणाकार म्हणजे क्रांतिकारक सावरकरांचा अवतार होय. पण हें झालें थोडें मोठें उदाहरण. अगदीं घरच्याच दाखला द्यावयाचा म्हणजे रामभाऊ रुईकर आणि शंकरराव जावडेकर यांचा. माझे वडील आणि हे दोघे असे तिघेजण या काळीं कॉलेजांत शिकत होते. इतकेंच नव्हे तर एकत्र राहात होते. एकत्र विचारांचा विनिमय करीत होते. " आगरकरांची आणि गोखल्यांची ओळख आम्हांला बापूरावांच्यामुळें झाली, " असे उद्गार दोघांनींहि अनेकदां काढलेले आहेत. समाजकारण व राजकारण हीं एकच होत, दोन नव्हेत ही दोघांचीहि विचारसरणी होती. रुईकरांना व जावडेकरांना जें जमलें तें वडिलांना कां जमलें नाहीं ? अनेक ठिकाणीं आणि खुद्द आत्मचरित्रांतहि वडिलांनीं यासंबंधीं विवेचन केलेलें आहे. पण तें थोडें अपूर्ण वाटतें. टिळकांच्या राजकारणांतले व प्रतिपक्षा-बरोबर वागण्यांतले सर्व अवगुण मान्य करूनहि नेमस्तांच्या राजकारणाचा मोठेपणा सिद्ध होत नाहीं. वडिलांचे पूर्वग्रह फार प्रखर असत आणि

अनेकदां युक्तिवाद करूनहि त्यांचा निरास करणें अशक्य असे. त्याबरोबरच स्वतः व्यक्तिस्वातंत्र्याचे आणि लोकशाहीचे प्रखर पुरस्कर्ते असूनहि जिकडे बहुमत असेल त्या पक्षाबद्दल व मतांबद्दल वडील सदैव साशंक असत. लोकगंगा किंवा जनताजनार्दन हे वडिलांचे कायमचे उपहासाचे विषय होते. वडिलांची तात्त्विक बैठक बळकट असली तरी प्रत्यक्ष वादविवाद करतांना सिद्धान्त मांडण्यांऐवजीं व्यक्तिगत पूर्वग्रहानें रंगलेलीं मतें मांडण्याकडे त्यांची कधीं कधीं प्रवृत्ति होई. अशक्तांचें रक्षण करणें हें दाक्षिण्याचें लक्षण होय. पडत्या पक्षांचा किंवा मतांचा कैवार घेण्याचें हें दाक्षिण्य वडिलांच्या व्यक्तित्वांत कोठेंतरी घर करून राहिलें असावें असा एक पुसट संशय येतो. वडिलांचें भाषण आणि लेखन कितीहि जहाल आणि तिखट असलें तरी त्यांचा स्वभाव विधायक आणि सनदशीर होता. जहाल राजकारणांत विध्वंसाचा आणि विघटनेचा भाग बराच असतो. पण नेमक्या याच गोष्टींचा त्यांना तिटकारा होता. नेमस्तांचें राजकारण कसेंहि असलें तरी त्यांत विद्वत्ता आणि व्यासंग हे प्रामुख्यानें आढळत. तसेंच बुद्धिवादी असूनहि वडिलांच्या स्वभावांत विभूतिपूजेचा अंश निश्चित होता.

१९१३ सालीं वडील एकदम प्रसिद्धीच्या प्रकाशांत आले. 'विद्याहरण' या खाडिलकरांच्या नाटकावर ज्ञानप्रकाशमधून तीन लेख लिहून त्यांनीं कडाडून हल्ला चढविला. " धटिंगण कविब्रुवांचा संप्रदाय " या लेखमालेच्या नांवावरूनच आंतील मजकूर किती तिखट आणि चावरा असेल याची कल्पना येईल. धडाडीनें हल्ला चढविणें हें केवळ बचावाचेंच नव्हे तर आत्मप्रसिद्धीचें उत्तम साधन असतें. हे लेख आज उपलब्ध नाहींत, पण वाङ्मयीन टीकेपेक्षां राजकीय आणि सामाजिक मतभिन्नतेचाच प्रभाव या लेखांत अधिक असावा असें वाटतें. ही लेखमाला वाचल्यावर गोविंद वासुदेव कानिटकर हे या तरुण लेखकाला मुद्दाम भेटले आणि

" आगरकरांच्या भाषेची आठवण झाली, " असा त्याचा त्यांनीं गौरव केला.

या लेखमालेपासून वडिलांचा तडफदार लेखणीचा आणि डौलदार शैलीचा लेखक म्हणून लौकिक झाला. थोड्याच काळांत ज्ञानप्रकाशांत उपसंपादक म्हणून वडील प्रविष्ट झाले व प्रपंचास हातभार लावतांना राजकारणाचा व समाजकारणाचा परमार्थहि साधूं लागले. ज्ञानप्रकाशांत गेल्यामुळेंच भारतसेवक समाजांतील शास्त्री, कुंझरू, ठक्कर, द्रविड, देवधर, जोशी, आंबेकर, वझे इ. लहानमोठ्या व्यक्तींचा परिचय झाला. बापूराव आंबेकरांच्या हाताखालीं या उपसंपादकानें वृत्तपत्रव्यवसायाचे पहिले धडे गिरविले. ' विद्याहरणा 'वरील लेखमालेमुळें कोल्हटकर, गडकरी आणि केळकर या तिघांचा व वडिलांचा प्रत्यक्ष परिचय झाला व तो पुढें वाढतच गेला. केळकर आणि खाडिलकर यांचे त्या वेळचे संबंध लक्षांत घेतले म्हणजे ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालेली ही लेखमाला केळकरांना कां आवडली असावी याचें एक कारण लक्षांत येईल.

ज्ञानप्रकाशांत असतांनाच बातमीदार म्हणून मुंबईच्या कायदेकौन्सिलांत वडिलांना डोक्याला रुमाल बांधून जावें लागे. तेथील भाषणांचें, प्रश्नोत्तरांचें व वादविवादांचें मराठीमध्यें प्रतिवृत्त देणें व त्यासाठीं मूळ इंग्रजीचा मराठींत अनुवाद करणें हा वृत्तपत्रीय अभ्यासाचा कंटाळवाणा पण आवश्यक असा आणखी एक भाग होता.

या उद्योगामुळें कॉलेजमधील अभ्यास मात्र मागासला. खुद्द गणित हा विषय आणि तो शिकविणारे रँ. परांजपे या दोघांच्याहिबद्दल वडिलांना फार प्रेम. त्यांनीं मोठ्या उत्साहानें बी. ए. ला गणित विषय घेतला, पण अभ्यासाला वेळ न मिळाल्यामुळें परीक्षेंत अपयश आलें. तेव्हां अर्थशास्त्र हा विषय घेऊन वडील पुढें बी. ए. ची आणि एम्. ए.ची परीक्षा उतरले. अर्थशास्त्र, इतिहास व राजकारण या तीन विषयांचा अभ्यास वडिलांना

पुढें वृत्तपत्रकार, लेखक आणि प्राध्यापक म्हणून काम करतांना फार उपयोगी पडला. शिवाय रोजच्या राजकारणांत आणि समाजकारणांत वडील प्रत्यक्ष भाग घेत होते. यामुळें साहित्यिकांत आढळणारा 'संकुचितपणा,' वृत्तपत्रकारांत आढळणारा 'उथळपणा' आणि प्राध्यापकांत आढळणारा 'पुस्तकीपणा' या त्रिदोषांपासून वडील अलिप्त राहिले.

प्रत्येक माणसाच्या आयुष्यांत असा एक तरी प्रसंग येतो कीं जो त्या माणसाची कुवत जोखतो आणि त्याच्या पुढील वर्तनक्रमाची दिशा ठरवितो. विशाळगड संस्थानचे युवराज बाबासाहेब प्रतिनिधि यांनीं १५० रु. पगारावर खासगी चिटणीस म्हणून येण्याचा वडिलाना फार आग्रह केला. त्या काळीं १५० रु. आणि तेसुद्धां महिना जेमतेम ४०-५० रुपये प्राप्ति असणाऱ्या आणि आयुष्यांत अजून कसलेंच स्थैर्य नसलेल्या प्रापंचिक तरुणाला कमी नव्हते. परत भविष्यकाळांत कुबेराचें भांडार मिळणार होतें असेंहि नाहीं. नोकरी मग ती संस्थानी असो अगर सरकारी असो, तिचा स्वीकार करावयाचा नाहीं हा निश्चय टिळक आणि आगरकरांचा डोळयांसमोर आदर्श असल्यामुळें या वेळीं जो एकदां ठरला तो आमरण कायम होता. १५० रु.ची ही नोकरी वडिलांनीं नाकारली इतकेंच नव्हे तर मुंबईच्या 'इंदुप्रकाश' या वृत्तपत्रांत संपादकाची नोकरी आपणहून मागून घेतली. संपादक हें नांव मोठें असलें तरी पगार फक्त ६० रु.च होता. पण या अपुऱ्या पगाराच्या काडीचा आधार घेऊन त्या काळींहि महागाईबद्दल प्रसिद्ध असलेल्या मुंबई शहराच्या महासागरांत या तरुण संपादकानें उत्साहानें संसारासकट उडी मारली. मुंबईत आल्यानंतर कांहीं महिन्यांनीं माझे धाकटे चुलते मरण पावले. दैनंदिन जीवनांत या धाकट्या भावाबद्दल मी वडिलांच्या तोंडून केव्हांहि चकारशब्द ऐकला नाहीं आणि आत्मचरित्रांतहि जवळ जवळ तीच स्थिति आहे. असें कां व्हावें कळत नाहीं. दोघे एकत्रच राहात होते आणि दोघांत कसल्याहि प्रकारचें कधींहि वितुष्ट आलेलें नव्हतें.

कधीं कधीं माझी आजी आपल्या मुलावर रागावली किंवा नाराज झाली कीं तिला या आपल्या अकालीं मृत्यु पावलेल्या लहान मुलाची राहून राहून आठवण येई आणि मग या दोन भावांच्या स्वभावांत असणारा भेद ती स्पष्ट शब्दांत व्यक्त करी. यावरून माझे चुलते हे अतिशय शांत आणि समजूतदार वृत्तीचे होते असें वाटतें. या आपल्या मुलाच्या मृत्यूमुळें माझी आजी कांहीं दिवस जवळजवळ वेडीच झाली होती. पुढें हिमालयाची यात्रा करून आल्यावर तिची दुःखानें विकृत झालेली वृत्ति परत मूळ पदावर आली. योगायोग असा कीं जवळजवळ बेचाळीस त्रेचाळीस वर्षांनंतर आपल्या थोरल्या मुलाच्या आजारामुळें आणि त्याला आपल्या अगोदर मृत्यु येतो कीं काय या भयामुळें ती परत जवळ जवळ दोन वर्षे भ्रमिष्ट झाली आणि त्यांतच शेवटीं मृत्यु पावली.

२ जुलै १९१६ रोजीं मुंबई शहरांत ‘आगरकर डे’ साजरा करण्यांत आला. अच्युतराव कोल्हटकर यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे माझे वडील हे, “या आयडियाचे जनक, संवर्धक व परिपोषक होते.” पण यासंबधीं आत्मचरित्रांत भरपूर माहिती आली असल्यामुळें त्यांत अधिक भर घालण्याचें कारण नाहीं. ‘आगरकर डे’बद्दल लिहितांना या आगरकर-भक्ताचा ‘बिनमुरलेलें लोणचें’ असा थोडासा उपहासानें पण बराचसा कौतुकानें कोल्हटकरांनीं उल्लेख केला होता. चांगलें असो किंवा वाईट असो, पण आपलें अस्तित्व जगाला जाणवूं लागणें हें मोठेपणाचें एक लक्षण आहे. खुद्द टिळकांना नसला तरी त्यांच्या अनेक परमभक्तांना या ‘बिनमुरलेल्या लोणच्या’चा ठसका बरेच दिवस चांगलाच जाणवला. “मतें मवाळाचीं पण भाषा मात्र जहालाची,” असें ‘इंदुप्रकाशां’त लिहितांना आणि व्यासपीठांवरून भाषणें करतांना वडिलाचें अभिनव धोरण होतें. यामुळें इंदु-प्रकाशचा खप आणि त्याच्या संपादकाची अप्रियता ही समाजांत बरोबरीनें वाढूं लागली. पण यामुळेंच नेमस्त आणि सुधारकी मतें असणाऱ्या अनेक

प्रतिष्ठित व्यक्तींचा परिचय झाला. सर नारायण चंदावरकर आणि जयकर हीं त्यांपैकीं दोन मोठीं नांवें. दामोदर गणेश पाध्ये, दिनकर महादेव आणि श्रीपाद महादेव वर्दे, काणेकर ( शारदाश्रमवासी ), प्रो. वसंतराव नाईक, प्रो. न. र. फाटक अशीं अनेक इतर नांवें सांगतां येतील.

'मनोरंजन' मासिकाच्या 'आगरकर खास अंका'च्या बहुतेक संपादनाचें आणि सामुग्री संकलन करण्याचें काम वडिलांनींच केलें होतें. या अंकांत त्यांनीं आगरकरांचें एक छोटेखानी चरित्रहि लिहिलें होतें. या रोपट्याचेंच पुढें १९३० सालीं, "गोपाळ गणेश आगरकर चरित्रात्मक निबंध" या मोठ्या वृक्षांत रूपांतर झालें. 'आगरकर डे'नंतर वडील चरित्र लिहिण्याच्या दृष्टीनें जोरांत प्रयत्न करूं लागले. पण प्रत्यक्ष चरित्र प्रसिद्ध होण्यास जवळजवळ १५ वर्षें लागलीं. याचें एक कारण असें कीं, कित्येक वर्षें टिळकांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा जो राजीनामा दिला होता त्याची प्रत मिळत नव्हती. एकदां खुद्द टिळकांच्याकडेच उठून हे आगरकरांचे भावी चरित्रकार गेले आणि विनम्रपणें त्यांनीं राजिनाम्याच्या प्रतीची मागणी केली. टिळकांनीं ती नाकारली. त्यांचें उत्तर रोखठोक व व्यवहाराला धरून होतें, "मला शिव्या देण्यासाठीं तुम्ही आगरकरांचें चरित्र लिहिणार आणि म्हणून माझ्या राजिनाम्याची प्रत तुम्हांला मिळणार नाहीं." राजिनामा कां मिळत नव्हता आणि तो पुढें कसा मिळाला याचा इतिहास मनोरंजक आणि टिळकांच्या सार्वजनिक नीतीवर विदारक प्रकाश टाकणारा असला तरी तो येथें अप्रस्तुत आहे.

वडिलांनीं सरकारी नोकरी जशी कधींहि केली नाहीं, तसे ते चाळींतहि कधीं राहिले नाहींत. इंदुप्रकाशांत दरमहा ६० रु. पगार असतांना २२॥ रु. भाड्याच्या तीन खोल्यांच्या स्वतंत्र गाळ्यांत वडील राहात होते. "लहान जागेंत राहणाऱ्या माणसांचीं मनेंहि लहान होतात" असें त्यांचें ठाम मत होतें.

"पैसा खर्च करण्यासाठीं असतो, बचत करण्यासाठीं नसतो" असें वडिलांचें देशस्थी अर्थशास्त्र होतें. पण बँक या संस्थेवर त्यांचा तितकाच विश्वास होता. पैसे थोडेच, पण ते दोन-तीन बँकांत विखुरलेले असत. पैसे थोडेफार शिल्लक टाकणें हा हेतु नसून कोणालाहि पैसे देतांना ते रोख न देतां चेकनें आणि तेसुद्धां क्रॉस आणि ऑर्डर चेकनें देणें ही वडिलांच्या व्यवहारकौशल्याची व सावधपणाची परिसीमा होती. बेअरर चेक मागणारा माणूस हा बहुधा लबाड असतो असें त्यांचें एक आवडतें अवलोकन होतें; कारण घेणाऱ्याला बेअरर चेक आपल्या खात्यावर सक्तीनें जमा करावा लागत नसल्यामुळें खऱ्या प्रातीचा थांगपत्ता लागूं न देतां त्याला नामानिराळें राहतां येतें.

मिळत असलेला पैसा अपुरा असल्यामुळें प्रपंचाचीं दोन्हीं टोंकें मिळविण्यासाठीं वडिलांनीं मराठींतून व इंग्रजींतून एकांडया ( Free lance) लेखनास प्रारंभ केला. वृत्तपत्रव्यवसायच असा आहे कीं तेथें 'मदायत्तं तु पौरुषम्' या तत्त्वालाच महत्त्व असतें. विषय वाङ्मयीन असो, राजकीय असो किंवा आर्थिक असो, या नवोदित लेखकाची लेखणी सारख्याच कुशलतेनें चालूं शके. जी स्थिति लेखणीची तीच स्थिति वाणीची. मराठीप्रमाणेंच इंग्रजी भाषेमध्येंहि अस्खलित भाषण करण्याचा वडिलांना याच काळांत सराव झाला. पुढें कांहीं वर्षांनंतर निघालेल्या नेमस्त पक्षाच्या प्रचाराचें काम वडिलांनीं जिल्ह्याजिल्ह्यामधून मोठ्या उत्साहानें केलें. यामुळें आज जो संयुक्त महाराष्ट्र आहे त्याच्या सर्व भागांत वडिलांनीं प्रवास केला. देशाटन, पंडितमैत्री आणि सभेंत संचार केल्यामुळें मनुष्यस्वभावविषयक किंवा जीवनाविषयक शहाणपण किंवा चातुर्य फार मोठ्या प्रमाणांत पदरचा पैसा फारसा न खर्च करतां वडिलांना प्राप्त झालें. ( पुढें प्रवास करतांना पदरचा पैसा अधिक खर्च करीत तें वेगळें! ) भारतांतल्या कोणत्याहि प्रांतांत, शहरांत फार काय गांवांत गेले तरी

वडिलांचीं दोनतीन ओळखीचीं कुळें हीं निघावयाचींच. वडिलांच्या इतक्या ओळखी कशा हें मला लहानपणीं कळत नसे. पण आतां आत्मचरित्र वाचतांना त्याचा उलगडा होतो. वडिलांचा प्रवास, वडिलांचीं भाषणें आणि त्यांच्या अक्षरशः शेंकडों ओळखी या मी प्रत्यक्ष डोळ्यांनीं बघितलेल्या आहेत. कारण मी एकुलता एक मुलगा (किंवा मूल) असल्यामुळें वडिलांच्या सहवासाची आणि म्हणून प्रवासाची जास्तींत जास्त सक्ती माझ्यावर झाली. अस्मादिक २॥–३ वर्षांच्या उमरीचे असतांना वडिलांच्या बरोबर हट्टानें गोव्यापर्यंत जाऊन आले! वडिलांच्या लहानमोठ्या स्वारीशिकारींत त्यांचा सँको पँझा होण्याचें भाग्य मला लाभलें होतें. गोव्याला केलेल्या पहिल्या प्रवासानंतर मला प्रवासाला न्या असा हट्ट मी कधींच केला नाहीं. पुढें वडीलच हट्टानें मला प्रवासाला नेत. त्या वेळीं हा प्रवास आणि ठिकठिकाणीं मोठ्या माणसांचा होणारा सहवास मला नकोसा वाटे. पण आज मात्र पटतें कीं केवळ वडिलांच्या पुण्याईमुळें आणि प्रेमामुळें अखिल भारतांतील अनेक प्रसिद्ध माणसें मला बघायला आणि बोलायला मिळालीं. त्याचबरोबर (जरी त्या वेळीं त्याचें महत्त्व कळलें नाहीं तरी) वडिलांचे या मोठ्या माणसांशीं असणारे संबंध किती जिव्हाळ्याचे, किती बरोबरीचे आणि मोकळ्या मनाचे होते याचें आज आश्चर्य आणि कौतुक वाटतें. वडिलांच्या ओळखीचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे त्या ‘पक्षपाती’ नव्हत्या. वडिलांच्या परिचयाला मतांचीं, पक्षांचीं, वयाचीं, पैशाचीं किंवा प्रतिष्ठेचीं बंधनें नव्हतीं. वडिलांच्या हिशेबीं महत्त्व फक्त माणसाला होतें. कुठल्याहि प्रकारच्या स्वार्थासाठीं वडिलांनीं कोणाहि सधन, सत्ताधारी किंवा विद्वान् माणसाशीं स्नेह संपादन केला नाहीं आणि त्या दृष्टीनें बुद्धिपुरस्सर तो वाढविलाहि नाहीं. वडिलांचे सर्व स्नेहसंबंध निरपेक्ष आणि निर्लोभ होते. आशाबद्ध नसल्यामुळें वडिलांचा धाक, भय किंवा तिटकारा कोणालाहि कधींहि वाटला नाहीं. उलट त्यांच्याबद्दल

आदराची आणि आपुलकीची भावना सर्वत्र आढळून येई. अनेक जातींतले आणि अनेक धर्मांतले लोक वडिलांचे मित्र होते. वडिलांचा कट्टर शाकाहार आणि निर्व्यसनीपणा त्यांना कोठेंहि अडवूं शकला नाहीं, किंवा त्यामुळें इतरांना उपाधीहि झाली नाहीं. कारण या दोन्हीहि गोष्टींचें त्यांनीं कधींहि नैतिक अवडंबर माजविलें नाहीं.

या निर्लोभी, निरपेक्ष आणि निर्व्यसनी वृत्तीमधून वडिलांच्यांत सतत वास्तव्य करणाऱ्या निर्भयपणाचा आणि स्पष्टोक्तीचा जन्म झाला होता. "निस्पृहस्य तृणं जगत्" या वचनाचें अनेकदां स्मरण वडिलांचें दैनंदिन वर्तन बघतांना होई. पहिली बायको जिवंत असतांना 'बौद्धिक सहवासाकरितां' म्हणा, किंवा आणखी कशाकरितां म्हणा, दुसरें लग्न करण्याला वडिलांचा सक्त विरोध होता. अशीं दोन लग्नें मला अजून आठवतात—कोणाचीं तें सांगत नाहीं—कीं त्या वेळीं लग्न करणाऱ्या व्यक्तींच्या तोंडावर—मागें नव्हे—वडिलांनीं कसलीहि भीडभाड न धरतां, आपल्या मतांना कसलीहि मुरड न घालतां अगदीं खणखणीत शब्दांत निषेध व्यक्त केला व ते लग्नाला हजर राहिले नाहींत. निषेध व्यक्त करण्यास, नाहीं म्हणण्यास, अप्रिय पण पथ्य-कर बोलण्यास माणसांत नैतिक धैर्य लागतें, तें माझ्या वडिलांच्यांत भरपूर होतें. ज्ञानेश्वरांच्या एका ओवीचा पूर्वार्ध घेऊन सांगावयाचें तर——

'दिठी नोहे मिणधी। बोलणें नाहीं संदिग्धी।' असा वडिलांच्या व्यक्तित्वाचा एकंदर थाट होता. या व्यक्ती दुसरें लग्न कां करतात याची पूर्ण जाणीव व त्याबद्दल योग्य सहानुभूति वडिलांना होती. पण कोणत्याहि गोष्टींचें समर्थन करतां आलें म्हणजे त्यांत असणाऱ्या अन्यायाचें निराकरण होतें यावर वडिलांचा कधींच विश्वास नव्हता. पण असा स्पष्ट शब्दांत तोंडावर निषेध करूनहि या व्यक्ती शेवटपर्यंत वडिलांच्या उत्तम मित्र राहिल्या. वडिलांना त्यांच्या घरीं आणि त्यांना आमच्या घरीं येण्यास आणि राहण्यास कधींहि संकोच वाटला नाहीं. वडिलांनीं जीवनांतील विशिष्ट

आदर्शांचा कधींहि अवमान केला नाहीं. पण हटवादीपणाचे व आदर्शांचे त्यांनीं भावनाविहीन शेंदूर फांसलेले दगडहि बनविले नाहींत. कोणाहि माणसाबद्दल त्यांना कधींहि तिरस्कार वाटला नाहीं. राग आला असेल, वाईट वाटलें असेल, पण सहानुभूतीचा झरा कधींहि आटला नाहीं. जगांत स्मरणशक्तीइतकीच विस्मरणाची शक्तीहि अद्भुत आहे. आपण क्षुद्र आणि व्यवहारीं माणसें नको त्या गोष्टी लक्षांत ठेवतों व आपलें आणि त्याच वेळीं दुसऱ्यांचेंहि जीवन असह्य करतों. ही विस्मरणाची कला वडिलांना उत्तम अवगत होती. मनाचा मोठेपणा हा अशा उदार विस्मरणाचा पाया असतो. माझ्या वडिलांत अनेक लहानमोठे प्रमाद होते, पण वृत्तीचा क्षुद्रपणा हा प्रमाद मात्र निश्चित नव्हता.

गप्पा मारणें आणि गप्पा ऐकणें हा वडिलांचा एक आवडता उद्योग होता. महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या आणि आज हयात असलेल्या प्रथम-श्रेणीच्या गप्पिष्टांत वडिलांची निश्चित गणना करावी लागते. जुन्या काळांतील नामवंत गप्पिष्ट म्हणजे कोल्हटकर आणि गडकरी ही गुरुशिष्यांची जोडी. कांहीं म्हणजे सुमारें १५-२० वर्षांपूर्वी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु केदार, मुंबईचे प्रो. न. र. फाटक आणि प्रो. अळतेकर व पुण्याचे (आतां मुंबईकर झालेले) आचार्य अत्रे आणि म. म. पोतदार हे पांच जण चतुर संभाषणाबद्दल प्रसिद्ध होते. हा लौकिक योग्यच आहे याची साक्ष माझे कान आहेत. बंगलोर येथें केदारांच्या गप्पा जवळ जवळ चार तास ऐकल्या, त्यांचें अजून विस्मरण झालेलें नाहीं. वडिलांची आणि अत्र्यांची अनेकदां एकत्र बैठक होत असल्यामुळें त्यांच्या तासन् तास चालणाऱ्या गप्पांचा आस्वाद घेण्याचें भाग्य मला लाभलें होतें. प्रो. फाटकांच्या गप्पा रसाळ खऱ्या, पण त्यांना उपहासाची आणि उपरोधाची एक धार असते. पोतदारांचें संभाषण त्या मानानें मला कमी ऐकावयास मिळालें. आज ही संभाषणचातुर्याची कला बरीच मागें पडत चालली आहे असा संशय येतो.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ विः ........
क्रमांक ........ नोंः दिः ........

संभाषणाला जें एक काळाचें आणि मनाचें स्वास्थ्य लागतें तें नसल्याचा हा परिणाम असावा किंवा जो बहुश्रुतपणा आणि वृत्तीचा खेळकरपणा लागतो त्याचा अभाव हेंहि एक कारण असावें.

गप्पा मारणें म्हणजे थापा मारणें नव्हे. थापा या असंस्कृतपणाच्या, अज्ञानाच्या व अहंकाराच्या द्योतक असतात. थापा मारण्याबद्दलहि कांहीं व्यक्ति या महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत. पण त्यांचा 'अनुल्लेख' करणेंच योग्य होय.

संभाषणचातुर्य हें वडिलांचा परिचयपरिघ मोठा असण्याचें एक महत्त्वाचें कारण होतें. त्यांच्या संभाषणांत विद्वत्तेची चमक असे, पण त्यांत जडता नसे. अवलोकनाचा बारकावा आणि विसंगति ताडण्याची विनोदबुद्धि असे, पण उपरोधिक वृत्तींतून निर्माण होणारा दंश नसे. निर्लोभीपणा, मनाचा मोठेपणा आणि निर्भयपणा हे गुण खरे, पण हे आदर निर्माण करणारे गुण आकर्षण निर्माण करणारे नव्हेत. आदरांत दराची म्हणजे भयाची पुसट कां होईना पण लकेर असते. उलट आकर्षणांत आपुलकी आणि कौतुक असतें. वडिलांच्या जगन्मैत्रीचें रहस्य असें दुहेरी होतें.

वडिलांच्या कपड्याप्रमाणेंच त्यांचा स्वभाव आणि बोलणें अघळपघळ होतें. शिष्टपणाची इस्त्री जशी त्यांच्या वृत्तीला नव्हती तशीच ती त्यांच्या कपड्यांनाहि नव्हती. कपडयांचे लाड किंवा कौतुक वडिलांनीं कधींच चालूं दिलें नाहीं. कपडयांना कांहीं आकार असतो, किंवा असावा हें त्यांच्या गांवींहि नव्हतें. त्यामुळें वडिलांचा परमेश्वराप्रमाणें 'निराकार' असणारा सूट हा कॉलेजमध्यें विद्यार्थ्यांच्या कौतुकगर्भ करमणुकीचा नित्य विषय असे. या पोशाखाची सखी म्हणजे कोटाच्या खिशांत नित्य असणारी भाजीची पिशवी. ही पिशवी म्हणजे वडिलांचें परब्रह्म होतें. पोटोबा म्हणजे भाज्यांचे, फळांचे आणि खाद्यपदार्थांचे अनेक प्रकार आणि विठोबा म्हणजे बुद्धीला खाद्य पुरविणारीं सर्व प्रकारचीं पुस्तकें हे दोघेहि या एकाच

पिशवींत गुण्यागोविंदानें नांदत. संकोच किंवा 'जग काय म्हणेल?' ही भयाची भावना वडिलांच्या अंतराला कधींहि शिवली नाहीं. एखाद्या ग्रंथालयांत किंवा पुस्तकभांडारांत वडील जितक्या जिज्ञासेनें जात, तितक्याच जिज्ञासेनें ते मंडईंत भाज्यांची पाहणी करीत फेऱ्या मारीत. आग्र्याला गेल्यावर वडील एक वेळ ताजमहाल बघणार नाहींत, प्रयागाला एक वेळ त्रिवेणी-संगमावर जाणार नाहींत पण कोठल्याहि गांवांतली सब्जीमंडी चुकणें केवळ अशक्य! एखाद्या सम्राटानें दिग्विजय करून यावें त्याप्रमाणें वडील प्रवास करून परत येतांना भाज्यांची व फळांची करंडी घेऊन येत. अस्मादिक मोकळ्या मनानें आणि मुखानें त्याचें स्वागत करीत व वडिलांच्या या उदार 'आयात धोरणा'बद्दल अभिनंदनाचा ठरावहि 'एकमतानें' पास करीत. पण आजी आणि आई मात्र वडिलांचा हा 'दिग्विजय' कपाळाला आंठ्या घालून स्वयंपाकघरांत नेत आणि आमच्या तीर्थरूपांच्या या 'खुळ्या नादाचा' निषेध करीत करीत किमान एक आठवडाभर तरी आणलेल्या या ऐवजाचा संहार करीत. वडिलांच्या कापडाच्या पिशवींत जरी खाद्यपदार्थांचा भरणा असे, तरी त्यांच्या स्मरणशक्तीच्या पोतडींत मात्र प्रत्येक प्रवासानंतर नवीन नवीन अद्भुतरम्य आठवणींची, नवीन ओळखींची व चमकदार अवलोकनांची भर पडलेली असे. हें खाद्य आम्हांला आणि वडिलांच्या मित्रपरिवाराला पुढील प्रवासापर्यंत सहज पुरवठीं येई.

कॉलेजच्या रजेचा प्रारंभ म्हणजे वडिलांच्या प्रवासाची नांदी आणि सुट्टीचा शेवट म्हणजे त्यांच्या प्रवासाचें भरतवाक्य. या नाटकाचे प्रयोग 'सालाबादप्रमाणें' अनेक वर्षें चालू होते. प्रवास करून झाल्यावर फावल्या वेळांत वडील कॉलेजांत शिकवत कीं कॉलेजांत शिकवत असतांना जो फावला किंवा सुट्टीचा काळ असे त्यांत प्रवास करीत याचा उलगडा होणें खरोखरच सोपें नव्हतें. या प्रवासप्रियतेमुळें आगगाडींत भेटणाऱ्या

अपरिचित प्रवाश्यांचा मात्र कधीं कधीं गैरसमज होई. विशेषतः वडील जेव्हां सहकुटुंब सहपरिवार प्रवास करीत तेव्हां डब्यांतील माणसें "आपण रेल्वेंत नोकरीला असतां का ? आपल्याला वर्षांतून किती वेळां पास मिळतो ?" असे प्रश्न भाबडेपणानें विचारीत. केवळ प्रवासाकरितां प्रवास करणारा आणि त्याकरितां आपली पदरमोड करणारा प्राणी इतर माणसांना जर अरबी भाषेंतील कथेप्रमाणें 'सुरस आणि चमत्कारिक' वाटला तर नवल नाहीं.

आगगाडयांचें वेळापत्रक हा वडिलांचा सगळ्यांत आवडता ग्रंथ. कालिदासाचा 'रघुवंश', ज्ञानेश्वरांची 'भावार्थदीपिका' इ. ग्रंथांचा क्रम नंतर लागेल. अखिल भारतांतील सर्व रेल्वेमार्गांचीं वेळापत्रकें आमच्या घरीं असत. या वेळापत्रकांचें वाचन करणें, मनन करणें आणि भविष्यकालीन प्रवासांची आंखणी करणें हा वडिलांचा आवडता छंद होता. "आपण प्रवाश्यांच्या मार्गदर्शकाचें काम जर कॉलेजमधील नोकरी सुटली तर सहज करूं" असें वडील विनोदानें म्हणत. पण त्यांत सत्याचा अंश मात्र निश्चित होता. पुढें आजारांत विरंगुळा म्हणून वडील प्रवासाचे अनेक बेत आंखीत, पण दारिद्री माणसाप्रमाणेंच व्याधिग्रस्त माणसांच्याहि मनोरथाचें जनन आणि मरण एकाच वेळीं होत असतें.

वडिलांच्या मनावर उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासाचे जितके गाढ संस्कार झाले होते तितके दक्षिण हिंदुस्थानच्या प्रवासाचे झाले नव्हते. याचा उत्तम पुरावा म्हणजे त्यांच्या कादंबऱ्यांतून येणारीं प्रवास-वर्णनें. या कादंबऱ्यांतील नायक निदान एकदां तरी उठून प्रवासाला जातात ते सुद्धां दक्षिणेकडे नव्हे तर उत्तरेकडे आणि त्यांत पुन्हा हरद्वार, हृषीकेश आणि हिमालयाकडे. याचें एक कारण ऐन तारुण्यांत वडिलांनीं दोनचार वेळां उत्तरेकडचा प्रवास केला हें असावें. ऐन तारुण्यांतील किंवा बाल्यांतील अनुभव हेच अनेक वेळां ललित वाङ्मयांत वेगवेगळ्या रूपानें आणि प्रकारानें प्रगट

होतात. पुढील वयांतील अनुभव हे ललित वाङ्मयाच्या दृष्टीनें बहुतेक लेखकांच्या बाबतींत भाकड ठरतात. वडील या बहुसंख्य लेखकापैकींच एक होते.

हाच प्रकार वडिलांच्या सामाजिक आणि राजकीय अनुभवांच्या बाबतींत आढळतो. समाजकारणांत आणि राजकारणांत वडिलांनीं सारख्याच हिरीरीनें आणि उत्साहानें भाग घेतला. पण त्यांच्या प्रत्येक कादंबरींत आणि कथेंत सामाजिक अनुभव आढळतात, अपवाद म्हणूनसुद्धां एकहि राजकीय अनुभव आढळत नाहीं. कादंबऱ्यांतील पात्रांच्या तोंडीं असणारी चर्चा ही नेहमीं समाजकारणाभोंवतीं रुंजी घालते. पण राजकारणाला दुरूनहि स्पर्श करीत नाहीं. वडिलांच्या प्रतिभेचें म्हणा वा अनुभूतीचें म्हणा, सूर्यफूल हें समाजकारणाकडे सन्मुख होतें आणि उमलतें; पण राजकारण दिसलें रे दिसलें कीं आपल्या आविष्काराच्या पाकळ्या मिटून घेतें. कादंबरीच्या शेवटीं नायक आणि नायिका हीं परस्परांशीं 'नेमस्त' होतात येवढाच काय तो नेमस्त राजकारणाशीं संबंध. नेमस्त राजकारणांत उत्कटता आणि उदात्तता नसल्याचा हा परिणाम असावा.

'अपराध कोणाचा?', 'शांताराम', 'ललिता' आणि 'मुक्तबंध' या चार कादंबऱ्यांत त्या काळच्या सुशिक्षित तरुण पिढींत दृश्यमान होणाऱ्या कांहीं प्रवृत्तींचे आलेख व्यक्त होतात. विशेषतः 'मुक्तबंध' ही या दृष्टीनें सगळ्यांत यशस्वी कादंबरी आहे. पुढील कादंबऱ्यांत याच अनुभवांची कंटाळवाणी पुनरावृत्ति आढळते. या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन गुणावगुण कांहीं असोत, पण त्यांनीं कादंबरी-वाङ्मयांत एक छोटी कां होईना पण ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे.

वडील इंदुप्रकाशांत नोकरी करीत असतांना इतर उद्योग कोणते करीत हें बघतांना काळाचें भान विसरलों, आणि बऱ्याच पुढल्या गोष्टी सांगत बसलों. काळाची गति कुंठित करणें हें मोठेपणाचेंच एक लक्षण आहे.

इंदुप्रकाशनंतर म्हणजे १९१७ सालानंतर वडिलांनीं 'असोसिएटेड प्रेस' या संस्थेंत वार्ताहर म्हणून काम केलें. १९१८ सालीं नेमस्त पक्षाची स्थापना झाली आणि त्याचें पहिलें अधिवेशन मुंबई येथें भरलें. याच्या अगोदर वडिलांनीं 'प्रेसिडेन्सी असोसिएशन' या संस्थेंत दुय्यम चिटणिसाची पगारी जागा स्वीकारली. येथें अनेक राजकारणी पुरुषांचें प्रत्यक्ष दर्शन होऊन त्यांचे वादविवादहि ऐकावयास मिळत. सर दिनशा वाच्छा, सर चिमणलाल सेटलवाड, नारायणराव समर्थ इ. नेमस्त पुढाऱ्यांचा दाट परिचय होण्यास पक्षापेक्षांहि ही दुय्यम चिटणिशी अधिक उपयोगी पडली. या नेमस्ताग्रणींच्यापेक्षां अगदीं वेगळ्या स्वभाववैशिष्ट्याच्या एका थोर व्यक्तीची याच संस्थेंत प्रथम ओळख झाली आणि त्या ओळखीचें नंतर गाढ स्नेहांत रूपांतर झालें. या पुरुषाचें नांव बॅ. विठ्ठलभाई पटेल. बॅरिस्टरी यथातथाच असल्यामुळें विठ्ठलभाईंचा बराच वेळ प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या ऑफिसांतच जाई. विठ्ठलभाई पटेल यांच्या अनेक आठवणी वडील अभिमानानें आणि कौतुकानें सांगत.

येथें नोकरी करीत असतांनाच वडिलांनीं 'न्यू रिव्ह्यू' नांवाचें स्वतंत्र इंग्रजी मासिक काढलें आणि तें कांहीं वर्षें चालविलें. या मासिकांतील जवळजवळ सगळा मजकूर वडीलच लिहीत असत. या मासिकामुळें वडिलांना आर्थिक लाभ झाला नाहीं, पण इतर लाभ मात्र अनेक झाले. त्यांतील सर्वांत मोठा लाभ म्हणजे अलाहाबाद येथील 'लीडर' या वृत्तपत्राचे प्रसिद्ध संपादक आणि एक अग्रगण्य नेमस्त पुढारी सर सी. वाय्. चिंतामणि यांचा परिचय झाला. 'न्यू रिव्ह्यू' मधील लेखांमुळें चिंतामणींचें लक्ष या तरुण संपादकाकडे वेधलें आणि त्यामधूनच पुढें वडिलांची 'लीडरचे' मुंबईचे वार्ताहर म्हणून नेमणूक झाली. बातमीपत्राखेरीज 'लीडर'मध्यें नियमितपणें निरनिराळ्या विषयांवर त्यांचे स्वतंत्र लेखहि प्रसिद्ध होत असत. जसा गोखल्यांच्याबद्दल आणि परांजप्यांच्या-

बद्दल वडिलांना आदर होता तितकाच आदर त्यांना चिंतामणींच्या-बद्दल वाटे.

पुढें कांहीं वर्षें वडील 'टेक्स्टाइल जर्नल' या अर्थशास्त्रविषयक मासिकाचे उपसंपादक होते. या वेळीं मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' आणि कलकत्त्याच्या 'कॅपिटल' या वृत्तपत्रांमधून त्यांचे मधून मधून लेख प्रसिद्ध होत. अशा प्रकारें अनेक वृत्तपत्रीय आणि राजकीय उद्योग चालू असतांना १९२४ सालीं वडिलांनीं "विल्सन कॉलेजमध्यें अर्धा वेळ काम करणारा मराठी विषयाचा अध्यापक पाहिजे," ही जाहिरात वाचली व अर्ज केला. त्या वेळचे विल्सन कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. मॅकेन्झी यांनीं मुलाखत घेतली. कांहीं दिवसांनीं वडील विल्सन कॉलेजमध्यें मराठीचे प्राध्यापक म्हणून प्रविष्ट झाले. त्या वेळीं बी. ए. ला दोन पेपर मराठीचे असत आणि साधारणपणें आठवड्यांतून चार तास शिकविण्याचें काम असे. नेमणूक होतांना वडिलांनीं दोन गोष्टी स्पष्ट केल्या होत्या. माझीं मतें अज्ञेयवादी आहेत आणि मराठी विभाग हा कितीहि लहान असला तरी तो स्वतंत्र असला पाहिजे.

या वेळीं लेखक आणि वृत्तपत्रकार म्हणून वडिलांचा लौकिक झालेला असला तरी मराठी विषयाची कोणतीच परीक्षा त्यांनीं दिलेली नव्हती. प्राचीन आणि अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा त्यांचा उत्तम परिचय असला तरी पद्धतशीर अभ्यास ज्याला म्हणतात तो झालेला नव्हता. पण मुंबई विद्यापीठांतील मराठीच्या अध्यापनाचा हा प्रारंभ काल होता. वडिलांच्या प्राध्यापकीय कारकीर्दीतच मराठी भाषेला व वाङ्मयाला क्रमाक्रमानें महत्त्व प्राप्त होत गेलें आणि वडील कॉलेजमधून निवृत्त झाले, तेव्हां मराठी हा विषय अगदीं पहिल्या वर्षापासून ते थेट Ph. D. पर्यंत विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमांत संमत झाला होता. विल्सन कॉलेजमधील मराठी विभागाचा लौकिक म्हणजे वडिलांचा लौकिक हें समीकरण अनेक वर्षें ते

कॉलेजमधून निवृत्त होईपर्यंत अव्याहत चालू होतें. वडिलांची विद्वत्ता, शिकविण्याचें कौशल्य, मनमिळाऊपणा, निःस्वार्थीपणा आणि निस्पृहपणा यांमुळें विल्सन कॉलेजमध्यें लोकप्रिय आणि प्रतिष्ठित म्हणून मराठी या विषयाची आणि तो शिकविणाऱ्याची गणना होऊं लागली. पगार वाढवा अगर वाढवूं नका पण विषय वाढवा, त्याच्या विकासाला कसलाहि प्रतिबंध करूं नका हा वडिलांचा आग्रह असे. मराठी विषयाचा हा व्याप बी. ए. ऑनर्सपासून तो प्रथम वर्ष साहित्य आणि विज्ञान इतका वाढल्यानंतरसुद्धां वडील कित्येक वर्षें सर्व वर्ग एकटेच घेत असत. पुढें १९४४ सालापासून त्यांना मदतनीस मिळाला. याखेरीज मुंबई विद्यापीठाच्या एम्. ए.चे प्रारंभीं सर्व आणि नंतर कांहीं पेपर्स कसलीहि अपेक्षा न करतां वडिलांनीं शेवटपर्यंत घेतले. भाषाशास्त्र असो, व्याकरण असो, बखर किंवा प्राचीन काव्य असो, ज्ञानेश्वरी किंवा एकनाथी भागवत, आणि 'यथार्थदीपिके'-सारखी टीका असो, अर्वाचीन निबंध, कादंबरी, कविता किंवा नाटक असो, वडील हे सर्व वाङ्मय-प्रकार सारख्याच आत्मविश्वासानें आणि आत्मीयतेनें शिकवीत असत. विषय कितीहि किचकट किंवा शास्त्रीय असला तरी शिकविण्यापूर्वी किंवा प्रत्यक्ष शिकवितांना वडिलांना टिपणें काढण्याची कधींच गरज भासली नाहीं. स्मरणशक्तीचा त्यांच्यावर वरदहस्त होता. शुक्रवार हा दिवस एम्. ए.चा दिवस म्हणून शेवटपर्यंत प्रसिद्ध होता.

विल्सन कॉलेजांत प्राध्यापक झाल्यामुळें वडिलांच्या आयुष्याला स्थैर्य आणि नांवाला प्रतिष्ठा प्राप्त झाली. वृत्तपत्रकार कितीहि वाकबगार आणि बाणेदार असला तरी समाज त्याच्याकडे कांहींसा अनादरानें आणि संशयानें बघतो. वृत्तपत्रकार हा हुशार असेल पण तो विद्वानहि असूं शकतो, यावर टिळक, आगरकर आणि परांजपे इत्यादींची परंपरा असूनसुद्धां समाजाचा विश्वास बसत नाहीं. वृत्तपत्रकार घाईघाईनें लिहितो म्हणजे तो उथळ लिहितो असा अकारण ग्रह अनेकांचा झालेला असतो. वास्तविक प्रत्येक

प्राध्यापक विद्वान् असतो असें नाहीं. तो आपल्या व्यासंगांत सदैव गढलेला असतो असेंहि नाहीं. प्रत्येक क्षेत्रांत आणि धंद्यांत उत्तमाचें प्रमाण हें अल्पच असतें. बाकी बहुतेक सर्वजण हे प्रवाहपतित असतात आणि पोटाला कमावण्याचा एक धंदा म्हणूनच रोज कामाच्या पाट्या टाकतात. पण प्राध्यापक या व्यक्तीभोंवतीं एक आदराचें वलय निर्माण झालेलें आहे. प्राध्यापक भावी पिढ्यांचा मार्गदर्शक, मित्र आणि तत्त्वज्ञ असतो, असा कित्येक वर्षें समाजाच्या मनांत जो संशय घर करून राहिलेला आहे, त्याचा अजूनसुद्धां संपूर्ण निरास झालेला नाहीं. अशा प्रकारचा ‘ संशय ’ ज्या मूठभर प्राध्यापकांच्यामुळें घेण्याला समाजाला अवसर सांपडतो त्यांत माझ्या वडिलांची गणना होते.

उत्तम प्राध्यापकाचे आणि उत्तम लेखकाचे गुण हे वेगळे असतात. याची योग्य जाणीव या लेखकाला किंवा वृत्तपत्रकार प्राध्यापकाला होती. कॉलेजमध्यें ठराविक वेळ ते विद्यार्थ्यांना शिकवीत, पण उरलेला बराच वेळ ते स्वतःला शिकविण्यांत खर्च करीत. हा अभ्यास वडिलांनीं कसा केला याचें वर्णन त्यांचे सहकारी प्रोफेसर हरिभाऊ वेलणकर हे अभिमानानें करतात. सुदैवानें प्राध्यापक असावा कसा याचें उत्तम उदाहरण म्हणजे खुद्द वेलणकरच होते. संस्कृतच्या अभ्यासाशिवाय मराठीचा अभ्यास अपूर्ण राहणार हें वेलणकरांच्याबरोबर चर्चा करतांना वडिलांच्या लक्षांत आलें आणि त्यामुळें आपल्या सहकाऱ्याच्या मदतीनें त्यांनीं संस्कृत साहित्यशास्त्राचाच नव्हे तर ‘ शांकरभाष्यादि ’ ग्रंथांचासुद्धां अभ्यास केला. वक्तृत्वाच्या बळावर आणि लेखक म्हणून असणाऱ्या लौकिकावर खालच्या वर्गांना नित्य पण वरच्या वर्गांना मात्र कांहीं कालच झुलवितां येतें. शिक्षकाचें ज्ञान हें सोन्याचें आहे कां पितळेचें आहे याची परीक्षा प्रौढ विद्यार्थी ताबडतोब करतात.

उत्तम शिक्षकसुद्धां दोन प्रकारचे असतात. परीक्षेसाठीं परोपरीनें तयारी करून घेणारे शिक्षक हा एक वर्ग. कोणत्याहि पुस्तकाचा आशय थोडक्यांत

सांगणें, अनेक उपयुक्त मुद्द्यांचें आणि विचारांचें संकलन करणें, एकेक पोटविषय घेऊन त्याची विद्यार्थ्यांना झेपेल व पचेल अशा प्रकारें मनोरंजक फोड करणें, एकेक मुद्दा चंदनाच्या खोडाप्रमाणें विद्यार्थ्यांच्या मस्तकावर पुन्हां पुन्हां घासणें आणि हेंहि कमी पडेल म्हणून शेवटीं उपयुक्त टिपणें देणें हें अशा प्रकारच्या शिक्षकाचें मुख्य काम असतें. शिक्षणाचा हा झाला प्राथमिक आणि कमी महत्त्वाचा भाग.

दुसऱ्या प्रकारच्या प्राध्यापकाची अगदीं उलट स्थिति असते. केवळ परीक्षेच्या दृष्टीनेंच विचार केला तर हा शिक्षक क्वचित् निरुपयोगीहि ठरण्याचा संभव असतो. हा प्राध्यापक कोणत्याहि विषयाचा किंवा ग्रंथाचा स्वतंत्र विचार कसा करावा, त्याला कसोट्या कोणत्या आणि त्या कां लावाव्यात हें प्रत्यक्ष आपल्या उदाहरणानें शिकवितो. या प्राध्यापकाच्या ज्ञानाची हुंडी स्वानुभवाधिष्ठित आणि स्वकष्टार्जित असते. पुस्तकी आणि भिकेची नसते व केवळ परीक्षेच्या शिक्क्यावर चढणें येवढेंच या हुंडीचें कार्यहि नसतें. प्रत्येक मोठ्या माणसाचा मानवी जीवनाकडे बघण्याचा एक स्वतंत्र आणि अभिनव दृष्टिकोन असतो. उत्तम प्राध्यापक अशा दृष्टिकोनाची ओळख आपल्या समोरच्या विद्यार्थ्यांना करून देतो. पहिल्या प्रकारच्या शिक्षकाच्या हाताखालून जाणारा विद्यार्थी हा परीक्षेंत यशस्वी होतो, पण जगाच्या परीक्षेंत परावलंबी बनल्यामुळें आणि स्वतःचें स्वतंत्र मत नसल्यामुळें कुठल्या-कुठें फेंकला जातो आणि कायमचा बेपत्ता होतो. दूर अंतरावर असणाऱ्या विद्युत्गृहाच्या बळावर एकाच वेळीं पेटणाऱ्या हजारों दिव्यांप्रमाणें या विद्यार्थ्यांची स्थिति असते. विद्युत्गृहांतील प्रवाह एक क्षणभर जरी थांबला तरी या दिव्यांचें उसनें तेज मालवितें. याउलट दुसऱ्या प्रकारचे विद्यार्थी आणि त्यांचे गुरु हे, ‘प्रज्वालितो दीप इव प्रदीपात्’ या वर्गांतले असतात.

माझे वडील खऱ्या अर्थानें उत्तम प्राध्यापक होते, शाळामास्तर नव्हते.

वडिलांचे असंख्य विद्यार्थी आपण त्यांच्याजवळ स्वतंत्रपणें विचार करावयास शिकलों, एका नवीन दृष्टिकोनाची आपल्याला ओळख झाली हें अभिमानानें सांगतात.

वडिलांच्या वर्गांत 'भावबंधन' नाटकांतील धुंडिराजाप्रमाणें प्रत्यक्ष विषयापेक्षां विषयांतरेंच अधिक असत. मूळ विषय असे पश्चिमेकडे तर वडिलांचें प्रतिपादन चाललेलें असें पूर्वेकडे. वहीवर वाक्यांमागून वाक्यें टिपून घेणें हा प्रकार त्या काळीं नव्हता. नेमलेलें पुस्तक आणि पुढ्यांतली वही फक्त नांवाला असे. एकदां शिकविण्याचा ओघ सुरू झाला कीं त्याच्या गतिमान् प्रवाहांत या दोन वस्तु कुठें जात याचा तास संपल्यानंतर कांहीं वेळानें पत्ता लागे. एक नेमलेला विषय तेवढा सोडून वर्गांत इतर सर्व विषयांचा ऊहापोह होई, तसाच एखादा वावदूक विद्यार्थी असला— आणि प्रत्येक वर्षी असा एक तरी विद्यार्थी असेच — तर वादविवादाला एक वेगळाच रंग चढे. वर्गांत काय शिकवावें आणि काय वगळावें या बाबतींत कोणतीहि 'लक्ष्मणरेषा' अशी नव्हती. वडिलांचें शिकविणें जितकें उद्बोधक तितकेंच खमंग, खेळकर आणि उपहासात्मक असल्यामुळें डोळयांना परीक्षेचीं झांपणें बांधलेला अभ्यासू प्राणी वर्गांत औषधालाहि मिळत नसे. खास परीक्षेसाठीं विद्यार्थी स्वावलंबन आचरणांत आणीत. त्यामुळें बोंडल्यानें घातलेल्या ज्ञानापेक्षां त्यांचें ज्ञान हें अधिक सकस आणि शाश्वत असे.

वडिलांच्या शिकविण्याच्या या पद्धतीमुळें सर्व क्षेत्रांतील प्रचलित असणाऱ्या वादग्रस्त प्रश्नांचें उत्तम ज्ञान विद्यार्थ्यांना होई आणि त्यामुळें ते केवळ पुस्तक-पंडित न होतां बहुश्रुत आणि स्वतंत्रपणें निर्णय घेणारे बनत. यामुळें विल्सन कॉलेजचे मराठीचे विद्यार्थी ही एक वेगळी आणि वैशिष्टयपूर्ण जात निर्माण झाली. प्रत्येक विद्यार्थ्यावर वडिलांच्या व्यक्तित्वाचा खास ठसा उमटलेला असे. पण व्यक्तित्वाचा ठसा याचा अर्थ

निर्बुद्ध अनुकरण किंवा विभूतिपूजन नव्हे. वडिलांच्या सहवासाचा आणि शिकविण्याचा गुण असा होता कीं त्यामुळें विद्यार्थ्यांत असणारे सुप्त गुण व त्याचें स्वत्व जागृत होई.

बहुश्रुतपणा, स्वतंत्र विचार करण्याची कुवत आणि आपल्या व्यक्तित्वाचा शोध याबरोबरच भारतीय संस्कृतीचा 'देखणा' अभिमान हा वडिलांच्या शिकविण्यामुळें होणारा आणखी एक लाभ होय. 'मूळ-प्रकृति म्हणजे भारतीयांचें आर्यत्व न सोडतां,' हें आगरकरांचें सूत्र वडिलांनीं शिरोधार्थ मानलेलें होतें. 'कालिदासाची सृष्टि' या ग्रंथांत वडिलांनीं आपले हे सर्व विचार कालिदासाला 'निमित्तमात्र' करून उत्तम प्रकारें मांडलेले आहेत. 'कविता म्हणजे संसृति टीका' (Literature is criticism of life) ही मॅथ्यू आर्नोल्डची व्याख्या प्रत्यक्ष वाङ्मय लिहितांना आणि त्याचें मूल्यमापन करतांना वडिलांना आदर्श वाटत असावी. पण अशा प्रकारच्या संसृति टीकेंत काव्यदृष्टि ही गौण ठरते हा आरोप तात्यासाहेब केळकर यांनीं वडिलांच्या भाषणानंतर केलेल्या एका अध्यक्षीय भाषणांत घेतलेला होता. ('काव्यसृष्टि आणि काव्यदृष्टि' हा केळकरांचा लेख) जीवनाचे आदर्श आणि कलेचे आदर्श (values) यांत मूलभूत फरक असतो कां नसतो हा मुख्य वादाचा विषय. यांत खरें मत कोणतें याचा काथ्याकूट करण्याचें येथें कारण नाहीं. वडील मात्र जीवनाचे आदर्श आणि कलेचे आदर्श हे अभिन्न समजत.

वडिलांचा दुसरा अभिमानविषय म्हणजे महाराष्ट्राची धार्मिक, वाङ्मयीन सामाजिक आणि ऐतिहासिक परंपरा. 'श्री ज्ञानदेव' या ग्रंथांत वरील अभिमानाचा अत्यंत ओजस्वी आणि तितकाच हळुवार आविष्कार झाला आहे. 'महाराष्ट्र-कविपरंपरा' ही बंडखोरांची आणि जगाच्या कल्याणाकरितां जन्म घेतलेल्या विभूतींची परंपरा आहे असा त्यांचा आग्रह होता. पैशासाठीं किंवा प्रतिष्ठेसाठीं मराठी कवितेचा जन्म झाला नाहीं. वडिलांच्या

मनोमंदिरांत एकनाथ, तुकाराम, रामदास, आणि मोरोपंत इत्यादि प्राचीन आणि चिपळूणकर, आगरकर, टिळक, हरिभाऊ आपटे, इत्यादि अर्वाचीन मूर्ति विराजत असल्या तरी त्यांत अत्युच्च स्थान केवळ ज्ञानदेवांनाच होतें. ज्ञानदेवांच्या निकट येणारी दुसरी विभूति म्हणजे छत्रपति शिवाजी महाराज !

मोरोपंतांची कविता, त्यांत 'आर्याभारत' आणि त्यांत परत 'कर्णपर्व' हें वडिलांना फार प्रिय होतें. मोरोपंतांना भाषांतऱ्ये म्हणून आणि पुराणिक म्हणून तुच्छ लेखणाऱ्या टीकाकारांचा समाचार वडील वर्षांतून एकदां तरी घेत. मोरोपंतांनीं रंगविलेल्या महारथी कर्णाच्या व्यक्तिचित्रणाचें आणि त्याच्या अनुषंगानें येणाऱ्या इतर पात्रांचें रसग्रहण केवळ माझ्या वडिलांनींच करावें. मोरोपंतांवर कालिदासाप्रमाणें आणि ज्ञानदेवाप्रमाणें त्यांनीं स्वतंत्र ग्रंथ कां लिहिला नाहीं हें खरोखर मला कळत नाहीं. असा ग्रंथ लिहिला असता तर आज मोरोपंतांवर प्रचलित असणाऱ्या लहानथोर ग्रंथांपेक्षां तो अगदीं वेगळा ठरला असता हें निश्चित. तुकारामाचे अभंग शिकवितांना त्याच्या अनुषंगानें वडील अर्वाचीन पाखंडाचें खंडन करीत. पण ज्ञानेश्वरांची ओवी म्हणजे वडिलांच्या सर्व शक्तींना उत्सवासारखी वाटे. ' पुण्यासु प्रतापु आगळा, ' ' ज्या उत्तम कुळींच्या होती ' किंवा ' वाचें बरवें कवित्व– ' अशा वाक्यखंडांवर व्याख्यान सुरू झालें कीं सर्व वर्गाचें देहभान हरपत असे. रामदासांच्याबद्दल वडिलांना आदर होता पण तो कार्यकर्ते आणि संत म्हणून, कवि म्हणून नव्हे. समर्थांच्या पुरस्कर्त्यांनीं त्यांचा केलेला उदोउदो आणि ज्ञानदेवादि संतांची ' टाळकुटे ' आणि ' संताळे ' म्हणून केलेली निंदा त्यांना मुळींच आवडत नसे. रामदास हे या संतपरंपरेंतीलच एक कसे आहेत हे वडील दासबोधांतील अनेक उदाहरणें देऊन पटवून देत असत. ज्ञानेश्वरांचीं ' अज्ञानलक्षणें ' आणि रामदासांचीं ' मूर्खलक्षणें ' यांत असणारें साम्य सांगतांना एखाद्या कुशल वकिलाप्रमाणें वडील एकेक मुद्दा मांडीत. कवि

म्हणून रामदास हे किती सामान्य आहेत हें पटवून देतांना दासबोधांतील अनेक मनोरंजक दाखले वडील पुढें ठेवीत.

कांहीं लेखक—त्यांच्यांत असणाऱ्या गुणांची जाणीव असूनसुद्धां—वडिलांना आवडत नसत. प्रि. गोळे आणि डॉ. केतकर हे सुधारणेचे कट्टर शत्रु आहेत असें त्यांचें ठाम मत होतें. यामुळें 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या', 'हिंदुधर्म आणि सुधारणा' किंवा 'ब्राह्मणकन्या' व 'विचक्षणा' अशीं पुस्तकें अभ्यासाला असलीं कीं त्यांतील भ्रामक युक्तिवादाची हजेरी घेण्यांत आणि भंबेरी उडाविण्यांत आठवड्यांतले किती तास जात याची गणना करणें कठीण असे. कांहीं लेखकांच्याबद्दल आणि कवींच्याबद्दल वडिलांना कमालीचा तिटकारा होता. वर्गांत शिकवितांना अशा लेखणीधरांना हास्यास्पद करणें हा वडिलांचा एक आवडता उद्योग असे. वरील लेखक कोण हें 'उघड गुपित' असल्यामुळें त्यांची अधिक दखल घेण्याचें कारण नाहीं.

मराठी विषयाप्रमाणें कॉलेजमधील वाङ्मयमंडळाचें संगोपन आणि संवर्धन वडिलांनीं अनेक वर्षें केलें. गणपतीच्या दिवसांत कार्यकारी मंडळाला आणि मराठी वर्गाला प्रसादासाठीं घरीं बोलावणें हा एक वार्षिक कार्यक्रम ठरलेला असे. त्यांत दरवर्षीं निघणाऱ्या सहलींची आणि संमेलनाच्या वेळीं होणाऱ्या नाटकांची भर पडे. पुढें मराठीचा वर्गच इतका मोठा झाला कीं त्यामुळें कार्यकारी मंडळ हें आमच्या घरच्या आमंत्रणामधून वगळलें जाऊं लागलें. अशा वेळीं वडील आपलें वय आणि अधिकार विसरून विद्यार्थी-समुदायांत मनःपूर्वक मिसळत. वडिलांना भेटावयास म्हणून आलेल्या अनेक सुप्रसिद्ध साहित्यिकांना कॉलेजमधील या मराठी वाङ्मयमंडळापुढें हजेरी द्यावी लागे. वडील आपल्यानंतर अध्यक्ष या नात्यानें भाषण करणार आहेत हा धाक असल्यामुळें प्रत्येक वक्ता हा फार काळजीपूर्वक भाषण करी.

कॉलेजमधील विद्यार्थी-विद्यार्थिनींच्यावर केलेली टीका माझ्या वडिलांना मुळींच खपत नसे. वेळोवेळीं व्याख्यानांतून आणि लेखनांतून वडिलांनीं असल्या बाष्कळ आणि दुष्ट टीकेचा समाचार घेतलेला आहे. तरुण पिढीच्या कर्तृत्वावर आणि चारित्र्यावर वडिलांचा अपरंपार विश्वास होता. साहजिकच प्रत्येक विद्यार्थ्याला आपली बाजू घेऊन भांडणाऱ्या या प्राध्यापकाबद्दल केवळ आदरच नव्हे तर आपुलकी वाटे. त्यामुळें कॉलेजमधील अभ्यासाव्यरिक्त अधून मधून उत्पन्न होणाऱ्या अडचणींच्याबाबत सल्ला घेण्यासाठीं कित्येक विद्यार्थी वडिलांना भेटत असत.

वडिलांची आपल्या विद्यार्थ्यांना होणारी मदत केवळ शाब्दिक नसे. वडिलांच्या अनेकविध ओळखींचा उपयोग विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळवितांना आणि इतर कार्यांतहि फार होत असे. अशा वेळीं मदत करण्यासाठीं वडिलांचे हात आणि पाय दोन्ही उत्साहानें पुढें असत.

या सर्व गोष्टींमुळें कॉलेजमध्यें माझे वडील एक व्यक्ति म्हणून वावरत नव्हते. तर संस्था म्हणून त्यांना स्वतंत्र अस्तित्व होतें. कांहीं माणसांना विशिष्ट स्थानामुळें माहात्म्य प्राप्त होतें. पण वडील अशा कांहीं किंवा बहुसंख्या माणसांपैकीं नव्हते. कॉलेजमुळें वडिलांचें नांव झालें नाहीं. उलट मराठी विषयापुरताच विचार केला तर प्रो. अळतेकर शिकवितात तें विल्सन कॉलेज असें जग मानीत असे. यामुळें वडिलांच्या सव्वीस वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दींत कॉलेजमधील मराठी विभागाच्या यशःप्रासादाचें शिखर इतकें उंच झालें कीं निवृत्तीनंतर त्यांच्या आसनावर आरूढ होणाऱ्या एका क्षुद्र कावळ्यालासुद्धां आपण गरुड आहोंत असा गर्व व्हावा ! !

मराठीचे प्राध्यापक म्हणून इतका वेळ वडिलांचा मोठेपणा आणि वैशिष्ट्यें सांगितलीं. पण या मोठेपणालाहि एक मर्यादा होती. वडील प्रखर प्रतिभेचे प्राध्यापक होते ही गोष्ट खरी. पण ज्याला संशोधन करण्याची प्रवृत्ति म्हणतात ती वडिलांच्या स्वभावांतच नव्हती. कोणत्याहि प्रमेयाचें

पृथक्करण करणें, पुरावा गोळा करणें, त्याची पद्धतशीर मांडणी करणें आणि त्यावरून निघणारा निष्कर्ष हा समतोलपणें मांडणें हा वडिलांचा मनोधर्म नव्हता. वडिलांची अंतःकरणप्रवृत्ति निरोगी होती, संकुचित किंवा विकृत नव्हती. यामुळें त्यांच्या प्रवृत्तीची प्रतिक्रिया ही बहुतेक वेळां बरोबर असे आणि ही प्रतिक्रिया किंवा साध्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे मत वडील आपल्या वाक्चातुर्याच्या आणि लेखणीच्या बळावर जोरदारपणें मांडीत. पण शेवटीं हें मत होतें, कारणमीमांसेवर आणि अनेक वर्षांच्या सतत अभ्यासावर उभा असलेला सिद्धान्त नव्हता हें विसरून चालणार नाहीं. यामुळें विद्यापीठांतलें जें अत्युच्चपद 'संशोधक-प्राध्यापक' तें वडिलांना हस्तगत झालें नव्हतें, आणि त्यासाठीं वडिलांनीं प्रयत्नहि केला नाहीं. मात्र संशोधन याचा अर्थ घटपटादि यांत्रिक आणि प्रतिभाहीन खटपट नव्हे. माहितीचा महासागर असणारा माणूस हा उत्तम संशोधक असेलच असें सागतां येत नाहीं. कांहीं मार्गदर्शक म्हणून नेमलेले प्राध्यापक हे प्राथमिक शाळेंत शिकविण्याच्याहि पात्रतेचे नसतात. अशा खोट्या संशोधकांच्यापेक्षां माझे वडील हे कितीतरी पटींनें श्रेष्ठ प्राध्यापक आणि लेखक होते.

विद्यार्थ्यांच्याकरितां टीपा आणि टिप्पणी किंवा तत्सम लेख लिहिणाऱ्या, शिकवण्या करणाऱ्या, कॉलेजमध्यें शिकवायला लागल्यावर पैशासाठीं जुन्या शाळेमधला आपला घरोबा कायम ठेवणाऱ्या आणि परीक्षादि फायद्यांच्याकरितां व एम. ए., पीएच्. डी.च्या संमतीकरितां आपण कॉलेजव्यतिरिक्त इतर कोणतेंहि काम करीत नाहीं असें धडधडीत खोटें बोलणाऱ्या, तसेंच पीएच्. डी.च्या मार्गदर्शकांच्या पंगतीमधून एकदां नव्हे दोनदां 'हुडुत' म्हणून हाकलून दिल्यावर लोचटपणें अर्ज करणाऱ्या प्राध्यापकांचा वडील स्पष्ट शब्दांत, खुद्द त्यांच्याच तोंडावर निषेध करीत. प्राध्यापकाची जागा ही बहुमानाची जागा आहे आणि तो बहुमान टिकविण्यासाठीं आणि वाढविण्यासाठीं खुद्द आपण झटलें पाहिजे आणि त्यासाठीं अनेक

पथ्यें पाळलीं पाहिजेत असें त्यांना वाटे. बहुतेक माणसांना अधिकारपदाची लालसा सत्तेसाठीं आणि होणाऱ्या लहानमोठ्या आर्थिक फायद्यासाठीं असते. या तिन्हीहि गोष्टींची वडिलांना पर्वा नसल्यामुळें 'राजकारणी प्राध्यापकांची' भूमिका विद्यापीठाच्या आणि कॉलेजच्या रंगभूमीवर वडिलांनीं कधींहि स्वीकारली नाहीं. कांहीं वर्षें ते मराठी बोर्डाचे सदस्य होते. पण थोडेंफार बरें करावयास जावें तर कोणातरी दुष्टाचार्यांच्या शेपटीवर पाय पडतो आणि इतरेजनांचें पाहिजे तितकें हित करतां न आल्यामुळें त्यांच्या शिव्या मात्र खाव्या लागतात. हा अनुभव आल्यामुळें वडील परत बोर्डाच्या निवडणुकीला उभे राहिले नाहींत. चार पुस्तकें नेमावयाचीं आणि त्याकरितां न लागलेल्या चाळीस पुस्तकवाल्यांचें शत्रुत्व पत्करायचें हा अव्यापारेषु व्यापार वडिलांना पटला नाहीं.

१९२९ च्या फेब्रुवारी महिन्यांत आम्ही मुंबईजवळ असणाऱ्या विलेंपार्लें या उपनगरांत रहावयास गेलों. १९४२ च्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत आमचें वास्तव्य या गांवांत होतें. त्या काळीं विलेंपार्लें म्हणजे पुण्याची विशेषतः सदाशिव पेठेची छोटी आवृत्ति होती. डॉ. केतकरांच्या 'सदाशिवपेठी संस्कृति' या शब्दसमूहांतील सर्व बरेवाईट विशेष येथील लोकांच्या स्वभावांत, त्यांच्या वागण्यांत आणि सार्वजनिक चळवळींत एकवटलेले होते. या गांवच्या पूर्व भागांत महाराष्ट्रीयांचें तर पश्चिम भागांत गुजराथ्यांचें प्राबल्य होतें. पूर्व भागाचे लो. टिळक हें दैवत होतें, तर पश्चिम भागांत म. गांधींचें महत्त्व प्रतिवर्षीं वाढत होतें. येथील मराठी लोकांची लो. टिळकांच्याबद्दलची भक्ति टिळक विद्यालय आणि टिळक मंदिर या रूपानें साकार झाली होती. महाराष्ट्रीयांच्या स्वभावधर्माला अनुसरून या दोन संस्थांच्या कार्यकर्त्यांत अनेक वर्षें अव्याहत वितुष्ट चालू होतें. हा वाद सार्वजनिक पातळीवर चालविण्यासाठीं 'टणत्कार' आणि 'साष्टी समाचार' हीं दोन वृत्तपत्रें एकमेकांना गालिप्रदान देण्यास सदैव सज्ज असत. बहुतेक

गांव हा कारकुनी पेशाचा असल्यामुळें लो. टिळकांच्याबद्दलचा आदर आणि त्यांच्या प्रतिपक्षांत मोडणाऱ्या व्यक्तीविषयीं तितकाच तिरस्कार हा सारासार विचारापेक्षां विकारावर अधिष्ठित असे.

अशा या टिळक-भक्तांच्या गांवांत आल्यावर वडिलांनीं पहिली कोणती गोष्ट केली असेल तर १९३० सालीं आगरकरांचें चरित्र प्रसिद्ध केलें. आगरकर-चरित्रांत अनेक गुण आहेत किंबहुना वडिलांच्या व्यक्तित्वांतील विविध विशेषांचा सर्वोत्कृष्ट अंश या ग्रंथांत उतरलेला आहे. वडिलांच्या व्यक्तित्वांतील महत्त्वाचा विशेष म्हणजे प्रखरपणा, एक घाव आणि दोन तुकडे करण्याची वृत्ति. 'इष्ट असेल तें बोलणार' या आगरकरी बाण्यानें या चरित्रांतील प्रत्येक वाक्य उतरलेलें आहे. चरित्र प्रसिद्ध झाल्यावर सर्व महाराष्ट्रांत एकच खळबळ उडाली. टीका आणि प्रतिटीका, आरोप आणि प्रत्यारोप आणि केवळ शिव्याशाप यांचें झंझावाती वादळ उठलें. टिळकभक्त असणाऱ्या या गांवांत कांहीं दिवस श्वासोच्छ्वासहि करणें आम्हांस अशक्य झालें असल्यास नवल नाहीं. शाळेंत मराठी दुसरींत किंवा तिसरींत असणाऱ्या माझ्यासारख्या मुलाजवळ वयानें मोठीं पण मनानें माझ्यापेक्षांहि लहान असणारीं अनेक माणसें वडिलांचा तोंडांत येईल त्या शब्दांनीं उद्धार करीत. बापाचीं 'पापें' पुत्राला भोगावीं लागतात हें त्या वेळीं बायबल न वाचतांसुद्धां मला उत्तम पटलें. एकदां रस्त्यावरून जात असतांना एका गृहस्थानें मला गांठलें व "कॉलेजमधील प्रत्येक प्रोफेसर हा देशद्रोही आणि महापाजी असतो," असें मौलिक विधान केलें. आम्ही आमच्याच वडिलांचे चिरंजीव असल्यामुळें 'टिळक हेहि एके काळीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें प्रोफेसर होते,' अशी माहिती त्या महाभागास ताबडतोब पुरविली.

कांहीं दिवसांनीं 'आगरकर चरित्रा' वरचा वाद शमला आणि गांवानें झालें गेलें विसरून आपल्या सार्वजनिक चळवळींत वडिलांचा आदरपूर्वक

आणि यथायोग्य उपयोग करून घेतला. प्रतिवर्षी गांवाचा व्याप वाढत असल्यामुळें अनेक प्रकारचे नागरी प्रश्न आणि अडचणी निर्माण होत होत्या. त्याचा विचार आणि परिहार करण्यासाठीं आणि लोकांना नागरी शिक्षण मिळावें म्हणून वडिलांच्या सूचनेवरूनच लोकमान्य सेवासंघानें नागरी समिति स्थापन केली. १९३० ते ३५ अशीं पहिलीं पांच वर्षें वडीलच या समितीचे अध्यक्ष होते.

मुंबई साहित्य-संघानें १९३५ सालानंतर म्हणजे आपल्या स्थापनेनंतर खुद्द मुंबई शहरांत आणि उपनगरांत अनेक संमेलनें भरविलीं, पण उपनगर साहित्य-संमेलन भरविण्याची पहिली कल्पना वडिलांची. विलेपार्लें, अंधेरी, खार, मालाड वगैरे उपनगरांतील वाङ्मयप्रेमी लोकांशीं विचार-विनिमय करून १९२९ सालीं बडोद्याचे राजकवि (त्या वेळीं ते राजकवि झाले नव्हते.) चंद्रशेखर यांच्या अध्यक्षतेखालीं हें संमेलन मोठ्या यशस्वी रीतीनें पार पडलें. पुढील वर्षी अंधेरीला दुसरें साहित्य-संमेलन फर्ग्युसन कॉलेजमधील गणिताचे प्रसिद्ध प्राध्यापक प्रो. व्ही. बी. नाईक यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. तिसरें साहित्य-संमेलन मालाडला होणार होतें. पण तें झालें नाहीं. अकस्मात् दोन लाटा याव्यात तशीं हीं दोन संमेलनें होऊन गेलीं. 'अकस्मात् आलेली लाट' हें वर्णन तितकेंसें बरोबर नाहीं. या वेळीं मुंबई शहरांतील आणि उपनगरांतील वाङ्मयप्रेमी जनता जागृत होत होती, कार्याला प्रवृत्त होत होती, त्याचीं प्रसाद-चिन्हें म्हणजे हीं दोन उपनगर साहित्य-संमेलनें होत. पुढें रीतसर साहित्यसंघाची स्थापना झाली. डॉ. भालेरावांच्यासारखा धडाडीचा आणि भव्य कल्पनांचा, निरलस आणि उद्योगी कार्यकर्ता या संस्थेला मिळाला. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयहि जागृत झालें आणि या दोन संस्थांच्या छत्राखालीं अनेक नव्या दमाचे कार्यकर्ते एकत्र आले. त्याचें दृश्य फळ आज आपण बघत आहोंत. पण आज मोठा आकार धारण करणाऱ्या उपक्रमांचा प्रारंभ वडिलांच्या प्रेरणेनें

भरलेल्या दोन उपनगर साहित्य-संमेलनांमधून झाला. हें लक्षांत ठेवलें पाहिजे. या दोन साहित्य-संस्थांशीं वडिलांचे संबंध जिव्हाळ्याचे होते.

कॉलेजांत नोकरी धरल्यामुळें आयुष्यांत आणि ' आगरकर-चरित्र ' लिहिल्यामुळें वाङ्मय-क्षेत्रांत वडिलांना एक प्रकारचें स्थैर्य प्राप्त झालें. उमेदवारीचा आणि कष्टांचा काळ संपला आणि स्वास्थ्याचें व उत्कर्षाचें पर्व सुरू झालें. अनेक ठिकाणांहून वडिलांना व्याख्यानांना आमंत्रणें येऊं लागलीं. शाळा, कॉलेजें आणि साहित्यसंस्था यांच्या वार्षिकोत्सवाला अध्यक्ष म्हणून त्यांना पाचारण होऊं लागलें. वडिलांना प्रवासाची, भाषणांची आणि ठिकठिकाणीं असणाऱ्या मित्रांना भेटण्याची मुळांतच हौस असल्यामुळें वडिलांचा होकार हा ठरलेला असे. परत त्यांत गणेशोत्सव, शारदोत्सव आणि गांवगन्ना असणाऱ्या वसंत किंवा हेमंत व्याख्यानमालांची भर पडे. कॉलेजला रजा पडली रे पडली कीं वडिलांचे दौरे जोरानें सुरू होत.

वडिलांचें भाषण ऐकणें हा एक अपूर्व अनुभव असे. तसाच जर विचार केला तर वडिलांच्या लेखणीपेक्षां त्यांची वाणी उजवी होती. त्यांचें बोलणें किंचित् सानुनासिक पण अस्खालित आणि स्पष्ट असें. आवाजावर असणारी त्यांची हुकुमत खरोखर आश्चर्यकारक होती. कितीहि वेळ बोललें आणि कितीहि भाषणें केलीं तरी वडिलांचा आवाज कधीं फाटत नसे किंवा बसत नसे. वडिलांच्या भाषणांत संभाषणामधला घरगुतीपणा, मोकळेपणा व खेळकरपणा असे, नाटकीपणा किंवा कृत्रिमपणा औषधालाहि नसे. मराठी भाषेवर उत्तम प्रभुत्व असल्यामुळें लिहिण्याप्रमाणेंच भाषणांतहि एक डौल असे. विनोदबुद्धीचें देणें वडिलांना भरपूर होतें. यामुळें उपहासप्रधान दाखल्यांचा आणि वाचनांचा वडील भरपूर उपयोग करीत. वडिलांच्या भाषणांत विनोद असे, पण त्यांचीं भाषणें विनोदी नसत. श्रोत्यांना कितीहि हंसविलें तरी भाषणाचें गांभीर्य आणि प्रतिपाद्य विचारांचा परिणामकारकपणा शेवटपर्यंत कायम राही. वडिलांच्या कोणत्याहि भाषणाकडे श्रोत्यांनीं

' दोन घटका करमणूक ' या दृष्टीनें बघितलें नाहीं. यांतच वडिलांच्या वक्तृत्वशक्तीचें आणि व्यक्तित्वाचें सामर्थ्य दिसून येतें. कांहीं वक्ते तत्कालीन लोकप्रिय विषयावर भाषणें करून नांव कमवतात. वडिलांचे बहुतेक विषय हे पथ्यकर पण अप्रिय असत. असा वक्ता दुर्लभ खरा, पण श्रोते भरपूर संख्येनें हजर असत. विनोदाचें वेष्टण असलेलें हें कडू औषध श्रोतृसमुदाय बिनतक्रार प्राशन करीत असे. प्रसंगावधान, हजरजबाबीपणा, बहुश्रुतपणा आणि प्रांजळपणा यामुळें वडिलांचीं व्याख्यानें हीं उत्तम गायकाच्या मैफलीप्रमाणें रंगत आणि ऐकणाऱ्याला धुंद करीत. एकदां ' शृंगार आणि वीर ' या विषयावर भाषण करतांना, ' पहिली रास असणाऱ्या लोकांना या विषयाचें स्वारस्य समजणार नाहीं ' असा त्यांनीं प्रारंभ केला. श्रोत्यांच्या-कडून पहिल्याच वाक्याला टाळी मिळाली. भाषण शेवटपर्यंत चढत आणि रंगत गेलें हें सांगणें नको.

रॉयल ऑपेरा हाउसमध्यें, ' विभावरी शिरूरकर ' वाङ्मयावर आचार्य अत्र्यांचें त्या वाङ्मयाची तरफदारी करणारें आणि प्रतिपक्षीय टीकाकारांची सडकून निंदा करणारें दणदणीत भाषण झालें. अत्र्यांचें भाषण असल्यामुळें अर्थात्च ' हंशा आणि टाळ्या ' यांची पुन्हां पुन्हां फैर झडत होती. अत्र्यांच्या प्रभावशाली भाषणानंतर त्या भाषणांतील प्रत्येक मुद्दा खोडून काढतांना वडिलांनीं अध्यक्ष म्हणून जें भाषण केलें, त्याचें वर्णन 'अलौकिक' या एकाच विशेषणानें करतां येईल. उत्तम भाषणाचे प्रसंग सांगावे तेवढे थोडेच आहेत. पक्वान्नाची चव खाण्यांत आणि भाषणाची गोडी ऐकण्यांत असते, त्यांचीं केलेलीं वर्णनें वाचण्यांत नसते.

याच काळांत वाणीप्रमाणें वडिलांची लेखणीहि अविश्रान्त चालू होती. ' कालिदासाची सृष्टि ' ' श्रीज्ञानदेव ', ' नवी नीति आणि नवें मानसशास्त्र ' आणि ' पानें आणि फुलें ' हा निबंधसंग्रह या सर्वांमधून वडिलांच्या व्यासंगाचें आणि प्रतिभेचें प्रगल्भ स्वरूप प्रगट होतें. येथें

प्रारंभीं आढळणारा वावदूकपणा संपतो आणि अभ्यासानें व अनुभवानें प्राप्त झालेला वृत्तीचा समतोलपणा प्रत्येक वाक्यांत जाणवतो.

मला एका गोष्टीचें मात्र बरेंच आश्चर्य आणि थोडें दुःख वाटतें. अर्वाचीन मराठी वाङ्मयांतील पहिल्या प्रतीच्या निबंधकारांत आणि शैलीकारांत वाडिलांची गणना केव्हांहि करावी लागते. माध्यमिक शाळेपासून तों कॉलेजपर्यंतच्या शिक्षणक्रमावर आधारलेलीं, अनेक लेखकांच्या पुस्तकांतील उतारे असणारीं कितीतरी वेच्यांचीं पुस्तकें निघालीं आहेत. पण त्यांपैकीं एकाहि पुस्तकांत वडिलांच्या लिखाणांतील एकहि उतारा नाहीं! हें वस्तुस्थिति-निवेदन आहे, यावर अधिक विवेचन करण्याचें कारण नाहीं.

वडिलांच्या साहित्यविषयक विधायक कार्याचें एक उत्तम उदाहरण म्हणजे त्यांनीं विल्सन कॉलेजमध्यें गेल्यावर स्थापन केलेली 'वाङ्मय-सेवा-मंडळ' ही संस्था. पुढें प्रख्यात झालेल्या अनेक संशोधकांनीं आणि टीकाकारांनीं आपले पहिले निबंध या वाङ्मयसेवामंडळाच्या सभेंत वाचून दाखविलेले आहेत. वाचनानंतर किंवा भाषणानंतर त्यावर होणारी चर्चा हा प्रत्येक सभेचा एक अविभाज्य भाग असे. या चर्चेमुळें होतकरू लेखकांना उपयुक्त मार्गदर्शन होई. 'वाङ्मय-सेवा-मंडळ' ही खास वडिलांनीं काढलेली आणि संवर्धन केलेली संस्था. वडिलांच्या पिशवींत इतर अनेक गोष्टींच्याबरोबर या संस्थेची वही व पावती-पुस्तक हें हमखास असें. नवीन वक्ता किंवा नवीन श्रोता दृष्टिपथांत आला रे आला कीं वडील पिशवींत लपलेलें आपलें गुप्त शस्त्र ताबडतोब बाहेर काढून समोरच्या सावजाची शिकार करीत. वडिलांच्या वाङ्मयीन उत्कर्षाबरोबर या त्यांच्या संस्थेचाहि उत्कर्ष होत गेला. पण दीर्घकालीन आजारांत तिची आबाळ झाली. आज ही संस्था अक्षरशः 'नाममात्र' जिवंत आहे. १९३८ सालापासून वडिलांनीं आणखी एक उद्योग केला. आपलीं पुस्तकें आपणच प्रकाशित करण्यास प्रारंभ केला. प्रकाशक, मग तो कोणीहि असो, लेखकाला

फसवतो असें अनुभवान्तीं त्यांचें ठाम मत झालें होतें. पुस्तकें लिहिणें, छापवून घेणें आणि तीं खपविण्यासाठीं वर्गणीदार गोळा करणें हें 'त्रैराशिक' वडील धडाडीनें सोडविण्याचा प्रयत्न करीत होते. पण शेवटीं उरणाऱ्या पुस्तकांच्या 'स्थावर' मिळकतीमुळें हा उद्योग त्यांना सोडावा लागला.

१९४० सालानंतर वडिलांचा P. E. N. या आंतरराष्ट्रीय साहित्य-संघटनेशीं संबंध आला. मॅडम सोफाया वाडिया या भारतांतील या संघटनेच्या सूत्रधार होत्या आणि आजहि आहेत. वडील अनेक वर्षें या संघटनेचे कार्यवाह होते. जयपूर आणि बनारस येथ झालेल्या P, E. N. च्या अधिवेशनाची पूर्वतयारी कार्यवाह या नात्यानें वडिलांनाच करावी लागली. पुढें प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांनीं कार्यवाहपदाचा राजिनामा दिला.

जयपूरच्या P. E. N. च्या अधिवेशनांत अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा आढावा घेणारा एक निबंध वडिलांनीं वाचला. या निबंधांत "अजूनहि हरिभाऊ आपटे हे सर्वश्रेष्ठ कादंबरीकार आहेत," अशा अर्थाचें एक विधान केलें होतें. हें विधान तसें प्रक्षोभकहि नव्हतें किंवा खोटेंहि नव्हतें. आज पंधरा वर्षांनंतरहि वरील विधानांत एकाहि कानामात्रेचा फरक करण्याचें कारण नाहीं. पण या विधानाच्या निषेधार्थ कांहीं साहित्यिकांनीं (यांत वरेरकर आणि काणेकर हे प्रमुख होते.) एक जाहीर पत्रक काढलें. यांतहि कांहीं चुकलें असें नाहीं. कारण एकाला जसें मत मांडण्याचा अधिकार तसाच दुसऱ्याला तें मत न पटल्यास त्याचा निषेध करण्याचा व तें खोडून काढण्याचा अधिकार अर्थातच आहे; पण हें पत्रक आणि त्यानंतर वर्तमानपत्रामधून झालेला प्रचार ह्यांत केलेल्या विधानाबद्दल 'जाब' विचारण्याची आणि आपल्याखेरीज कोणालाहि अधिकारवाणीनें बोलण्याचा

हक्कच नाहीं अशा प्रकारच्या असहिष्णु वृत्तीचा दर्प येत होता. साहित्य-संघ या संस्थेनें आपण कोणी कोर्ट आहोंत अशा थाटांत आपली बाजू मांडण्यासाठीं वडिलांना पाचारण केलें. वडिलांनीं अर्थात्च या “ गोमा-गणेशांना ” धूप घातला नाहीं.

निद्रानाशामुळें वडिलांची प्रकृति त्यांना कल्पनाहि नव्हती इतक्या झपाट्यानें ढासळूं लागली. झोपेच्या गोळ्या घेण्यापासून तों टबमध्यें बसून गरम पाण्यानें रोज आंघोळ करण्यापर्यंत सर्व उपाय करण्यांत आले. पण जवळ जवळ दीड ते दोन वर्षें निद्रेनें वडिलांच्या बरोबर संपूर्ण असहकार पुकारला होता. वडिलांच्या अगोदरच असणाऱ्या आग्रही स्वभावाचें हळूहळू हटवादांत रूपांतर झालें. वडिलांचें पहिल्यापासून वागणें हें घरांत—बाहेर नव्हे—‘ त्रस्तसमंधा’सारखें असे. वृत्तींत स्थिरपणा असा नांवालाहि नव्हता. ‘ मनःपूतं समाचरेत् ’ हें वचन चांगल्या अर्थानें ( व्यासंगाचा भाग सोडल्यास ) आणि वाईट अर्थानेंहि वडिलांनीं जन्मभर आचरणांत आणलें होतें. याचीं कितीतरी उदाहरणें देतां येतील. आतां हसूं येतें, पण त्या वेळीं मात्र आमची विशेषतः माझ्या आईची व आजीची जी त्रेधा उडत असे त्याचें वर्णन करणें अशक्य नसलें तरी उचित होणार नाहीं. या अस्थिरपणाचें द्योतक म्हणजे वडिलांचें आगगाडीवर असणारें अपरंपार प्रेम. आम्ही पार्ल्याला असतांना कॉलेजसाठीं रोज चर्नीरोडपर्यंत आगगाडीनें प्रवास घडतच असे. पण कॉलेजमधून घरीं परत आल्यावर केवळ वेळ जात नाहीं म्हणून अनेक वेळां संध्याकाळीं वडील चर्चगेटपर्यंत आगगाडीमधून परत फेरफटका करून येत. ‘ घरगुती प्राण्यांत ’ वडिलांची गणना होणें अशक्य होतें. एक गप्पा सोडल्यास वडिलांना बैठा नाद असा कसलाच नव्हता. पत्ते, सोंगट्या, बुद्धिबळें, बगीचा, इ० सर्व नादांचा वडील रिकामटेकडे उद्योग म्हणून उपहास करीत. पण स्वतः निवृत्त किंवा रिकामटेकडे झाल्यावर त्यांना या नादांची महती पटली.

आजार चालू असतांनाच वडिलांनीं एका मोठ्या सत्कृत्यांत केवळ मित्रप्रेमामुळें भाग घेतला. रे. डॉ. बी. पी. हिवाळे हे विल्सन कॉलेजमधील वडिलांचे अनेक वर्षांचे सहकारी आणि मित्र. १९४७साली त्यांनीं अहमद्‌नगर येथें कॉलेज काढण्याचा संकल्प सोडला. प्रथम अनेकांनीं मदत करूं म्हणून घवघवीत आश्वासन दिलें, पण प्रसंग आला तेव्हां डॉ. हिवाळ्यांना 'प्रत्येकाला आपला सूळ आपल्याच खांद्यावर वागवावा लागतो. (Each has to bear his own cross) या बायबलमधील वचनाची चरचरीत प्रचीति आली. पैसा फार थोडा, प्रतिष्ठा फक्त व्यक्तीपुरती मर्यादित, पण डॉक्टर-मजकुरांचा 'भाव तेथें बळ' या वचनावर गाढा विश्वास होता. डॉ. हिवाळे यांनीं एकट्यांनीं कॉलेज काढलें आणि तें काढतांना केवळ एक उत्तम कार्य आपला मित्र करतो आहे, या भावनेनें वडिलांनीं मदत केली. वडिलांच्या अधिकारीवर्गांत आणि मोठ्या माणसांत असणाऱ्या ओळखीचा या वेळीं फार उपयोग झाला. आज 'अहमद्‌नगर कॉलेज' हें 'पुणें विद्यापीठांतील' एक अग्रेसर आणि सर्वतोपरीनें संपन्न असें कॉलेज आहे. पण या कॉलेजच्या बाळंतपणाच्या बऱ्याच खस्ता ज्या चालकांना खाव्या लागल्या त्यांत वडील कॉलेज बोर्डाचे एक सभासद म्हणून व डॉ. हिवाळ्यांचे मित्र म्हणून सहभागी होते. वडील अहमद्‌नगर कॉलेजच्या इतर गोष्टी सांगत, पण आपण त्यांत काय केलें, ही 'आत्मश्लाघा' त्यांत नसे. वडिलांच्या मृत्यूनंतर डॉ. हिवाळ्यांनीं कॉलेजच्या जन्माची आणि त्यांत वडिलांनीं केलेल्या कार्याची सगळी हकिगत आम्हांला सांगितली. वडिलांच्या हातून घडलेलें हें शेवटचें विधायक कार्य.

१९५० सालीं म्हणजे कॉलेजमधून निवृत्त होण्याच्या वेळीं वडिलांनीं एक वानप्रस्थाश्रम असावा म्हणून लोणावळें येथें 'घर बांधून बघितलें.' पण वाढत्या आजारामुळें या घराचा उपभोग वडिलांना फारसा म्हणजे जवळ जवळ मुळींच घेतां आला नाहीं.

१९५१ सालीं निवृत्त होतांना वडिलांचा त्यांच्या आजी आणि माजी विद्यार्थ्यांनीं रँग्लर परांजपे यांच्या अध्यक्षतेखालीं मोठा सत्कार घडवून आणला. महामहोपाध्याय काणे, प्रो. हरिभाऊ वेलणकर, रँग्लर महाजनी, आचार्य अत्रे, इ. अनेक वक्त्यांचीं त्यांच्या गौरवपर भाषणें झालीं.

वडिलांच्या आठवणी लिहाव्यात तेवढ्या थोड्याच आहेत. शब्दांच्या मुठींत मावण्याइतका वडिलांचा मोठेपणा क्षुद्र नव्हता. शिवाय कांहीं आठवणी लिहिण्यासाठीं असतात. कांहीं आठवणी आप्तस्वकीयांत आणि सुहृज्जनांत सांगण्यासाठीं असतात, तर कांहीं आठवणी या केवळ आपल्यासाठीं आणि आत्मचिंतनासाठीं असतात. अशा प्रकारच्या स्मृति या शब्दातीत असतात. आणि त्यांचें मर्म व सौंदर्य हें प्रेमाप्रमाणेंच ' अनुभवी चित्तचित्त जाणें ' असें असल्यामुळें हें ' शेवटचें पान ' येथेंच पुरें केलेलें बरें.

मनोहर माधव अळतेकर

# परिशिष्ट : २ – इंग्रजी पत्रव्यवहार

26, Hamilton Road,
Allahabad,
May 1, 1941

My dear Altekar,

Many thanks for your letter of April 29. My health has been better than when you saw me for the simple reason that the winter has passed. Summer is already very severe and it brings its own trials. But they are in my case less taxing than those which accompany winter. It is for this reason that I have for some time been enabled to dictate a few articles and paragraphs for the LEADER. I thank you for your good opinion of two of them.

I did not admire the attiude of Sir Chimanlal Setalvad towards the Bombay Conference, particularly his statement on the morrow of Mr. Amery's obnoxious speech. I am certain that such a thing would not have been done by Sir Pherozeshah Mehta or Mr. Gokhale. By the way, can you tell me why Sir Chimanlal after having asked me and a number of others to sign the Liberal leaders' statement in reply to British politicians backed out of it ? He wired that he could only state the reasons when we met. But Kunzru told me yesterday evening that he had met Sir Chimanlal and asked for the reasons. But Sir Chimanlal evaded the question and would not answer it. In case you can throw light on this I shall be glad.

Convey my **Pranams** to your mother and remember me to Mrs. Altekar and your son.

With kindest regards for yourself,

I am
Yours sincerely,
**C. Y. Chintamani**

10, Albuquerque Road,
NEW DELHI
10th January 1939.

Dear Professor Altekar,

Your kind letter of congratulations dated the 6th reached me while in Bombay. I am very thankful to you for your kind sentiments.

I realise all that you say about my being lost to public and political life. But, as you are aware, there is hardly any scope in it for a man of my political views and sentiments. I shall, however, be available whenever occasion arises, giving scope for persons of my views. But in the meanwhile I thought it better to be serviceable in another department of public life, namely, on the bench first of the Federal Court and later on of the Judicial Committee. I am expecting to do useful work while I am there, but I agree that the delight of public life cannot be compared with the quiet wisdom of a judicial tribunal.

I shall be thankful if you will send me from time to time your publications, for I can assure you that though not a literary man, I take delight in reading Marathi books composed by persons for whom I have esteem. Only please take the trouble to send me your productions by V. P. P., for I do not want you to suffer pecuniarily on account of your kindness to me.

I hope to be in Bombay before leaving for England and hope to meet you then.

With best wishes,

I am
Yours sincerely,
**M. R. Jayakar**

21, Woodburn Tee
Edinburgh–10
Oct 6th. 1959

Dear Dr. Altekar,

I was very sorry to hear of the passing away of your father, and I am writing to express to your mother and to you my sincere sympathy. You will, I am sure, feel this loss very very deeply.

I remember your father very clearly, and my husband and I were always glad when he came in to see us. He often came in on Saturday morning and had a cup of tea with us and I remember when he brought you with him when you were a small boy and I am glad you are in College teaching Marathi and I hope you are happy there.

We liked your father very much and always found his conversation interesting and very frank.

I think your family is related to the Mahajani family, formerly of Fergusson College in Poona.

Your Dr. Mahajani was in Edinburgh for a year and he came to see me now and again. And in June when I was south on a visit to my sister I met him at St. Albans' where he is working in the City Hospital and we had Lunch together, He is a very nice lad.

I hope you and your family and your mother are all well.

With kind regards and my sympathy,

Yours sincerely,

**A. McKenzie**

P. S.

I am always glad to see friends from India and many students come to Edinburgh. So if any of your friends ever come do give them my address.

A. F. M.

☆ ☆ ☆

Municipal Corporation Office,
Bombay 4th September 1959.

From,

Shri. A. P. Wagle, B. A.,
Municipal Secretary.

To,

Dr. M. M. Altekar, M. A., Ph. D.

Sir,

I have to communicate to you the following Resolution passed by the Municipal Corporation of Greater Bombay, at their Meeting held on the 24 th August 1959, with reference to the lamented death of your father, the late Professor Madhav Damodar Altekar;—

"That the Municipal Corporation of Greater Bombay have learnt with deep regret the sad news of the death which took place in Bombay on Thursday, the 20 th August 1959, of Professor Madhav Damodar Altekar, who was a Professor of Marathi literature in the Wilson College, Bombay, for over 25 years and who was a great scholar and an eminent writer in Marathi

literature, a powerful orator and a keen social worker, and who in these and various other capacities rendered valuable services to the City and in whose death the City has lost an eminent social worker and a veteran educationist and and an erudite scholar in Marathi literature.

2. I have also to convey to you the Corporation's sympathy with you and your family in your sad bereavement and to state that as a mark of respect to the memory of your father, the Corporation adjourned without transacting any business that day.

Yours faithfully
Sd/– **A. P. Wagle**
Municipal Secretary.

दा. क्र. ९९२०६

# कै. प्रो. माधव दामोदर अळतेकर
# यांचें वाङ्मय

| | |
|---|---|
| अपराध कोणाचा ? | सामाजिक कादंबरी |
| ललिता | सामाजिक कादंबरी |
| शांताराम | सामाजिक कादंबरी |
| मुक्तबंध | सामाजिक कादंबरी |
| गोपाळ गणेश आगरकर | चरित्रात्मक निबंध |
| अंतरंग | सामाजिक कादंबरी |
| निरंकुश | |
| नवें मानसशास्त्र आणि नवी नीति | |
| कालिदासाची सृष्टि | |
| श्रीज्ञानदेव | |
| पानें व फुलें–भाग पहिला | ( निबंध ) |
| पानें व फुलें–भाग दुसरा | ( लघुकथा व कविता ) |

• •

# सूचि

अळतेकर प्रो. अ. स. १३६, १३७.
अळतेकर कृष्णा १, १८, ३०, ४१, ४४, ४५, ६०, ६२, ६६, ७०.
अळतेकर (आई) लक्ष्मीबाई १, १८, १९, २३, ४१ ४३, ४४, ४५, ४६, ४८, ५५, ६२, ६५, ६६, ७०, ९०.
अळतेकर दामोदर श्रीपत १८, १९, २०.
अळतेकर शंकर दामोदर १८, ३५, ४६.
अळतेकर सौ. मालतीबाई माधव (कृष्णाबाई) ४८, ५५, ६०, ६२, ७०, ९०.
आझर दि. ब. गोविंदराव १०९.
आपटे प्रो. रघुनाथराव १४, २९, ३९.
आपटे हरि नारायण ४२, ४४, ६५, ८४.
आठवले पार्वतीबाई ४७, ६५.
आंबेकर बापूराव ५०, ५१, ५५, १३५.
आगरकर गोपाळ गणेश ६०, ६४, ६५, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८३, ८४, ८५, ९१, १४४, १४५.
ऑंकार भास्करराव ४६, ४७.
कुंभोजकर गणेश विठ्ठल १, ५, ७६.
कर्झन लॉर्ड १५, २१.
कळेकर रघुनाथराव १६, २०.
कानिटकर प्रि. केशवराव १३८.
काळे प्रो. वामनराव १३८.
कारखानवीस डॉ. ४३.
कर्वे प्रो. धोंडोपंत केशव ४७,
कुलकर्णी नारायणराव ५५, ५६, ५७.
कुलकर्णी मंगेशराव १४४.
कुंझरू, प. हृदयनाथ ५७, ५८.
कोल्हटकर अच्युत बळवंत ७६, ८३.
कामत नामदार बी. एस्. ८३, ८८, ८९.
काळे रावबहादूर १०७, १०८.
काळे प्रो. वामन गोविंद ८३, ८८, १३४,

कोल्हटकर श्रीपाद कृष्ण ८४, ८५.
केळकर नरसिंह चिंतामण ८४, ८८, ८९, १४१, १४७, १५१, १५२, १५४.
केळकर रा. ब. नारायणराव ११७.
कोठारी वालचंद ८९.
खरे डॉ. ना. भा. ११७.
खापर्डे गणेश श्रीकृष्ण ऊर्फ दादासाहेब ३७.
खांडेकर गोपाळराव ६१.
साठ्ये प्रिन्सिपॉल ६३.
खाडिलकर कृष्णाजी प्रभाकर ६४, ८४, ८५.
खेर बाळासाहेब १५२.
गरुड भय्यासाहेब १०८, ११४.
गोखले विष्णु कृष्ण १, ७, ३६, ४२, ४८, ६५, १२०.
गोखले गोपाळ कृष्ण ४, १५, १६, २२, २३, ३७, ४९, ६४, ६५, ६७, ७०, ८६, ९६, १५४.
गोखले नारायण विष्णु ६८, ९४.
गडकरी राम गणेश ७५, ७६, ८४, ८५.
गांधी महात्मा ८६, १४२.
घोरपडे श्रीमंत इचलकरंजीकर २३.
घोष डॉ. रासबिहारी ३७.
चाटरजी ए. सी. ५१, ५२.
चंदावरकर सर नारायण गणेश ७३, ७५, ७७, ७८, ८०, ८१, ८४, ९२, ९४, ९५, ९६, ९९, १००.
चिंतामणि ९७, १११, १२०, १२१, १३३, १३५, १५१.
चंद्रशेखर कवि १४८, १४९.
जावजीशेट तुकाराम ३.
जावडेकर रावसाहेब २२, २४, २५, ३५, ४१, ४४, ४७, ५४, ५५, ६२.
जोशी प्रो. वामन मल्हार ४१, ४२, ११६.
जयकर बॅरिस्टर मुकुंद रामराव ४९, ७४, ८०.
जोशी नारायण मल्हार ६३, ७२, ९४.
जोशी सर मोरोपंत ११६, १३९
जव्हेरी, शेठ गुलाबचंद देवचंद ९१, ९२, १०६, १११, ११९.
जिना बॅ. महंमद अली ९४, १४१
टिळक बाळ गंगाधर १६, २७, ३७, ४१, ६०, ६४, ६७, ६८, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८३, ८६, ८८, ८९, ९७, ९८, १४४, १५४.
टेंबे गोविंदराव ३९.

देवधर गोपाल कृष्ण ६७, ८९, ९४.
नवरोजी दादाभाई ३०.
नेहरु पं. जवाहरलाल १४२.
नेहरु पं. मोतीलाल ६८, १०१, १४२.
नाईक वसंत नारायण ७३, ७४, ८१, ९१.
नामजोशी वेणूबाई ८०.
पटवर्धन श्रीमंत बाळासाहेब, मिरज ५, ६.
परांजपे शिवराम महादेव १४, ४१.
पंडित महाराज २७, ३८, ४३, ४५.
पंतप्रातिनिधि श्रीमंत बाबासाहेब ३५, ४५, ४७.
परांजपे, रँग्लर रघुनाथ पुरुषोत्तम ४६, ४७, ४८, ४९, ५२, ५९, ७३, ७४, ७८, ८०, ८३, ८६, ८९, ९२, १३१, १३४, १३८, १४५.
परांजपे सौ. सीताबाई रघुनाथ ४८.
परांजपे कु. शकुंतला ४८, ४९.
पटवर्धन वामनराव ५०, ९८.
पाध्ये के. अ. ११८.
पाध्ये रावबहादुर दामोदर गणेश ५३, ६०, ६१, ६३, ८२, १३४.
पाटील सदानंद सदोबा ५८, ६३, ६६, ८८.
प्रधान रामचंद्र गणेश ७४, ८०, ८६.
पटवर्धन प्रो. वासुदेव बळवंत ८३.
पानसे प्रो. ८३.
पेटिट जहांगिर बोमनजी ९३, ९४.
पटेल बॅ. विठ्ठलभाई ९४, ९५, १०१, १४१.
बानर्जी सर सुरेंद्रनाथ १०१.
बालकवि १३.
बालगंधर्व ३८, ३९, ४३, ४५.
बेझंट ॲनी ९६, ९७, ९८.
भांडारकर डॉ. रामकृष्ण गोपाळ ८, २३.
भाजेकर डॉ. ३२, ३३.
भाटे प्रो. गो. चिं. ७४, ८०, ८५, १४३.
भालेराव डॉ. ८४.
मॅकेंझी डॉ. १३०, १३२.
मराठे कृष्णराव ९, १५, २८.
मुनशी कन्हय्यालाल १५२.
मेहता कृष्णराम ११०.
मेहता सर फेरोजशहा २१, ३७, ५१, ५२, ५३, ६४, ७०, ७१, ९३.
मोर्ले जॉन ३६, ३७.
मालवीय पं. मदनमोहन ५८, १३६, १३७.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३००५२ वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

मॅकीकन डॉ. ७४, ७७.
मित्र काशिनाथ रघुनाथ ७४.
महाजनी रावबहादुर विष्णु मोरेश्वर ७४.
मॉंटेग्यु ९५, १०१.
यंदे शेट दामोदर सावळाराम ६०, ८२.
रुईकर डॉ. वामन बाजी, २, २३, ३३.
रुईकर सौ. लक्ष्मीबाई वामन २.
रानडे न्या. महादेव गोविंद २, ३, २१, ७६.
रुईकर बापूरावकाका ४, १४, १५, १६, १७, १९, २०, २२, २३, २४, ३६, ६२, ११५.
रुकडीकर विद्वच्छिरोमणि गणेश, शास्त्री ८, ९.
रानडे रामभाऊ १०, ४२.
रुईकर रामभाऊ बापूराव ३६, ६२.
रहिमतुल्ला सर इब्राहिम ५२, १०३, ११३.
रुईकर गणपति बापूराव ६२.
ल्यूसी प्रिन्सिपॉल १६.
लठ्ठे प्रो. अण्णा बाबाजी २९.
लिमये हरिभाऊ ८१, ८३.
वाड डॉ. १५७.
विजापूरकर विष्णु गोविंद ऊर्फ अण्णासाहेब १६, २१, २२, २३, २४, २६, २७, ३०, ४१, ४२, ४४, ५०, ५५, ६०, ८२, ८५.
विशाळगडकर श्रीमंत बाबासाहेब २५, ५३, ५४, ५५, ५७, ५८, ५९, ६०, ६१.
वाच्छा सर दिनशा ३७, ७१, ९२, ९३, ९५, १००, १०६, ११२, १२०.
वर्दे श्रीपाद महादेव ६३.
वर्दे दिनकरराव ६३, ७१.
वेलणकर प्रो. ह. दा. १३४, १३८, १४०.
शेवडे शिवरामपंत ४०, ५४.
शिराळकर पांडुतात्या ५५.
शास्त्री नामदार श्रीनिवास ६४, ९६, ११५, ११७, १४६.
सोवनी डॉ. विठ्ठलराव ४८, ९२.
सिडनहॅम लॉर्ड ४९.
साठे नामदार ५२, ८९.
सप्रू सर तेजबहादुर ५८, १२०, १४२.
सेटलवाड, सर चिमनलाल ९३, ९४, ९५, १००.
समर्थ नारायण महादेव ९३, ९५, १००.

☆☆

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें स्थळप्रत,
३०५०८ २१० नों: दि: ९३।५।५९

REFBK-0011608
REFBK-0011608